म. ग्रं. सं. ठाणे
नं.



REFBK-0021686

# माझ्या आठवणी

**वत्सला साहित्य प्रकाशन**

वर्ष दुसरें (१९४०)

**टॉलस्टॉयच्या गोष्टी**

किंमत १२ आणे

**माझ्या आठवणी व अनुभव**

किंमत २ रुपये

**गेलीं पंचवीस वर्षें**

किंमत १ रुपया

**वार्षिक दोन रुपये वर्गणींत**


साहित्य
प्रकाशन

वत्सला साहित्य प्रकाशन : पुष्प ६ वें

# माझ्या आठवणी व अनुभव

( कर्मवीर विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिन्दे यांचें आत्मचरित्र )

REFBK-0021686

प्रथमावृत्ति ] किंमत २ रुपये [ १५ ऑगस्ट १९४०

प्रकाशक :

जयवन्त बाबुराव जगताप, बी. ए. ( ऑनर्स )

संपादक व प्रकाशक– ' वत्सला साहित्य प्रकाशन '

१२४८ शुक्रवार पेठ, पुणे शहर.

सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन

मुद्रक :

लक्ष्मण भाऊराव कोकाटे, ' हनुमान प्रेस '

३०० सदाशिव पेठ, पुणे २.

# " आठवणी " पूर्वी—

**वत्सला साहित्य प्रकाशन** मालेचें " माझ्या आठवणी व अनुभव " हें सहावें पुस्तक आम्ही आज वाचकांस सादर करीत आहोंत. मौलिक लिखाण, माफक किंमत व मोहक छपाई या मालेच्या ध्येयाला हेंही पुस्तक ओतप्रोत उतरलें असल्याचा वेगळा निर्वाळा देण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

**मराठमोळा** या प्रासंगिक पुस्तकास प्रस्तावना देतांना गुरुवर्य शिन्दे यांनीं जो बहुमोल उपदेश केला त्याचेंच 'माला' हें दृश्यफळ होय. चटोर वाङ्मयामुळें भारदस्त वाङ्मयाची गळचेपी झाली आहे आणि म्हणूनच मोहक छपाईत व माफक किंमतींत भारदस्त वाङ्मय प्रकाशित करणारी संस्था निघाली पाहिजे, असा त्यांनीं पटवून दिलेला उपदेश, ध्येय म्हणून पुढें ठेवून आम्हीं त्वरीत मालेच्या कार्यास सुरुवात केली. मालेनें पहिल्या वर्षीं जीं चार पुस्तकें प्रकाशित केलीं तीं सर्व तंतोतंत याच ध्येयाप्रमाणें निघालीं असल्याचें ग्राहकांच्या निदर्शनास आलें असेलच.

याच सुमारास गु. शिन्दे यांनीं स्वतः लिहिलेल्या चरित्राबद्दलची गुणगुण आम्हांस लागली. बृहन्महाराष्ट्रास आपल्या कर्तृत्वानें, स्वभावानें व वाणीनें प्रिय झालेल्या गुरुवर्यांसारख्या विभूतीचें चरित्र प्रकाशित करण्याचा मान मालेला मिळावा म्हणून आम्हीं लगेच त्या लिखाणाची मागणी केली. आमचे उभयतांचे पूर्वसंबंध पितापुत्रवत् प्रेमानें निगडित झाल्यानें अर्थातच आमची इच्छा ताबडतोब पूर्ण झाली. या कामीं आम्हाला आमचे गुरुबंधु श्री. रविन्द्र शिन्दे यांची फारच मदत लाभली. किंबहुना त्यांच्या मदतीविना हें पुस्तक प्रसिद्धच झालें नसतें. त्यांनींच हें लिखाण उजेडांत आणून त्यांत अण्णासाहेबांकडून बरीचशी भर घालवून पूर्ण स्वरुपांत आम्हांला दिलें. चरित्रासारखी महत्त्वाची बाब मजसारख्या अननुभवी प्रकाशकाचें स्वाधीन केल्याबद्दल व लिखाण पूर्ण करून दिल्याबद्दल अनुक्रमें पितापुत्रांचें आम्ही मनस्वी आभारी आहोंत.

साध्या व सोप्या भाषेंत अगदीं लहानपणापासूनच्या बारीकसारीक गोड आठवणी गुरुवर्यांनीं दिल्या आहेत. त्यांत अर्थातच कसल्याही प्रकारचा आडपडदा नाहीं. सोपी वाक्यरचना, सखोल अर्थपूर्ण योग्य शब्द आणि मार्मिक विनोद यामुळें लिखाण वाचनीय झालें आहे.

तथापि दुर्दम शारीरिक परिस्थितींत सध्या गुरुवर्य असल्यानें, नोकरी-मुळें रविंद्र यांना पुणें सोडावें लागल्यानें व बी. टी. च्या अभ्यासास्तव आम्हासही कोल्हापुरास जाणें भाग पडल्यानें आम्हां तिघांपैकीं एकासही संपूर्णतेनें मुद्रितें पहातां आलीं नाहींत. या व अशा अनेक कारणांमुळें मजकुराच्या प्रकरणांचा विस्कळीतपणा फारच राहिला आहे आणि नजर-चुकीनें महत्त्वाचीं अशुद्धेंही उरलीं आहेत म्हणून वाचकांनीं कृपा करून शुद्धीपत्रक अवश्य पाहावें अशी आमची त्यांना नम्र विनंति आहे. मुद्रण-दोष, वाक्यदोष, सुसंगतपणाचा अभाव, अपूर्णता वगैरे दोषांबद्दल अर्थातच आम्ही कारणीभूत आहोंत. त्याबद्दल गुरुवर्यांना दोष देणें म्हणजे उपरिनिर्दिष्ट परिस्थिति नजरेआड करणें होय. बृहन्महाराष्ट्रांतील लहान-थोरांनीं या कृतीचें भरपूर स्वागत केलें तरच या पुस्तकांचा महत्त्वाचा उत्तरार्ध – गुरुवर्यांच्या सार्वजनिक जीवनकार्याचा वृत्तांत वाचकांपुढें सादर करण्यास आम्हांस उत्साह नि हुरूप येणार आहे. गुरुवर्यांच्या चहात्यांनीं आम्हांस या कामीं सहानुभूति व मदत करावी अशी विनंति आहे.

प्रस्तुत पुस्तकाचीं मुद्रितें श्री. मा. र. कारले, शिक्षक श्रीशिवाजी मराठा हायस्कूल, पुणें यांनीं तपासून दिलीं आहेत. श्री. कारले यांच्यामागें कामाचा व्याप मोठा असतांना देखील आमचें काम झटपट करून दिलें व तसेंच माझे मित्र श्री. शंकरराव पंडीत यानीं हें पुस्तक पूर्ण होण्याचें कामीं बरीच मदत केली. याबद्दल आम्ही ह्या दोघांचें आभारी आहोंत.

मालेच्या ग्राहकांनीं पूर्ववत् आपुलकीच्या भावनेनें कार्याविषयीं सहानुभूति दाखवावी व आर्थिक साहाय्य करावें अशी आशा प्रगट करून तूर्त रजा घेतों.

१२४८ शुक्रवार पेठ,
पुणें शहर.
श्रावण वद्य ७ शके १८६२.

वाचकांचा नम्र,
**जयवन्त बाबुराव जगताप.**

# संपादकीय खुलासा

ग्वाल्हेरच्या रिसाल्यांत नौकरी करीत असतां अपघातानें मला दुखापत झाली. त्यामुळें रजा घेऊन मी गेल्या हिंवाळ्यांत पुण्यास घरीं आलों. आजारामुळें जरी दुबलता होती तरी लिहिण्या-वाचण्याइतकी शक्ति आली पण करमेना म्हणून माझे तीर्थरूप अण्णासाहेब शिंदे यांचे कागद-पत्र चाळण्याची परवानगी घेतली. त्यांत त्यांच्या "बाळपणाच्या आठवणी" हें सुंदर लिखाण मला मिळालें. शिवाय त्यांच्या अनेक रोजनिशा आणि पत्रव्यवहार यांतून त्यांनीं लिहिलेला बराच मजकूर आढळला.

१९३० सालच्या कायदेभंगाच्या मोठ्या चळवळींत तीर्थरूप अण्णा-साहेबांनीं स्वतः भाग घेतल्यानें त्यांना ६ महिने सक्त मजूरीची शिक्षा झाली. ते येरवड्याच्या तुरुंगांत असतांना त्यांना रात्रीं थोडा वेळ मिळे. तेव्हां स्वतःच्या करमणुकीसाठीं तुरुंगाच्या अधिकाऱ्यांकडून लेखनसाहित्य मागवून या "आठवणीचा" बराच भाग त्यांनीं लिहिला होता. ता. २४ जुलै १९३० ते ता. १४ ऑक्टोबर १९३० रोजीं त्यांची सुटका होईपर्यंत रात्रीच्या एकदोन तासांत त्यांनीं त्या आठवणी लिहिल्या. रात्रीं विजेचा दिवा उशिरा लागून लवकरच एकदम मालविला जाई, त्यामुळें एकंदर लिखाणाला बराच विस्कळितपणा आला होता. हें लिखाण पुढें कधीं प्रसिद्ध होईल याची अण्णांना कल्पनाही नव्हती. केवळ आपल्या करमणुकीसाठीं किंवा फार तर आपल्या घराण्यांतील माणसांच्या माहितीसाठी त्यांनीं हा मजकूर लिहिला होता. तुरुंगांतून सुटका झाल्यावरही त्यांनीं त्यांत भर घातली नाहीं व तिकडे लक्ष दिलें नाहीं. यावरून त्याचे त्यांना फारसें महत्त्व वाटलें नाहीं हें सिद्ध होतें. पण मी जेव्हां हे लेख वाचूं लागलों तेव्हां वाच-कांना हे लेख मनोरंजक व बोधप्रद होतील असें मला कळून आलें. ह्या खुल्या दिलाच्या कथानकांत वाचकांना एक नवीनच वाङ्मय लालित्य आढळेल, म्हणून ते तसेच धूळ खात ठेवणें मला बरें दिसेना. ह्या त्यांच्या इतर आठवणींची जुळवा-जुळव करून ती प्रसिद्ध करण्याची अण्णांची परवानगी मागितली आणि ती त्यांनीं नाहीं होय म्हणतां दिली.

या आठवणींतील प्रत्येक शब्द अण्णांच्याच लेखणींतून किंवा मुखांतून उतरला आहे. त्यांच्या कॉलेजांतील शिक्षणाच्या काळापर्यंतचा मजकूर तुरुंगांतच लिहिला गेला आहे. १८९८ सालापासून ते आपली रोजनिशी



रविंद्रराव शिंदे.

लिहूं लागले. विशेषेंकरून विलायतेंत लिहिलेल्या रोजनिशीची फार मदत झाली आहे. अण्णांनीं स्वतः लिहिलेलीं पत्रें जरी मिळत नाहींत तरी त्यांना आलेलीं पत्रें नीट सालवार जुळवून ठेवण्यांत आलीं आहेत. त्यांचाही उपयोग झाला. याशिवाय इतिहास, भाषाशास्त्र, धर्म आणि तत्त्वज्ञान, सामाजिक सुधारणा आणि लोकशिक्षण इत्यादि गंभीर विषयांवर वर्तमानपत्रें व मासिकें यांतून प्रसिद्ध झालेले अण्णांचे मोठमोठे निबंध नीट राखून ठेवण्यांत आलेले आहेत. पण आतां प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें अण्णांना स्वतः कांहींच करतां येत नाहीं. कंपवातामुळें दोन्ही हात एकसारखे हालत असल्यानें त्यांना लिहवत नाहीं. आणि गेल्या जानेवारींत डोळ्यांतील मोतीबिंदू काढल्यानें त्यांची दृष्टि फार अधू झाली आहे, म्हणून त्यांना वाचवत देखील नाहीं. तशांत गेल्या ४।५ वर्षांपासून त्यांना जडलेला मधुमेहाचा विकार आहेच. अशा स्थितींत फारशी सुधारणा होण्याची आशा दिसेना म्हणून त्यांच्या आठवणींचा पूर्वार्ध लवकरच प्रसिद्ध करण्याची आवश्यकता वाटूं लागली.

१९०३ सालीं विलायतेहून परत येऊन प्रार्थनासमाजाच्या प्रचाराच्या कामाला सुरवात करून अण्णांनीं आपल्या सार्वजनिक आयुष्याला आरंभ केला. त्यावेळी ते ३० वर्षांचे होते. यापुढील त्यांच्या सार्वजनिक कामाचें महत्त्व जरी अधिक असलें व ते लिहून प्रसिद्ध करण्याचीं साधनें भरपूर असलीं तरी तें लिहिण्याचें काम अंगावर घेऊन करणारा तज्ञ तूर्त तरी, कोणी पुढें येईलसें दिसत नाहीं. अशा वेळीं माझे वर्गमित्र रा. जयवंतराव जगताप ह्यांनीं हा पूर्वार्ध प्रसिद्ध करण्याची सर्व हमी आपल्याकडे घेतल्यामुळें मी त्यांचा फार आभारी आहें. शिवाय या पूर्वार्धांतील खासगी माहिती अण्णाशिवाय कोणालाही नसल्यानें त्यांची स्मरणशक्ति शाबूत आहे तोंपर्यंतच हें काम उरकून घेणें अत्यंत आवश्यक होतें. ही कृति लोकादरास पात्र होऊन पुढील प्रयत्नास उत्तेजन मिळेल अशी आशा आहे. माझ्या पूज्य पित्याची अल्पशी सेवा माझ्या हातून घडविली याबद्दल मी देवाचा आभारी आहें.

सेकंड लान्सर्स
बडोदें,
ता. १ जून १९४०.

—रविंद्र विठ्ठल शिंदे.
संपादक

# प्रस्तावना

**मृदुना दारुणं हंति मृदुना हंत्यदारुणम् ।**
**नासाध्यं मृदुना किंचित् तस्मात्तीव्रतरं मृदु ॥ ३२ ॥**

—वनपर्व २८ अध्याय.

धर्म—द्रौपदी संवादांतील बळी आणि प्रल्हाद ह्यांच्या संवादांत, प्रल्हाद आपला नातू बळी ह्याला म्हणतोः— " मऊपणा ( दये ) नें कठिणाला जिंकतां येतें; मऊपणानें अकठिणाला तर जिंकितां येतेंच. मऊपणाला असाध्य असें कांहींच नाहीं. म्हणून मऊ ( दया ) हें तीक्ष्णाहूनही अधिक तीक्ष्ण होय ! "

आतां मी सत्तराचें वरांत जाऊं लागलों आहें. जगाच्या दोन पिढया तर माझ्या पाहून झाल्या. तिसरी किती पाहीन तें भविष्य मात्र जाणें. माझ्या आयुष्याचें सार जर काढावयाचें असेल, तर वर महाभारतकारांनीं प्रल्हादाच्या तोंडीं जो उद्गार घातला आहे, तोंच सार माझ्या आयुष्यांतील अनुभवाचा आहे. महात्मा गांधी ह्यांच्या अहिंसावादाची ही तन्मात्राच होय. असा कठीण अनुभव मला करूं लागल्यापासून – निदान माझ्या सार्वजनिक कामांत तरी मला पदोपदीं आला. ह्यावरून मी स्वभावतः मृदु आहें, असें सांगण्याचा माझा हेतु नाहीं. जी वस्तुस्थिति नाहीं ती आहे असें मी कसें सांगूं ? तसें मी म्हणेन तर पुढें ज्या आठवणी व अनुभव मीं लिहिले आहेत, तीं सर्व असत्यमिश्र आणि म्हणून कवडी मोल ठरतील. माझा जन्म – स्वभाव मृदु नसून कठीण होता. दारुण नसला तरी कठीण होता हें खरें. निदान वरील श्लोकांतल्याप्रमाणें मृदु तरी नव्हताच हें खास. पण माझ्या आयुष्यांत विशेषतः माझ्या प्रौढपणांत जीं जीं कामें मीं केलीं, सत्याचीं, धर्माचीं आणि निर्मळ प्रेमाचीं म्हणून त्यांची धुरा माझ्या दुर्बल खांद्यावर घेतली त्यांत मला कठीण अनुभव आला ! त्यामुळें आतां मी पूर्णपणें नाहीं तरी अंशतः बराच मऊ झालों आहें. आणि ह्यांत माझ्या सेवेचें फळ मला मिळालें, असें समजून मी जगच्चालकाचाच नव्हे तर जगाचाही आभारी आहें.

माझ्या कामांत मला यश मिळालें नाहीं म्हणून मला कठीण अनुभव

आला असें नव्हे. यशाची मला आकांक्षाच नव्हती. यशाची मला नीट व्याख्याच करितां येत नाहीं तर मी त्याची इच्छा तरी कशी करूं? माझ्या कामांत माझ्या साथीदारांचा, इतरांचा, फार काय ज्यांच्यासाठीं मी घरदारही कमी समजून तीं तीं कामें करीत होतों, त्यांचाही माझ्यासंबंधीं गैरसमज, दुराग्रह, नव्हे उघड विरोधही झाला. हाच माझ्या अनुभवाचा कठीणपणा किंवा दारुणपणा होय. ह्यामुळें माझ्या मनाची शांति ढासळली आणि अकालीं बहुतेक स्वीकृत कामांतून मी विराम पावलों. मात्र धर्माचा प्रचार ह्या माझ्या अस्सल कामांतून मी विराम पावणें शक्यच नाहीं; कारण मी धर्माचा स्वीकार केला हें खरें नसून, धर्मानेंच माझा स्वीकार केला, अशी माझी समजूत असल्यामुळें ह्या शरीरांतून विराम पावेपर्यंत तरी धर्मानें मला पछाडलें आहेच व पुढेंही तो मला अंतरणार नाहीं, ही मला आशा आहे.

माझ्या अनुभवांतून मी वाचलों आहें व मला निर्वाण जरी नाहीं तरी मनाला थोडीबहुत अलीकडे शांति मिळत आहे. कारण मी मृदु होऊं लागलों हेंच होय. माझीं कामें कठीणपणानें होण्यासारखीं नव्हतींच. पण मीं जर प्रथमपासूनच मृदुपणानें हीं सर्व कामें केलीं असतीं तर इतके कठीण अनुभव आले नसते, ते स्वभावदोषामुळें आले. त्या सर्वांतून मी पार पडलों ह्याचें कारण मी माझ्या कामामुळें मृदुतेचे धडे— मला कळत, किंबहुना नकळतही— शिकलों हें खास. जी मृदुता माझ्या-मध्यें स्वभावतः नव्हती, केवळ कामामुळें आली, ती माझ्या आईमध्यें मूर्तिमंत होती; आणि तिच्याद्वारें ती मजमध्यें मला नकळत कां होईना आली होती. येरवीं तिचे धडे मी कामामुळें तरी शिकण्यास कसा पात्र झालों असतों? ह्याप्रमाणें ह्या विश्रांतीच्या गेल्या ७ वर्षांत माझें लक्ष माझ्या पूर्वजांच्या चरित्राकडे गेलें.

माझ्या कांहीं पक्षपाती मित्रांनीं मला स्वतःचें चरित्र लिहिण्याची सूचना व आग्रह बराच वेळा केला होता. पण तशी माझी पात्रता व लौकिक दृष्ट्या जरूरी मला वाटेना. जगांत ग्रंथ – प्रकाशनाचें काम आतां इतकें बेसुमार वाढलें आहे कीं त्यांत आणखी एका गबाळ ग्रंथाची भर टाकण्याचें धैर्य मला अद्यापि येत नाहीं. असो.

ह्या इ. स. १९३० वर्षीं चालू झालेल्या भारतीय धर्मयुद्धांत मी कसाबसा पडलों. तो तपशील सांगण्याचें हें स्थळ नव्हे. शेवटीं त्याचें फळ म्हणून माझ्या सुदैवानें ता. १२ मे १९३० सोमवारीं सायंकाळीं ७ वाजतां मी येरवडयाच्या तुरुंगांत जाऊन पडलों. तेथें मी सुखी होतों. ज्या दिवशीं मी तेथें गेलों त्या दिवशीं वैशाख पौर्णिमा—श्रीगौतमबुद्धजयन्ति—होती ! ह्या सुमुहूर्तावर मी ह्या शांती मंदिरांत आलों. मला सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा मिळाली होती. रोज ८ तास काथ्या वळण्याचें काम करावें लागलें त्यामुळें माझी प्रकृति बरी होऊन माझी खरी कुरकुर कांहींच उरली नाहीं. पण सायं-काळीं अंधाऱ्या खोलींत कोंडल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं पुनः कामासाठीं दार उघडेतोंपर्यंत माझा वेळ जात नव्हता. मी लिहिण्याचें सामान घरून मागितलें. रात्रीं दिवा असेल अशा खोलींत मला कोंडण्याची विनंति केली. पण हें सर्व होण्यास २॥ महिने गेले ! केवळ माझ्या करमणुकी-साठीं म्हणून मी ह्या माझ्या आयुष्यांतील "आठवणी व अनुभव" तुरुंगांतील खोलींत लिहिल्या आहेत. बोध तर दूरच राहो, पण नुसती करमणूकही इतरांची होईल, असें मला वाटत नाहीं. तसा माझा हेतूच नाहीं.

पुढील प्रकरणें म्हणजे माझीं केवळ असंबद्ध टिपणें आहेत. विशेष माझ्या पूज्य मातापितरांचें व इतर पूर्वजांचें पुण्यस्मरण ह्या एकांतवासांत व्हावें, व मनाची लाडकी हळहळ मिटावी म्हणून मी लिहिण्यास सुरुवात केली. पुढें पुढें माझ्या केवळ आठवणींपेक्षां माझ्या लहानपणींच्या अनुभवाचे महत्त्व चरित्रशास्त्राच्या दृष्टीनें मला भासूं लागलें म्हणून माझे चरित्राच्या गोष्टी लिहूं लागलों. आतां ह्या लेखाचें तारूं कोणीकडे भडकतें आणि कोणत्या बंदराला पोचतें— कां मध्येंच लहरीच्या वाऱ्यावर हेलकावे खात एकाद्या खडकावर आपटते ह्या पुढच्या गोष्टी. तोंपर्यंत प्रस्तावनाही येथेंच पुरें करणें बरें नव्हे ?

"यल्लभसे निजकर्मोपात्तं । वित्तं तेन विनोदय चित्तं ॥"

रामविहार, १२९२ शिवाजी नगर, पुणें ५.
ता. २३ एप्रिल, १९४०

वि. रा. शिन्दे

# अनुक्रमणिका

## भाग पहिला– पूर्वज ( १ ते ४१ )


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें : | माझे आजोबा .... .... .... | १ |
| ,, | २ रें : | माझी आजी .... .... .... | ८ |
| ,, | ३ रें : | आजोळ .... ... ... | १६ |
| ,, | ४ थें : | माझे बाबा ... ... ... | २२ |
| ,, | ५ वें : | माझी आई ... ... ... | २९ |


## भाग दुसरा – प्राथमिक शिक्षण ( ४२–६५ )


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | ६ वें : | आमचीं लग्नें ... ... ... | ४२ |
| ,, | ७ वें : | वडील भावाचा मृत्यु ... ... ... | ४६ |
| ,, | ८ वें : | खडतर पांच वर्षें ... ... ... | ५२ |
| ,, | ९ वें : | बालपण ... ... ... | ५७ |
| ,, | १० वें : | माझें प्राथमिक शिक्षण ... ... | ६१ |


## भाग तिसरा – दुय्यम शिक्षण ( ६६–१०० )


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | ११ वें : | माझा हायस्कूलचा काळ ... ... | ६६ |
| ,, | १२ वें : | माझे सोबती ... ... ... | ७३ |
| ,, | १३ वें : | माझे खेळ ... ... .... | ७९ |
| ,, | १४ वें : | माझ्या खोड्या ... .... ... | ८६ |
| ,, | १५ वें : | कांहीं संवयी आणि वागणूक ... ... | ९४ |

ह्या इ. स. १९३० वर्षीं चालू झालेल्या भारतीय धर्मयुद्धांत मी कसाबसा पडलों. तो तपशील सांगण्याचें हें स्थळ नव्हे. शेवटीं त्याचें फळ म्हणून माझ्या सुदैवानें ता. १२ मे १९३० सोमवारीं सायंकाळीं ७ वाजतां मी येरवडयाच्या तुरुंगांत जाऊन पडलों. तेथें मी सुखी होतों. ज्या दिवशीं मी तेथें गेलों त्या दिवशीं वैशाख पौर्णिमा–श्रीगौतमबुद्धजयन्ति–होती ! ह्या सुमुहूर्तावर मी ह्या शांती मंदिरांत आलों. मला सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा मिळाली होती. रोज ८ तास काथ्या वळण्याचें काम करावें लागलें त्यामुळें माझी प्रकृति बरी होऊन माझी खरी कुरकुर कांहींच उरली नाहीं. पण सायंकाळीं अंधाऱ्या खोलींत कोंडल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं पुनः कामासाठीं दार उघडेतोंपर्यंत माझा वेळ जात नव्हता. मी लिहिण्याचें सामान घरून मागितलें. रात्रीं दिवा असेल अशा खोलींत मला कोंडण्याची विनंति केली. पण हें सर्व होण्यास २॥ महिने गेले ! केवळ माझ्या करमणुकीसाठीं म्हणून मी ह्या माझ्या आयुष्यांतील " आठवणी व अनुभव " तुरुंगांतील खोलींत लिहिल्या आहेत. बोध तर दूरच राहो, पण नुसती करमणूकही इतरांची होईल, असें मला वाटत नाहीं. तसा माझा हेतूच नाहीं.

पुढील प्रकरणें म्हणजे माझीं केवळ असंबद्ध टिपणें आहेत. विशेष माझ्या पूज्य मातापितरांचें व इतर पूर्वजांचें पुण्यस्मरण ह्या एकांतवासांत व्हावें, व मनाची लाडकी हळहळ मिटावी म्हणून मी लिहिण्यास सुरुवात केली. पुढें पुढें माझ्या केवळ आठवणीपेक्षां माझ्या लहानपणींच्या अनुभवाचे महत्त्व चरित्रशास्त्राच्या दृष्टीनें मला भासूं लागलें म्हणून माझे चरित्राच्या गोष्टी लिहूं लागलों. आतां ह्या लेखाचें तारूं कोणीकडे भडकतें आणि कोणत्या बंदराला पोचतें– कां मध्येंच लहरीच्या वाऱ्यावर हेलकावे खात एकाद्या खडकावर आपटतें ह्या पुढच्या गोष्टी. तोंपर्यंत प्रस्तावनाही येथेंच पुरें करणें बरें नव्हे ?

" यल्लभसे निजकर्मोपात्तं । वित्तं तेन विनोदय चित्तं ॥ "

रामविहार, १२९२ शिवाजी नगर, पुणें ५.
ता. २३ एप्रिल, १९४०

**वि. रा. शिन्दे**

# अनुक्रमाणिका

## भाग पहिला– पूर्वज ( १ ते ४१ )


| | | |
|---|---|---|
| प्रकरण | १ लें : माझे आजोबा .... .... .... | १ |
| ,, | २ रें : माझी आजी .... .... .... | ८ |
| ,, | ३ रें : आजोळ .... ... ... | १६ |
| ,, | ४ थें : माझे बाबा ... ... ... | २२ |
| ,, | ५ वें : माझी आई ... ... ... | २९ |


## भाग दुसरा – प्राथमिक शिक्षण ( ४२–६५ )


| | | |
|---|---|---|
| प्रकरण | ६ वें : आमचीं लग्नें ... ... ... | ४२ |
| ,, | ७ वें : वडील भावाचा मृत्यु ... ... ... | ४६ |
| ,, | ८ वें : खडतर पांच वर्षें ... ... ... | ५२ |
| ,, | ९ वें : बालपण ... ... ... | ५७ |
| ,, | १० वें : माझें प्राथमिक शिक्षण ... ... | ६१ |


## भाग तिसरा – दुय्यम शिक्षण ( ६६–१०० )


| | | |
|---|---|---|
| प्रकरण | ११ वें : माझा हायस्कूलचा काळ ... ... | ६६ |
| ,, | १२ वें : माझे सोबती ... ... ... | ७३ |
| ,, | १३ वें : माझे खेळ ... ... .... | ७९ |
| ,, | १४ वें : माझ्या खोड्या .... .... ... | ८६ |
| ,, | १५ वें : कांहीं संवयी आणि वागणूक ... ... | ९४ |

## भाग चौथा— धर्मभावनेचा विकास ( १०१–१३७ )

प्रकरण १६ वें : माझ्या एकांत सहली ... ... ... १०१
,, १७ वें : माझें वाचन ... ... ... १०३
,, १८ वें : पोरवयांतील माझी धर्मभावना ... ... १०७
,, १९ वें : मूर्तिपूजा ... ... ... ११७
,, २० वें : भावी सामाजिक सुधारणेची तयारी ... १२८

## भाग पांचवा— कॉलेज शिक्षणाचा काल ( १३८–१८६ )

प्रकरण २१ वें : कॉलेज प्रवेश ... ... ... १३८
,, २२ वें : प्रिव्हीयसचें वर्ष .... ... .... १४३
,, २३ वें : इंटरमिजिएटचें वर्ष ... ... ... १५२
,, २४ वें : शोध व दर्शन ( पदवीग्रहण ) ... १७३

## भाग सहावा— परदेशगमन व धर्मशिक्षण ( १८७–२३१ )

प्रकरण २५ वें : विहंगावलोकन ... ... ... १८७
,, २६ वें : माझें बिऱ्हाड ... ... ... १९०
,, २७ वें : मँचेस्टर कॉलेज ... ... ... १९३
,, २८ वें : खेळकर वृत्ति ... ... ... १९८
,, २९ वें : कांहीं टिपणें ... ... ... २०२
,, ३० वें : परत प्रवास ... ... ... २२५
पुरवणी नंबर १ : रोजनिशींतील वेंचे ... ... ... २३२
,, नंबर २ : मॅन्चेस्टर कॉलेजचे दाखले ... ... २४४

---

खुलासा— यापैकीं पहिली तेवीस प्रकरणें खुद्द गु. शिन्दे यांनीं येरवड्याच्या तुरुंगांत असतांना लिहिलीं असून बाकीचा मजकूर आमचे मित्र श्री. रविंद्रराव शिन्दे यांनीं केवळ आमचेसाठींच म्हणून वडिलांचीं पत्रें, रोजनिश्या वगैरे इतर बाबींवरून तयार केला आहे.

# वत्सला साहित्य प्रकाशन

—मुद्रित—

१ प्रसाद
२ मराठमोळा
३ गुंतागुंत
४ अधःपात आणि इतर गोष्टी
५ प्रौढांचें शिक्षण व साक्षरता प्रसार
६ जुईच्या कळ्या
७ टॉलस्टॉयच्या गोष्टी
८ माझ्या आठवणी व अनुभव ( पूर्वार्ध )
९ मुंबई ते कलकत्ता
१० महात्मा फुले चरित्र
The History of English Literature

—अमुद्रित—

१ गेलीं पंचवीस वर्षें
२ माझ्या आठवणी व अनुभव ( उत्तरार्ध )
३ मुंबई ते रामेश्वर

*' शिक्षक ' प्रकाशित*

१ माझी शाळा
२ अध्यापनाचा परिचय
३ शाळा कशी चालवावी

# माझ्या आठवणी व अनुभव

## ( पूर्वार्ध )

इ. स. १८७३ ते १९०३ पर्यंतचा वृत्तान्त



सन १९२८ सालीं पुणें येथें विट्ठलराव
मुंबई इलाखा शेतकरी परिषदेचे अध्यक्ष असतांना घेतलेला फोटो.

# माझ्या आठवणी व अनुभव

## भाग पहिला : ‘पूर्वज’

### प्रकरण १ लें

#### माझे आजोबा

अर्थात् माझ्या घराण्यांतील मीं पाहिलेला सर्वांत वडील मनुष्य म्हणजे माझे आजे बसवंतराव. त्यांचे मेहुणे व्यंकटराव ( व्यंकप्पा ) हे माझ्या आजींचे सख्खे भाऊ. हे माझ्या आजीपेक्षां मोठे होते. पण हे आजोबांपेक्षां लहान कीं मोठे हें मला ठाऊक नाहीं. हे आमच्या आजोबांच्या आश्रयाखालीं आमचेच घरीं रहात असत. त्यांची मला फारच अंधुक आठवण आहे. आमचे घरीं एक मोठा काळा म्हातारा पाठाळ बैल यल्लमादेवीला वाहिलेला ( कंठाळीचा बैल ) होता. त्यावरून त्याला कठल्या बैल असें नांव होतें. त्याचेवर ओझें लादून व्यंकप्पा आमचे मळ्यांतून रोज घरीं येत. हीच माझ्या आयुष्यांतील अगदीं पहिली आठवण होय. व्यंकप्पा फार सात्त्विक, साधे व सहनशील होते. आमचे आजे बसवंतराव नेहमीं त्यांची चेष्टा करीत व तिकडे केवळ

**पहिल्या आठवणी**

दुर्लक्ष करून व्यंकप्पा केव्हांतरी गंभीरपणानें उत्तर देत. ह्यावेळीं मी फार तर तीन किंवा चार वर्षांचा असेन.

जमखंडी माझ्या जन्मभूमीचा गांव. हा कृष्णानदीचे दक्षिणेस ४॥ मैलांवर, विजापूरचे पश्चिमेस ३६ मैलांवर व कुडची ( एस्. एम्. आर्. ) स्टेशनापासून ३३ मैलांवर आहे. विजापूरपैकीं लिंगायत तेली जातीच्या देसायांचा हा मूळ गांव. पटवर्धनांनीं त्याच्यापासून हा प्रांत जिंकून घेतला.

अप्पा दप्तरदार नांवाचे एक श्रीमंत ब्राम्हण गृहस्थ जमखंडीचे यजमान रावसाहेब ( गोपाळराव ) पटवर्धनाचे वेळीं होते. त्यांचा कदाचित् आश्रय आमच्या आजोबांस असावा. कारण त्यांचाच मळा जो जमखंडीचे पूर्वेस आलगुरच्या वाटेवर दोन मैलांवर होता, तो आमच्या आजोबांकडे लागवडीस पुष्कळ वर्षें होता. आमचे राहाते घराची जागाही ह्या दप्तरदारांनींच दिली असें मीं ऐकत होतों. पण माझ्या जन्मानंतर हा जुना संबंध कदाचित् आधींच पुष्कळ वर्षें तुटलेला असावा. हा मळा मात्र माझे जन्माचे वेळींही आमचेकडेच होता. ह्या मळ्याला 'अप्पांचा मळा' असें माझे लहानपणीं म्हणत असत. आतां तो अगदीं उद्ध्वस्त झाला आहे.

**चंद्रोजीराव**

आजोबांचे वडील चंद्रोजीराव हे मारले जाऊन त्यांच्या सर्व घराण्याचा नाश झाला ! ते विजापूरपैकीं सुरापुरचे राहणारे. ही लढाई परशुरामभाऊ पटवर्धन ह्यांनीं जिंकली असें इतिहासकार खरेशास्त्री ह्यांनीं एका केसरीचें अंकांत लिहिलें आहे. चंद्रोजीराव शिंदे हे जर सुरापूरचे जहागिरदार असतील तर हें शक्य आहे. पण ते आतां कळण्यास मार्ग नाहीं. सौंदत्ति येथें १२ व्या शतकांत शिंदे घराण्याचें राज्य होतें. त्या घराण्यांतील कोणी पुरुष सुरापूरचा जहागिरदार असल्यास चंद्रोजीरावाचा संबंध शोधून काढण्यास जागा आहे. पण माझे वडील जिवंत असतांना मला आपल्या वंशावळीचा शोध करण्याचा विचारही सुचला नाहीं. आतां तर गोष्टी फारच जुन्या ठरल्या !

माझे आजोबा एका नदीचे कांठीं अगदीं लहानपणीं पोरके आढळले. ही नदी कृष्णा असावी. पुढें त्यांना जमखंडीचे देसायांनीं पाळलें. कारण पोर पाणीदार व होतकरू होतें. देसाई हे लिंगायत असल्यानें त्यांनीं या मुलाला लिंगायत होण्याला सांगितलें, तेव्हां हा तर मराठा; मांस खाणारा म्हणून ह्याला हें धर्मांतर न आवडून तो देसायाच्या घरांतून निघून कदाचित वर सांगितलेल्या दप्तरदाराचा मळा करून स्वतंत्र राहूं लागला असावा.

आमचे घरीं त्यावेळीं फक्त आमच्या आजोबांना व बाबांना मराठी येत होतें. बाबांचें मराठी शिक्षण मुलकींत मराठी भाषेत त्यावेळचे मानानें उत्तम झालें होतें. आजोबांना लिहितांवाचतां येत होतें असें मला वाटत नाहीं. कारण मी त्यांना वाचतांना कधीं पाहिलें नाहीं. ते फार पाणीदार व कर्तृत्व-वान पुरुष होते. शरीर सडपातळ, उंच, वर्ण चांगला गोरा, डोळे लाल, भिवया कोरलेल्या, एकंदर उठावदार आकृति होती. त्यांचा पोशाख अस्सल दरबारी मराठेशाहीचा—तंगदार पांढरी विजार, घोळदार अंगरखा, वत्ती पांढरी बिन पिळाची, मिशा झुपकेदार शुभ्र लांब व ताठ. एकंदर रुबाब मनांत भरण्यासारखा होता. पुरुष हिकमती व विनोदी होता.

**एक हिकमत**

ह्याबद्दलची एक गोष्ट आमची आई सांगत असे ती अशी—आजोबा एकदां प्रवासास गेले असतां एका घरीं उतरण्यास जागा मागूं लागले. पण त्या घरची बाई मोठी खाष्ट होती. तरी तेथेंच उतरण्याचा आजोबांनीं निश्चय केला. नाहीं होय म्हणतांना बाईनें गोठ्यांत उतरण्यास जागा दिली. सायंकाळीं बाईनें आपल्या मुलास न्हाऊ घालून पाळण्यांत निजविलें. एक झोका देऊन बाई आंत कामास गेली. पण मूल कांहीं केल्या रडण्याचें थांबेना. बाई झोके देऊन जाई, पण मुलानें केवळ आकांत मांडला. पुन्हा बाई येऊन मुलास हातांत घेई, आंजारी गोंजारी पण जशी जशी ती त्यास रंजविण्यास इकडे तिकडे खालवर करी, तसतसें तें पोर अधिकच चरफडूं लागलें. शेवटीं

घावरून आजोबांकडे मुलास कांहीं उपचार सुचल्यास करण्या करितां बाई दीन वाणीनें आली. आजोबांनीं मुलास मांडीवर घेऊन त्याचे पोटावरून व पाठीवरून हात फिरविला, तोंच मूल स्वस्थ झालें व हसूं खेळूं लागलें. हा चमत्कार पाहून बाईला फारच आश्चर्य वाटलें व आनंद झाला. ती आजोबांच्या पायां पडूं लागली. तिनें लगेच घरांत चांगलीशी जागा देऊन आजोबांस दोन दिवस सत्कारानें मेजवानी दिली.

आजोबांची करामत अगदीं साधी होती. न्हालेल्या मुलाला पाळण्यांत घालून बाई आंत गेल्यावर, आजोबा पाळण्याजवळ जाऊन मुलाच्या कुल्यांत अगदीं नाजूक जागीं एक सराटयाचा लहानसा कांटा खोवून ठेवून आल्यानें, मुलाची तळमळ उडाली होती. जेव्हा बाईनें मूल आजोबांच्या मांडीवर दिलें, तेव्हां आजोबांनीं मुलाचे पाठीवरून हात फिरवीत असतां बाईची नजर चुकवून तो सराटयाचा कांटा काढून घेतल्याबरोबर मग मूल कशाला रडतें ? बाईला मात्र आजोबा मोठे अवलिया वाटले.

ते मोठे धोरणी व बहुश्रुतही होते. बसप्पा अथणी नांवाचा एक श्रीमंत लिंगायत

**बसप्पा अथणी**

वाणी गृहस्थ माझ्या बाबांचा मोठा मित्र होता. व्यापारांत खोट आल्यानें दिवाळें निघण्याची पाळी आली म्हणून जंगलांत फांस लावून आत्महत्त्या करण्यास तो निघाला असतां, माझे वडील रामजी बाबांनीं त्यास अडविलें व त्यास धीर देऊन घरीं आणिलें. आणि आमचे घरांतील हजारों रुपये नगद व आमचे आईचे मौल्यवान दागिने बसप्पाचे पदरांत टाकून त्याचा जीव व अब्रू वांचविली. पण पुढें त्यानें हें विश्वासाचें कर्ज संपूर्ण फेडलें नाहीं. हा सर्व प्रकार वृद्ध आजोबांना मुळींच आवडला नाहीं. एकंदरींत आमच्या वडिलांचा अव्यवहारी, उदार व विश्वासू स्वभाव आजोबांना पसंत नव्हता. आपला मुलगा संसारांत फसून दुःखांत दिवस काढणार हें त्यांचें भाकित

पुढें अक्षरशः खरें ठरलें. तरी आजोबा जिवंत असेपर्यंत आमचें घराणें चांगल्या सुबत्ततेंत होतें.

**बेहिशेबी उधारी**

बसप्पाच्यानें कर्ज फेडवेना म्हणून त्याच्या दुकानांतून आमचे घरीं सर्व वाणसौदा उधार येत होता. बसप्पा वरचेवर आमचे वडिलांकडे बसावयास येत असत. तेव्हां आजोबा मला जवळ बोलावून माझ्या हातावर साखरी काजू ठेवून खालील स्वकृत कानडींतील एक फटका शिकवीत. आणि हा फटका म्हणत बसप्पाजवळ जाण्यास मला सांगत.

ग्यांगड ग्यांगण्णा । आडकी संगण्णा ।
वंद कोट्टु मूरु बरी अण्णा ॥ १ ॥

ह्याचा थोडक्यांत अर्थ असा आहे कीं, संगण्णा नांवाचा वाणी एक देऊन तीन आपल्या वहींत लिहितो. हा टोमणा बसप्पाच्या उधारी खात्यावर होता. अशी खोटी उधारी लिहून बसप्पा कर्ज फेडणार हा ध्वनि ह्या फटक्यांत होता.

बसप्पा ज्या ज्या वेळीं घरीं येई त्या त्या प्रत्येक वेळीं तो माझ्या हातावर थोडी खडीसाखर ठेवी. मी लहानपणीं मोठा गुटगुटीत व गोजीरवाणा होतों असें सांगतात. घरीं येत ते सर्व माझ्यावर प्रेम करीत.

एके दिवशीं आजोबांनीं शिकविलेला हा नवीन कानडी फटका माझ्या बोबड्या शद्वांत म्हणत वेडेवांकडे हातवारे करीत मी बसप्पाजवळ गेलों. जवळच माझे बाबा बसले होते. ते रागानें म्हणाले, " अरे विठ्या, कायरे, हें कोणीं तुला शिकविलें ? आँ ! " " मला आजोबांनीं शिकविलें, " असें म्हणून मी धूम ठोकून आजोबांचे कुशींत दडून बसलों.

**लष्करी पेशा**

आजोबांनीं कधीं कोणाची खाजगी नोकरी केलेली मला माहीत नाहीं. त्यांचा धंदा शेतकीचा. पण तीहि त्यांनीं प्रत्यक्ष हातानें केली असेलसें वाटत नाहीं. मात्र ते मान्यतेनें व सुखवस्तु असे रहात असत. मी जेथें जन्मलों तें रहातें

घर आजोबांच्या म्हातारपणीं माझ्या आबांनीं बांधलें होतें. आमची जागा व वाडा ‘ लक्कन केरी ’ नांवाच्या तळ्याचें कांठीं होतीं. हें तळें फुटून आमचें जुनें घर त्या पुरांत बुडालें. नंतर तें पुन्हा कदाचित् आमचे वडिलांनीं माझे जन्माचे पूर्वीं बांधलें असावें. माझ्या आजोबांचा रयतावा चांगला होता. लोक त्यांना सुभेदार म्हणत. सन १८५७ सालचे बंडापूर्वीं रामचंद्रराव अप्पासाहेब यांचे वेळीं तासगांवाहून मराठ्यांचीं कांहीं घराणीं जमखंडीच्या रिसाल्यांत आलीं होतीं. त्यांना सुभेदार असें म्हणत. त्यांतच आमचे आजोबांची गणना होत असावी. ह्यावरून त्यांनीं लष्करांत कोठेंतरी सुभेदारी केली होती असा तर्क करण्यास जागा आहे.

आजोबांचे वेळीं आमच्या घराण्यांत लष्करी पेशा होता, ह्याचा एक पुरावा मीं लहानपणीं प्रत्यक्ष पाहिला. इ. स. १८५७ सालच्या बंडांत इंग्रजी लष्कर जमखंडीस आल्यावर लोकांकडून आपली खाजगी हत्यारें जमिनींत पुरून ठेवण्यांत आलीं. तशीं आमच्या वाड्यांतही आमचीं हत्यारें पुरलीं होतीं. पुढें हत्यारांचा कायदा केल्यानें हीं हत्यारें तशींच पुरलेलीं होतीं. आजोबा वारल्या-वर मी इंग्रजी शाळेंत असतांना माझ्या वडिलांनीं आमच्या वाड्याच्या एका जुन्या भागाची जमीन उकरून हीं हत्यारें पाहिलीं. तलवारी व कट्यारी अगदीं गंजून निकामी झाल्या होत्या. ढाली वगैरेंचे लोखंडी खिळेच गंजलेले सांपडले. त्या हत्यारांत बंदुकी अजिबात नव्हत्या.

आजोबांविषयीं एक आख्यायिका आमची आई सांगे. ती अशी कीं, एकदां आजोबांनीं गोसाव्याचें सोंग घेऊन कांहीं महत्त्वाचे कागदपत्र व टपाल दुसरीकडे लांबचा प्रवास करून पोंचविलें. शिवाय आजोबांच्या लष्करी साहसाच्या, तरुणपणाच्या व फाकडेपणाच्या कांहीं गोष्टी आम्हांला लहान असतांना सांगून आई आमची करमणूक करीत असे.

शेवटीं शेवटीं आजोबांना वृद्धपणामुळें अगदीं दिसेनासें झालें. ते आपल्या खोलींतून बाहेर सोप्यांत जेथें माझा पाळणा बांधला असे तेथें भिंतीला

दुसरे दिवशीं सकाळीं आईचे स्वप्नाबद्दल आश्चर्य करीत सर्व मंडळी नदीवर दसपिंडीच्या विधीला गेली. मीहि त्यांच्यांत होतों.

आजोबा वारण्यापूर्वी १–२ महिने माझी बहीण जनाक्का जन्मली होती.

**जनाक्का**

आजोबांना दिसत मुळींच नव्हतें. ते एक दिवस पाळण्याजवळ येऊन तान्ह्या जनाक्काला हातानें चांचपून पाहूं लागले आणि उद्गारले कीं, "हां ! बिद्री कासव्वाने अदाळ." जमखंडीपैकीं बिद्री नांवाचा एक पेट्याचा गांव आहे. तेथील कासव्वा ( काशीबाई ) नांवाची एक ब्राह्मणाची बाई आजोबांच्या ओळखीची असे. ती फार लठ्ठ असे. जनाक्का लहानपणीं फार बाळशामुळें लठ्ठ असे; म्हणून कासव्वाप्रमाणें आहे असा आजोबांचा उद्गार होता.

---

# प्रकरण २ रें

## माझी आजी

**संताबाई**

जमखंडीचे आग्नेयीस मुधोळचे बाजूला निंगनूर ( लिंगन + ऊर = लिंगाचें गांव ) नांवाचें देसायाचें एक खेडें आहे. ही माझ्या आजीची व तिचा भाऊ व्यंकप्पा ह्यांची जन्मभूमि. आमच्या घराण्याची म्हणजे बसवंतरावांची कुलदेवता तुळजापूरची अंबाबाई. तेथील भोपे भाऊराव कदम हे आमचे आश्रीत. ह्यांच्या वहींत आजोबांचें नांव बसवंतराव आणि आजीचें संताबाई असें आहे, असें मला स्वतः भाऊराव कदम ह्यांनीं सांगितलें. पण ह्या कानडी मुलखांत

## माझी आजी

आमच्या आजाआजीला लोक बसप्पा व सत्यव्वा असें म्हणत. माझ्या आजीचा स्वभाव करारी व कांहीं अंशीं तामसी होता. तिची माहेराकडील कुलदेवता सौंदत्तीची यल्लमा होती. हा संबंध सौंदत्तीच्या शिंदे घराण्याकडे जातो. पण तुळजापूरची अंबाबाई ही खरी अस्सल मराठ्यांची देवता. आमच्या देव्हाऱ्यावर ह्या दोन्ही देवता असत. पण आजी धार्मिक व आग्रही असल्यामुळें घरीं यल्लामाचें प्रस्थच फार असे. तरी भाऊराव कदम आपला हक्क गाजविण्यास वरचेवर येतच.

आजी वर्णानें काळी, रूपानें राकट पण संसारांत शहाणी, फार उद्योगी व कर्तृत्ववान होती. तिचें माहेर फार गरीब दिसतें, येरवीं तिचा भाऊ आमचे घरीं कां राहतां? इतकेंच नव्हे तर त्याचा एकुलता एक मुलगा शिद्दु आमच्याच घरीं लहानाचा मोठा झाला. शिद्दु हें नांव कर्नाटकी मराठ्यांत असतें. एकंदरींत बसवंतरावाचा विवाह त्यांच्या आपत्कालीं झालेला दिसतो. त्यांचा स्वभाव विनोदी व सहिष्णु असल्यामुळें घरगुती बाबी त्यांनीं बहुतेक आजीकडेच सोंपविल्या होत्या. आणि ती कष्टाळू व कर्तृत्ववान असल्यामुळें शेतवाडी, घर, देवधर्म वगैरे सर्वच कारभार स्वतः पहात असे. आमचे आजोबा फारसे धार्मिक दिसले नाहींत. एकंदरींत आजोबांत मराठ्याचीं व आजींत कर्नाटक्याचीं लक्षणें भरपूर दिसत. आजी खेडवळ व राकट कुणबाऊ, तर आजोबा नागरिक दरबारी गुलहौशी दिसत. पोरकेपणामुळें व जमखंडी संस्थान ब्राह्मणी पडल्यामुळें बिचाऱ्या बसवंतरावाचा खानदानीपणा बराच खालीं उतरला.

पुढें त्यांचे एकुलतेएक चिरंजीव, माझे वडील रामजीबाबा ह्यांनीं आपल्या सुशिक्षणानें आणि आपल्या खंबीर लेखणीच्या जोरावर आमचा खानदानीपणा पुनः वर उचलला. तथापि पुढें तलवारीचे दिवस अजिबात गेल्यामुळें जुन्या मराठमोळ्याला आमच्या घराण्यांत ब्राह्मणी तऱ्हा व कारकुनी वळण लागलें.

आजोबांचे मागून १।२ वर्षांनीं आजी वारली. पण तिच्या मला फारशा गोष्टी आवडत नाहींत; ह्याचें कारण तिचा मला फार लळा नव्हता व ती नेहमीं शेताच्या व घरच्या कामांत गुंतलेली असे. तिचा स्वभावहि प्रेमळ नव्हता. ती घरीं शेताचा कापूस आल्यावर तो वटून त्याचें सूत स्वतः कातून तो कोष्ट्याला देऊन लुगडीं विणवून घेत असे. पुढें आम्हांला गरिबी आल्यावर माझी आईहि सूत कांतून प्रपंच कसा तरी भागवीत असे.

**पोरकट चोरी**

दूधदुभतें करण्यांत आजी फार वाकब असे. घरच्या दुभत्याचें लोणी कढवून एक गाडगें भरून सुंदर साजूक तूप फडताळांत आजीनें एकदां ठेविलें होतें. माझ्या बाबांची एकुलती-एक बहीण आंबाबाई तेव्हां आमचे घरींच दुष्काळा-मुळें राहात असे. भागुबाई नांवाची तिची मुलगी, माझा वडील बंधु भाऊराव आणि मी खेळगडी असूं. लहानपणीं मी मोठा गोडघाशा, खादाड व चोरटा होतों. घरीं गोडधड झालें कीं आजीनें व आईनें किती जपून व कोठें तरी दूर ठेविलें असलें तरी त्यांच्यामागें तें हुडकावून चोरून खाण्यांत माझा हातखंडा होता. एकदां आई, आजी व आत्या ( तिला आम्हीं अक्का म्हणत असूं ) ह्या तिघी पाणी आणावयास विहिरीवर गेल्या होत्या. त्या येण्याचे आंत आम्ही तिघांनीं ताज्या तुपाच्या मडक्यावर हल्ला केला. मडक्यांत तूप भरलेलें वरवर थिजलें होतें, पण खालीं अद्याप पातळ होतें. तें आम्हां चोरांना कळलें नाहीं. आम्ही घाईत मडकें ताटांत पालथें केलें. तेव्हां भसकन सगळेंच तूप पडून उष्टें झालें. आजी तर इकडे येण्याची वेळ झाली. ताटांतील तूप कांहीं आम्हां तिघांनाही संपेना. ओठावर, पोटावर, हातावर, कोपरापर्यंत तुपाचे ओघळ पडलेले असा आमचा देखावा पाहाण्यासारखा होता. आजी, आई व आत्या तिघी आंत आल्या, तेव्हां ताज्या तुपाचा घमघमाट सुटला होताच. त्यांनीं आमचें ध्यान पाहिल्याबरोबर आम्हांला मुद्देमालासकट पकडलें. मग काय ? आम्ही एकमेकांवर चोरीचा

आरोप ठेवूं लागलों. एकानें हुडकून काढलें, दुसऱ्यानें खिडकी उघडली व तिसऱ्यानें मडकें पालथें केलें. अशा प्रकारें खरें पाहतां सगळेच गुन्हेगार व सगळ्यांचेच हात व तोंड तुपानें बरबटलेलें त्या तिघांनीं पाहिलें. एकंदरींत ह्या जिवंत चित्रांचें जें त्यांना दृश्य दिसलें त्यांतच त्या तिघी गुंग झाल्यामुळें आम्ही सुटून पळालों.

सौंदत्तीची यल्लमा ही आमच्या आजीची कुळदेवता होती असें वर लिहिलेंच आहे. ह्या देवीची भक्ति आजी मोठया निष्ठेनें करी. तिनें ह्या देवीची ताळी देव्हाऱ्यांत ठेविली होती. पंढरपूरची जशी माळ तशी ही सौंदत्तीची ताळी—एक सोन्याची साव्हरीनसारखी ताळी ( पुतळी ), नंतर तांबड्या पोवळ्याचें व पांढरे मणी ओंवलेली ही ताळी असे. उपास करणें, लिंब नेसणें, दंडवत घेणें, सौंदत्तीच्या डोंगरांतील प्रसिद्ध क्षेत्राची यात्रा करणें वगैरे गोष्टींत आजीचा करारी स्वभाव दिसे. मार्गशीर्ष पौर्णिमेला दरवर्षी ह्या यात्रेला जमखंडी येथील यल्लमाची मूर्ति तिचे पुजारी सौंदत्तीला घेऊन जात. हिला जगाची यल्लमा म्हणत. जग म्हणजे एक मोठी ३।४ फूट व्यासाची वाटोळी १॥–२ फूट खोल बांबूंची परडी असे. तिच्यांत यल्लमाचा रुप्याचा भव्य मुखवटा ठेवून तिला खालीं मोठें लुगडें नेसवून सजावट करीत. ह्या यात्रेबरोबर जमखंडीच्या आजूबाजूचे २००।४०० स्त्रीपुरुष कोणी गाड्यांतून, कोणी बैलांघोड्यांवरून, तर कोणी पायीं चालत जात. ही यात्रा आटोपून परत आल्यावर एकदम देवळांत न येतां जमखंडी गांवाबाहेर दक्षिणेकडे कट्टेगिरी म्हणून एक तलाव आहे. त्याजवळ ही सर्व यात्रा उतरत असे. गांवांतील सर्व भक्तमंडळीनें देवीस नैवेद्य न्यावयाचा असतो. मग रात्रीं मिरवणूक काढून थाटानें मूर्ति देवळांत आणीत. गोड खावयास व मौज पहावयाला मिळे म्हणून मला लहानपणीं यल्लमाच नव्हे तर आजी देखील तेवढ्या वेळेपुरती फार आवडे. धर्माचे पहिले संस्कार माझ्या कोमल

यल्लमाची यात्रा

मेंदूवर आजीच्या त्या द्राविडी देवतेनें उठवलेले, आठवण झाल्यावर मला ते अजून रमणीय वाटतात. इतकेंच नव्हे तर आजी वारल्यावर बरेच वर्षांनीं मी इंग्रजी पांचव्या इयत्तेंत असतांना मला खरूज झाली; तेव्हां मी ह्या यल्लमाला नवस केला. खरूज बरी झाल्यावर यल्लमाची यात्रा करून यावें म्हणून मी माझ्या वडिलांजवळ आग्रह धरला. कौतुकानें त्यांनीं तो पुरविला. आम्ही घरची सर्व मंडळी सौंदत्तीची यात्रा करून आलों. ही गोष्ट इ. स. १८८९ च्या डिसेंबर महिन्यांत घडली असावी.

ह्यापूर्वी सुमारें ९ । १० वर्षांमागें आम्ही तुळजापूरची यात्रा केली होती. ती मला फार आवडली. ती मला चांगली आठवते.

**आंबाबाईची यात्रा** आंबाबाई आमची कुलदेवता. तिचें नांव माझ्या आतेला ठेवलें होतें. आजोबा वारल्यानंतर एकदोन वर्षांत आजी वारण्याचे पूर्वी–सुमारें १८७९ । ८० इ. स. सालीं–ही यात्रा घडली असावी. घरची बैलगाडी होती. राम्या व मदान्या ही दोन मोठ्या बैलांची जोडी होती. काडाप्पा हें गड्याचें नांव होतें. हा गडी मोठा विश्वासू. फार दिवस आमच्या घरीं काम करीत असलेला होता. तो आमच्या आजीच्या निंगनूर ह्या खेड्यांतला होता. आई, बाबा, आजी, मी व माझा मोठा बंधु ( नांव भाऊराव ) धाकटी बहीण ( तान्हें बाळ जनाक्का फार तर एक वर्षाची असेल ) आणि गाडी हांकणारा काडाप्पा गडी इतके ७ जण गाडींत होतों. त्यावेळीं मी फार तर सहासात वर्षांचा असेन व भाऊराव अकरा बारा वर्षांचा असेल. वाटेंत विजापूर, सोलापूर हीं शहरें आणि कृष्णा, भीमा व सीना ह्या नद्या लागल्या. सीना नदीवरील वाळवंटांत उपहार केला, तेव्हां प्रथम आम्ही लांब सोलापुरीं पांढऱ्या साखर काकड्या खाल्ल्या हें आठवतें. खाण्यापिण्याच्या गोष्टी लहानग्याचे लक्षांत कशा राहातात हें यावरून स्पष्ट होतें ! विजापुरास गोलघुमट व जुन्या मशिदी आणि सोलापुरास जुनें सिद्धेश्वराचें देऊळ पाहिल्याचें ठसे

मला अद्यापि आठवतात. पुढें मोटेपणीं विलायतच्या प्रवासांत माझ्यामध्यें जी निरीक्षणशक्ति आढळली तिचीं हीं पूर्व बीजें होत. त्यावेळीं आगगाडी म्हणजे मोठें नवल ! सोलापुराजवळ आगगाडीच्या रस्त्यालगत धावती गाडी पाहावी म्हणून बाबांनीं आम्हां सर्व मंडळींना कुठल्यातरी एका लेव्हल क्रॉसिंगजवळ आडवून ठेविलें. दोनप्रहर झाली तरी गाडी आली नाहीं. भूक लागल्यानें मला त्या आगगाडीचा मोठा कंटाळा व राग आला आणि तिचेविषयीं मला कल्पनाच नसल्यानें ती पाहाण्याची मला हौसहि वाटली नाहीं.

तुळजापुरांत जें पाहिलें त्यांपैकीं कांहीं देखावे अद्यापि आठवतात. देवीचा निजावयाचा पलंग व त्यावरील अतिशय उंच गादी आठवते. रात्रीं आराध्ये लोक जळती पोत अंगाभोंवतीं कशी पाजळीत, त्यांच्या कवड्याच्या माळा, तेलानें माखलेला पायघोळ पोषाख वगैरे सर्व आठवतें.

तुळजापूरची आंबाबाई, सौंदत्तीची यल्लमा शिवाय इतर कांहीं देवींची व देवर्षींची भक्ति आमची आजी करीत असे. जमखंडीच्या पूर्वेस चार मैलांवर कुंभारहाळ व त्याच्याहि पूर्वेस कुंचनुर म्हणून एक गांव आहे. कुंचनुरास महादेवाचें

**कठीण नवस**

( महादप्पा ) देवस्थान आहे. तेथें आमच्या घरची सर्व मंडळी दरवर्षी चैत्री प्रतिपदेस नैवेद्य घेऊन जात व तेथें एक दिवस राहून परत येत असत.

सन १८५७ चे नंतर जमखंडीच्या संस्थानिकावर बंडांत सामील झाल्याचा वहीम आला होता. तो खोटा ठरावा म्हणून ह्याच देवतेला आजीनें सात मैल दंडवत घालण्याचा नवस करून तो पार पाडला. सुदैवानें जमखंडीकरांचा प्रत्यक्ष संबंध शाबीत झाला नाहीं. म्हणून कांहीं दिवस बेळगांवच्या किल्ल्यांत ठेवून, त्यांना परत गादीवर आणून बसविण्यांत आलें. त्यांचा विश्वासू मसलतदार छोटूसिंग नांवाच्या एका बाणेदार रजपुतानें सर्व कारभार आपल्या अंगावर घेतल्यानें त्याला मात्र जमखंडी येथें

इंग्रज सरकारनें फांशी दिलें. जमखंडी शहराचे उत्तरेस कृष्णानदीचे वाटेवर हें छोटुसिंगाचें थडगें आहे. हा नवसास पावतो अशी भोळ्या लोकांची समजूत आहे.

कुंभारहाळ येथें लक्ष्मण नांवाचा एक धनगराच्या जातीचा देवर्षि राहात असे. त्याच्या दर्शनाला आमची वडील मंडळी जात असत.

शिवाय ताईबाई नांवाची एक देवता कर्नाटकांत पुजली जाते. ही कदाचित् शितळामाता असावी. हिला "येळ मक्कळ ताई" (सात मुलांची माता) असें कानडींत म्हणत. आमच्या वाड्यांतील गोठ्यांत, एका कोनाड्यांत ह्या देवीचे नांवानें एक तिकोनी धोंडा शेंदूर फासून बसविला होता. आमच्या वडिलांना देवी आल्या होत्या. त्यांतून ते वांचले म्हणून आमच्या आजीनें ही देवी स्थापिली असल्यास नकळे. आमचे बाबा एकुलतेएक पुत्र म्हणून हें शक्य आहे. ह्या ताईबाईला दरवर्षी एक आठखुरी मेंढीचा बळी लागत असे. आठखुरी मेंढी दिल्यानें आपलीं मुलें सुखी राहतात अशी समजूत दिसते. त्या दिवशीं आमचे घरीं मांसांचे जेवणाची मोठी समाराधना होत असे. ही प्रथा मला समजूं लागल्यावर माझ्या सांगण्यावरून बंद करण्यांत आली.

ह्याशिवाय आमच्या आजाआजींच्या देवता दुसऱ्या विशेष दिसल्या नाहींत. हें सर्व धर्माचरण आमच्या आजीचेंच होतें. आजोबा आपले तिचे लाड पुरवीत असत. आजी नंतर ह्या सर्व देवी देवतांची श्रद्धा आमच्या घराण्यांतून लवकरच नामशेष झाली.

बाबा त्या काळचे सुशिक्षित असल्यानें असल्या देवतांवर त्यांची धार्मिक वृत्ति तृप्त होणें शक्य नव्हतें. त्यांनीं पुढें पंढरपूरचा संप्रदाय पत्करला. ते पंढरपूरच्या वारीला जात होते, पण त्यांनीं माळ मात्र घातली नाहीं. जमखंडीच्या यजमानाजवळ त्यांचें वजन असल्यानें त्यांच्या वजनानें आपल्या वाड्याजवळ त्यांनीं विठोबाचें एक लहानसें देऊळ बांधविलें. त्याला विठोबाचा मठ म्हणत.

आजाशिवाय आमचे घरीं पूर्वीं कोणी मांस खात नसत. ह्याचें कारण आमची आजी शाकाहारी होती. यल्लमा देवीला

**शाकाहार**

मांसाचा नैवेद्य चालत नाहीं. ही तेलंगणांतल्या रड्डी लोकांची देवता. कर्नाटकांतले रड्डी व दक्षिण महाराष्ट्रांतील मराठे हे एकाच जातीचे असावे असें माझें मत मीं शास्त्रदृष्ट्या सिद्ध केलें आहे. हे तेलंगी रड्डी वैष्णवहि आहेत. त्यामुळें ते शाकाहारी बनले. ते व्यंकटेशाचेहि उपासक आहेत. आजीच्या भावाचें नांव व्यंकप्पा होतें. ह्यावरूनही हाच समज दुणावतो. आमच्या आईच्या माहेरचीं माणसेंही शाकाहारी होतीं. पंढरपूरच्या वारकरी संप्रदायामुळें आणि आमच्या बाबांची वहिवाट ब्राम्हणमंडळींत फार असल्यामुळें, केवळ आमच्या आजोबांशिवाय आमचे घरीं मांसाहारी कोणीच नव्हतें. अशा परिस्थितींत ताईबाईचा आठखुरी मेंढीचा नैवेद्य कसा आमचे घरीं आला एक कोडेंच आहे. वर सांगितल्याप्रमाणें माझ्या बापाला लहानपणीं देवीचा जिवावरचा आजार झाला तेव्हां नवस करूनही ताईबाईच्या कंदुरीचा सुगावा लागतो. तो एक प्रकार सोडला तर आमच्या इतरांचा शाकाहार इतका कडक होता कीं, आजोबांना मांस खावयाचें झाल्यास गोठ्यांत स्वयंपाक करून सर्व भांडीं घासून घरीं यावें लागे.

तुळजापुराहून परत आल्यावर बहुतेक दुसरेच वर्षी—इ. स. १८८०।८१ सालीं—आमच्या आजीचा अंत झाला. मरतांना तिला

**अंतःकालचें वेड**

वेड लागलें. जमखंडीस बाबा वैद्य म्हणून एक प्रसिद्ध आयुर्वेदी वैद्य होते. त्यांनीं वेडावर उपाय म्हणून आजीच्या डोईवर एक मोठी सळई लाल तापवून मोठा डाग दिला. डाग देतांना आजीला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. ती आपली भोंवताली पडलेले दाणे टिपतच बसली होती. तें पाहून आम्हां सर्वांना फारच वाईट वाटलें. त्या स्थितींत ती दोन चार महिने होती. आजीला वेड लागल्यावर वेडाचे भरांत ती घरांतील सोन्याचे दागिने घेऊन आपल्या मुलीस देण्यास जाई आणि वाटेंत

गळून पडलेले तिला कळत नसे. ते, ओळखीचे लोक आमचे घरीं आणून देत. काय, त्या वेळची ही दानत व आमच्या घराण्यावरची जमखंडीच्या लोकांची श्रद्धा !

---

# प्रकरण ३ रें

## आजोळ

येथवर माझ्या बाबांच्या आईबापांच्या आठवणी झाल्या, आतां माझ्या आईच्या आईबापांच्या आठवणींकडे वळूं.

**कृष्णराव काळे**

जमखंडीच्या पूर्वेस ६ मैलांवर आलगूर म्हणून कृष्णाकांठीं एक खेडेगांव आहे, हें माझ्या आईचें माहेर. माझ्या आईचें नांव यमुनाबाई, तिच्या आईचें नांव गंगाबाई व बापाचें नांव कृष्णराव काळे असें होतें. गुडघीच्या रोगानें त्यांचा एक पाय गुडघ्यांत अगदीं वाकडा झाला. त्यामुळें ते तरुणपणींच कायमचे लंगडे झाले होते. म्हणून त्यांना गांवांत कुंट कृष्णाप्पा म्हणजे लंगडा कृष्णराव असें म्हणत असत. जमखंडी संस्थानांत खेड्यांतील सर्व लोक कानडीच बोलतात. मराठी कोणालाच येत नाहीं. माझ्या आजाआजीला मराठी बोलतां येत होतें. आजापेक्षां आजीला जास्त चांगलें येत असें.

**पतिव्रता गंगाबाई**

बसवंतराव मराठी तर संताबाई जशी कानडी, तशी गंगाबाई मराठी तर कृष्णराव कानडी असें हें जोडपें होतें. गंगाबाई गोरी होती, कृष्णराव अगदीं काळे होते. इकडे बसवंतराव गोरे तर संताबाई काळी होती. बाबांचें घराणें

सुखवस्तु वजनदार होतें आणि आईचें गरीब होतें. तरी कृष्णरावांचा आलगुरांत चांगला दरारा होता, तो त्यांच्या प्रामाणिकपणामुळें होता. गुडघीच्या रोगानें ते वर्षभर अंथरुणावर खिळलेले होते. गंगाबाईनें त्यांची अतिशय प्रेमानें व श्रद्धेनें रात्रंदिवस शुश्रूषा केली. त्यावेळीं माझी आई ५।६ वर्षांची व तिचा लहान भाऊ सोमा नांवाचा १।२ वर्षांचा होता. आलगूरचे कुळकर्णी गोविंदाप्पा नांवाचे वैष्णव ब्राह्मण मोठे देवमाणूस होते. त्यांची पत्नी सरस्वतीबाई, वडील बंधु बाबासाहेब व एकंदरींत सर्व घराणें अगदीं बाळबोध, प्रेमळ व प्रामाणिक असे. कृष्णरावांला या घराण्याचा मोठाच आश्रय होता. कृष्णरावांचें या घराण्यांत त्यांच्या प्रामाणिकपणामुळेंच मोठें वजनही होतें. एक वर्षाच्या आजारांत आमची आजी नेहमीं अंथरुणाला धरून बसलेली राहिल्यामुळें चूल आणि मुलाचा सर्व जोजार ( भार ) माझ्या आईवरच पडला. तेवढया लहान वयांतही तिनें तो बिनबोभाट चालविला. या लहानपणाच्या हालानें आमच्या आईला पुढें सहिष्णुतेचें अन् दक्षतेचें चांगलेंच वळण लागलें. माझ्या आईचा सारा जन्मच सहन करण्यांत गेला. तें सामर्थ्य तिनें लहानपणींच माहेरीं मिळविलें होतें. माझी आजी व तिची नमुनेदार मुलगी माझी आई हीं दोन माणसें साऱ्या आलगूर गांवाला पातिव्रत्याचा व हिंदु स्त्रियेच्या चांगुलपणाचा एक अनुपम नमुनाच वाटत होता. अद्याप त्यांचें नांव काढलें तर त्यांची माहिती असणारांपैकीं न गहिंवरणारें माणूस त्या गांवांत सांपडणार नाहीं.

**आमचा तोरा**

जमखंडीस बाबांच्या घराण्याचा लौकिक व आलगुरांत आईच्या घराण्याविषयीं असा अकृत्रिम आदर यांची जोड साधल्यामुळें आम्ही लहानपणीं जेव्हां आजोळीं जात असूं तेव्हां सारा गांव आमचें नेहमीं कौतुक करीत असे. वाटेंत कुंभारहाळ हें गांव लागे, हें वर सांगितलेंच आहे. तेथूनच आमच्या स्वागताला सुरवात होई. यामुळें आम्हांलाही मोठी आढयता



२

वाटत असे. आलगुरास जाण्यास आम्हीं एका पायावर तयार असूं. माझ्या बाबांच्या आईचा स्वभाव कडक व सहानुभूतिशून्य असल्यामुळें माझ्या आईला पुढें सासुरवास सोसावा लागला. आपण भोगलेल्या त्रासाचे मासले ती आम्हांस बालपणीं सांगूं लागली म्हणजे आमच्या कोमल अंतःकरणाला घरेंच पडत. माझ्यामध्यें पुढें पुढें जें स्त्रीदाक्षिण्य आणि हिंदुविवाह पद्धतीमुळें कायमची तेढ उत्पन्न झाली, तिचें पहिलें बीज ह्या आईच्या खडतर सासुरवासांतच आहे. आईच्या माहेरचीं माणसें—आजा असो आजी असो किंवा आईचा भाऊ रामजी असो किंवा माझी मावशी तान्हुबाई असो—जमखंडींत आमच्या वाड्यांत आलीं म्हणजे मुठींत जीव धरून येत. उलट आम्हीं कोणी आलगुरांत गेलों कीं, बडे बापके बेटेच जसे वागत असूं. नुसत्या आजाच्या घरांतच नव्हे तर साऱ्या खेड्यांतूनच आमचा तोरा चालवीत असूं. आम्ही शहरांत राहणारे, शाळेंत शिकणारे, मराटी बोलणारे, खाणें—पिणें—पोषाखाची मिजास चालविणारे आणि सरकारदरबारांत वजन असलेल्या सुप्रसिद्ध व कडक बापाची मुलें—मग काय आम्हांला या खेड्यांत स्वर्ग दोनच बोटें उरत असे. असो! तरी आम्हांला आलगूर फार आवडे. त्याचें कारण तो नदीकांठचा गांव, तेथली स्वच्छ हवा, गोड पाणी, साधी राहाणी व तेथें चालणारे आमचे चोचले!

आजोबांचा पाय लंगडा असल्यामुळें ते जमखंडीहून आम्हांस बोलविणें झाल्यास आपल्या वांझ म्हशीवर बसून येत. पोषाख खादीचा मांडचोळणा, खादीची बंडी, त्याचे एक काळें दणकट कांबळें आणि डोईला तपकिरी रंगाचा एक भलामोठा रुमाल, काटक चेहरा, मिशा पांढऱ्या झुबकेदार आणि आवाज खणखणीत. एकंदर स्वारी जरी ठेंगणी होती तरी एखाद्या गनिमीकाव्याच्या नायकाप्रमाणें पाहिल्याबरोबर नजरेनेंच पाहाणाऱ्याला नरम करणारी त्यांची मुद्रा होती.

आलगुरच्या आजोबांचें घर चंद्रमौळी, भांडीं मातीचीं. अंथरुण-पांघरूण जमखंडीहून नेलेलें तेवढेंच. शिवाय लागेल तें शेजाऱ्यांकडून आणलेलें. कण्यांत घालावयास मीठदेखील शेजारणीकडे मागावयाला एखाद्या आम्हांला पाहावयाला आलेल्या गचाळ मुलीला आजी मोठ्या मायाळुपणानें सांगे. आणि तिला कोणतीही वस्तु कोण नको म्हणेल ? त्यावेळीं खेड्यांतून हल्लींचा रशियांतील कम्यूनिझमच होता. म्हणजे कोणतीही वस्तु प्रत्येकानें कोणालाही हक्कानें मागावी. यामुळें आम्हांला पाहुणचार फार आवडे. गेल्याबरोबर आम्हांला अगोदर आळींतील लहान मोठीं माणसें विशेषतः पोरें व त्यांच्या पोरकट आयांचा घोळका आमच्याभोंवतीं जमे. हाकलून दिलें तरी जातात कशाला ? लकव्वा, सिद्व्वा, पद्माक्का वगैरे म्हाताऱ्या ओरडून ओरडून कानठाळ्या बसवणाऱ्या मजजवळ येत आणि कोणी म्हणे माझ्याशीं लग्न कर, कोणी म्हणे पाट लाव, कोणी म्हणे तूं माझा नवराच — इतके दिवस सोडून कोठें गेला होतास — आतां पोटकी टाक वगैरे. ही रानटी थट्टा ऐकून आम्ही चिडत असूं. त्यामुळें त्यांचा हंशा जास्तच पिके.

**आजीचें घर**

आजीचें घर धाब्याचें. जमीन धुळीनें भरलेली, न झाडावी तेंच बरें. सोपा कोठें संपला व गोठा कोठें सुरू झाला हें तीन आठवडे राहिलों तरी समजलें नाहीं. निजलों असतांना रात्रीं म्हशीचें पारडूं मुसकटींत शिरावयाचें किंवा आमच्या तंगड्या त्या वांझ म्हशीच्या शिंगांत गुंतावयाच्या ! आजीची चूल घर बांधलें त्यानंतर सारवलेली असेल तर गांवच्या मारुतीची शपथ ! खोलींत दोन मडकीं, एक काथवट व एक भला मोठा पाटा. तो सुद्धां कधीं उभा करावयाचा नाहीं, मग धुवायची गोष्ट कशाला. मीठ असेल तर लसूण नाहीं व दोनही असलें तर मिरची नाहीं, हें रोजचें रडगाणें. तरी तिची तांबडी भगभगीत मिरच्यांची चटणी, घट्ट ताक आणि ताज्या शाळूच्या भाकरी हें

जेवण आम्हांला परमामृतासारखें गोड लागे. वांग्यांची भाजी तर सुखाची परमावधि ! कृष्णातीरचीं वांगीं प्रसिद्धच आहेत.

देवघर म्हणून जी एक खोली होती ती एक काळोखाचें पेवच होतें. भर दोन प्रहरींही तिथें जाण्याची छाती होत नसे. भिंतीला व जमिनीला लोणा चढलेला. देव्हाऱ्यावर देव कोण होते, किती होते – कीं मुळींच नव्हते हें शोधायला धाडशी कोलंबसच आला पाहिजे. खिडकी तर नव्हतीच. एक साण होतें, तें जर उघडलें तर वरून जो दोन प्रहरीं प्रकाश पडे, त्यामुळें तर त्या गुहेला अधिकच भयानक स्वरूप येई. त्यामधून जेव्हां सूर्यप्रकाश पडे तेव्हां तें अधिकच भयानक दिसे. अशा देवघरांतील देव होण्यापेक्षां बाहेरील मोकळ्या हवेंतील गोठ्यांतील म्हशींचें पारडूं होणें बरें वाटे !

माझ्या बाबांची आई जशी धार्मिक होती तशी आईची आई धार्मिक दिसत नव्हती. पण ती स्वतःच धर्माची मूर्ति होती. निराळा

**सावलींतील तुळस** धर्म तिला कोठून येईल ? ती नांवाप्रमाणें आंतबाहेर शुभ्र यशाची गंगाच होती आणि तिच्या कुशींतून माझी आई यमुना निघालेली. गंगाबाईचा देव म्हणजे तिचा लंगडा नवरा. मराठ्यांतला पडदानशिनपणा तिच्यांत नव्हता. तरी पण ती उंबरठा ओलांडून कधीं बाहेर जात नसे. खेडयांतील स्त्रिया शेतांत खपतात, पाणी आणतात व अष्टौप्रहर उघडयावर असतात. प्रत्यक्ष माझ्या बाबांची आई उघडयांत वाढलेली रानदांडगी बाई होती. पण गंगाबाई सावलींतील तुळस होती. कधीं म्हणून शेजारणीकडे बोलायला गेली अशी गोष्ट कशाला ? हा जातिवंत मराठमोळा कांहीं औरच होता. ज्या कुळकर्ण्यांच्या घराचा आजाला आश्रय होता तें घराणें वैष्णव ब्राह्मणाचें असून मोठें धार्मिक होतें. वैष्णव कर्मठ असावयाचेच. विधि, संस्कार, उपवास, व्रतें, गाणीं, न्हाणीं, सौभाग्यलेणीं इत्यादींची तिथें लयलूट होती. ह्या सर्वांचा जन्मजात संस्कार माझ्या आईच्या हाडाहाडांत व रोमरोमांत शिरला होता. ती एकाद्या वैष्णव ब्राह्मणीप्रमाणें दिसत होती. पण माझी

आजी अगदीं साधी. तिच्यांत रूढ धर्माचा कसलाही वरपंग नव्हता. इतकेंच नव्हे तर तिच्यांत धर्मभोळेपणाही नव्हता. मग कर्मठपणाचें तर नांवच नको. हा प्राणीच कांहीं विरळा होता. आळींतल्या स्त्रिया गंगाबाईचें नांव घेऊनच आपणांस पवित्र मानीत होत्या साध्या रोगावर माझी आजी कांहीं साधे उपचार करी. कावीळ झाली असतां ती नेमक्या ठिकाणीं मणगटांत बिबा घाली व त्यामुळें अचूक गुण येई. उसण भरली असतां ती उतारा करी. वनस्पतीपक्षां अशा वैद्यकींत श्रद्धेचाच जोर असावयाचा हें सांगावयास नको. अशा अकृत्रिम पवित्र पातिव्रत्याला आकर्षून घेणारे आमचे आजोबाही तसेच पात्र आणि गरीब असूनही बाणदार पाते होते. नदीचें पाणी आणायलाही कधीं त्यानें आपल्या बायकोला बाहेर पाठविलें नाहीं. गुडघीरोग होण्यापूर्वी ते सामर्थ्यवान व हिंमतवान होते. ज्या कुळकर्ण्यांच्या आश्रयाला ते होते त्यांच्या घरावर एकदां दरोडा आला. तेव्हां एकट्या आजोबांनीं आरोळ्या फोडून व धोंडे फेकून त्यांना पिटाळून लाविलें.

जमखंडीचे आजाआजी वारल्यावर लवकरच सुमारें इ. स. १८८२–८३ सालीं आजोबा कृष्णराव आलगूर मुक्कामीं आषाढ किंवा श्रावण मासीं उद्भवलेल्या पटकीचे उपद्रवानें वारले. त्यावेळीं नदीला पूर आला होता. मी नदीवर स्मशानयात्रेला गेलों होतों. मला तो देखावा चांगला आठवतो.

माझी मावशी तान्हूबाई हिचा सनाळांत रामजी शिंदे यांच्याशीं विवाह झाला. ती आतां म्हातारी झाली आहे. शेतवाडी करून तें सर्व कुटुंब सुखी आहे.

**माझे मामा**

आलगुरांत माझा मामा रामजी हा मात्र दिवाळखोर कर्जबाजारी निघाला. अगदीं लहानपणीं लाडका, तरुणपणीं प्रथम चांगला नांवाजलेला पहिलवान होता. पण पुढें तमाशांत विदूषकाचें काम करणारा निघाला. त्याची बायको लक्ष्मीबाई ही सनाळची. हिला दोन मुली व एक मुलगा होता. त्यांपैकीं एक

मुलगा व एक मुलगी वारली आणि मामीही सुमारें १८९२ सालीं वारली. एकुलती एक मुलगी मथुराबाई पोरकी झाली म्हणून आमचे घरींच जमखंडीस वाढली. ती पुढें पुणें ट्रेनिंग कॉलेजची थर्ड ग्रेडची परीक्षा चांगली पास झाली. नंतर माझे धाकटे बंधू एकनाथराव यांच्याशीं तिचा विवाह झाला. १९१६ सालीं तिला गंगूबाई उर्फ छबु नांवाची पहिली मुलगी झाली. १९१८ च्या मोठ्या इन्फ्लुएंझाच्या सांथींत मथुराबाई मुंबईस बाळंतपणींच वारली. छबूला पुढें मलाच सांभाळावें लागलें.

आमचा मामा रामजीबाबा हा दिवाळखोर निघाला म्हणून आमच्या आजीचे फार हाल झाले. १८९७ च्या दुष्काळात स्वतः आमचेही हाल झाले. शेवटीं १९०१ सालीं ती आमचे घरीं येऊन राहिली होती. सप्टेंबर १९०१ मध्यें मी धर्मशिक्षणासाठीं विलायतेस गेलों म्हणून माझे आई, बाबा व इतर मंडळी पुण्यास व मुंबईस आली होती. आजी मात्र जमखंडीस आमचे घरीं असतांनाच वारली. ह्या गोष्टीचें मला आतां राहून राहून वाईट वाटतें.

---

## प्रकरण ४ थें

## माझे बाबा

[ जन्म ( अदमासें ) १८३५ — मृत्यु २७ जून १९१० ]

आजे बसवंतराव यांना दोनच अपत्यें. वडील मुलगा माझे बाबा रामजीबाबा आणि धाकटी बहीण माझी आत्या ( आम्ही तिला अक्का म्हणत असूं ) आंबाबाई. माझे बाबांचें रूप व स्वभाव बहुतेक माझे

आजीचे वळणावर गेले होते. शेतकऱ्याचें पोर निसर्गाचे मांडीवरच खेळून वाढलेलें. लहानपणीं खोडकर होतें. तथापि पुढें कोणीं एका शास्त्रीबुवांच्या-जवळ ते लिहावाचावयाला व हिशेब ठेवायला त्यावेळचे मानानें फारच उत्तम प्रकारें शिकले. ह्याचें श्रेय आजोबाला, बाबांच्या तैलबुद्धीला किंवा त्या शास्त्रीबुवांच्या चांगुलपणाला द्यावें हें ठरविण्याला आतां मार्ग नाहीं. कारकुनी शिक्षणांत तर बाबांचा जमखंडीस नंबर पहिला होता ! त्यांचें मोडी अक्षर म्हणजे मोत्याचा दाणा ! माझ्या वेळेला बाबा तर मुलांना मोडी कित्ते घालून देत. जमाखर्चांत जमखंडी दरबारांत त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. मामुली शिक्षण संपल्यावर जमखंडी संस्थानांत बिद्री नांवाचा एक पेट्याचा गांव आहे, तेथें त्यांना प्रथम शिक्षकाची नोकरी लागली. त्यावेळीं ब्राम्हणी संस्थानांत ह्या मराठ्याच्या मुलाला शिक्षकाची नोकरी मिळते ही सामान्य गोष्ट नव्हे. ही शाळा सरकारीच असली पाहिजे. एरवीं हा खाऊनपिऊन सुखी मराठ्याचा एकुलताएक लाडका मुलगा, खासगी शाळा काढावयाला जमखंडी हा राजधानीचा गांव सोडून बिद्रीसारख्या पेट्यांत कां जातां ? ह्या सर्व गोष्टींत त्या शास्त्रीबुवांचें कांहीं तरी अंग आहे. त्या ब्राह्मणाचें लक्ष ओढून घेण्यासारखें कांहीं विशेष पाणी बाबांत असलें पाहिजे. हें पाणी आमच्या आजोबांकडून आलें असावें. तें मजमध्यें किती आलें हें ठरवणें माझें काम नव्हे.

**पांढरपेशी शिक्षण**

नुसतें कारकुनी शिक्षणच नव्हे, तर धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यकशास्त्र वगैरे सांस्कृतिक विषयांची तांत्रिक माहिती बाबांना बरीच होती. हें मला समजूं लागल्यापासून माझे नजरेस येऊं लागलें. त्यांना संस्कृत येत नव्हतें तरी मराठींतील संस्कृत तत्सम शब्दाचे कठीण अर्थ त्यांना समजत असत. इतकें त्यांचें प्राकृत पोथ्याचें वाचन झालें होतें. त्या काळच्या प्राकृत पौराणिक सर्व पोथ्यांचा व मूलस्तंभ पंचांगें वगैरे शास्त्रीय वाङ्मयांचाही संग्रह

त्यांनीं चांगला केला होता. ह्यावरून त्यांची वाङ्मयभक्ति दिसते. माझे लहानपणीं एक शास्त्री पुराण सांगावयाला आमचे घरीं नेहमीं येत. ह्यावरून गुणी माणसांची संभावना करून खानदानी लौकिक राखण्याची बाबांची प्रवृत्ति चांगली दिसते. त्यांचा हात सढळ होता. किंबहुना ते बेहिशेबी मराठा होते म्हटलें तरी चालेल. कारकुनी हिशेबांत ते कोणालाही हार न जाणारे असतां संसारांतील काटकसरींत ते फार मागासलेले होते हें मोठें आश्चर्य ! सर्व जातींतील संभावीत माणसांचा ह्यांना स्नेह व लळा होता. पण ह्यांना ब्राह्मणी बहुश्रुत राहणीचेंच वळण जास्त कां लागलें ह्याचें कारण ह्यांचे गुरुजी शास्त्रीबोवाच असावेत. पण ह्या बाबतींत मला निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं. इतिहास शोधनाची आवड उत्पन्न होण्यापूर्वींच माझ्या घराण्यांतील सर्व वडील माणसांचाच नव्हे तर वस्तुंचा, मौल्यवान् कागद पत्रांचा व दप्तराचा नाश व्हावा ही मला आतां मोठी खेदाची गोष्ट वाटते ! इतिहास हा कॉलेजांतील आवडीचा विषय असून असें कां झालें याचें कारण माझी फकिरी वृत्ति.

बैठ्या शिक्षणाचें ब्राह्मणी वळण बाबांच्या अंगांत इतकें भिनलें कीं, आजोबांचा शेतकीचा अगर शिलेदारीचा बाणा त्यांच्यांत

**ब्राह्मणी वळण**

मुळींच उरला नाहीं. फार काय तर त्यांच्या पोषाखांतही ब्राह्मणी झांक दिसे ती अशी. माझ्या आजोबांची पांढरी बिन पिळाची वत्ती किंवा पायांतली फार तंग नसलेली पण रुबाबदार विजार मी बाबांचे अंगांत कधींच पाहिली नाहीं. इतकेंच नव्हे तर ब्राह्मणाप्रमाणें ते दहा हात लांब धोतर नेसत असत व तें थोडें जुनें झालें म्हणजे, तेंच दुमडून पांघरण्याचें उपरणें करीत. ही चाल जमखंडीस सभ्य ब्राम्हणमंडळींत कदाचित् अद्यापि असावी. आमचे इंग्रजी शाळेचे हेडमास्तर त्रिंबकराव खांडेकरही असेंच जोड उपरणें पांघरीत. आंगरखा मात्र बाबांचा मराठा बाण्याचा असे. तो गुडघ्याच्या खालपर्यंत घोळदार असून छातीवर बंद असत. अस्तन्यावर बऱ्याच चुण्या असून शेवटीं त्यांना

कान असत. ते मणगटाच्यापुढें हाताच्या पंजावर अगदीं बोटापर्यंत पसरलेले असत. रुमाल कर्नाटकी तऱ्हेचा मोठा असून तो बांधण्याची ढब ठरलेली असे. पायांत जोडाही मराठी तऱ्हेचा असे. एकंदर पोषाख शुभ्र आणि साधा असून रुबाबदार असे. ऋतुमानाप्रमाणें ह्यांत कधीं फरक होत नसे. अर्ध्याच पोषाखानें ते कधीं बाहेर पडत नसत

**कडक स्वभाव**

बाबांचा स्वभाव फार बोलका होता. ते आपल्या मित्राजवळ बोलत बसले म्हणजे मला लहानपणीं ऐकण्याची फार मौज वाटे. त्यांच्या बोलण्यांत म्हणी फार असत. मराठी, कानडी व मुसलमानी ते सफाईनें बोलत. ऐकणाऱ्या-वर त्यांची छाप तेव्हांच बसे. ते स्वभावानें किंचित् शीघ्रकोपी पण खुल्या दिलाचे व मृदु अंतःकरणाचे असत. आम्हांला लहानपणीं रागानें एकदां मारत सुटले म्हणजे बेतालपणानें फारच मारीत व मग राग ओसरल्यावर आपणच अश्रु ढाळीत. बिद्रीचे शाळेंत असतांना मुलांना फार मारत म्हणून त्यांना ती नोकरी सोडून श्रीमंतांनीं आपल्या खासगींत जवळ घेतलें असे मी एकदां ऐकलेलें स्मरतें. ते विशेषतः माझ्या मोठ्या भावाला फार मारीत. त्यांना आम्ही लहानमोठे सर्वजण फारच भीत असूं. इतकेंच नव्हे तर गांवांतही त्यांची जरब फार असे. गांवच्या पोलीस शिपायांनीं एकादी कांहीं चूक केली तर आपल्या पोटच्या पोराप्रमाणेंच त्यांना कित्येक वेळां मारलेलीं उदाहरणें घडलीं आहेत ! व्यवहारांत मात्र ते फार भोळसट असत. कांहीं विक्री सौदा करावयास गेले तर व्यापाऱ्यांच्या डोईवर देवाचा प्रसाद ठेवून धमकावून खरी किंमत सांगावयास लावीत. मग त्यांनीं सांगितलेलीच किंमत देत ! त्यांनीं कधींही व्याजानें पैसे दिले नाहींत ! व्याज घेणें हें मोठें पाप समजत ! पण त्यांनीं बिन व्याजीं दिलेलें कर्जही कधीं कोणीं परत फेडलेलें मला आठवत नाहीं. फार तर काय, श्रीमंताशीं भांडून सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन जेव्हां ते घरीं बसले, तेव्हां ह्यांनीं कांहीं

प्रकरणीं स्वतःची तसलमात २५८९ रुपये (पंचवीसशें एकूणनव्वद) सरकारांत खर्ची घातले होते. तेही त्यांनीं १५।१६ वर्षे मागितली नाहीं. पुढें आमच्या घरीं आम्ही दारिद्र्याच्या भयंकर यातना सोशीत असतां, ही तसलमात परत मागण्याच्या याद्या कितीदां तरी श्रीमंत आप्पासाहेबांकडे केलेल्या मीं पाहिल्या; पण एक कवडीही परत मिळाली नाहीं.

तरुणपणीं बाबांच्या हातांत चार पैसे खेळत म्हणून त्यांनीं प्रथम प्रथम ऐष-आराम केला. पण त्यांचा धर्माकडे स्वाभाविक असलेला ओढा वळावला, विशेषतः पंढरपूरच्या वारकरी पंथाचा फारच नाद लागला. प्रथमपासून त्यांचा स्वभाव प्रेमळ, श्रद्धाळू, उदार आणि करारी असे. त्यांचा प्रामाणिकपणा किंबहुना सर्वच आमच्या घराण्याच्या प्रामाणिकपणाचा लौकिक जमखंडी संस्थानांत गाजत होता.

**बाबांची रसवंती**

मी अगदीं लहान असतांना बाबांच्या मित्रांपैकीं म्हातारबा सुतार, बसप्पा अथणी (लिंगायत) आणि बापू जामदार (मराठे) हे वरचेवर घरीं येत. नंतर मी थोडा मोठा झाल्यावर सटवप्पा सुतार आणि पांडाप्पा टर्की (ब्राह्मण वारकरी) हे येत असत. पण बाबा कांहीं फारसे कोणाचे घरीं जात नसत. आमच्या वाड्यांत सोप्याच्या उजव्या बाजूस एक चारपांच फूट लांबरुंद, स्वच्छ व प्रशस्त चुनेगच्ची कट्टा असे. ह्याला आम्ही तुळशीकट्टा म्हणत असूं. कारण पूर्वी येथें तुळशीवृंदावन होतें. ह्या कट्ट्यावर बाबा आपल्या मित्रांशीं बोलत बसत. मी आपला तेथें घुटमळत असावयाचा. कारण बाबांचें संभाषण मला आवडत असे. मला वाटतें माझे अंगीं जर कांहीं कर्तृत्व आलें असेल तर त्याचें प्रथम बीजारोपण बाबांच्या अकृत्रिम, साध्या व जोमदार रसवंतीनें केलें असावें. रूपानें, रंगानें व स्वभावानें मी अगदीं बाबाचे वळणावरचा आहें, असें मला लोक म्हणत असत.

जमखंडीस पंढरपूरचा भजनी संप्रदाय वाढविण्याच्या कामीं बाबांचा पुढाकार होता. नरसप्पा नांवाचे एक रजपूत गृहस्थ फार सात्त्विक होते. मी

त्यांना कधीं पाहिलें नाहीं. ते जमखंडीस हा पंथ काढण्यांत मुख्य होते असें मीं ऐकलें होतें.

**विठोबाचा सप्ताह**

आमचे घराजवळ 'आप्पासाहेबांची विहीर' म्हणून एक पिण्याच्या पाण्याची मोठी विस्तीर्ण व खोल विहीर आहे. तिचे कांठीं सटवाप्पा सुतारांचें घर व सुतारीचा कारखाना आहे आणि त्याचे समोर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस विठोबाचा मठ आहे. फाल्गुन वद्य द्वितीयेपासून ( ही श्रीतुकाराम बोवांची पुण्यतिथि ) तों पुढच्या षष्ठीअखेर ( ही श्रीएकनाथस्वामींची पुण्यतिथि ) पांच दिवस आणि त्यापूर्वी व नंतरचे दोन दिवस असा दरवर्षी त्या मठांत भजनाचा मोठा सप्ताह साजरा केला जात असे. सात दिवस विणा रात्रंदिवस खालीं ठेवायचाच नसतो. दररोज काकडआरती, शेजारती सकाळसंध्याकाळ होई. त्यावेळीं मोठी गर्दी जमे. ३०।४० नियमित टाळकरी लंब गोलांत उभे राहात. मध्यें विणेकरी उभे राहात. दोहों बाजूंस या गोलाचे शेवटीं दोन मृदुंग्ये उभे असत. आरतीचे वेळीं भजनाच्या सोहळ्याला फार रंग येई. बीजेच्या व षष्ठीच्या आरतीचा थाट मोठा होई. कुरमुरे, नारळ व बत्तासे ह्यांनीं भरलेलीं खिरापतीचीं ताटें ऐकणारे स्त्रीपुरुष आणीत. आरतीचे वेळीं गुलाल उधळला जाई. बुक्का, उदकाड्या, कापूर यांचा घमघमाट सुटे. टाळकऱ्यांत मुलें उभीं राहात. त्यांत मी व माझा मोठा भाऊही असें. विणेकरी हरीबा कर्जगार नांवाचे जिनगर ( वारकरी ) असत. आरती धरण्याचा मान बाबांचा असे. तो देखावा माझ्या डोळ्यांपुढें चित्रासारखा आहे. माझ्या धार्मिक विकासांत या भजनाचा फार मोठा परिणाम झालेला आहे. आरती संपल्यावर सायंकाळीं ६ वाजतां प्रसाद म्हणजे जेवणाच्या पंक्ति बसत. शंभर-दोनशें पात्रें तरी दररोज होत. त्यांत वाणी, मराठे, ब्राह्मण, सुतार, सोनार, जिनगर, शिंपी वगैरे जाति असत. जातीभेदाचे नियम कडक पाळण्यांत येत नसत. शेवटचे दिवशीं मोठी आरती व महाप्रसाद होऊन रात्रीं १० वाजतां दिंडीचा छबिना निघे. तो सर्व रात्रभर गांवांतून व पेठेंतून

ब्राह्मण आळींत एक जुनें विठोबाचें देऊळ आहे, तेथें जाऊन सकाळीं ८।९ वाजतां परत मठांत येई.

बबलादीचे स्वामी

बाबांची मानमान्यता सर्व जातींत असे. त्यामुळें आमचे घरीं जातिभेद विशेषतः पाळण्यांत येत नसे. आमचे बाबा मराठे जातीचे सरपंच असूनही आमचे घरीं जातिभेदाची इतकी ढिलाई होती. फारतर काय ब्राह्मण, लिंगायत-सुद्धां आमचेकडे येऊन जेवत. मात्र तें फार उघडपणें नसे. इतकेंच नव्हे तर पुढेंपुढें बबलादीऱ्या लिंगायत स्वामींचे आमचेकडे येणें जाणें फार झालें. तेव्हां तर उघडपणे आमच्या घरीं सर्व जातीच्या पंक्ति बसत. त्यावेळीं मी इंग्रजी ५।६ इयत्तेत होतों. ह्या स्वामींच्यापुढें एक शिंग वाजविणारा महार असे. तोही आमचेकडे जेवत असे. बबलादीचे स्वामि एक प्रसिद्ध सिद्ध गणले जात. हे उघडपणें दारू पीत व मांसही खात. धर्माच्या नांवावर हे सगळेच उघड चालत असे. आमचें अठरा विश्वे दारिद्र्य असूनही ही टोळधाड आमचे घरीं आठ-आठ दिवस उतरत असे. खर्च कसा चाले ह्याचें मला आश्चर्य वाटतें त्यावेळीं मला नुसती मौज वाटत असे. पुढें मॅट्रिकची परीक्षा होऊन मी पुण्यास कॉलेजांत शिकूं लागलों. तेव्हां माझें वजन घरीं भासूं लागलें. प्रत्यक्ष बाबाही मला पाहून दबत असत. पुढें या स्वामीमंडळाचें प्रस्थ कमी होऊन शेवटीं येण्याचें आजिबात बंद झालें.

तुळजापूरची आंबाबाई, सौंदत्तीची यल्लमा, पंढरपूरचा विठोबा, नरसोबाचे वाडीचा दत्तात्रय, कोल्हापूरची महालक्ष्मी ह्या मोठमोठ्या क्षेत्रांतल्या प्रसिद्ध दैवतांचे संप्रदाय तर असतच. पण शिवाय वरील बबलादीचे स्वामि, रामदासी पंथ, गोसावी, बैरागी, अतिथी अभ्यागत वगैरे अनेक खुळांचा सुळसुळाट आमचे घरीं सारखा चाललेला असे. मिळकत मुळींच नाहीं उलट खर्चालाही ताळ नाहीं. ह्याचा परिणाम ठरलेला झाला तो हाच कीं; शेतें गेलीं, गुरें गेलीं, घर गेलें. दागिने गेलें सर्व सावकाराचें

हातीं गेलें आणि एक दिवशीं पांघरलेल्या कपड्यानिशीं आम्ही आमच्या मोठ्या वडिलोपार्जित वाड्यांतून बाहेर पडलों व भाड्याच्या घरांत जाऊन राहिलों. त्या वेळेला मला चांगलें कळत होतें. माझी मॅट्रिकची परीक्षा होऊन मीं कदाचित् पुण्यास शिकतही असेन. या सर्व करुण रसानें भरलेल्या नाटकांत मुख्य नायिकेचें पात्र माझी आई साध्वी यमुनाबाई ही होय. आतां तिच्या आठवणीस सुरुवात करतों.

---

# प्रकरण ५ वें

## माझी आई

**[ जन्म ( अदमासें ) १८४०—मृत्यु ८ फेब्रुवारी १९१० ]**

येथवर आठवणी लिहून कोणाचीच जन्माची किंवा मृत्यूची तिथि, महिना अगर निदान वर्ष तरी मीं कां लिहिलें नाहीं याचें कारण तें मला माहीत नाहीं. माझ्या बाबांचा चौकसपणा, सुसंस्कृतपणा इतका होता कीं, त्यांनीं आमच्या घरच्या पुरोहितांकडून घरच्या सर्व मुलांची जन्मपत्रिका ज्योतिषशास्त्रान्वयें वर्तवून ठेविल्या आहेत. सुदैवानें तेवढ्या तरी आम्हीं अद्यापि जपून ठेवल्या आहेत. मीं मोठा झाल्यावर मला आपली जन्मभूमि बदलावी लागली. इतकेंच नव्हे तर मी एवढी मोठी परीक्षा इतक्या मागल्या काळांत पास होऊनही आपल्या संसारांत लक्ष न घालतां आजन्म दारिद्र्याचें व्रत घेतलें. त्यामुळें व्यवहारांत मी बाबांपेक्षांही अधिक नालायक व निष्काळजी ठरलों. बाबांनीं कर्जाखालीं खानदानी घालविली तर मीं त्यांच्यापेक्षां सुशिक्षितपणाचा कादा त्या मीं ती

कधींच मिळविली नाहीं. किंबहुना खानदानीनें राहण्याला मी अपात्र ठरलों. तशांत कांहीं वर्षें मुंबईत व नंतर पुण्यांत नेहमीं बदलणाऱ्या भाडयाचे घरांत रहावें लागल्यामुळें बाबांच्या पोथीपुस्तकांची व कागदपत्रांची मीं अक्षम्य हयगय केली आणि दैवहत असा मीं आतां आठवणी लिहीत बसलों आहें ! फार तर काय मीं माझा स्वतःचा पत्रव्यवहारही जपून ठेवला नाहीं. ही चूक मला खेद देत आहे.

**बाबांचें लग्न**

माझी आई आलगूर या गांवीं जन्मली. ती आपल्या आईबापांची बहुतेक पहिलीच मुलगी असावी असें तिच्या बोलण्यावरून दिसतें. नंतर कांहीं मुलांनंतर आतां हयात असलेले आमचे मामा रामजीबाबा व शेवटची मुलगी आमची मावशी तानूबाई ही होय. आमच्या आईची पहिली मुलगी बाळाबाई हिचेपेक्षां माझा मामा रामजी हा लहान असावा असें दिसतें. सोमा मुलगा अगदीं लहान असतांना आलगूरचे आजोबा एक वर्ष गुडघी रोगानें आजारी पडले. आणि त्या आजारांत चूल व मूल यांची सर्व जबाबदारी माझ्या अगदीं लहान असलेल्या आईवर पडली असें वर सांगितलेंच आहे. आईचें लग्न ह्या आजारापूर्वीं झालें कीं मागावून झालें हें कळत नाहीं. माझ्या बापाच्या घरची स्थिति जर चांगली होती आणि माझे बाबा जर शिकलेले व हुशार होते तर माझ्या आजोबांनीं अशा गरीब व लंगड्या मनुष्याशीं सोयरीक कां केली बरें ? यावरून वाटतें माझ्या आई–बाबांचें लग्न अगदीं लहानपणीं म्हणजे माझ्या बाबांच्या शिक्षणापूर्वीं झालें असेल. म्हणजे माझी आई सात वर्षांची व बाबा बारा वर्षांचे असतील हा सर्व केवळ अजमासच आहे. या अजमासाला आणखी एक कारण आहे. माझे बाबा लहानपणीं फार खोडकर असत. विशेषत: त्यांना झाडावर चढण्याचा नाद असे. माझ्या आजोबांच्या मळ्यांत एक मोठें केवडयाचें झाड होतें. केवडा काढावयास जाऊन बाबा लहानपणीं त्या झाडावरून पडून मरतां मरतां

वाचले. तेव्हांपासून आमच्या आईनें हरतालिकेचें व्रत घेतलें असें ती लहानपणीं सांगत असे. तिचें लग्न होण्यापूर्वी जर बाबा पडले असते तर तिनें हें व्रत घेण्याचें कारणच नाहीं. लग्नाचें वय मुलीचें ७।८ व मुलाचें १२।१३ हें सामान्यतः असतें. निदान ह्यापेक्षां जास्त तितक्या मागल्या काळांत असणें संभवनीय नाहीं. झाडावरून पडण्यालाही १२ वर्षांचें वय–२।३ वर्षें पुढें मागें संभवतें.

माझे बाबा आपल्या आईप्रमाणें काळे व रूपानेंही आपल्या आईचे चेहऱ्याचे होते. माझी आई तिच्या आईप्रमाणें फारशी गोरी नसली तरी थोडी उजळ निमगोरी आणि चेहऱ्यानें आपल्या बापासारखी होती. अर्थात् आईला लिहितांवाचतां येणें शक्य नसलें तरी वैष्णव ब्राह्मणाचें वळण, सात्विक राहाणी, शाकाहार, घरकामांत कष्टाळूपणा व हुषारी वगैरे गुणांनीं मंडीत होती म्हणून बाबांच्या वडिलांनीं हा जोडा पसंत केला असावा. ह्या दोन्ही घराण्याचें ब्राह्मणी वळण व माझ्या बाबांचें सुशिक्षण यामुळें माझें शिक्षण इतकें झालें. इतकेंच नव्हे तर शेवटपर्यंत माझा सहवासही ब्राह्मणाशींच घडला.

**यमुनाबाई**

आईची कानडी भाषा अगदीं शुद्ध वैष्णव ब्राम्हणाची तर बाबांची मराठी भाषा कर्नाटकांतील शुद्ध देशस्थ ब्राह्मणाची. त्याचप्रमाणें पेहराव; व तशाच संवयी. गोपीकृष्णावरची किती सुंदर सुंदर कान ी गाणीं व पुरंदर विठ्ठलाचीं भजनें आई म्हणून पाळण्यांत लहानपणीं आम्हांला निजवीत असे. तिचा गळा अकृत्रिम फार गोड, म्हणण्यांत स्वाभाविक करुणरसाचा उठाव असे. मोठेपणींही आम्हांला हीं गाणीं व गोपीकृष्णाच्या गोष्टी सांगून आम्हां भावंडांना असह्य कठीण दारिद्र्याच्या वेदना हळूवार करीत असे. व्रतें, उपवास व इतर गृहकृत्यें ब्राह्मणाप्रमाणें करण्याला आई आलगुरांत लग्नापूर्वीच शिकली असावी. शिवाय बसवंतरावांच्या सुशिक्षित व पाणीदार मुलाला दिली म्हणून कदाचित् ह्या कुळकर्ण्यांघरच्या बाया मंडळींनीं या लहान यमुनेला अधिकच

काळजीनें घरगुती वळण लावणें शक्य आहे. कारण माझी आजी गंगाबाई हिच्या अंगांत कांहीं हें वळण देण्याची करामत नव्हती. इकडे बसवंतराव जरी मोठे पाणीदार व रुबाबदार मराठे होते, तरी त्यांच्यांत आमच्या बाबांना कारकुनी बाण्याचें वळण लावणें शक्य नव्हतें. केवळ ह्या कोवळ्या जोड-प्याला ब्राह्मणी संस्कृति सहानुभूतीनें व योग्य दक्षतेनें तीं एकमेकांस विवाह-पाशानें बद्ध होण्यास योग्य ठरली. ही एक भाग्याची विधिघटनाच नव्हे तर काय ! माझ्या आईबापांचा वैवाहिक संबंध अगदीं आदर्शवत् मला ३७ वर्षें पहावयास मिळाला. माझ्या आजीचे दागिने तितक्या मागील काळीं कर्नाटकी ब्राह्मणेतरांप्रमाणें किंचित् ग्राम्य असत. पण माझ्या आईचे दागिने मराठा पद्धतीचे व सर्व सोन्यामोत्याचे वजनदार जडावाचे होते. केवळ सांपत्तिक दृष्टया पाहातांही माझे वडील कर्ते झाल्यावर आजोबापेक्षां अधिक संभावित व श्रीमंत स्थितीला पोहोंचले. पण आजा आजीचे मागें त्यांनीं आपल्या निष्काळजीपणानें म्हणा किंवा धार्मिकपणानें म्हणा आपल्या घराची धूळधाण केली, इतकेंच नव्हे तर, आम्हांला अन्नालाही महाग केलें. फार काय आईची जोड व एक प्रकारचा निर्बंध नसता तर बाबा कदाचित् आम्हांला कोणावर तरी टाकून बैरागी होऊन गेलेही असते. म्हणून आम्हीं सर्वस्वी आईचें ऋणी आहोंत.

**सासुरवास**

माझ्या आईच्या अंगी ही दैवी पात्रता येण्याला तीन प्रकारचे टाकीचे घाव तिला अगदीं लहानपणापासून तो अगदीं मरणाचें दारापर्यंत जवळ जवळ ७० वर्षें सोसावें लागले. प्रथम तिचे माहेरचें दारिद्र्य आणि बाप लंगडा व आई कर्तृत्वहीन असल्यामुळें, माझ्या आईचे झालेले हाल. दुसरें तिचा पराक्रियांचें म्हणजे वैष्णव ब्राह्मणांचें लागलेलें वळण आणि तिसरें तिला कठीण सासुरवास. पहिल्या दोन्हींची कल्पना वरील माहितीवरून येण्यासारखी आहे. तिसरा जो सासुरवास त्याच्या गोष्टी आईनें आमच्या लहानपणीं ज्या

उठतां बसतां सांगितल्या त्या ऐकून आमचें कोवळें हृदय तर करपत होतेंच; पण अद्यापि त्यामुळें सामान्यतः स्त्रीजातीचे हाल विशेषतः हिंदुस्थानच्या कन्यांचें दुर्भाग्य कळून येतें. आमच्या आजीचा -संताबाईचा- स्वभाव खाष्ट होता हें वर सांगितलें. ती फार क्रूर होती अशांतला प्रकार नव्हता, पण अगदीं हेकड, सहानुभूतिशून्य आणि पक्षपाती होती. तिला दोनच मुलें होतीं व त्यांतल्या त्यांत तिचें प्रेम तिच्या मुलीवर, -आंबाबाईवर- जास्त होतें. गरिबीमुळें ही मुलगी आमच्या घरींच राहात असल्यामुळें सासूच्या कहरांत नणंदेची भर पडत असे. त्यामुळें ती सुनेला मरे मरेतों राबवी हें त्याकाळीं साहजिक असें.

आमचा रयताबा

आमचे घरीं रयतावा मोठा होता. दावणींत आठ बैल औताचे तर असतच. शिवाय गाई, म्हशी आणि वासरांचें खिल्लार असे. आजी रानांत गड्यांच्या बरोबर सर्व काम स्वतः करी. तिचा भाऊ व्यंकप्पाही राबत असेच. माझ्या आईला शेतांत मात्र जावें लागत नसे, पण घरकामाचा बोजा लहानपणापासून एकटीवरच पडे. नणंद होती तिचा उपयोग चहाड्या सांगण्यापुरताच. आजोबा, आजी, बाबा, नणंद, आंबाबाई, केव्हां केव्हां तिचा नवराही, व्यंकप्पा, त्याचा मुलगा शिद्‌ड्, आम्ही दोन तीन मुलें, आंबाबाईची मुलगी भागूबाई, दोन चार गडीमाणसें शिवाय अतिथि, बैरागी, पाहुणे; इतका हा नेहमींचा राब! सकाळीं चार वाजल्यापासून दळणाची घरघर सात वाजेपर्यंत चाले. मग पाणी विहिरींतून आणणें, स्वयंपाक, भांडीं धुणें, जेवण होतें न होतें तोंच सूत कातणें, मग इतक्या बैलांच्या शेणाच्या गोवऱ्या करणें, शिवाय रात्रीचा स्वयंपाक. श्रीमंत आप्पासाहेबांचे राहणें जमखंडीहून १॥ मैलावर डोंगरांत रामतीर्थ नांवाचे ठिकाणीं असे. तें काम आटोपून यावयाला रात्रीं ११।१२ वाजत, तोंपर्यंतही घरचें काम आटपत नसे. बाबा कामावरून लौकर येत नसत. पुन्हा भल्या सकाळीं दळणाला उठावें लागत असे. बाबांचे आणि आजोबांचें

वैभव असतां तरुण सुनेला इतकें काम कां? तर त्या काळची साधी आणि कष्टाळू राहणी, आणि विशेषतः आजीचा हेकडपणा. आजोबांना हा सासुरवास आवडत नसे. पण नित्याची कटकट करणेंही त्यांच्या सुखवस्तु स्वभावाला आवडत नसे. नशीब आईचें!

हालअपेष्टा

नुसता कामाचाच भार नसे. आईला एकदां जी अगदीं लहानपणीं सासरीं आणली होती ती माहेर ६ मैलांवर असूनही २।४ वर्षांत एकदांही तेथें पाठविण्याची मारामार पडूं लागली. कारण माहेरचीं माणसें गरीब, आईचें बाळंतपणही करण्यास असमर्थ. घरांत वस्त्रालंकाराची रेलचेल असूनही आईला ती घरांत घालून कौतुक करण्याची सहृदयता आजींत नसे. इतकेंच नव्हे तर आपल्या लाडक्या मुलीला तितकेच दागिने नाहींत म्हणून कांहीं अंशीं मत्सरही आड येत असावा. हिंदु सासूरवासाचीं नाजूक कारणें इतकीं आहेत कीं जुन्या वळणांतील सर्व लोकांना सुद्धां त्यांची मीमांसा करतां येत नसते. आमच्या बाबांचाही स्वभाव, फार रागीट असे. मुलें होऊं लागेपर्यंत एक प्रकारचा जाच व मुलें होऊं लागल्यावर तो एक दुसराच भार. आमच्या आईला एकंदर वीस मुलें झालीं ( एक खंडीभर अशी म्हण आहे ). त्यांपैकीं एकाच वेळीं पांचांहून जास्त केव्हांच नव्हती. ह्यावरून निदान पंधरा तरी मुलांचा शोक आईला करावा लागला. आणि आमच्या आईच्या प्रेमाला सीमाच नाहीं. विशेषतः दोन मुलें मोठीं होऊन वारलीं. माझा मोठा भाऊ त्याचें नांव परशुराम ( लाडकें नांव भाऊच होतें ) हा आठरा वर्षांचा होऊन वारला. आणखी सर्वांत धाकटी बहीण चंद्राबाई नांवाची सुमारें १४।१५ वर्षांची होऊन वारली. भाऊ पटकीनें दोन दिवसांत तडकाफडकी वारला. त्याचा शोक तिनें कित्येक वर्षें इतका केला कीं दगडालाही पाझर फुटावा. पुढें आईचें म्हातारपणीं चंद्राबाई क्षयानें झिजून वारली. तिचा शोक आईला मरेपर्यंत पुरून उरला!

घरचें काम इतकें पडे कीं, त्याचा एकदां हृदयद्रावक परिणाम घडला. मी ५ वा मुलगा, माझ्या अगोदरचा कृष्णा म्हणून एक मुलगा होता. तो रंगानें उजळ आणि पिंडानें गुटगुटीत होता. सुमारें ६ महिन्यांचा असतां तो आईच्या अंगाखालीं चिरडून झोपेंतच मेला तें तिला कळलेंच नाहीं. त्याला पाजीत असतां आईला गाढ झोंप लागून, मुलाचा दम कोंडून सकाळीं मेलेला आढळला! मग त्या आकांताला व आईच्या हालाला कोण सीमा असणार!! हा प्रकार इ. स. १८७०।७१ मध्यें घडला असला पाहिजे. आजा आजी असेतोंपर्यंत म्हणजे इ. स. १८८० पर्यंत तरी आईला स्वातंत्र्य म्हणजे काय तें माहीत नव्हतें. कोणत्या अस्सल हिंदु सुनेला हें स्वातंत्र्य असणार! आणि आजी गेल्यावर लवकरच आमच्या घरची सुबत्ताही तिचे बरोबरच गेली. कारण बाबांनीं माझ्या जन्माचे अगोदरच म्हणजे इ. स. १८७३ चे सुमारासच सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. इतकेंच नव्हे तर त्यांनीं त्यानंतर कोणताच किफायतीचा धंदा केला नाहीं. गड्या-माणसांवर शेती कसची चालते. खर्च विनहिशोबी. एकूण आईला घरीं स्वातंत्र्य मिळतें न मिळतें तोंच आठरा विश्वें दारिद्र्यानें गांठलें!

माझी आजी संताबाई वारल्यावर दोनतीन वर्षें माझ्या आईचीं फार हालांत गेलीं. त्यावेळीं माझी बहीण मुक्ताबाई (जनाक्काच्या पाठीवरची, आठवी मुलगी) हिचे जन्मापूर्वी (आई गरोदर होती) जवळ जवळ एक वर्षभर आई हिंवतापानें बेजार होती. त्यावेळीं मी नुकताच मराठी शाळेंत जावयास लागलोंच असेन. बहुतकरून तें १८८०–८१ साल असावें. आईला रोज दोनप्रहरीं कडकडून हींव भरत असे. तिला तहान फार लागे. तेव्हां पाणी तापवून देण्यालाही घरीं कोणी नसे. बाबा कोठें तरी बाहेर जात असत, मला माहीत नाहीं. माझी बहीण जनाक्का २।३ वर्षांची असेल. अशानें आई फार खंगली होती. शेवटीं अशांतच बाळंतपण आलें.

**तान्याक्का**

आई सर्व महिने आजारी असल्यामुळें जन्मलेलें मूल तान्याक्का अर्थात अशक्त व रोगीच असणार. या आजारामुळें तान्याक्काच्या मेंदूवरही परिणाम झाला होता. ती फार भोळसर होती.

माझा भाऊ परशुराम ह्याच्या पाठीवर आम्ही चौघे मुलेंच झाल्यामुळें व सातवी मुलगी जनाक्का जन्मल्यामुळें ही आमच्या घरांत पहिलीच मुलगी जगूं, म्हणून जनाक्का ही आमच्या सर्वांची लाडकी होती.

जनाक्का

विशेषतः ती माझ्या बाबांची मोठी लाडकी होती. ती लहानपणीं अंगानें गुटगुटीत, बुद्धीनें चुणचुणीत, आणि भांडखोर व बोलकी असे. दिवसांतूनच काय पण तासांतूनहि आम्ही कितीदां तरी भांडत असूं. कारण दोघांचाही स्वभाव तापट, हावरा, अधाशी, खोडकर व दोघेंही आम्हीं बाबांचे लाडके, त्यामुळें आमच्या कागाळ्यांना सीमाच नसे! आमची वर्दळ आईकडे गेली कीं, स्वयंपाकघरांतलें काम सोडून तिनें आम्हांला धमकावयाला सोप्यांत बाहेर यावें. पण आईचा स्वभाव शांत व सहनशील असल्यानें आम्हां दोघालांही तिच्या रागाचा धाक मुळींच वाटत नसे. पण बाबांचा नुसता त्यांच्या नांवाचाही आम्हांस जबर धाक असे. ते घरीं असेतोंपर्यंत त्यांच्यासमोर उभे राहाण्याचीही आम्हांला छाती होत नसे. ते बाहेर गेलें कीं, तावडतोब आमच्या धांगडधिंग्याला सुरवात होई. माझा मोठा भाऊ माझ्या आईसारखा शांत व मवाळ होता. तो आमच्यांत फार मिसळत नसे. धाकटी तान्याक्का थोडी मोठी झाल्यावर आमचेबरोबर खेळावयास येई. पण ती फारच भोळसर असल्यामुळें आम्ही सांगूं तें तें ती मुकाट्यानें करी. दोन भाऊ व दोन बहिणीच काय तीं आम्ही भावंडें घरीं लहानपणीं एकत्र समागमांत होतों. माझा मोठा भाऊ इ. स. १८८५ सालीं पावसाळ्यांत पटकीच्या रोगानें वारला. त्यावेळीं गांवांत ही साथ बरीच होती. म्हणून जमखंडीच्या गांवकऱ्यांनीं मरीआईची मोठी यात्रा केली. त्यावेळीं

कित्येक रेडे, पुष्कळशीं बकरीं व कोंबड्यांची तर गणतीच नाहीं, इतक्या प्राण्यांचा वध झाला !

**आमचा वाडा**

इतकीं मुलें लहानपणीं वारण्याचें कारण आमच्या वाड्याची आरोग्याच्या दृष्टीनें परिस्थिति वाईट होती. आमचे घराचे पश्चिमेला लागून एक मोठें तळें होतें. त्याच्या खालच्या सखल भागांत आमचा वाडा असे. सांडपाणी जाण्याला कोठें वावच नव्हता. दक्षिणेलाहि आमच्या घराचे मागें उंचवटाच होता. स्वयंपाकघरांत एक न्हाणी होती व बाहेर सोप्याचे खालीं, मोठ्या दरवाजाला लागूनच एक दुसरी न्हाणी होती. पण दोहींचेंही सांडपाणी दोनचार हातांवर जमिनींतच जिरत असे. अर्ध्या घरांत अंधार, ओल व कोंदट हवा असे. मोठा मुख्य दरवाजा उत्तरेकडे तोंड करून होता. व त्याच्या आंत थोडें आंगण व थोडी पडवी होती. हवा आणि उजेड यावयाला काय ती एवढीच वाट होती. दक्षिणेच्या बाजूला तीन खिडक्या होत्या. त्या लहानच होत्या व त्या बाजूला गांवचे लोक शौचास बसत, म्हणून त्या आम्हांला झाकाव्या लागत. उजेडाला साणी राखली होती. त्यांतून दोनप्रहरीं ऊन पडे, पण हवा येणें शक्य नसे. आरोग्याचे दृष्टीनें हें घर अतिशय वाईट असे. मोठ्या दाराच्यापुढें सुमारें एक एकराचें आंगण असे. त्यांत उकिरडे, कडब्याच्या गंजी, गोवऱ्याचे हुडवे, शेणाचे ढिगारे असत. वायव्य कोनास एक पेवाचा पायखाना असे. त्याचा उपसाही वेळेवर होत नसे. एवढंच बरें होतें कीं, आमच्या वाड्याच्या दक्षिण, पश्चिम व उत्तर बाजूनें बऱ्याच अंतरापर्यंत दुसऱ्या कोणाचींही घरें नसत. पश्चिमेच्या बाजूला तर मोठें विस्तीर्ण तळें ( लकन केरी नांवाचें ) आणि त्याच्या पश्चिमेस मोठा डोंगरच होता. आमचा वाडा गांवाच्या पश्चिम हद्दीवरचा शेवटचाच होता. वाड्याबाहेर जरी मोकळी हवा मुबलक होती तरी आंतली स्थिति अपायकारक होती. बाळतपणांत बाळंतिणीचे खोलींतच एक खड्डा खणून त्यांतच बाळं-

तिणीला १०।१२ दिवस न्हाऊ घालीत. अशा स्थितींत इतकीं मुलें लहानपणींच वारलीं हें आश्चर्य नसून आम्हीं ५।७ जण तरी कसें वांचलों हेंच आश्चर्य होय.

आईच्या गोष्टी

दर दुसरें वर्षी आमच्या आईचें बाळंतपण हें ठरलेलेंच असे. आणि त्यावेळीं मागलें मूल कांहीं जिवंत नसे. बाळंतपण किंवा मुलांचा आजार व मरण याखालीं माझ्या आईची सर्व शक्ति खचली. तरीपण मुलांचा कंटाळा किंवा संसाराचा तिटकारा–किंबहुना दुःखाचा किंवा निराशेचा एक उद्गारही कधीं आईच्या तोंडांतून आमच्या कानांवर आला नाहीं. उलट दारिद्र्याच्या असह्य वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही; आम्हा लहानग्यांना नेहमीं आपल्या माहेरच्या सुखदुःखाच्या गोष्टी रसिकपणानें सांगून आई आमची गोड करमणूक करीत असे. आईच्या गोष्टी व गाणीं हाच आमचा मोठा मेवा होता. तिची आनन्दी आणि विनोदी वृत्ति हीच आमची विश्रांति होती. तिच्या गोष्टीची आम्हांला पुढें पुढें चटच लागली. इतकी कीं, जर भूक लागली असली, स्वयंपाकला अवकाश असला किंबहुना, भाकरीबरोबर खावयास चांगली भाजी नसली तर आम्हीं आईच्या काठवटीभोंवतीं जमून तिला गोष्टी सांगण्यास लावीत असूं. मग तिनें आम्हांस अशा प्रेमळ कहाणींत गुंतवावें कीं, स्वयंपाक केव्हां झाला, आम्हीं काय खाल्लें कीं मुळींच कांहीं खाल्लें नाहीं याचें आम्हांस भानच रहात नसे. बाबा एखादे वेळीं रात्रीं उशीरा घरीं आले कीं, आमच्या गोष्टीची मेजवानी लांबे! केव्हां केव्हां आम्हीं वन्समोअरही म्हणत असूं ! एकंदर आईच आमची खेळगडी होती. आम्हांला बाहेरच्या खेळगड्याची जरुरीच लागत नसे. आमचा वाडा एकीकडचा, अंधारी व भयाण असल्यानें लोकांच्या नजरेंत तो भुताटकीचा एक मोठा अड्डाच होता. शिवाय आमचे आजूबाजूचे सर्व घरांतून, किंबहुना आमचे सर्व मराठा जातींतही आमच्या-

इतकें सुशिक्षित व वजनदार घराणें नसल्यानें भोंवतालच्या लोकांना आमचा मोठा दरारा वाटत असे.

**आत्मसंतोष**

आमच्या बाबांचा स्वभाव रागीट, सडेतोड, करारी असल्यानें व आमची आई आपल्या आईप्रमाणेंच, कधीं आपल्या दाराच्या बाहेर कामाशिवाय पाऊलही टाकणारी नसल्यामुळें आमचे घरीं शेजाऱ्याचा विनाकारण सुळसुळाट कधीं नसे. कितीही त्रास असो व कसलाही प्रसंग येवो, बाबा घरीं असोत नसोत, आई आम्हां चौघां पिलांस एकाद्या पक्षिणीप्रमाणें पंखाखालीं घेऊन आनन्दानें बसे. व आम्हांलाही तिच्या पंखाशिवाय दुसरा आसरा नको असे. आजा-आजी असेतोंपर्यंत ज्या वाड्यांत मोठ्या दणक्यानें रयतावा चालत असे तेथें त्यांच्यामागें थोड्याच वर्षांत सर्व वैभव होरपळून; रानांत शेत नाहीं, गोठ्यांत गुरें नाहींत, घरांत माणसेंही नाहींत अशी ओसाड स्थिति झाली. तरी बाबांना संसाराची काळजी म्हणून कसली ती लागेना, किंवा आईच्या स्वभावांत कडूपणाची कधीं छटा दिसून आली नाहीं. ह्या धन्य संतोषाचा माझ्या मनावर जो परिणाम झाला, मला जे बाळकडू मिळाले तेंच माझे अमुल्य भांडवल. माझें पुढील आयुष्याचे तारूं अनेक तुफानांत जें सुरक्षित चाललें त्याला आधार काय ती माझ्या आईबापाची धन्य आत्मसंतुष्ट वृत्ति.

सोळा वर्षें माझ्या बाबांनीं अगदीं कांहीं धंदा रोजगार न करितां घरीं निजून काढलीं. या सोळा वर्षांत घरची शेती-भाती, गुरें, गडी--माणसें आईच्या अंगावरची सर्व चिजवस्तु फुटक्या घड्यांतील पाण्याप्रमाणें गळून व झिरपून माझ्या नजरेसमोर गेली. मी अगदीं लहान असतांना माझ्या हातांत सोन्याचीं कडीं, कमरेस सोन्याचा झिळीमिळी करगोटा, गोठ्यांत मोठमोठे धिप्पाड बैल आणि शेतांत फार दिवसांचे इमानी नोकर पहात असे. दोहोंकडच्या आजाआजीच्या कुशींत लडिवाळप्रमाणें लोळलों होतों. सणवार,

उत्सव, समारंभ पाहात असे. घरांत पाहुण्यांची व आश्रितांची मांदी जमत असे. घरीं पुराणिक, पुरोहित, भजनीमंडळी, साधु, संत, फकीर, वैरागी, तडीतापडी यांची रीघ लागे. हळूहळू मी नुसत्या दोनतीन भावंडांतच सुख मानून माझ्या आईभोंवतीं घिरट्या घालून सुखानें राहण्यास शिकलों. हा कोणाचा प्रभाव ? केवळ माझ्या आईच्या दैवी संतोषाचा !

**बाबांचें सरपण**

बाबा देवळांतून, मठांतून, कोठें तरी भजनाला जात. घरीं आले तर निजून रहात. जागेपणीं त्यांचेसमोर उभे रहाण्याची आम्हां कोणाची छाती नसे. मग आम्ही चार मुलें व आई हेंच पंचायतन आत्मसंतोषाचें दिव्य आगर होतें. आमच्या भोंवतालचें भंगुर वैभव कसें पार नाहींसें झालें याचें एकच हृदय-द्रावक उदाहरण सांगतों. आमच्या रहात्या घरांतील माया तर सर्व गेलीच; पण आमच्या बाहेरच्या विस्तीर्ण आंगणांत चौफेर कुळवाडी होती. म्हणजे भोंवतालीं खोल्यांतून गरीब भाडोत्री कुटुंबें रहात असत. त्यांच्यापासून बाबा कांहीं भाडें घेत असतील असें मला वाटत नाहीं. कारण त्यावेळीं घराला भाडें घेणें लाजीरवाणीच गोष्ट समजत. हळूहळू हीं सर्व कुळें परागंदा झालीं. त्यांच्या धाब्यावजा खोल्यांच्या दुरुस्तीचा त्राण आमच्यांत उरला नाहीं. स्वतः आमच्या चुलीस जळणाचीही पंचायत पडूं लागली. मग काय विचारतां ! या पडक्या खोल्यांच्या मोठ्या तुळया व वासे आम्ही एका सोळा वर्षांत सरपण करून जाळलें. ' विठू, वासे आण ' म्हणून आईनें सांगण्याचा अवकाश कीं, धांवलोंच मी, एका हातानें शेंडी व दुसऱ्या हातानें लंगोटीचें शेंपूट ओढीत वासे ओढावयाला. पांडवप्रतापांतील द्रौपदीवस्त्रहरणाचें चित्र मी पोथींतून पाहिलेंच होतें. दुःशासनाचा आविर्भाव आणून मी आमच्या जुन्या वाड्यांतील आंगणाचे बाजूच्या धाब्याचे वासे ओढीत असे आणि मोठ्या फुशारकीनें आईला जळण आणून देत असे. हा माझ्या बाबांचा संसार !

घरचें आणि संसाराचें कांहीं होवो, बाबांच्या देवदेवतेमध्यें व भजनपूजनांत कांहीं खंड पडला नाहीं. आजी वारल्यावर दोनतीन

**करवीरची यात्रा**

वर्षांनीं बाबांला दत्ताच्या उपासनेचा नाद लागला. घरीं श्रीगुरुचरित्राच्या पोथींचें पारायण चाललेलें. बाहेरची भाविक मंडळी ऐकावयास येत व बाबा मोठ्या खड्या आवाजांत पोथी वाचून अर्थ सांगत. जमखंडींत काण्णवआळींत एक दत्ताचें देऊळ आहे. तेथें बाबा सायंकाळीं भजनाला जात. याचवेळीं नरसोबाची वाडीची आणि कोल्हापूरच्या यात्रेची टूम निघाली. त्यावेळीं अद्यापि आमच्या घरची गाडी-बैल, गडीमाणसें होतीं. बाबा, आई, आम्ही चार भावंडें कदाचित् एकादें पांचवें तान्हें मूल, शिवाय जिऊबाई नांवाची काण्णवआळींतील एक विधवा ब्राम्हणाची बाई ( ही आमच्या घरची पुरोहित चंद्रभट डेंगरे यांची बहीण होती ) व आमचा तुकाराम नांवाचा मराठा गडी इतके जण आमच्या स्वतःच्या गाडींतून कोल्हापूरचे महालक्ष्मीचे यात्रेस निघालों. वाटेंत अथणी, शेडवाळ, कागवाड, कुरुंदवाड, मिरज, सांगली, हातकणंगळें वगैरे लहान-मोठीं गांवें पाहिलीं. नरसोबाच्या वाडींत श्रीदत्ताची यात्रा केली.

एका ब्राम्हणाचे घरीं उतरून देवाचा नैवेद्य व ब्राम्हणभोजन केलें. कोल्हा-पुरास गांवाबाहेर पूर्वेकडे एकवेरीचें देऊळ आहे. त्याच्या ओवरींत तीन दिवस उतरलों होतों. कोल्हापूरचें राजधानीचें वैभव आणि आंबाबाईचें भव्य देऊळ, त्याचें महाद्वार, कोल्हापुरांतील पाण्याचे नळांना सुंदर गायमुखें लावलेलीं, रंकाळे व पदमाळे हे तलाव या साऱ्यांचा मनावर चांगला ठसा उमटला. एकवेरी देवळांतील आंगणांत एक मोठा विस्तीर्ण चबुतरा आहे. त्यावर खेळत असतां तेथील एका मुलाशीं भांडण होऊन माझी मारामारी झाली. तेव्हां “ विठ्या, तूं कोठें गेलास तरी तुझी आगळीक कांहीं थांबत नाहीं ना रे. ” असें म्हणून आईनें मला त्या मारामारींतून सोडविलें.

---

# भाग दुसरा : ' प्राथमिक शिक्षण '

## प्रकरण ६ वें

### आमचीं लग्नें

येथपर्यंत माझ्या पूर्वजांचा वृत्तांत संपला. येथून पुढें माझ्या स्वतःच्या पिढीचा वृत्तांत सुरू झाला.

**तीन लग्नें**

माझा भाऊ, मी, आणि माझी धाकटी बहीण ह्या तीन भावंडांचीं लग्नें एकाच वेळीं जमखंडींत बाबांनीं केलीं. बहुतकरून हीं लग्नें कोल्हापूरच्या यात्रेनंतर इ. स. १८८२ च्या सुमारास मे महिन्यांत ( वैशाखांत ) झालीं असावीं. सालाची खात्री नाहीं. १८८२ हें साल नक्की असेल तर माझें वय त्यावेळीं ९ वर्षांचें, भाऊचें १४ वर्षांचें आणि बहिणीचें ४ वर्षांचें होतें. हें लग्न करण्यांत बाबांचा फार अव्यवहारिकपणा व अविचार दिसतो. तो असा— माझ्या भावाचें वय फार तर शोभण्यासारखें होतें; पण माझें वय व माझ्या बहिणीचें वय अगदींच अक्षम्य होतें. वधूची पारख म्हणावी तर माझ्या भावाची वधू फार तर ५–६ वर्षांची होती. ती जमखंडींतील नातलगांची होती. माझी वधू माझ्या आत्या आंबाबाईची सर्वांत धाकटी मुलगी ही पुरी एक वर्षाची तरी होती कीं नव्हती

ह्याची शंकाच आहे. आई तर म्हणत होती कीं, ती सहा महिन्यांची होती. लग्नाचे वेळीं तिला नीट बसतांहि येत नव्हतें. तीन लग्नें एका वेळीं करूं नयेत अशी आमच्या आईची समजूत होती. पण तिचें कोण ऐकतो ? मला आपली मुलगी द्यावी असा माझ्या आतेचा आग्रह होता. मी तिचा फार लाडका होतों. माझा वडील भाऊ १३–१४ वर्षांचा झाला म्हणून त्यावेळचे समजुतीप्रमाणें तो लग्नाला योग्य झाला होता. तशांत आमच्या घरांत बरेच वर्षांत लग्नकार्य कधीं होण्याचा प्रसंग आला नव्हता. त्यावेळीं जरी आमच्या घराण्याला पूर्ण दारिद्र्य आलें नव्हतें तरी कर्ज काढल्याशिवाय लग्न होणें शक्य नव्हतें. लग्नाचे वेळीं घरांतील जे कांहीं दागिने उरले होते, तेही पण गहाण ठेवणें शक्यच नव्हतें, म्हणून त्यांनीं आमचा वाडा गहाण ठेवून प्रथम कर्ज काढलें. तें चिंतोपंत भिडे ह्या नांवाच्या त्यांच्या एका मित्राकडून अस्सल मुद्दल ५०० रुपयांचें होतें. धान्य वगैरे घरचें असावें.

**सालंकृत कन्यादान**

ह्या तिन्ही लग्नाचा खर्च बाबांच्याच अंगावर पडला. कारण माझ्या भावाचा सासरा हा गरीबच होता. माझा सासरा रामजी माने हा दुष्काळांत आमचेकडेच होता असें वर सांगितलेंच आहे. तेव्हां हीं दोन्ही लग्नें आमच्याच खर्चानें करावीं लागलीं. माझ्या बहिणीचें सालंकृत कन्यादान केलें. तिचें सासरचें घराणें आसंगीचें चांगलें खाऊन पिऊन सुखी होतें, तरी सर्व खर्च बाबांनीं कर्ज काढून केला. यावरून आमचे बाबांचे जवळ जरी स्वतःची फारशी माया उरली नव्हती, तरी त्यांची पत बरी होती म्हणावयाची. आसंगीचे व्याही गोपाळबाबा कामते नांवाचे सभ्य गृहस्थ आणि समजूतदार रयत होते. पण वराला लिहितां वाचतां येत नव्हते. सुखवस्तु बापाचा तो एकुलताएक लाडका मुलगा होता. त्यांचें वय माझ्याच इतकें म्हणजे ८–९ वर्षांचें होतें. नांव कृष्णराव होतें. गोपाळरावांची बायको द्वारकाबाई, ही स्वभावानें खाष्ट व मत्सरी होती. या लग्नाचे वेळीं माझे आईचे पायाला नारु होऊन ती फार आजारी

होती. मुख्य वरमाई अशी आजारी, घरीं दुसरें कोणी कर्तें वडील माणूस नाहीं. अशा वेळीं हीं लग्नें बाबांनीं कर्ज काढून उभारलीं ! ब्राह्मणाला दक्षिणा देऊन मुहूर्त व लग्नपत्रिका वर्तवली असेल. पण यांपैकीं एकही स्थळ माझ्या आईला मान्य नव्हतें.

**व्याह्यांचा धिंगाणा**

सर्व लग्नांत तिची फार हेळसांड झाली. आमच्या बाहेरच्या विस्तीर्ण अंगणांत मोठा मांडव घातला होता. अर्थात् याच मांडवांत माझ्या बहिणीचें लग्न लोकरीतीप्रमाणें आमचे घरीं झालें. पण माझ्या आत्येची घरची गरिबी फार म्हणून माझेंही लग्न याच मांडवांत झालें. आणि तीन लग्नें एकाच मांडवांत करूं नये म्हणून माझ्या भावाचें लग्न मात्र त्याच्या सासऱ्याच्या घरीं झालें. पण जेवणाखाण्याचा सर्व खर्च बाबांचा. खर्च आमचा पण देखरेखीला आमचेकडचें कोणी नसल्यामुळें एकंदर लग्न समारंभांत चार दिवस एक-सारखी अंदाधुंदी चालली होती. मी लहानपणीं फार खेळकर होतों. हळदी लागल्यावर नवऱ्या मुलानें बाहेर जाऊं नये, असें असतां मी लग्नाचे वेळीं तळ्यावर खेळत होतों. तेथून मला धरून आणिलें. माझ्या बायकोला तर पाळण्यांतून आणून माझेच मांडीवर बसविलें. ती माझी आतेबहीण असल्या-मुळें पूर्वीपासून माझा तिचा लळा होताच मग लाजावयाचें कसें तें आम्ही शिकावयाचें पुढेंच होतें. सर्व खर्च आम्ही करून व्याह्यांनीं म्हणजे माझ्या व माझ्या भावाच्या सासऱ्यांनीं बाबांला लग्नांत फार त्रास दिला. वरपक्षानें हिणवावयाचें तें उलट वधूपक्षांचीच कारवाई फार चालली. शेवटीं गांव-जेवणाचे दिवशीं रात्रीं बारा वाजतां पानें पडलीं, पण कांहींतरी भांडण काढून जेवावयाला आलेली बरीच मंडळी पानावरून अभद्रध्वनि काढीत निघून गेली. ही हकीकत माझी आई पुढें किती दिवस तरी सांगून आमची करमणूक करीत असे.

आमचीं हीं तिन्ही लग्नें सायंकाळीं गोरज मुहूर्तावर झालीं. लग्नसमारंभ ४।५ दिवस यथासांग झाला. हळदी, रुखवत, रासन्हाणी, अक्षता, लग्नानंतरचे नवरानवरीचे खेळ, नवऱ्याला बागेंत नेणें वगैरे सर्व सोहळे झाले.

**केळवण**

लग्नांत केळवणासाठीं इतक्या घरीं जेवणास जावें लागलें कीं, मला फारच कंटाळा आला होता. सर्व ओळखीचीं माणसें एकाच दिवशीं जेवणास बोलावणार ! मग जेवण कसचें होतें. नुसता भात किंवा शेवयाचें ताट पुढें ठेविलें कीं त्यावरचा गूळ किंवा साखरेला थोडा हात लावला कीं झालें जेवण ! आणि प्रत्येक घरीं वाजंत्रीं लावून जावयाचें असे. बेजारून गेलों.

यापमाणें हा लग्नाचा धांगडधिंगा संपल्यावर आम्ही सर्व माझ्या बहिणीच्या सासुरवाडीला म्हणजे आसंगी गांवाला निघालों.

**आसंगीचें वऱ्हाड** *हें खेडें जमखंडीच्या पश्चिमेस कुडची स्टेशनच्या वाटेवर* ११ मैलांवर आहे. सुमारें चार पांच गाड्यांच्या भरतीचें वऱ्हाड निघालें. आमचेबरोबर आमचे आल्गुरचे मामा रामजीबाबा हे होते. फक्त बाबा आणि आई मात्र आलीं नाहींत. कारण कन्यादान केलें असतां कन्येच्या घरीं आईबापांनीं कन्येला मुलें होईपर्यंत अन्नग्रहण करावयाचें नसतें. आसंगीचें व्याह्याची शेती मोठी व घरही प्रशस्त होतें. रात्रीच्या वेळीं आम्ही गांवांत प्रवेश केला. आमची थाटानें वरात निघाली. दारुकाम वगैरे चांगला थाट झाला.

**पेंढारधाड**

आसंगीस नदी आहे. नदीवर व विहिरींत पोहणें; यथेच्छ जेवणें आणि रस्त्यांतून धिंगाणा घालणें हाच काय तो आमचा कार्यक्रम होता. बरोबर आमचे आई-बाबा नव्हते, मग व्याह्यांच्या घरीं आम्हांला कोण दाबांत ठेवणार ? आमच्या धुडगुशीला ताळच उरला नाहीं. आम्ही जमखंडीचीं बरींच मुलें होतों. त्यांत आसंगीच्या मुलांची भर पडली. मग काय आम्ही चार दिवसांत ह्या खेड्यांत कहर उडवून

दिला. गांवांत एक पेंढारधाड आल्याप्रमाणेंच झालें. सर्वांत हाल आसंगीच्या गांवडुकरांचे झाले. आम्ही जमखंडीस असा डुकरांचा जमाव कधींही पाहिला नव्हता. बोळाबोळांतून डुकरांना आडवून त्यांच्यावर दगडांचा वर्षाव करून एक मोठें भारतीय युद्धच आरंभिलें. शेवटीं वृद्धमंडळी बरीच त्रासली. या खेडेगांवांत आम्ही शहराचे पाहुणे शिकलेले म्हणून आलों होतों, म्हणून प्रथम प्रथम कोणीच बोलूं शकले नाहींत. शिवाय त्याही मोठे वजनदार होते. पण खेड्यांतील वडील लोकांकडून शेवटीं आमची कानउघडणी झालीच.

अशा रीतीनें आठ दिवस मेजवान्या झोडून आणि मजा करून आम्ही परत जमखंडीस आलों.

---

## प्रकरण ७ वें

## वडील भावाचा मृत्यु

१८८५ सालीं मी १२ वर्षांचा व माझा भाऊ १७।१८ वर्षांचा झाला होता. ह्या सालाच्या आरंभीं माझी मराठी ५वी यत्ता संपून मी इंग्रजी पहिल्या यत्तेंत हायस्कुलांत गेलों. एव्हांपासून माझ्या आयुष्यांतील नवीन एक टप्पा सुरू झाला. माझें बाळपण संपलें आणि विद्यार्थी दशेला प्रारंभ झाला म्हणावयाचा.

**नवीन टप्पा**

माझ्या मराठी शाळेंत माझे गणित व भाषा वगैरे अभ्यास त्या वेळच्या शिक्षणाच्या मानानें बरे होते. मराठी शाळेचे हेडमास्तर विष्णुपंत गवंडे फार कडक होते. तरी माझी तरतरी पाहून ते मजवर प्रेम करीत असत. चौथ्या यत्तेंत मास्तर अंताजीपंत पोंक्षे नांवाचे होते; तेही प्रेम करीत असत. त्यावेळीं ब्राह्मणेतरांचीं मुलें सरकारी शाळेंत फारच कमी असत, त्यामुळें व मी

हुषार म्हणून कोणीही माझें कौतुकच करीत. पण दुसऱ्या यत्तेंत असतांना दत्तोपंत बेडेकर नांवाचा एक मास्तर फार तिरसट असे. त्यानें मात्र एके दिवशीं मला अतिशय मारलें होतें. त्यामुळें मांडींतून रक्त येत असतांना मी घरीं आलों. हें पाहून माझे बाबा शाळेंत आले व त्यांनीं त्या मारकट मास्तराचा खरपूस समाचार घेतला. त्यामुळें पुढें सगळ्याच मास्तरांवर दाब बसला. माझ्या वडील भावाची प्रगति मात्र शाळेंत मुळींच होईना. हें एक कारण बाबांनीं त्याला नेहमीं बोलण्याचें व मारण्याचें होतें.

इंग्रजी शाळेच्या अभ्यासांत इंग्रजी शब्द पाठ करण्याचा व विशेषतः त्यांच्या स्पेलिंगचा मला भारी कंटाळा येई. इतका कीं त्यामुळें मला इंग्रजी शाळा नकोशी वाटूं लागली. आबा म्हैसकर नांवाचा एक ब्राह्मण मास्तर पहिल्या यत्तेवर होता. तो स्पेलिंग नुसतें पाठ करावयाला लावी मग तें इतके नकोसें होई कीं पुष्कळ वेळां मला जीव द्यावा असें वाटे ! घरीं किंवा शाळेंत मला मदत करावयास कोणीच नव्हतें.

ह्यावेळीं आमच्या घरीं एक अरिष्ट घडलें. इ. स. १८८५ मध्यें जमखंडींत पटकीचा उपद्रव सुरू झाला. आणि अगदीं सुरवातीलाच माझा तरुण भाऊ १।२ दिवसच आजारी पडून एकदम वारला. तो शान्त व समजूतदार होता. म्हणून शेजाऱ्यांना व नातलगांना माझ्यापेक्षां तोच जास्त आवडत असे. बाबा त्याच्यावर राग करीत म्हणून आईला तो अधिक आवडत असे. तो असा एकाएकीं वारल्या-मुळें माझे आईला व बाबांलाही एकदम फारच मोठा धक्का बसला. आईनें तर पुढें ५।६ वर्षे अतिशय शोक केला.

माझा भाऊ वारल्यावर सुमारें पांच वर्षें आम्ही अत्यंत भयंकर दारिद्र्याचें हाल सोसले. इ. स. १८८५ च्या डिसेंबर महिन्यांत माझा धाकटा भाऊ एकनाथ हा जन्मला. ह्यापुढची, किंबहुना माझी धाकटी बहीण मुक्ताबाई हिच्या

**बंधु एकनाथ**

पाठीवरचीं मुलें जन्मतःच फार अशक्त जन्मलीं. जन्मतः एकनाथही अशक्त व किरकिऱ्या होता. आईच्या अंगावर दूध मुळींच नव्हतें. कोठून असणार ? भाऊच्या मरणाच्या शोकानें तिचें सारें रक्तही जळून गेलेलें, मग दूध कोठून असणार. अशा स्थितींत धोंडूबाई नांवाची एक गवळण आईचे ओळखीची होती. तिला ह्या मुलाची करुणा आली. ती रोज त्याच्यापुरतें म्हशीचें ताजें दूध फुकट देत असे. एरव्हीं एकनाथ हा वांचलाच नसता. भाऊ वारल्यावर मीच सर्वांत वडील अपत्य झालों. तेव्हांपासून माझा पोरकट-पणा जाऊन स्वभावांत एकदम फरक पडला. आमच्या घरच्या करुणास्पद स्थितीची मजमध्यें एकदम जाणीव उत्पन्न झाली. मी बारा वर्षांचा होतों, मला सर्व कळूं लागलें. भावाचा मलाही शोक होत होता. त्यावेळीं मी कस-लीशी एक कविता रचली होती व दत्तात्रयावर एक आरती रचली होती.

माझ्या ह्या स्वभावांतील एकदम पडलेल्या फरकामुळें आईबाबांना माझें मोठें कौतुक वाटूं लागलें. नुसता स्वभावांत गंभीरपणा व समजूत उत्पन्न झाली इतकेंच नव्हे तर शाळेंत माझा अभ्यासही उत्तम होऊन माझी वाहवा होऊं लागली.

इ. स. १८८६ सालीं माझी इंग्रजी पहिली यत्ता पास होऊन दुसऱ्या यत्तेंत गेलों. तेथें गेल्यावर वर्गांत माझा नेहमीं पहिला नंबर लागूं लागला. रोजच्या मार्कांची बेरीज होऊन महिन्याचे शेवटीं नंबर लागत. दुसऱ्या यत्तेपासून मी जो एकदां पहिला नंबर पटकावला, तो अखेर सातव्या यत्ते-पर्यंत एक नंबरही खालीं उतरलों नाहीं. एकदां पांचव्या यत्तेंत असतांना यलम्माच्या यात्रेला गेलों म्हणून काय तो माझा नंबर खालीं गेला. एरव्हीं नेहमीं माझा पहिला नंबर अगदीं ठरलेला. मॅट्रीकच्या परीक्षेला जमखंडी हायस्कूलमधून जितकीं मुलें गेलीं, त्यांतही माझाच नंबर पहिला होता.

पहिल्या यत्तेंत मला जी इंग्रजी भाषा फार अवघड वाटून, अगदीं आत्म-

**चुणचुणीतपणा**

हत्या करून घ्यावी इतकें वाईट वाटत होतें, त्याच भाषेंत मी सर्व वर्गांत प्रवीण ठरलों. विष्णुपंत गाडगीळ नांवाचे ब्राम्हण मास्तर दुसऱ्या यत्तेवर होते. माझी सर्व विषयांत कायमची तरतरी पाहून ते नेहमीं मजवर फार खूष असत. इतर वर्गांतील सर्व मुलें ब्राम्हणाचीं असून मीच काय तो मराठ्याचा, आणि तोही पहिला; ह्याचें माझ्या ब्राम्हण मास्तरांना मोठें कौतुक वाटे. कोणीही ब्राम्हणांनीं माझा जातिभेदामुळें हेवा किंवा द्वेष कधीं मी शाळेंत असतांना तरी केला नाहीं. भाषांतर पाठमालेच्या धड्यांत मी अगदीं चुणचुणीत उत्तरें देत असे. एकदां मला पक्कें आठवतें कीं, मास्तरांनीं एक प्रश्न केला. तो वर्गांत कोणाला आला नाहीं. मी त्याचें उत्तर बरोबर देईन अशी त्यांची खात्री होती. आणि तसें तें उत्तर चटकन मी दिलेंही. तेव्हां गाडगीळ मास्तरांनीं मला प्रत्येक मुलाच्या तोंडावर थुंकावयास सांगितलें. तें माझ्याच्यानें कांहीं केल्या होईना. पण मास्तरांनीं आग्रहच धरला. तेव्हां मला प्रत्येक मुलापुढें जाऊन किंचित् थुंकल्यासारखें करावें लागलें. जसजसा मी वरच्या वर्गांत जाऊं लागलों; तसतसे नवीन विषय संस्कृत, बीजगणित, भूमिति, शास्त्रें वगैरे लागू लागलीं. तशाच लेखी परीक्षा सुरू झाल्या. पण सर्वांत पृथक् पृथक् माझाच नेहमीं नंबर पहिला असे. त्यामुळें सर्वच मास्तरांचा व विद्यार्थ्यांचा मी आवडता झालों होतों.

**चिमुकली स्कॉलरशिप**

हायस्कुलांतील प्रत्येक वर्गांत असतांना पहिल्या दोन मुलांना दरमहा एक लहानशी स्कॉलरशिप मिळत असे. दुसऱ्या इयत्तेंत १-१॥ रुपयापासून ती सातवे इयत्तेंत ३ रुपयेपर्यंत होती. अर्थात् मला नेहमीं पहिल्या नंबरची स्कॉलरशिप मिळे. ह्यावेळीं घरीं तर भयंकर दारिद्र्य असे. माझ्या चिमुकल्या स्कॉलरशिपचीच घरीं मोठी मदत होत असे. त्यावेळीं जमखंडींत मोठी स्वस्ताई असे. एकंदर १ रुपयाला १६ पायल्या धान्य झालेलें मला

आठवतें. मग माझ्या चिमुकल्या स्कॉलरशिपकडे माझ्या आईचे डोळे लागून राहात, ह्यांत नवल काय ! इतकी जरी स्वस्ताई होती तरी आमचे घरीं उत्पन्न नसल्यानें आई आम्हां चार मुलांचे, बाबांचे व आपले प्राण कसे राखीत असे ते आईलाच ठावें किंवा देवाला ठावें ! अर्थात् तिला बाजारांत सर्वांत मिळेल तितकें वाईट व स्वस्त धान्य व भाजीपाला तसलाच आणावा लागे. पुष्कळ वेळां पेवांत बरेच दिवस ठेवून बिघडलेले जोंधळे बाजारांत विक्रावयास येत. ते फार स्वस्त म्हणून आई तेंच नेमकें आणी. त्याचा वास वाईट येई, पण आम्ही मुलें त्याच्याच भाकरी गोड करून खात असूं. कारण गोडी धान्यांत नसून आमच्या आईच्या हातांत विशेषतः तिच्या निर्मळ वाणींत असे. असल्या दाण्याची भाकरी, तसल्याच तुरीच्या डाळींचें वरण व तांबड्या मिरच्याची चटणी हे तीन पदार्थ आम्हांला बासुंदीपुरी-सारखे गोड लागत. आमचें लक्ष अन्नाकडे जाऊं नये म्हणून आई आपल्या लहानपणींच्या माहेरच्या व सासरच्या करुणास्पद कहाण्या सांगत असे. त्या आमच्या काळजांत इतक्या खोल जात कीं आमचें जेवण आटपून आमचे हात वाळले तरी आम्हांला भान रहात नसे.

पुष्कळ वेळां हें कदान्नहि आम्हांला पुरेसें मिळत नसे. बाळूबाई नांवाची एक कुणबीन पूर्वी आमची स्थिति बरी असतांना आमचे घरीं कामाला होती. पुढें आम्हांला अशी भयंकर स्थिति प्राप्त झाल्यावर त्या प्रामाणिक बाईला आम्हां बाळांचा कळवळा येऊन, कोठलेतरी फार दिवसाचे शिळे तुकडे आणून तिनें हळूच झाकून आईला आणून द्यावे. मग आईनें ते ताकांत अगर वरणांत अगर दोन्ही नसल्यास नुसते पाण्यांत भिजवून आमचेसाठीं ठेवावे. आम्ही सर्व मुलें शाळेंतून भूक, भूक म्हणत आल्यावर तेंच पक्वान्न खावें आणि पुढें कितीतरी वेळ नुसतीं बोटेंच चाटीत बसावें. आणि आमचा हा अल्पसंतोषी-पणा पाहून आईनें आम्हांला न कळत आंसवें गाळावीं आणि अशा आनंदांत आपली भूक विसरावी !

इतकें झालें तरी, आईनें कधीं कोणाची मजुरी केली नाहीं, कीं कोणाचे दारीं चिमुठभर मीठ मागण्यासाठीं कधीं उभी राहिली नाहीं. तिच्या आईप्रमाणें तीही उंबरठ्याच्या आंतच राही. बाजारहाट, हिशेब वगैरे सर्व आईलाच करावें लागे. वाणी, माळणी, तेलणी, गवळणी आईची कदर ओळखून असत. त्या सढळ हातानें माप देत व पैशांची कधींही जिकीर करीत नसत. एकंदरींत आमचा संसार अगदीं तुकारामबोवाच्या वळणावर चालला होता. फरक इतकाच कीं तुकारामाच्या मुलांना मराठी तरी लिहितां येत होतें कीं नाहीं शंका आहे. पण मी मात्र हायस्कूलमध्यें पहिला नंबर होतों. इतकेंच नव्हे तर माझ्या बहिणीही मुलींच्या शाळेंत लिहिणें, वाचणें, कशिदा काढणें वगैरे शिकत होत्या. दारिद्र्यानें पाठ पुरविली तरी आमच्या घराण्याचा रुबाब कांहीं कमी झाला नाहीं किंवा चालत असलेल्या धार्मिक सामाजिक परंपरेंत खंड पडला नाहीं. एकादशी, शिवरात्री, हरतालिका, गौरी गणपति, रानसटवाई या क्षुद्र दैवतांचीही समजूत माझे आई व बाबा करावयास कधींच चुकले नाहींत. मग नवरात्रासारखे समारंभ चुकत नसत हें सांगावयास नको. नवरात्रांत नऊ दिवस, गणेशचतुर्थी पांच दिवस आमच्या घराचा पुरोहित तम्मणभट्ट डेंगरे, निदान त्याच्या घरचा कोणी लहान मुलगा का होईना, रोज पूजा सांगावयाला यावयाचाच ! नवरात्रांत नऊ दिवस तो रोज सकाळीं ११ वाजतां कांहीं मंत्र म्हणून जात असे. तसेंच नऊ दिवस प्रत्येक रात्रीं मोठी पूजा होऊन थाटानें आरती होत असे. मूठभर कां होईना पुरण घालून आई नैवेद्याचे पांच कानोले करी. ते आम्ही चार भावंडें पूजा आटपल्यानंतर भांडभांडून खात असूं. गणेशचतुर्थीतील गणपती पाण्यांत बुडवण्याचे वेळीं ब्राह्मण विहिरीपर्यंत आलाच पाहिजे. दिपवाळींत एकाच पैशाच्या फटाकड्या मी आणि माझी बहीण जनाक्का थांबून थांबून उडवीत असूं. धाकटी तान्याक्का ( मुक्ताबाई ) नुसतें पाहूनच सुखी होई. हीच आवृत्ति

तुळशीचे लग्नाचे वेळीं ! आमची सांपत्तिक स्थिति बरी होती, तेव्हां भरपूर मिळालेली दक्षिणा आठवूनच, आमचे पुरोहितांनीं आपली सर्व परंपरा बिन-तक्रार चालविली. नागाचा उपास, हरतालीकेचा उपास, नवरात्राचा असे नाना तऱ्हेचे उपास आई व बाबा करीत. आणि आम्ही बोके त्यांच्या फराळा-वर हात मारून पुनः दुसरे दिवशीं पारण्याची वाट पाहात त्यांच्या आधीं ताटावर शेंडीला पीळ घालीत व लंगोटीचे शेपूट ओढीत तयार बसलेले !

---

# प्रकरण ८ वें

## खडतर पांच वर्षें

( १८८५-१८९० )

**स्वभावदोष**

येथपर्यंत आमच्या घरांतील दारिद्र्याच्या मीं आठवणी दिल्या त्या केवळ माझ्या बाबांच्या व विशेषतः आईच्या स्वभावाचें वर्णन करण्यासाठीं दिल्या. त्यांच्या स्वभावांतील दोष दाखविण्यासाठीं नव्हे. ह्या दारिद्र्याचें कारण माझ्या बाबांचा कदाचित् फार तर आळस हा असेल. पण कोणत्याही प्रकारची कोणाची फसवणूक किंवा अप्रामाणिकपणामुळें त्यांच्या उत्पन्नामध्यें आलेला तोटा हें नव्हतें. आतां ह्यापुढेंही कांहीं आठवणी द्यावयाच्या त्यांत बाबांच्या स्वभावांतले कांहीं दोष दिसतील. पण ते त्यांचे दोष नसून–निदान दोष दाखविण्याचा माझा हेतु मुळींच नसून,–माझ्या आईच्या स्वभावांतला दैवी चांगुलपणा दाखविण्यासाठींच मी केवळ त्या आठवणी देत आहें.

माझ्या आईच्या सहिष्णुतेची–तिच्या स्वभावाची पारख करण्याकरितां व आम्हां मुलांच्या भावी शिक्षणाकरितां देवानें आम्हांला दारिद्र्य हा मित्र दिला. त्याबद्दल आम्ही त्याचे आभारीच आहोंत. पण त्याही पुढें आम्हां मुलांची नसली तरी आमच्या आईची पारख करण्याकरितां आम्हांवर जे दुर्धर प्रसंग आले, त्याबद्दल काय म्हणावें हें समजत नाहीं. ते प्रसंग म्हणजे माझ्या बाबांला निशा करण्याचें व्यसन लागलें हे होत !

बाबांना प्रथम गांजा ओढण्याचें व नंतर कांहीं दिवसांनीं दारू पिण्याचें व्यसन लागलें ! मी या सर्व काळांत आमचे जे हाल झाले त्याबद्दल माझ्या पूज्य व बाणेदार बाबांला मुळींच दोष देऊं इच्छित नाहीं.

**संस्थानी नोकरी**

बाबा त्यांचे लहानपणापासून सुखांत व लाडांत वाढलेले. पैशांचा लोभ त्यांच्यामध्यें मुळींच नव्हता. लोभाचा इतका अभाव कीं त्यामुळें त्यांना पैशांची योग्य किंमतही कळत नव्हती असें म्हटलें तरी चालेल. त्यांचें शिक्षण बैठे आणि पांढरपेशी होतें. ही स्थिति त्यांचे अर्धें वय म्हणजे जवळ जवळ ते चाळीस वर्षांचें होईपर्यंत चालून मग त्यांना दारिद्र्य आल्यानें पुढें त्यांच्या स्वभावांत व धंद्यांत फरक पडणें कठीण झालें. जमखंडीचे यजमानाशीं ते भांडून आपण होऊनच घरीं बसले होते; व त्यावर यजमानांनीं दोन तीनदां बोलाविलें तरी गेले नाहींत. मला समजूं लागल्यावर ते म्हणत असलेले मला आठवतें कीं, आपण कोणता धंदा नोकरीशिवाय केला नाहीं व आतां नोकरीही जमखंडीच्या यजमानाशिवाय दुसरीकडे करावयाची नाहीं, असा माझा निश्चय आहे, आणि हा आग्रह मग तो बरा असो – वाईट असो त्यांनीं सोळा वर्षें चालविला. माझ्या जन्माचे सुमारास म्हणजे इ. सन १८८३ चे सुमारास त्यांनीं नोकरी सोडली. पुढें सोळा वर्षांनीं त्यांचा हा करारी आग्रह पाहून यजमान श्रीमंत आप्पासाहेबांनीं आपणच इ. सन १८९० चे सुमारास त्यांना आपले स्टोअर– कीपरचे ( हिशेबी ) विश्वासाचे

काम दिलें. पण दरमहा पगार दहा रुपये होता. १६ वर्षे घरीं अभिमानानें बसलेल्या नोकराला पुन्हा बोलावल्याबद्दल आप्पासाहेबांचे आभार मानायचे कीं इतक्या जुन्या अनुभवी माणसाला इतका लहान पगार दिल्या• बद्दल त्यांच्या कंजुषपणाची तारीफ करावयाची हें ठरविणें कठीण. पण कांहीं असो बाबांचा हा पगार व माझी स्कॉलरशिप ह्यावर आमच्या आईनें आमच्या संसाराचें ओझें हाकललें. शिवाय ह्यावेळीं मी इंग्रजी ६ आणि ७ व्या इयत्तेंत गेल्यानें मला पुस्तकांचा खर्च येऊं लागला तोही भागला. जमखंडी हायस्कुलांत शाळेची फी सातव्या इयत्तेअखेर दरमहा एकच आणा असल्यानें माझ्या दुय्यम शिक्षणांत खंड पडला नाहीं. ह्या आणीबाणीच्या वेळीं बाबांनाही नोकरी लागली नसती तर मात्र काय झालें असतें ह्याची मला नुसती कल्पनाही होत नाहीं.

**व्यसनी विराप्पा**

इ. सन १८९० चे सुमारास ही नोकरी लागली पण इ. सन १८८५ सालांत माझा मोठा भाऊ वारल्यापासून ह्या पांच वर्षांत माझ्या आईनें काय दुःख व कष्ट सोशिले तें आमच्या डोळ्यासमोर आहे. कारण नुसतें दारिद्र्यच नव्हे तर बाबांना निशेबाजी लागली ह्याचें तिला फारच दुःख होई. तरुणपणीं बाबांचे हातीं जेव्हां मुबलक पैसा खेळत होता तेव्हां त्यांना नुसते तंबाकुचेंही व्यसन नव्हतें. फार तर काय पानाचा विडाही ते नेहमीं खात नसत. उतार-वयांत त्यांना हें गांजाचें व्यसन लागलें ह्याचें कारण त्यांची दारिद्र्य–वेदनामुळें उदासिनता आणि त्यांची किंकर्तव्यता हीच होय बाबांना पुढें पुढें कांहीं सुचेनासें झालें. अशांत त्यांच्या भाविकपणामुळें, ते आल्या गेल्या साधूजवळ, बैराग्याजवळ जाऊन बसूं लागले. अर्थात हे बैरागी म्हणजे निःसंग फिरस्ते, गांजेकसच असणार. त्यांच्या बेजबाबदार व बेपर्वाईच्या गोष्टी ऐकत बसतांना बाबांना आपल्या संसाराच्या वेदनांचा विसर पडत असावा. मग त्यांत गांजाच्या व्यसनाची भर पडण्यास काय उशीर ? तशांत ज्या दत्त सांप्रदायाच्या

ते ह्या वेळीं नादीं लागले होते; त्यांतील बरीच मंडळी आळशी, उनाड व गांजेकस होती; त्यांत विराप्पा नांवाचा एक कोष्टी गृहस्थ होता. तो स्वभावानें फार चांगला होता. तो कांहीं कानडी साधुसंतांचीं पदें फार रसिक तऱ्हेनें म्हणत असे. पण त्याला गांजाचें व्यसन फार जबर होतें. तो माझ्या बाबांचा मोठा सोबती होता. माझ्या बाबांला व्यसन लागण्याचें हें एक कारण. विराप्पा तर ह्या व्यसनापायींच शेवटीं वारला. हा आपल्या मित्राचा नाश झालेला पाहून दुसऱ्याच्या संगतीला न लागतां माझे बाबा मात्र शुद्धीवर येऊन निवळले !

पण इतक्यांत बाबांना दुसरी वाईट संगत लागली. ती म्हणजे मागें सांगितलेल्या बबलादीच्या लिंगायत साधुंची. बबलादीचे

**बबलादीचे सिद्ध** हे सिद्ध पुरुष कानडी प्रांतांतले त्या काळीं बरेच प्रसिद्ध देवर्षि होते. जमखंडीच्या पूर्वेस सुमारें १२ मैलांवर कृष्णानदीचे कांठीं विजापूर जिल्ह्यांत बबलादी एक खेडेगांव आहे. त्या गावीं ह्या सिद्धांचा मठ आहे. चंद्रगिरी नांवाच्या एका देवतेचा ह्या सिद्ध घराण्याच्या मूळ पुरुषाला प्रसाद होता. ते मूळ पुरुष चांगले निःसंग साधू असावेत असें त्यांनीं केलेलीं कांहीं कानडी अनुभवी पदें या सिद्धांच्याबरोबर हिंडणारे अनुयायी म्हणत, यावरून दिसतें. ह्या सिद्धांच्या आशिर्वादानेंच पुनः नोकरी लागली अशी आमच्या बाबांची समजूत होती. बबलादीचा संप्रदाय त्या प्रांतांत तेव्हां वाढत होता. त्यांपैकीं सर्वांत वडील सिद्ध शंकराप्पा, त्यांचे चिरंजीव सदाशिवप्पा, आणि त्यांचे दोन पुतणे गंगाप्पा व शिवरुद्रप्पा असे चौघेजण आळीपाळीनें कर्नाटकांत फिरतीवर भिक्षेस निघाले म्हणजे आमचे घरीं येऊन उतरत असत. शिवाय त्यांचे शिष्य पडसलगी नांवाच्या एका खेड्यांत ( आईच्या माहेर गांवीं ) आलगुरास तवनाप्पा नांवाचे एका पूर्वाश्रमींचें जैन जातीचे सिद्ध होते. ह्यांच्याच मार्फत बाबांचा बबलादीशीं संबंध जडला. हा इ. सन १८८९ सालीं जडला असावा. इ. सन १८९०

त नोकरी लागली, हे स्वामी उघड उघड अभेद–मार्गी असत, म्हणजे जातीभेद पाळीत नसत. कोणाची पर्वा करीत नसत व निस्पृह आणि धुंद असत. पण दारू पीत व मांस खात. तुळजापूरची देवी आमची कुळदेवता तिला मांसाचा नैवेद्य जरूर लागतो. तुळजापुरचे भोपे भाऊराव कदम आमचेकडे भिक्षेला आले कीं हा नैवेद्य होत असे. शिवाय एक रामदासी ब्राह्मण संन्यासी येत. ते तर दारू व मांस दोन्हीही घेत. अशा अनेकांच्या संगतींत बाबांना दारूचीही चटक लागली व मांसाचा प्रघात आमचे घरांत पडला असावा. तरी पण आमच्या दारिद्र्यामुळें त्यांचें हें व्यसन अनावर होऊं शकले नाहीं हें एक आमच्या दारिद्र्य मित्राचें आम्हांवर मोठें उपकारच !

प्रथम प्रथम ववदालीच्या सिद्धावर माझीही चांगली श्रद्धा होती ते घरीं आले कीं त्यांची पूजा आमचे घरीं होत असे.

**स्वभावांतील पालट**

चहुंकडून सर्व जातींचे भक्त येत. स्वामी तुळशी कट्ट्यावर बसत व आम्ही ताटांत कापूर ठेवून आरती म्हणत ओवाळावयाचें व त्यांच्या पायावर फुलें घालावयाचीं हीच काय ती त्यांची साधी पूजा होती. आरती झाल्यावर भक्त लोक दारूच्या बाटल्या त्यांचेपुढें ठेवीत आणि आशीर्वाद मागत. ती दारू सर्वजण पीत. त्यांत मोठा वाटा ह्या सिद्धाचा असे. दारूच्या निशेंत सिद्धाच्या तोंडून जीं भविष्यवाक्यें निघत तीं खरीं होत अशी भक्तांची समजूत असे. ही आरती करीत असतां मीच ताट ओवाळीत असे. व कानडींतील त्यांच्या संप्रदायाच्या आरत्या व इतरही चांगलीं पदें मी नीट चालीवर म्हणत असे. शाळेंतला माझा चांगला अभ्यास व माझी श्रद्धा व निर्व्याज वर्तन वगैरेमुळें मीही त्या सर्व साधूंना आवडत असे. पण पुढें माझी इंग्रजी हायस्कुलांतील मॅट्रीकची परीक्षा पास होऊन मी कॉलेजांत जाऊन पुणें–मुंबईकडचे मला नवें वळण लागल्यावर त्या प्रांतीं सिद्धापेक्षां लोकांत माझीच प्रसिद्धि होऊं लागली. तेव्हां मात्र ही सिद्ध मंडळी मला पाहून चपापूं लागली. मी मोठा विद्वान

होईन हें त्यांचे तोंडचे कानडी भविष्य मी कित्येक वेळां प्रत्यक्ष ऐकलें आहे. हें भविष्य कसेंही ठरलें असो, किंवा हे त्यांच्यावर बसलेल्या श्रद्धेचें फळ असो किंवा नसो मॅट्रिक क्लासमध्यें असतांनाच मला या सिद्धांच्या लीला आवडेनाशा झाल्या. आणि बाबांवरही माझ्या सर्व वर्तनांचा दाब बसून हें बंड आमच्या घरांतून अजिबात बंद झालें. इतकेंच नव्हे तर पुढें नोकरी लागल्यावर बाबांच्या भांबावलेल्या मनाला कांहीं व्यापार मिळाल्यामुळें म्हणा किंवा माझ्यामुळें म्हणा बाबांची निशेबाजी अगदी बंद झाली ! इ. सन १८९१ चे डिसेंबरांत माझी मॅट्रिकची परीक्षा पास झाली आणि तेव्हां माझ्यांतच नव्हे तर माझ्या घराण्यांतही मोटाच पालट झाला !

## प्रकरण ९ वें

### बालपण

आतां स्वतः माझ्याचसंबंधींच्या आठवणीकडे वळतों. मी इ. स. १८७३ एप्रिल ता. २३ (शके १७९५ चैत्र वद्य एकादशी) बुधवारीं दोनप्रहरीं ११ वाजतां जन्मलों. माझी जन्मपत्रिका इतर सर्व मुलांप्रमाणें रीतसर ज्योतिषाकडून वर्तवून बाबांनीं ठेविली आहे. त्या जन्मपत्रिकेची भाषा अर्धवट संस्कृत व अर्धवट मराठी. पण दोन्ही अशुद्ध पाहून ह्या ज्योतिषबोवांचे भाषेचेंच नव्हे तर ज्योतिषांचेंही ज्ञान तुटपुंजेंच दिसतें. ह्यांत मी अमुक होईन तमूक होईन म्हणून ज्या माझ्या भावी गुणांची लांब माळ ओंविली आहे ती अद्यापि वाचून मला मौज वाटते. अर्थात् हें भविष्य अशा कांहीं साधारण मोघम भाषेत असावयाचें कीं

जन्म

गोळा बेरजेंत तें कोणालाही लागूं पडावें. लहानपणीं मला लिहिण्याला व व वाचायला आल्यावर माझी पत्रिका वाचून विशेषतः मी मोठा विद्वान् व लोकप्रिय होणार हें वाचून मला मोठी फुशारकी वाटे येवढें मात्र खरें. अगदीं बालपणीं माझ्या अंगांत बाळसें चांगले असे. आतां जरी मी काळा आहें तरी बांध्यानें व चेहऱ्यानें मी लहान वयांत फार आकर्षक होतों असें आई मला सांगे. माझा वडील भाऊ मजपेक्षां रंगानें उजळ रूपानें जास्त चांगला आणि स्वभावानें शांत होता. तरी माझ्या बाळशाची व तरतरीतपणाची छाप पाहणारावर माझ्या इतर भावंडांपेक्षां अधिक बसे. दादाभाई डॉक्टर नांवाचा कोणी एक पारशी दरबारचा नोकर बाबांच्या परिचयाचा होता. तो पारशी तर मजवर फार लुब्ध होता. रस्त्यांत कोठेंही भेटला तर जवळ येऊन माझे बरेचसे मुके घेऊन मला बेजार करी असें मला आई सांगत असे.

**एक आपत्ति**

अर्थात् तेव्हां मी फार तर सव्वा-दीड वर्षांचा असेन. माझे कानांत सोन्याचे सुंदर झुबे घातले होते. त्या भोवताली लहान मोत्यें लाविलीं होतीं. हा दागिना साधाच परंतु मला फार शोभे. तो घालतांना कान टोचावा लागला. त्यांत कांहीं तरी कमी जास्त होऊन माझे कानाला जखम झाली. विशेषतः डावा कान फार सुजून त्यांत पू झाला. आमच्या आजीला वाटलें मला कोणाची तरी दृष्ट झाली. योग्य उपाय न होतां दृष्टीबद्दल बऱ्याच वस्तु ओंवाळून टाकण्यांत आल्या असाव्यात. शेवटीं कानाचा लोंबता भाग कुजून तुटेलसा झाला. एके दिवशीं मला न्हाऊं घालीत असतां तो भाग तुटून झुब्यासह खालीं पडला. मग काय विचारतां ! माझी आजी, आई आणि आत्या ह्यांनीं आकांत मांडला. तेव्हां माझे आजोबा जिवंत होते. मला मात्र हा प्रसंग आठवण्याइतका मी मोठा झालों नव्हतों.

तिसऱ्या वर्षापासून मी थोडें थोडें बोबडें बोलूं लागलों असेन. अगदीं

**पहिला लळा** पहिल्या पानावर लिहिलेली माझी आठवण ह्या तिसऱ्या वर्षांतली असावी. मला पहिला लळा आजीचा, किंबहुना बाबांचा व आईचा नसून माझ्या आजोबांचा बसवंत-रावांचाच होता. हिंदु घरांत असें होणेंच साहजिक होतें. नवरा बायको तरुण असतात. मुलांचा आजा आजी असेतोंपर्यंत त्यांच्यासमोर आपल्या मुलाचें कौतुक आपणच करण्यास त्यांना लाज वाटते. घरकामांत त्यांना फुरसतही मिळत नसते. आजा आजी म्हातारी असतात. त्यांना काम नसतें. मुलांचा मोह त्यांनाच जास्त असतो. अशा कारणामुळें हीं पिलें त्या म्हाताऱ्यांनाच बिलगण्यांत दोहों पक्षी सुख असतें.

**धाडसी तांडेल** माझी आजी कष्टाळू व कडक असल्यानें मी नेहमीं आजोबांच्याच भोंवतीं असें. त्यामुळें माझ्या मनावरचे अगदीं पहिले ठसे माझ्या आजोबांनींच उठविले. मला अद्यापि चांगले आठवतें. आमच्या घराच्या सोप्यांत माझा पाळणा बांधलेला असे. मी त्यांत बसून नेहमींप्रमाणें तो आडवा न हाल-वितां उभा हलविण्याचा मला भारी शोक असे. असा पाळणा हालू लागला म्हणजे मी नावेंत बसल्याप्रमाणें खालवर हेलकावे खाई. अशा हालणाऱ्या पाळण्याला मी नावच म्हणत असें. आजोबा आपल्या ठरलेल्या जागीं सोप्यांत बसून माझे लाड पुरविण्यासाठीं माझा पाळणा उभा हालवीत. पाळणा जोरांत हालूं लागला म्हणजे मोठ्या धाडसी तांडेलाप्रमाणें मी स्वतःला मोठा धन्य मानीत असें. भावी ईर्षेचे हे पहिले धडेच नव्हेत काय? आणि इतर म्हाता-ऱ्याप्रमाणें नवीन अंकुर फुटणाऱ्या ईर्षेला तेथल्या तेथेंच दाबून न टाकतां तिला चेतविण्याचें चातुर्य माझ्या आजोबांत होतें. ते त्यावेळीं वार्धक्यामुळें आंधळे होते. माझ्या तोंडावरची विजयशाली नावाड्याची विजयश्री जरी त्यांच्या चर्मचक्षूला दिसत नव्हती, तरी ती कल्पनाचक्षूनें निरखून आजोबा मला उत्तेजन देत. त्यावेळीं ते एक बालगीत म्हणत. त्याचें ध्रुवपद हें

असें—" माझें पकुलें कसें खेळतें, माझें छकुलें कसें खेळतें. " हें ऐकून मला धन्यता वाटे !

**संवयीचा परिणाम**

माझ्या बाबांचे नांव रामजी. माझे आजोबा व आजी अर्थात् त्यांना 'रामा' अशी हांक मारीत. ती ऐकून मीही बाबांना 'रामा' व आईला 'यमुना' अशा नांवानेंच बोलावीत असें. कदाचित् कौतुकामुळें कांहीं दिवस वडील मंडळींनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. मी तीनचार वर्षांचा झालों तरी अशींच नांवें घेऊं लागलों, हें बरें नव्हे म्हणून आजोबांनीं मला बाबा व आई अशी हांक मारण्यास सांगावें. पण तसें म्हणण्यास मला मोठी लाज वाटत असे ! एक दिवस दाराआड उभा राहून मी बाबा अशी हांक मारली व लाजून आंत पळून गेलों. त्यामुळें सर्वत्र हंशा पिकला. तेव्हां तर मला या नवीन नांवाची जास्तच लाज वाटायला लागली. तशी माझ्या बाबांला व आईलाही आपल्या वडिलांसमोर ह्या नांवानें हांका मारून घेण्याचें आवडेना ! संवयीचा हा कोण परिणाम !

**१८७७चा दुष्काळ**

मी चार वर्षांचा झालों, त्यावेळीं म्हणजे इ० स० १८७७ सालीं दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडला होता. तेव्हां चार शेरांची धारण होती असें म्हणतात. कोठें १६ पायल्यांची धारण आणि कोठें हे चार शेर ! पण त्यावेळीं आमच्या घरांत आबादीआबाद होती. विशेषतः आमच्या मळ्यांत मक्याचें पीक फार माजलें होतें. मक्याचीं कणसें आमचे घरांत रचावयास जागा पुरेना. हीं कणसें शिजवून खाणें आम्हांला आवडत असे. कणसें खाऊन आम्ही भुरकुंडें बाहेर फेकून देत तीं पटकन् उचलून भिकारी लोक फोडून त्यांचा कोंडा खात. एकदां तर हा कोंडा न पचल्यामुळें एक भिकारी ओकला. आणि त्याचा ओकच दुसऱ्या भिकाऱ्यानें आधाशीपणानें खाल्ला. हें मी स्वतः डोळ्यानें पाहिलें. पण मी इतका लहान होतो कीं, दुष्काळ म्हणजे काय याची मला तेव्हां कल्पना

नव्हतीं. आम्हीं टाकलेलीं कणसें भिकारी उचलून घेत, त्यांची आम्हांला मौज वाटे. आम्ही कणसें अर्धवट खाऊन टाकीत असूं म्हणून दारीं भिकाऱ्यांची गर्दी जमे. पण त्यांत करुणेपेक्षां कौतुकच जास्त असे.

**चोरटें दान**

आमचे आजोबा एका ठोकळ्यांत एक शेरभर दाणे घालून कट्ट्यावर आलेल्या भिकाऱ्याला एकेक मूठ भिक्षा घालण्यासाठीं सकाळीं बसत असत. त्यांना नीट दिसत नसे, म्हणून ठरलेले दाणे संपले कीं, आम्ही लहान मुलें थोडे जास्त दाणे ठोकळ्यांत टाकीत असूं. ही लबाडी लवकरच उघडकीस येऊन आमच्या ह्या लीलेला आळा पडत असे. पण आमच्या लबाडीला गरिबाचे दुवे मिळत, हें सांगावयास नको. ह्यावेळीं मी माझेपुढें आलेलें ताट एका दुष्काळी पीडिताला वाढलेलें आठवतें. च्हूंकडे दुष्काळ असतां आमचें हें शेत फार पिकलें. ह्याचें कारण तें नदीबूड रान होतें. आमच्या आजोबांच्या व बाबांच्या उघड दानामुळें व आमच्या लहानपणाच्या चोरट्या दानामुळें आमच्या घराण्याचा मूळचा बोलबाला अधिक वाढला, येरवीं आमच्या शेतांतलें पीक उघडपणें आमच्या घरीं पोंचलेंही नसतें.

---

# प्रकरण १० वें

## माझें प्राथमिक शिक्षण

**धूळपाटी**

मी ५ किंवा ६ वर्षांचा झालों असतां, माझे आजोबा बसवंतराव वारले. तेव्हांपासून ११ वर्षांचा होईपर्यंत म्हणजे इ. स. १८७९ पासून १८८४ पर्यंतचीं ५ वर्षें ही माझ्या प्राथमिक शिक्षणाचीं होतीं. मला प्रथम एका गांवठी शाळेंत

घालण्यांत आलें होतें. हल्लीं जमखंडीस ज्या घरांत रा. सदाशिवराव पेंडसे वकील रहात आहेत, तेथें ही खाजगी शाळा होती. पंतोजींचे नांव हरिपंत फडके किंवा असेंच कांहींसें होतें. ह्या शाळेंत फक्त लिहिणें, वाचणें, मोडी अक्षर वळविणें, हस्तलिखितें वाचणें, हिशोब करणें वगैरे केवळ व्यावहारिक साधे विषय होते. त्यावेळीं संस्थानांत सरकारी शाळा होत्या कीं नव्हत्या हें माहीत नाहीं. असत्या तर मला या गांवठी शाळेंत कां ठेवलें कळत नाहीं. निदान इंग्रजी शाळा तरी त्या पूर्वकाळीं नसावी. शाळाखात्याची घटना त्यावेळीं नुकतीच चालली असावी. या गांवठी शाळेंत मी प्रथम माझी धुळाक्षरें कशीं शिकलों तें आठवतें. एक लाकडी सुमारें दीड हात लांब व एक वीत रुंद असे. तिला पाटी म्हणत असूं. वेळूची एक बारीक लेखणी असे. तिनें या पसरलेल्या धुळींत धुळाक्षरें कोरीत असूं. म्हणूनच ह्या मुळाक्षरांना धुळाक्षर हें नांव पडलें आहे. ह्यावेळीं दगड स्लेटींचा प्रचार अद्यापि जमखंडीस दिसत नव्हता. शाळेंत घालण्याचा माझा मुहूर्त समारंभ झाला. पाडवा चैत्री, दसरा, पंचमी आणि अक्षतृतीया हे साडे-तीन शुभमुहूर्त गणले जात. कोणत्याही गोष्टीस सुरवात करावयाची ह्या मुहूर्तां-वर करीत असत. रा. बाळा काणे या नांवाचा एक ब्राह्मण खासगी शिक्षकाचा धंदा करीत असे. माझे वडिलांनीं त्याला घरीं बोलावून आणून माझ्या शिक्ष-णाच्या आरंभाचा एक लहानसा विधि करवला. सोप्यांत दोन पाट मांडून मला व काणेमास्तरांना समोरासमोर बसवून मध्यंतरीं ही धुळपाटी ठेवून तिची पूजा करण्यांत आली. नंतर शिक्षकांनीं माझा हात धरून माझा पहिला धडा ‘ श्रीगणेशायनमः ’ माझ्याकडून गिरविला. माझ्या वडील भावाचा हा विधि मला आठवत नाहीं. आणि माझ्या पाठीवर ८।१० मुलें जरी झालीं तरी तीं बाळपणींच वारलीं, जनाक्का व तान्याक्का ह्या मुली होत्या व एकनाथ हा शाळेंत जाण्याइतका होईपर्यंत युगांतरच झालें होतें. म्हणून मज-शिवाय हा विधि पुनः कधीं आमचे घरीं झाला नाहीं हें सांगावयास नकोच.

**मौंजीबंधन**

बाबांना धार्मिकविधि समारंभाची श्रद्धा होती व आपल्या घरीं पुरोहितास आणून सर्व संस्कार यथासांग व्हावेत असें त्यांना पूर्वीपासूनच वळण लागलेलें होतें. आमचीं लग्नें होण्यापूर्वीं माझ्या भावाची व माझी विधीपूर्वक मुंज ( मौंजीबंधन ) करण्यांत आली. ह्यावरून आमचें घराणें क्षत्रिय होतें अशी भावना आमच्या बाबांमध्यें विशेष होती असें दिसतें. ती त्यांच्या तात्कालिक ब्राह्मणी शिक्षणामुळेंच आली असावी. पण वरील दोन्ही उपनयन समारंभाच्यावेळीं माझे आजोबा जिवंत नव्हते. मुंजीच्या वेळीं आजीही जिवंत नसावी. आमचे लग्नानंतरही एकदोनदां श्रावणीचे दिवशीं स्वतः बाबा व आम्ही दोघे मुलगे, ह्यांचा पुरोहिताला आणून विधिपूर्वक होमहवन करून नवीन यज्ञोपवीत घेण्याच्या थाटाचा समारंभ होत असलेला मला आवडतो. पुढें लवकरच दारिद्र्यानें गांठून बाबा उदासीन झाले, त्यामुळें असले श्रावणीचे वार्षिक समारंभ अर्थात् बंद पडले. जमखंडी गांवांत इतर मराठे कोणी अशी श्रावणी करीत नसत. तरी पण मी १८९८ इ. सनांत पुणें येथील प्रार्थना समाजांत सभासद होईपर्यंत माझ्या अंगांत जाणवें हें होतेंच व त्याचा विधि इतर हिंदुप्रमाणें मी थोडाबहुत तोंपर्यंत पाळीत असें. आमची श्रावणी चालली असतां होमाचेवेळीं आमचे पुरोहित जे मंत्र म्हणत ते वैदिक असत किंवा पौराणिक असत हें मला माहीत नाहीं. पण नवरात्रांत रोज आमच्या घरीं नऊ दिवस महापूजा होत असत. त्यावेळीं मंत्रपुष्पाच्या वेळीं पुरोहित वेदमंत्र म्हणत असत हें आतां मला आठवतें. हा मंत्र क्षत्रियांच्या घरीं म्हणण्यासाठीं रचला असावा. इतक्या जुन्या काळीं जमखंडी-सारख्या ब्राह्मणी रिसायतींत आमच्या घरीं क्षत्रिय-ब्राह्मणांचा इतका सलोखा असतां पुढें पुढें ब्राह्मणब्राह्मणेतर वाद कसा माजला हें आश्चर्य आहे.

प्राथमिक शाळेंत माझा अभ्यास बरा होता. पण अभ्यासाकडे त्या वयांत लक्ष फारसें न लागणेंच साहजिक होतें. चौथ्या इयत्तेपासून माझें

गणित व भाषा बरीं आहेत, हें शिक्षकाच्या नजरेस आलें. मोडी अक्षर म्हणण्यासारखें वळणदार नव्हतेंच. बाबांनीं आमच्या शाळेतील अभ्यासाकडे खासगी लक्ष विशेष दिलेलें मला आढळलें नाहीं. मराठी चौथी इयत्ता संपल्यावरही एकदम इंग्रजी हायस्कुलांत जाण्यास हरकत नव्हती. पण मला मराठी पांचव्या यत्तेंत एक वर्ष घालवावें लागलें. मराठी शाळेचे हेडमास्तर विष्णुपंत गवंडे यांचा उल्लेख वर आलाच आहे. ह्यांनीं मला मुद्दाम पांचव्या यत्तेंत घेतलें. त्यामुळें मला फायदाच झाला मराठी कवितेंत आणि गणितांत त्यावेळच्या मानानें माझी बरीच प्रगति झाली. पांचव्या पुस्तकांतील कुशलवाख्यान आणि मोरोपंताच्या धेनुहरणाच्या आर्या ह्यांचा अर्थ व व्याकरण मला चांगला कळत असे. कविताही चांगल्या सुरावर मी ऐटित म्हणत असे. कोणी शाळा पाहावयास आल्यास माझ्या कविता म्हणून घेत असत. अशा प्रकारें पंतोजीचा मी लाडका असे. ह्याचा मला अभिमान असें. मोरोपंताच्या कठीण व संस्कृतमिश्र आर्यांचा अर्थ मी घरींदेखील कोणाला तरी मोठ्या आढ्यतेनें करून दाखवीत असे. ह्यामुळें मी बाबांचाही लाडका झालों. ते कोणी आपले प्रतिष्ठित मित्र आल्यास मला कविता म्हणून अर्थ करण्यास सांगत.

**अक्काची माया**

माझ्या आईबाबांशिवाय माझ्या आतेचा मी लाडका होतों असें मागें सांगितलेंच आहे. वडील भावापेक्षांही मजवरच अक्काचें ( आतेला म्हणजे आपल्या नणंदेला आमची आई अक्का म्हणे, म्हणून आम्हीही अक्काच म्हणत असूं ) प्रेम कां गुंतावें हा एक प्रश्न आहे. एकतर माझ्या भावापेक्षां मी जरी देखणा. नसलों तरी अधिक चुणचणीत असे. आणि माझ्या भावाला द्यावयाला त्याला अनुरूप अशी मुलगी माझ्या आतेला नव्हती. आणि आमच्या घराण्यांत आपली एक तरी मुलगी खुपसण्याची तिची बळकट इच्छा. कांहीं झालें तरी अक्काचें मजवर अकृत्रिम प्रेम होतें ह्यांत संशय नाहीं.

अशांत माझी तिसरी यत्ता मराठी शाळेंतली पास होऊन मी चौथींत गेलों तेव्हां माझ्या अक्काच्या आनंदाला आणि गर्वाला सीमाच नाहीशी झाली. तिनें लागलींच छोटुसिंगास साखर वाटली. बिचारी अक्का! पुढें मी बी. ए. झालों, विलायतेला जाऊन आलों हें पाहाण्यास राहाती तर तिनें काय केलें असतें!

अक्काचें मजवर इतकें प्रेम होतें तरी मी कांहीं फारसा तिचेकडे जात नसे. कारण मी तिकडे गेलों कीं, "धोंडीचा नवरा आला" असा गलबला त्या आळींतील पोरी आणि थोरेंहि करीत तें मला ऐकणें आवडत नसे. तरी मुख्य सणाचे प्रसंगीं जावे लागतच असें. दसऱ्यादिवशीं सोनें वाटावयाला, संक्रांतीचे दिवशीं तिळगुळ घ्यावयाला जाणें भागच होतें. दसऱ्याचे दिवशीं गेलो म्हणजे अक्काच्या देव्हाऱ्यावरच्या साऱ्या कडाकण्या मी खाऊन फस्त करीत असे. ती तर मी केव्हां येऊन खाईन ह्याची वाटच पहात बसे.

**माझा हट्ट**

एकदां अक्का कोंकटणूरच्या यल्लमाच्या यात्रेला निघाली होती. त्यावेळीं मी फार तर ४।५ वर्षांचा असेन. अक्का आमचे घरीं निरोप घ्यावयाला आली होती. ती जाऊं लागली तेव्हां तिचेबरोबर मीही यात्रेला येणार असा मी हट्ट घेतला. कांहीं केल्या हा हट्ट मी सोडीना. बाहेर रस्त्यापर्यंत मी तिचे मार्गे रडत लागलों. तिनें मला उचलून खांद्यावर घेतलें व परत घरीं आणून सोडूं लागली. त्यावेळीं मी इतका अनावर झालों कीं खांद्यावर बसल्या बसल्या मी मोठ्या आवेशानें पाय झाडीला; तो तिच्या पुढच्या दांतांला लागून वरचे दोन्ही दांत तात्काळ पडले आणि अक्काचें तोंड रक्तबंबाळ झालें. तरी बिचारीला राग तो म्हणून कसलाही आला नाहीं. उलट ही गोष्ट माझ्या बाबांना न कळण्याची खबरदारी घेण्याविषयीं तिनें माझ्या आईची गयावया केली.

---



५

# भाग तिसराः 'दुय्यम शिक्षण'

## प्रकरण ११ वें

### माझा हायस्कूलचा काळ

( १८८५-१८९१ अखेर )

हीं सात वर्षे माझ्या आयुष्यांतली महत्त्वाची होतीं. मागें म्हटलेंच आहे कीं इ. स. १८८५ च्या पावसाळ्याचे आरंभीं माझा वडील भाऊ वारल्या-मुळें माझ्या भावंडांत मीच वडील मुलगा झालों. आणि माझ्या स्वभावांत एकदम विलक्षण फरक पडला! बाळपणाचा हूडपणा कमी होऊन मी गंभीर, विचारी व अभ्यासी बनलों. आईबाबांचा शोक, घरची झपाट्यानें खालावत चाललेली सांपत्तिक स्थिति, माझ्या आईला वरचेवर झालेल्या मुलांचे बाळ-पणातले मृत्यू आणि बाबांचा हताश उदासीनपणा ह्यांचा परिणाम मजवर दिवसें-दिवस अधिकाधिक घडत चालला. ह्यावेळीं मला ११ वें वर्ष संपून १२ वें नुकतेंच लागलें होतें.

**शिक्षकवर्ग**

जमखंडी हा लहान संस्थानी गांव. त्यावेळीं संस्थानचे उत्पन्न ४।५ लाखाचें असावें. शहरची वस्ती १५ हजारांची. शाळा-खात्याची स्थापना नुकतीच झाली असावी. अशा ठिकाणचें हायस्कूल कोणत्या दर्जाचें असावें ह्याची कल्पना सहज होते. मी हायस्कुलांत गेलों तेव्हां तें हायस्कूल झालें नव्हतें. फार तर पांच यत्ता असतील. फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल

असे. रा. त्रिंबकराव खांडेकर ह्यांना पुण्याहून हेडमास्तराचे जागेवर आणिलें होते. त्यांची स्वतःची मॅट्रिकची तरी परीक्षा झाली असेल कीं नाहीं हें माहीत नाहीं. पण त्यांचा स्वभाव सुशील, नीतिमान, नेमस्त, गंभीर आणि करारी होता. नवीन इंग्रजी शिकलेल्यांचा उथळपणा त्यांच्यांत मुळींच नव्हता. जमखंडी गांवांत व दरबारांत त्यांच्या ह्या स्वभावामुळें लोक व स्वतः यजमानही वचकून होते. असिस्टंट शिक्षकांत विशेष कोणी म्हणण्यासारखे शिकलेले किंवा फारसे बुद्धिवान् नव्हते. मी पांचव्या यत्तेंत गेल्यावर ह्या शाळेचा दर्जा वाढून त्याच वर्षीं वरील वर्गांत बाहेरील पदवीधर शिक्षक आणावे लागले. मी सहाव्या यत्तेंत गेल्यावर जमखंडीच्या शाळेंतून मुलें प्रथमच मॅट्रिकच्या परिक्षेस पाठविण्यांत आलीं. तिसऱ्या वर्षीं आम्हां चौघांना जमखंडी हायस्कूलांतून पाठविण्यांत आलें. त्याच सुमारास आमच्या शाळेला युनिव्हर्सिटीकडून हायस्कूलचा दर्जा प्राप्त झाला. सहाव्या यत्तेंत रा. वासुदेवराव चिरमुले बी. ए. हे पहिले पदवीधर नवीन नेमण्यांत आले. रसायणशास्त्राच्या प्रयोगाचेंहि कांहीं सामान शाळेला मिळालें. एकंदरींत आतांप्रमाणें त्यावेळीं तशा मागसलेल्या प्रांतांत इंग्रजी शिक्षणाचा दर्जा असावा तसा नव्हता. आगगाडी ( सदर्न मराठा रेल्वे ) मी पांचव्या यत्तेंत जाईपर्यंत झाली नसावी. आणि ती झाली तरी कुडची, जे अगदीं जवळचें स्टेशन, त्यापासून जमखंडी तेहतीस मैल पूर्वेकडे लांब आहे.

**विषयांची गोडी**

पहिल्या वर्षीं इंग्रजी हा विषय मला नवा असल्यामुळें व शिक्षक चांगला सहानुभूतीचा नसल्यामुळें मला तें वर्ष फार जड कसें गेलें ह्याचें वर्णन मागें आलेंच आहे. पण दुसऱ्या वर्षापासून मला इंग्रजी भाषेची व सर्वसामान्य शाळेंतील इतर विषयांची गोडी लागली. तेव्हांपासून शिक्षक जरी विद्वान् नव्हते तरी सहानुभूतीनें शिकविणारे मिळाले. माझी हुषारी पाहून ते माझें कौतुक करूं लागल्यामुळें मला उत्तेजन मिळालें. Nothing succeeds

like success (यशासारखें यशस्वी कांहींच नाहीं) ही इंग्रजी म्हण मला तेव्हां जरी माहीत नव्हती तरी तिचा अनुभव मला जास्त जास्त येऊं लागला. मराठी शाळेंत असतांना आम्ही वर्गात जमिनीवर बसत असूं. तरटाच्या लांब पट्या हांतरावयाला असत. इंग्रजी शाळेंत आम्हांला बाकावर बसावयास मिळालें. मागे टेकावयाला उंच व जाड उतरत्या पाठीची मेज (डेस्क्स्) असत. शाळेची इमारत शहरच्या मध्यभागीं भर बाजारांत उंच अशा जोत्यावर टुमदार पण मनांत भरण्याजोगी होती. मराठी शाळेंत सकाळ संध्याकाळ दोन वेळां जावें लागत असे. तें इंग्रजी शाळेंत आल्यापासून दोन प्रहरीं ११ पासून सायंकाळीं ५ पर्यंत एकदाच जावें लागे. मे महिन्याची लांब सुट्टी मिळे. मराठी शाळेच्या शिक्षकांचे पंतोजीपणाचें मुख्य लक्षण म्हणजे त्याच्या हातांतील वेताची एक लांब छडी आणि तिचे केवळ मास्तराच्या लहरीप्रमाणें आमच्यावर होणारे उदार प्रयोग ! इंग्रजी शाळेंत हा प्रकार बदलला. एकंदरींत मी एका नवीन जीवन-प्रवाहांत पडल्याप्रमाणें वाटलें. खरोखरच मनूच पालटला म्हणावयाचा !

**ग्रहणशीलता**

इंग्रजी तिसऱ्या यत्तेपर्यंत आम्हांला जुन्या काळची इंग्रजी क्रमिक पुस्तकें म्हणजे 'हावर्ड'ची मालिका. आतांच्या आकर्षक रीडर्सप्रमाणें त्यांत चित्रें वगैरे कांहीं नव्हतीं. तरी तिसऱ्या यत्तेपासून इंग्रजी राहाटीचे धडे वाचावयाला मिळे. त्यामुळें माझ्या ग्रहणशील बुद्धीच्या डोळ्यांपुढें एका नवजीवनाचे नव्या रंगाचे पडदे दिसूं लागले. इंग्रजी शेताचें वर्णन, इंग्रजी झाडाझुडपांचीं नांवें, इंग्रजी खेडीं, इंग्रजी कुंपणावरील निराळी जंगली वेली, फुलें वगैरे नवीन देखावे मला नवीन हर्ष देऊं लागले. त्यामुळें धडे मला फार आवडूं लागले. विषय आवडला म्हणजे जो सुलभ होतो. इतकेंच नव्हे तर परिणामकारीही होतो. हा अनुभव माझा बालपणापासूनचा आहे. तिसऱ्या यत्तेचे शिक्षक रा. आप्पा काळे हे होते. त्यांच्या शिकवणींत एकपट रसिकता

असली तर ती माझ्या नूतन हृदयांत चेंडूप्रमाणें उशी घेऊन द्विगुणित व चौगुणित होई. अशा रीतीनें शिक्षकाच्या सहानुभूतीला शिष्याच्या ग्रहणशील-तेची जोड मिळत चालली.

मी चौथ्या यत्तेंत गेलों. तर माझे आवडीचे शिक्षक आप्पा काळेहि चौथ्या वर्गावर शिक्षक झाले. इंग्रजी पुस्तक 'सँडफर्ड ॲन्ड मर्टन' हे लावण्यांत आलें. हें मला फार आवडलें. विचार नवीन व उदार, भाषा बालबोध, मधून मधून इंग्रजी पोषाखांची चित्रें, इंग्रजी राहणीची व वनश्रीची शब्द-चित्रें आणि छायाचित्रें. ह्यामुळें इंग्रजी राहणीविषयीं कुतूहलता मजमध्यें दिवसेंदिवस वाढूं लागली. इतकी कीं पुढें मी मोठा झाल्यावर दैववशात् इंग्लंडांतील उत्तमोत्तम विश्वविद्यालयांत ऑक्सफर्ड येथें दोन वर्षें राहावयास मिळालें. तेव्हां तेथील खेड्यांपाड्यांत जाऊन शेतांत, कुंपणांत फिरून मी जे देखावे पाहिले व अनुभव घेतला; त्यांची पूर्वस्वप्नेंच जणूं मला माझ्या जमखंडी सारख्या खेडवळ शाळेतील क्रमिक पुस्तकें वाचीत असतांना पडत होतीं. बुद्धीची पूर्व भूमिका हृदय झाल्याविना तिचा खरा परिपोष होत नसतो, हें मला माझ्या लहानपणाच्या अनुभवानें खरें आहे असें आतां पटतें.

**इंग्रजी अभ्यास**

पांचव्या यत्तेंत 'लँम्ब्स टेल्स' हें पुस्तक लावलें होतें. त्यांत कवीकुलगुरु शेक्स-पीयर्संची भेट झाली. शिकविण्यास ठाकूर नांवाचे पुणेरी शिक्षक होते. सहाव्या यत्तेंत 'रीडींगज् फ्रॉम दि स्पेक्टेटर' हें पुस्तक चिरमुले ह्यांनीं शिक-विलें. हे तर ग्रॅज्युएट बी. ए. होते. ह्यांत ॲडिसनच्या खऱ्या बालबोध इंग्रजीचा व ताज्या विचारांचा मासला कळला. अशा रीतीनें माझ्या हृदयांत इंग्रजी भाषाच नव्हे तर संस्कृतीचाहि पक्षपाताची बीजें इतक्या कोंवळेपणांतच रुजूं लागलीं. पण आश्चर्य हें कीं हें सर्व मला बहुतेक त्या वेळीं न कळतच सहज घडत होतें !

पांचव्या यत्तेंत संस्कृत, भूमिति आणि बीजगणित; सहावींत रसायण, यंत्र-

शास्त्र, भूगोल, खगोल, इ. आधुनिक शास्त्रांची मूलतत्वें ह्यांचा उपक्रम झाला. एकाद्या मनोऱ्यावर चढत असतां प्रत्येक मजल्या भोंवतालचें क्षितीज अधिकाधिक विस्तीर्ण होऊन ज्याप्रमाणें जास्त प्रदेश दृष्टीच्या टापूंत येतो व आनंद वाढतो; त्याप्रमाणें माझा हा हायस्कूल अभ्यासक्रम मला फार चित्तवेधक, सहज व बोधकारक झाला. इतका कीं त्यामुळें माझ्या घरांतील भयानक दारिद्र्याच्या वेदना मला कधींच भासल्या नाहींत, कीं माझ्या शिशूदशेच्या सहजानंदांत कधी खंड म्हणून पडला नाहीं. ह्या माझ्या सदानंदी उत्साहामुळें माझ्या आईबापांचें दुःखही हलकें झालें. विशेषतः माझ्या आईला आपलें कठीण कष्ट सह्य झालें. ह्या गोष्टीचा मला आतां अभिमान वाटत आहे.

**सकृद्दर्शनी प्रेम**

आमची खेडवळ शाळा, तो जुना काळ; इंग्रजी विद्येचा आमचा देशांत कोठे नवा आनंद झालेला, तशांत माझें कोवळें वय ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतां, मी जें वर म्हटलें आहे कीं इंग्रजी संस्कृतीचा मजमध्यें पक्षपात रुजूं लागला, हें कांहीं आश्चर्यतेचें व अतिशयोक्तीचें दिसतें खरें. माझें म्हणणें येवढेंच कीं पुढें माझ्यावर ह्या संस्कृतीनें जो अमोघ मोहपाश टाकला आणि माझ्या सर्व आयुष्याचा प्रवाह पार बदलून टाकिला, त्या भावी परिणामाचे डोहाळे जणूं मला ह्या माझ्या साध्या भोळ्या शाळेंत भासूं लागले. Love at first impression म्हणजे सकृद्दर्शनी प्रेमाच्या झटक्याचाच हा एक मासला माझ्या प्रत्यक्ष अनुभवास आला, हें सांगण्यांत माझी कांहीं स्वयंमन्यता असेलसें मला तरी वाटत नाहीं.

**मराठी अभ्यास**

कांहीं असो. मी केवळ इंग्रजीला हुरळून तन्मय झालों; आणि माझ्या मातृभाषेला व संस्कृतीला पारखा झालों असें मुळींच नव्हे. चवथ्या पांचव्या यत्तेंत आम्हांला नवनीतांतील कांहीं कविता लावल्या होत्या. त्यांत विशेषें करून

रघुनाथ पंडिताचे नलदमयंतीआख्यानानें मजवर जो ठसा उमटविला तो अद्यापि ताजा आहे. ह्या सुंदर काव्यांतील कविता मी घरीं माझ्या आईला व बहिणींना म्हणून मोठ्या रसिकतेनें त्यांचा अर्थ सांगत असें. मराठीवरील माझें अकृत्रिम प्रेम वाढण्यास शाळेपेक्षां किंबहुना अधिकच साधनें माझ्या घरींच होती, हें सांगण्यास मला गर्व आणि कृतज्ञता हीं दोन्हीं सारखीच वाटतात! श्रीधर, महिपती, तुकाराम, ज्ञानेश्वर वगैरे मराठी कवी आणि प्रासादिक संतांच्या ग्रंथांचें पारायण माझें बाबा स्वतःच घरीं करीत असत. त्यांच्या संग्रहीं ह्या जुन्या पोथ्या बऱ्याच होत्या व त्या वाचून ते नेहमीं इतरांस पुराणिकाप्रमाणें अर्थ सांगतांना मी ऐकत असें. इतकेंच नव्हे तर चवथ्या पांचव्या यत्तेंत माझें मराठी सुधारल्यावर मी स्वतः रामविजय, हरीविजय, पांडवप्रताप, भक्तीविजय वगैरे ग्रंथ नित्य वाचून आपल्या वर्गातल्या मुलांना अर्थ सांगत असें. त्यावेळीं मराठींत गद्य वाङ्मय अद्यापि तयार झालें नव्हतें. पण आम्हांला त्याची वाण भासली नाहीं. इतकेंच नव्हे तर आतां जी आधुनिक वाङ्मयाची गबाळ वाढ झाली आहे तिच्यामुळें बाळबोध मराठीच्या परिचयांत विशेष भर पडली किंवा फायदा झाला, असें मला मुळींच वाटत नाहीं. हें माझें मत बऱ्याच आधुनिकांना पसंत पडेलसे वाटत नाहीं. असो!

**संस्कृत अभ्यास**

सहावींत व सातवींत माझा संस्कृतशी संबंध घडला. आमच्या शाळेंत रा. गणेशशास्त्री जोशी म्हणून एक जुने शास्त्री संस्कृत वाङ्मय जुन्या तऱ्हेनें शिकविण्यास होते. मॅट्रिकचा अभ्यास करितांना एक्स्ट्रा रीडींग म्हणजे शाळेंतील वर्गात नेमलेल्या अभ्यासापलीकडे कांहीं वाचणें बरें असतें. तें आम्ही वाचावयास शास्त्रीबोवांचे घरीं कांहीं विद्यार्थी मिळून जात असूं. त्यांतही माझा पहिला नंबर पाहून शास्त्रीबोवा, मी जातीनें मराठा म्हणून कोणताहि भेद मनांत न आणतां रसिकतेनें रघुवंश, कादंबरी, शांकुतल वगैरे वाङ्मय आम्हांला शिकवत असत. सकाळीं आम्ही त्यांचेकडे जात असूं. ते गोठ्यांत गाईचें शेण

काढीत असतां किंवा धोतराचे सोगे वर बांधलेलें, तोंडांत तंबाकूचा बार भरून त्याच्या मधुन मधुन पिचकाऱ्या मारीत, अगदीं उघडे बोडके बसलेलें कधीं कधीं इकडे तिकडे फिरत असतां, आम्हांला रघुवंशांतील श्लोक सांगत. विशेषतः बाणाची कादंबरी त्यांनीं आम्हांला अशी शिकवली कीं, ती त्यांचीं हसत मुद्रा, सूक्ष्म विनोद, प्रेमळ बोल मला अद्यापि आठवतात. अच्छोद सरोवरावरील शिवालयांतील महाश्वेतेचें संगीत भजनासारख्या देखाव्याची वर्णन करण्याची पाळी आली कीं गणेशशास्त्र्यांच्या स्वाभाविक रसिकतेला पाझर फुटे. शृंगार, वीर करुणादि नऊ रसांचे अभ्यंग स्नान आम्हांलाहि घडे. ॲडिसनचे ' सर रॉजर्ले डी कॉव्हरले ' वाचीत असतां जो मी इंलंडांतील खेड्यांतील देखाव्यांत रमे, तोच एकदम दीड हजार वर्षांमागच्या श्रीहर्षाचें चरित्र शास्त्रीबोवांच्या मुखांतून ऐकतांना मागील भारतीय वैभवाच्या शिखरावर भ्रमण करूं लागे. आणि ही स्थळ–कालान्तरें करणारा मी स्वतः त्यावेळीं १७।१८ वर्षांचाच होतों !

**रसिकता**

गणित असो वा शास्त्र असो, भाषा असो वा व्याकरण असो, परकीय इंग्रजी असो वा मृत संस्कृत असो कीं मातृभाषा चालू मराठी असो; माझी गति सारखीच अकुंठित चाले. सर्व हायस्कूलच्या क्रमांत मला अभ्यासाचें श्रम म्हणून कधीं भासलेंच नाहींत. ह्याचें कारण माझ्या बुद्धीचें तेज नसून– मी बुद्धीनें साधारणच आहे–केवळ माझ्या हृदयाची निर्मळ रसिकताच होय, हें मला येथें नमूद करावयाचें आहे. आणि ही रसिकता मला शाळेपेक्षां घरांतच अधिक, गुरूंपेक्षां माझ्या आईबापांकडूनच जास्त मिळाली हें खास. माझ्या घरीं जातिभेद नव्हता. तसा माझ्या हृदयांत संस्कृतिभेदाचा किंवा पक्षपाताचा कृत्रिमपणाही नव्हता. सौंदर्य जेथें भेटेल तेथें ऊर्ध्वहस्तानें स्वीकारण्यास मी लहानपणापासून एका पायावर तयार आहे. मग तें इंग्लंडांतलें असो कीं स्वदेशांतलें असो, शहरांतलें असो कीं खेड्यांतलें असो, संस्कृत

असो कीं प्राकृत असो, तें सहज व स्वाभाविक मात्र असलें कीं पुरें. मी त्याला विलगलोंच समजावें. ह्या माझ्या मुग्ध शृंगारी स्वभावामुळें, केवळ कपटी व्यवहाराच्या दृष्टीनें पाहातां प्रपंचांत माझें बऱ्याच अंशीं नुकसान झालें आहे. आणि कांहीं जगामध्यें मजसंबंधीं दुराग्रहहि पसरला आहे. तरी पण 'स्वभावो दुरतिक्रमः' ह्या न्यायानें मी आपला माझ्याच चालीनें चाललों आहे आणि ही चाल मीं हायस्कूलांतच नव्हे तर अगदीं माझ्या पाळण्यांतच किंबहुना माझ्या मातृगर्भांतच शिकलों असेन. नसेन कशावरून? एरवी ती अशी दुरतिक्रम झाली नसती.

---

# प्रकरण १२ वें

—:o:—

## माझे सोबती

हायस्कुलांतील माझे शिक्षक व अभ्यासाविषयीं साधारण आठवणी वर दिल्या. आतां सोबती व त्यांच्याशीं करमणुकीचे प्रकार सांगितले पाहिजेत. कारण स्वभाव आणि शील बनण्यांत केवळ पुस्तकी अभ्यासापेक्षां ह्या दोहोंचा परिणाम अधिक महत्त्वाचा आहे.

माझी इंग्रजी पहिली यत्ता मला कठीण व त्रासदायक गेली. त्यावेळीं माझा वडील भाऊ जिवंत होता त्यामुळें मला स्वतंत्र सोबती

**माझी भावंडें** असणें साहजिक नव्हते. त्याचे सोबती असत त्यांच्याच मागें मागें दुय्यमप्रमाणें वागावें लागे. ह्यावरून माझा भाऊ मजवर वडीलपणा गाजवी असें नव्हें. तो शांत स्वभावाचा होता. बरेच वेळा मी त्याचें ऐकत नसलों तरी तो समजुतीनें माझ्याशीं

वागून मला आपल्याबरोबर नेहमीं ठेवी. असा मायाळू भाऊ ह्यावर्षीं एकदम वारल्यामुळें मी एकाएकी उघडा पडल्यासारखें मला झालें. तोंपर्यंत माझ्या भावाशिवाय मी इतर कोणाशीं—मग तीं कोणी मुलें शाळेंतील असोत किंवा आळींतील इतर असोत—मिसळत नसे. हायस्कुलांत जाऊन मला माझ्या स्वतःचा शोध लागेपर्यंत माझीं भावंडेंच माझें मित्रमंडळ होतें.

जमखंडी गांवांत मराठे जातींतच नव्हे तर ब्राह्मणेतर समाजांत आमच्या घराण्याचे वजन आजोबापासून चालत आलेलें होतें. तें माझ्या बाबांच्या सुशिक्षणामुळें व दरबारीपणामुळें वाढलें होतें हें मागें सांगितलें आहे. आमचा वाडा ज्या आळींत होता, तेथें मराठ्यांची जीं घरें होतीं तीं अगदीं गरीब व खालच्या दर्जाची होतीं. एकाद्या किल्ल्याप्रमाणें आमचा वाडा किंचित एकलकोंडा होता. तशांत माझें प्राथमिक शिक्षण आटोपून इंग्रजी शाळेंत जाऊं लागल्यामुळें, आळींतल्या मुलांतच काय पण मोठ्या माणसांमध्येंहि माझें महत्त्व वाढत असल्याची जाणीव मजमध्यें दिसूं लागली. माझ्या भावांत अशी अहंता नव्हती. मी लहान व अल्लड, पण तो समजूतदार—त्याच्या माझ्यामध्यें पांच वर्षांचें अंतर—असल्यामुळें तो भोंवतालच्या लोकांत अधिक मिसळत असे. अशा वेळीं तो मला एकाएकीं सोडून गेला, इकडे तर शाळेंत नव्या इंग्रजी विषयाशीं माझें नीट जमेना; त्यामुळें मी त्रासलेला व बहुतेक दुर्मुखलेला असें. माझीं धाकटीं भावंडें म्हणजे दोन बहिणी ( जनाक्का, तान्याक्का )—त्यांच्या माझ्यामध्यें अनुक्रमें ५ आणि ७ वर्षांचें अंतर होतें. अशा अनेक कारणांमुळें माझें पहिल्या यत्तेंतलें वर्ष इ. स. १८८५ बहुतेक एकलकोंडेपणांतच गेलें. आळींतील सामान्य लोकांना हीं कारणें कशी कळणार ? ते मला मोठा गर्विष्ठ समजत. माझ्या भावाच्या तुलनेनें मी जवळजवळ लोकांत अप्रियच होतों.

मी लहानपणीं फार लाजाळू असल्यानें लोकांत न मिसळण्याचा माझा स्वभावच होता. अद्यापिहि मला एकदम एकाद्या समाजांत कारणाविना

किंबहुना अगत्यानें बोलाविल्याविना जाणें आवडत नाहीं. ह्यामुळें अजून केव्हां-केव्हां मजवर गर्विष्ठपणाचा—निदान मानीपणाचा आरोप

**माणूसघाणेपणा** येतोच. ह्यामुळें, माझ्या आतेचा कितीहि आग्रह असला तरी मी त्यांच्या आळींत कधीं फिरकत नसे. पण

माझा भाऊ मात्र त्या बाजूला फार लोकप्रिय असे. तो तरुण होता. माझ्यापेक्षां रंगानें उजळ व रुपानें देखणा होता. बड्या बापाचा वडील मुलगा आणि स्वभावानें मनमिळाऊ. मग कां लोकप्रिय होणार नाहीं? विशेषतः त्या बाजूच्या तरूण मुली त्याच्यावर फार फिदा होत्या. आणि मला हें रहस्य त्यावेळीं (माझें वय अवघें ११।१२ वर्षांचें) कळणें शक्य नव्हतें. म्हणून माझ्या भावाच्या चहाड्या घरीं येऊन मी मुग्धपणें आईजवळ सांगें. आई ते मनावर घेत नसे. आणि भावाला तर मजविषयीं कधीं रागच नसे. त्यामुळें माझ्या सासूच्या आळींतील लोक मला चहाडगा व मत्सरी म्हणत. मी जो मुलांशीही न मिसळणारा, तो मुलींत कसा मिसळणार? म्हणून त्या मला माणूसघाणा म्हणत. पुढें तर मोठा शिकलों, विलायतेला जाऊन आलों, ब्राह्म समाजांत शिरून सुधारणेचा अतिरेक केला, दारिद्र्याचें व्रत घेतलें, आणि शेवटीं कुटुंबासह महारा-मांगांच्या वाडयांत त्यांची सेवा केली! ह्यापैकीं एकाहि कारणानें मराठयां-सारखा मागासलेला समाज मला अद्यापि विक्षिप्त समजणें साहजिक आहे. मग ह्या सर्व कारणांचा कडेलोट करणाऱ्या मला जमखंडीतील मराठेच नव्हेत तर सर्वच लोक अद्यापि माणुसघाणा म्हणतात ह्यांत नवल कां वाटावें! आतां देखील फार दिवसानें मी जन्मभूमीला गेलों तर माझ्या घराण्याचा लौकीक जाणून लोक मला गांवांत तरी घेतात. बाटका, ख्रिश्चन, बहकलेला समजून मला महारवाडयांत बसवीत नाहींत ह्यांतच मी भाग्य समजतों! अर्थात् मराठेतर समजूतदार माणसें — मग ती ब्राह्मण असोत, लिंगायत असोत कां मुसलमान असोत, मला फार बहुमानानें वागवितात तो

प्रकार वेगळा. जमखंडीतील मराठे तरी मला अद्यापि दूरदूरच करीत आहेत. ‘कालोध्ययं निरवधि विपुला च पृथ्वी ’ ! !

माझा लाजाळू स्वभाव, लोकांत बसण्या उठण्याचा संकोच, माझ्या भावाच्या मृत्युमुळें झालेला विरह आणि अंगवळणी न पडलेल्या इंग्रजी अभ्यासाचा कांच इत्यादि कारणामुळें ह्यावेळीं मी फार घुम्या स्वभावाचा झालों होतों. अशा वेळीं एक लहानशीं सुंदर गोष्ट घडली ती आठवते. ती दिसण्यांत क्षुद्र असली तरी माझ्या त्यावेळच्या अंतःस्थितीवर मोठा मनोरंजक प्रकाश पाडीते, म्हणूनच केवळ येथें देतो.

**गोड देखावा**

माझा भाऊ वारल्यानंतर फार तर एक दोन महिन्यांतली ही गोष्ट. ह्या वेळीं मी बारा वर्षांचाहि नव्हतों व माझी बायको फार तर तीन वर्षांची असावी. माझी आत्या वरचेवर समाचाराला आमचे घरीं येई. ह्यावेळीं बरोबर तिनें माझ्या या लहानग्या बायकोला लुगडे वगैरे विशेष कांहीं न नेसवितां तसेंच आणिलें होतें. कारण माझें घर जरी माझ्या बायकोचे सासर तरी तिच्या आईचे माहेर होतें. किंबहुना तीच लहान पोर आईला न कळत अर्धी नागडी उघडी सहज मागें लागून आली असावी. आमच्या वाड्याच्या मोठ्या दरवाज्यांतून आंतील लहानशा चौकांत येतांना दारांत एक मोठी गुळगुळीत ओझरती फरशी होती. तिचेवरून दुडदुड धांवत येतांना हें लहान मूल पाय घसरून कोलमडून पडलें. त्यावेळीं मी जवळच एका खांबाला टेकून खालीं मान घालून दुःखी कष्टी बसलों होतो. मी चटकन् उठून तिला कवटाळून उचललें व जेथें मंडळी सर्व बसली होती त्या कट्ट्यावर नेऊन ठेविलें. हा देखावा पाहून मंडळींत हंशा पिकला. लग्नांत माझी बायको ६।७ महिन्याची होती म्हणतात. तिची मानहि नीट राहात नव्हती. लग्नांत बायको लपवून ठेवितात, तिला नवऱ्यानें शोधून कडेवर घेऊन यावयाचे वगैरे खेळ असतात. माझ्या लग्नांत हा खेळ होणें शक्य नव्हतें. तो खेळ मी आज केला

म्हणून मंडळी हांसत माझी थट्टा करूं लागली. मी स्वभावानें लाजाळू, घुम्मा व मंडळींत फारसा न मिसळणारा होतों. तरी प्रसंग पडल्यास उचित असेल ती गोष्ट करण्यास किंवा बोलण्यास मी कधीं कसली फाजील लाज अगर भीड राखीत नसे. माझी बायको अद्यापि फार लहान असल्यामुळें तिला तर लाज ती कशी माहीत नव्हती आणि ती माझी आतेबहीणच असल्यानें मी तरी काय म्हणून लाजावें, हा विचार मी कृतीनें दाखविला. हा गोड देखावा पाहून माझ्या भावाच्या मृत्युनें ज्यांचीं हृदयें दग्ध झालीं होतीं त्या माझ्या आईबापांच्या तोंडावर हासें विलसूं लागलें. माझ्या आत्येला तर माझें इतकें कौतुक वाटलें कीं त्याचें शद्बांनीं वर्णनच शक्य नाहीं. आपल्या मुलीचें पालन आपला लाडका भाचा उर्फ जांवई पुढें उत्तम रीतीनें करील ह्याचें पूर्व चिन्हच ह्या प्रसंगीं तिनें प्रत्यक्ष पाहिल्याचा तिला आनंद झाला ! त्यावेळचें माझ्या बायकोचें गुळगुळीत बाळसें, कुरळ्या केसाच्या झिपऱ्या; सहजमधुर चेहरा, अकुंठित धावपळ, आणि पडली असली तरी मी उचलल्या बरोबर तिनें हासलेलें बाळहांसें ह्या सर्वांची छबी माझ्या बाल-हृदयाच्या कॅमेऱ्यांत तात्काळ ठसावली. ती निगेटिव्ह मी अजून राखून ठेविली आहे. कितीदां तरी एकटा असतांना ती मी काढून पाहात माझ्याशींच रमतों ! प्रिन्सिपाल गोळे ह्यांनीं आपल्या " हिंदुधर्म आणि सुधारणा " ह्या पुस्तकांत बालविवाहाच्या सात्विक प्रेमाचें जें गौरव गाइलें आहे, त्यांतलें रहस्य असेंच असेल काय ?

**मित्रमंडळ**

ह्याप्रमाणें इंग्रजी पहिल्या यत्तेंतलें माझें वर्ष बहुतेक एकलकोंडेपणांतच गेलें. दुसऱ्या यत्तेंत गेल्याबरोबर माझ्या अभ्यासाची झपाट्यानें प्रगती कशी झाली व मी एकदां जो वर्गांत पहिला नंबर पटकाविला तो शेवटीं सातव्या यत्तेंपर्यंत—नव्हे युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकमध्येंहि माझ्या शाळेंतील मुलांमध्ये अखेरपर्यंत कायम राखिला हें मी वर वर्णन केलेंच आहे. वर्गांत पहिल्या नंबरच्या

विद्यार्थ्याला मित्रांची, निदान सोबत्यांची उणीव कधीं भासणें शक्यच नसते. ह्या न्यायानें माझे भोंवती सोबत्यांचा घोळका जमूं लागला. पहिले माझे गडी ब्राह्मणेतरच होते. चंदू साळुंखे, लक्ष्मण जाधव हे दोघे मराठे, मलकाप्पा तुंगळ हा लिंगायत, पांडू हा न्हावी, आणि मियासो अथणी हा तर मुसलमान होता. पण मी जसजसा वरच्या यत्तेंत जाऊं लागलों तसतशी ही ब्राह्मणेतर मित्रमंडळी साहजिक मागें गळूं लागली. तिसऱ्या चौथ्या यत्तेंपासून माझ्या प्रभावळींत बहुतेक ब्राह्मण मुलेंच दिसूं लागलीं.

**मुक्तद्वार वाडा**

आमचा वाडा एकीकडे निवांत होता. अभ्यासाला बसावयाला पुष्कळ जागा होती. माझा पुस्तकांचा सांठा भरपूर, कांहीं आडलें नडलें तर सांगावयाला माझी नेहमी तयारी. माझा कोणताहि सोबती असो त्यावर पोटच्या मुलांप्रमाणेंच अकृत्रिम प्रेम करण्याची माझ्या आईबापाचीहि तयारी. शिवाय आमच्या वाड्यापुढें विस्तीर्ण आंगण, आणि वाडा गांवाच्या हद्दीवर असून जवळच डोंगर, आणि दरींतून एक सुंदर आंबराई इतकीं साधनें असल्यावर माझें भोंवती सोबत्यांची अष्टौप्रहर मांदी जमत असें ह्यांत काय नवल! अभ्यास करीत करीत खेळ आणि खेळ खेळतच अभ्यास हा खेडवळ विद्यार्थ्यांचा निसर्गानेंच रेखून दिलेला कार्यक्रम असे. तिसऱ्या यत्तेपासून सातवी अखेर पांच वर्षेपर्यंत आमचा वाडा म्हणजे एक अनरजिस्टर्ड शाळा, एक मोफत वाचनालय, एक मुक्तद्वार विद्यार्थि वसतीगृह, एक धांगडधिंग्याचा जिमखाना असे एक ना दोन—जें म्हणाल तें होता म्हणावयाचा!

**नवीन भरणा**

तिसऱ्या चौथ्या यत्तेंत, रामू रानडे, सखाराम गोखले, वामन घारे, भिमू निवर्गी, मलकाप्पा तुंगल इत्यादि मंडळीं नेहमी माझें खोलींत पडलेली दिसे. पांचव्या सहाव्या यत्तेपासून ह्या मंडळांत नवीनच भरणा झाला. जमखंडीचें पश्चिमेस मुधोळ संस्थान १२ मैलावर आहे. तेथील इंग्रजी शाळेंत त्यावेळीं

चौथीपर्यंतच यत्ता होत्या. म्हणून तेथून विष्णु देशपांडे, हणमंत कुळकर्णी, रामू पाटील व अंतू हनगंडी वगैरे हीं मंडळी जमखंडीच्या शाळेंत शिकावयास आली. थोड्याच दिवसांत हे सारे ग्रह माझ्याच मालकेंत फिरूं लागले. ही सर्व खेड्यांतील देशस्थ ब्राह्मणांची मुलें होती. त्यांच्या आईबापांनीं एका घरीं त्यांच्या जेवणारहाण्याची सोय करून दिली होती. ते सर्व आपसांत जवळचे नातलग होते. थोड्याच दिवसांत ती सर्व माझ्या भावंडाप्रमाणेंच माझ्या घरीं पडून राहूं लागलीं. इतकेंच नव्हे तर सुटीचे दिवसांत त्यांनीं मला आपल्या गांवीं न्यावें; त्यामुळें त्यांच्या घराण्यांचा व माझ्या घराण्याचाहि मोठा घरोबा जमला! मुलांकडून वडिलांचा स्नेह जमणें म्हणजे वळचणीचें पाणी आढ्याला चढण्याप्रमाणेंच हा प्रकार होता. सातव्या यत्तेंत कुंदगोलहून जनार्दन सखाराम करंदीकर हे आमच्या शाळेंत आले. स्कॉलर ह्या नात्यानें हे माझे प्रतिस्पर्धि होते. पुढेंहि कॉलेजमध्यें हे व मी बी.ए. पर्यंत सारखेंच शिकत होतों.

---

# प्रकरण १३ वें

## माझे खेळ

जमखंडी गांव हा खेडवजा आणि इंग्रजी शाळा नुकतीच झालेली. तेथें अलिकडच्या हायस्कूलप्रमाणें क्रीडांगणें, व्यायामाचे निरनिराळे प्रकार, ड्रिल-मास्तर हे कोठून यावयाला? आम्ही आपल्याच मनानें कोठेंतरी गांवाबाहेर जाऊन खेळून येत असूं.

अगदीं प्रथम माझा वडील भाऊ असतांना आमच्या घरीं बैठा खेळ

म्हणजे सोंगट्यांचा. गंजिफा, बुद्धिबळें, सोंगट्यांचे हस्तिदंती फासे वगैरे खेळांची सर्व साधनें आमच्या बाबांनीं घरीं करून ठेविली होती. पण ते स्वतः कधीं खेळतांना आम्ही पाहिलें नाहीं. हें सामान मात्र भरपूर घरीं होतें.

**सोंगट्यांचा खेळ**

हा एक बाबांचा रसिकपणाचा मासलाच म्हणावयाचा. दिवाळीच्या सणांत तर आमच्या घरीं सोंगट्यांची मजलसच भरे. नरकचतुर्दशीच्या आदले रात्रीं पासून तो भाऊबिजेची रात्र उजाडेपर्यंत कवड्यांचा खळखळाट अष्टौप्रहर चालत असे. हा खेळ मोठ्या ईरेचा. मनुष्य कितीहि शांत असला तरी तो चिडून भांडल्याशिवाय ह्या खेळाची समाप्ति म्हणून व्हावयाची नाहींच. एका एका बाजूला दहा-दहा बारा-बारा गडी बसलेले, संध्याकाळीं सुरू होऊन उजाडेपर्यंत आम्ही खेळांत गढून जात असूं. भांडण केव्हां केव्हां हातघाई-वरहि यावयाचें.

माझा स्वभाव विशेष तापट असे. एकदा आलगूरचे आमचे मामा ( हे वयानें माझ्या वडील भावाहून फार तर १।२ वर्षांनीं मोठे असतील ) एकीकडे आणि मी व माझा भाऊ एकीकडे असें सोंगट्या खेळत होतों. मामा

**एक मल्लयुद्ध**

फार विनोदी, रडी खेळणारे, चिडखोरांना अधिक चिडवून मजा बघणारे अगदीं पहिल्या नंबरचे. खेळ बाजूसच राहून आमचें भांडण जुंपलें. शब्दयुद्ध संपून मल्लयुद्ध सुरू झालें. मामा म्हणजे पट्टीचा पहिलवान ! आम्ही दोघेच काय, दहा असलो तरी ते दाद कसची देतात. दुसऱ्याला चिडवून स्वतः कधींच चिडत नसत. हे पाहून तर आम्ही अधि-कच चिडूं. शेवटीं प्रकरण अगदीं निकरावर जाऊन स्वयंपाक घरांतून आईला आमचेकडे यावें लागलें. गलीव्हरच्या अंगावर लिलिपुटाप्रमाणें आम्ही दोघे बंधु मामांच्या पाठीवर चढून लाथा व बुक्यांचा मारा चालविला आहे. तो खालीं तसाच वाकून हांसत आम्हांला अधिकच खिजवीत आहे.

हा प्रकार पाहून आई म्हणाली, 'अरे हा कसला नवीनच डाव आज काढला आहे रे !' तीही आपल्या भावाचें पाठबळ न घेता आमचीच बाजू घेऊन मामाला म्हणे, 'तूं मोठा असून तुला कळत नाहीं काय रे, लहान मुलांशीं असले प्रसंग करायला ?' खरे पाहातां चूक आम्हांकडेच असावयाची. पुढें मी हायस्कुलांत गेल्यावर अगदीं मॅट्रिक होईपर्यंत आमचे घरीं ह्या खेळाचा अड्डाच जमत असे.

**पटाईत वृत्ति**

दिपवाळी आली कीं माझ्या अभ्यासाच्या खोलीला चुना, रंग वगैरे मी स्वतः व माझे सोबती लावीत असूं. वर छत, झालर आणि रोषनाई आमच्या ऐपतीप्रमाणें करीत असूं. दुसऱ्यांच्या घरींही असे अड्डे होत, तेव्हां अरसपरस जावें यावें लागे. रात्रीं किती भांडणें झालीं, बोलाचाली केली, तरी उजाडल्यावर रात्रीचा प्रकार जणूं काय स्वप्नांत झाल्याप्रमाणें आम्ही सर्वच विसरून जात असूं! सहाव्या सातव्या यत्तेंत असतांना, तेरदालचे विष्णु देशपांडे, रामु पाटील, अंतु हनगंडी, ममलीचे हणमंत कुलकर्णी, त्याचा भाऊ रामू शिवाय जमखंडीचे भिमु निवर्गी, व्यंकू कुलकर्णी, सीनु करकंबकर, रामु जासूद वगैरे १५।२० जण ह्या खेळांत जमूं. मी व तेरदालचे देशपांडे हे नेहमी विरुद्ध पक्षाला असूं. दोघेही सारखेच चिडखोर आणि हेकेखोर. खेळापेक्षां भांडणांतच वेळ आणि शक्ति जास्त खर्चत असूं. शेवटीं शेवटीं जुळवून कवड्या टाकण्याची पद्धत निघाली. व्यंकू कुलकर्णी म्हणजे प्रत्यक्ष शकुनीमामाच. कवड्या जुळवून वाटेल तो फासा हमखास टाकण्यांत त्याचा हातखंडा. त्याच्या खालोखाल मीही जुळवण्यास शिकलों. दहा, पंचवीस, सहा, बाराच काय पण साधे तीन आणि चार हेही आम्ही जुळवून नेमके पाडीत असूं. केव्हां केव्हां बाहेरचे लोक डाव पाहावयाला बसत असत. रंग बहारीचा चढे. पत्ते, गंजीफा फार क्वचित् खेळत असूं. बुद्धि-बळाला तर हातच लावीत नसूं. तो गर्दीचा खेळ नव्हे. तितकी गंभीरताही

आमच्यांत नव्हती.

मैदानी खेळ आट्यापाट्या, हुतूतू, खो खो वगैरे खेळत असूं. शिवाय किर्र म्हणून एक खेळ विशेष चुरशीचा असे. यांत हारलेली बाजूचे गडी एकामागें एक कंबरेला धरून वाकून उभे राहात आणि विजयी बाजूचे गडी लांबून धांवत येऊन त्यांच्यावर स्वार होत. ते बराच वेळ बसले आणि भार सहन होईनासा झाला म्हणजे खालच्यापैकीं कोणी तरी "किर्र" म्हटलें कीं खालीं उतरून पुनः उडी घेत. पण जर कां वर बसलेल्यापैकीं एकाचा जमिनीला पाय लागला कीं त्यांच्यावर डाव येऊन त्यांच्या पक्षाला खाली वांकावें लागे. ब्राह्मणांचीं मुलें हा खेळ खेळावयाला किंचित् कचरत असत.

**'किर्र' खेळ**

झाडावरचा सूर हा खेळ फार मौजेचा वाटे. जमखंडी गांवाभोंवतीं डोंगराच्या दरींतून तळ्यांच्या कांठीं बऱ्याच रम्य आंब्राया असत. तेथें सायंकाळच्या वेळीं निवांत असे. आमची वानरसेना हा खेळ खेळावयास एकादे विस्तीर्ण शाखेचें ठेंगणें आंब्याचें झाड गाठीत असे. सर्वांनीं झाडावर चढावयाचें. एकानें खालीं उतरून, एक दांडकें आपल्या उजव्या तंगडीखालून दूर फेंकावयाचें. ज्याच्यावर डाव आलेला असे तो तें आणीपर्यंत टाकणारा झाडावर चढे. तें दांडक ठरलेल्या कोंडाळ्यांत ठेवून डाव आलेला गडी झाडावरच्यांना शिवण्याचा प्रयत्न करी. त्याची नजर चुकवून कोणीतरी दांडक्यावर नेमकी उडी टाकून तें दांडकें पुनः पूर्वीप्रमाणें फेकून तो झाडावर चढे. कोणातरी एकाला शिवेपर्यंत त्याच्या वरचा डाव जात नसे. हा खेळ मुख्यतः गुराखी मुलांचा असे. ह्याला वडाचें झाड चांगलें. त्याच्या फांद्या लांबवर गेलेल्या, लाकूड चिवट असल्यानें मोडण्याची भीति नाहीं. आंब्याचें पोकळ झाड असतें. शिवाय आंब्याच्या मोसमांत आंबराईत राखण बसे. वडाला नेहमीं मुक्तद्वार. शिवाय पारंब्या खालीं लोंबत असल्यामुळें

**सुरपारंब्या**

त्या धरून खालीं उड्या घेण्यास किंवा खालूनच उलटें झाडावर चढण्यास फार सोयीचें हेंच झाड. मात्र घरीं येईपर्यंत अंगावरचे कपडेच काय, पण कातडेंही जागजागीं फाटलेलें असल्यामुळें घरच्या मंडळीपासून फाटका आणि ओरखडलेला भाग लपवून ठेवण्यांत दुसरा एक खेळच खेळावा लागत असे. हात पाय मुरगळलेला, डोकीला खोंक पडलेली, पाठ खरच-टलेली, शिरा ताणलेल्या व हाडें न् हाडें खिळेखिळीं झालेलीं—अशा स्थितींत घरीं आलेल्या गड्याला पुनः एक आठवडा तरी आंबराईच्या दिशेनें पाहाण्याची सुद्धां इच्छा होते कशाला ? पण दुसऱ्या आठवड्यांत पुनः हीं माकडें झाडावर आहेतच तयार ! जित्याची खोड मरे तोंपर्यंत जात नाहीं. पण आमची खोड मॅट्रिक झाल्यावर पार गेली. कॉलेजांत जाणें म्हणजे बालप-णालाच नव्हे तर जन्मभूमीलाही मुकणें होय ! जळो तें कॉलेज आणि मरोत ते प्रोफेसर ! !

### सुरपाट्या

सुरपाट्या हा तर अगदीं राजमान्य राष्ट्रीय खेळ. तो आम्हां खेडवळांचा क्रिकेटच. जमखंडीच्या पूर्वेस नंदिकेश्वराचें एक जुनें देऊळ आहे आणि वायव्येस सुमारें एक मैलावर अबुबकराचा दर्गा आहे. ह्या दोन ठिकाणच्या प्रशस्त पटांगणांत आमची टोळी सुरपाट्या खेळण्यास जात असे. एकदां जाण्याची घडी पडली म्हणजे तीन तीन महिने ती मोडत नसे. त्या आंगणांत खेळून खेळून पाटीचे आडवे आणि सुराचा एक लांब उभा असे खाचरच पडत. ह्या दोन जागा म्हणजे आमच्या वतनाच्या झाल्या होत्या. तेथें दुसरे कोणी फिरकावयाचें नाहीं. इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा वचक व दबदबा असतो; तसें जमखंडीस आम्हा विद्यार्थ्यांच्या कळपांचें वजन असे. ह्या टोळीचा मी नायक म्हणून प्रसिद्ध असे. गांवचे लोक विशेषतः आमची शिक्षक मंडळी आमच्या खेळाचें कौतुक करीत असत. एकदां जमखंडीचे वृद्ध यजमान श्रीमंत अप्पासाहेबांनीं उन्हाळ्यांत साखरपाणी

करून मोठ्या आवडीनें आम्हां विद्यार्थ्यांना आपल्या हातांनीं साखरपाण्याचे पेले पाजले !

**आमचा कंपू**

आमचा कंपू घेऊन मी दरसाल उन्हाळ्यांत आणि पावसाळ्यांत कोठेंतरी नदीच्या कांठीं किंवा डोंगरांच्या दरींत वनभोजनाला जात असे. आमच्यांत लिंगायत, मराठे, ब्राह्मण, मुसलमान सर्व जातींचे विद्यार्थी असत. जातीभेद कसला तो आमच्या गांवीही नव्हता. तसलीं सोवळीं पोरें आमच्या वाऱ्यालाही उभीं राहत नसत. आणि आम्ही त्यांना आमच्यांत घेत नसूं. जनुभाऊ करंदीकर असल्या सोवळ्याचा होता. तो आमच्यांत फारसा मिसळत नसे. आमचा सर्व कंपू नेहमीं आमच्या वाड्यांत रात्रंदिवस पडलेला असे. बाहेरच्या मोठ्या अंगणापासून आंत स्वयंपाकघर व देवघरापर्यंत ह्या टोळांचा धुडघूस चाले. मात्र बाबांना सर्व भीत. त्यांचेसमोर पुस्तकांत नाक खुपसून बसूं. ते बाहेर गेले कीं घेतला वाडा सर्व डोक्यावर अन् काय. माझ्या दोन वहिणी जनाक्का व तान्याक्का ह्या लहान अल्लड असत. त्याही आमच्या धांगडधिंग्यांत सामील होत. माझ्या आईला कोणीच भीत नसत. तिला सर्व आपलींच पिलें वाटत. तिला स्वतः वीस झालीं. ही बाहेरची वीस ! कित्येक वेळां स्वयंपाक घरांतील खाण्याच्या पदार्थांवर हल्ला होई. आमच्या गरिबींतले शिळे तुकडे तेरदालचा विष्णु आणि जमखंडीचा सीनु ही श्रीमंतांचीं मुलें असूनही मिटक्या मारीत खात. मग आईला मायेचें भरतें कां येऊं नये ! हे माझ्या भावी सामाजिक सुधारणेचे पाळण्यांतले पाय बरें ! भावी चारित्र्याचे नमुने पुस्तकांतील रेखीव धड्यांत अगर वर्गांतल्या निर्जीव बाकावर बनत नसून, ते आंगणांतल्या जिवंत धांगडधिंग्यांत आणि समानशील सवंगड्यांच्या धसमस्करीच्या जिव्हाळ्यांत जन्म पावत असतात.

आमचा सर्व वेळ अभ्यासांत, किंबहुना खेळांतच जाई असें नव्हे. नित्य

**चित्रकला नाद** कांहींतरी नवीन कल्पना निघे, आणि आम्ही सर्वच त्यांत रमत असूं चित्र काढण्यांत आमच्यांतला रामू रानडे याचा हात चांगला चाले. आमच्या टोळीला लागला चित्रें काढण्याचा नाद ! आमच्या सोप्यांत आणि तुळशी-कट्यावरच्या भिंतीवर चमकावयाला लागली रामाची, मारुतीची, देवदेवींचीं चित्रें. तुळशीकट्यावरची भिंत चुन्याची होती. तिच्यावर मी लाईफ साईझ रामपंचायतन रंगीत काढलें होतें. तें बरींच वर्षें राहिलें होतें. घरांत आले-ल्यांना तें दर्शनी भागीं असल्यामुळे दिसे. आतां आठवल्यावर मला त्याची लाज वाटते ( कारण त्याच दर्जाची ती आमची कला होती ! ). पण त्या वेळीं मला त्या चित्राचा मोठा पोरकट गर्व वाटत होता. ह्यावरून मी लहानपणीं किंचित् बढाईखोर असेन असें वाटतें.

**कारागिरी** दुसऱ्यांदा एक वेळ गणेश चतुर्थी आली. आणि आमच्या टाळक्यानें घेतलें, गणपती प्रत्येकानें स्वतः करावयाचा ! मग चाललें हें माकडमंडळ जमखंडीच्या पूर्वेस २-२॥ मैलांवर एक डोंगर आहे, तेथून शाडू माती आणावयाला. बरीच शाडू आणून जो तो चढाओढीनें गणपती करूं लागला. 'विनायक प्रकुर्वाणो रचयामास वानरम्' असाही प्रकार अर्थात पुष्कळांचा झाला. तरी प्रत्येकाला आपलीच कृति पसंत पडून आपापली पाठ आपणच थोपटून घेतली. खरें पाहातां रामू रानड्याचा गणपती मात्र त्यांतल्यात्यांत गणपतीसारखा दिसत होता. कांहीं असो. त्या गणेशचतुर्थींत सर्वांनीं स्वकृत गणपतीचीच पूजा केली ही कांहीं थोडी गोष्ट नव्हे !

**आमचे कारखाने** आणखी एकदां साबण करण्याची टूम निघाली. जो तो चुना आणि तेल ह्यांत हात घालून बसला वड्या तयार केल्या पण त्या वाळेचनात ! वाळल्या तर पुनः ओल्याच होईनात. कप-ड्याला लावूं गेलों तर कपडा फाटे पण डाग कांहीं

जाईना. साबणाचे नवे डाग कपड्याला पडूं लागले. चहूंकडे छीथू झाली आणि आमच्या पियर्स सोप कंपनीचें दिवाळें निघालें. ह्याचप्रमाणें शिस-पेन्सिली, दगडीपेना ह्यांचे आमचे कारखाने जसे निघाले, तसेच बुडाले. भागीदार आमचे आम्हीच असल्यानें कोण कोणावर फिर्याद करतो. केली तरी पुनः हसेंच होणार ना? तरी एका गोष्टींत आमचा हातखंडा असे. आमची शाई नेहमीं आम्हीच करीत असूं. बाभळीच्या शेंगा शिजवून त्यांत हिरडा व हिराकस घालून आम्ही शाईच्या बाटल्या भरून ठेवीत असूं. मग वाटेल तितक्या दौती लवंडल्या तरी भरलेल्या बाटल्या कोनाड्यांत शिल्लक असतच. मात्र ह्या शाईच्या कारखान्याच्या भरभराटी-मुळें, शाई वेळोवेळीं घरभर सांडे आणि यामुळें बिचाऱ्या आमच्या आईला सारवणाचा नवीनच त्रास उद्भवे. असो! ह्या गालबोटामुळें आमच्या यशाची शुभ्रता जास्त उठावदार दिसूं लागली. मग आईच्या त्रासाला कोण जुमानतो?

---

# प्रकरण १४ वें

## माझ्या खोड्या

दंगा, मारामारी आणि स्वैर खेळ हे बालपणाचे जन्मसिद्ध हक्क होत; आणि ते मी माझ्या परीनें—आमचे बाबांचा आम्हांवर आग्रहीपणा कितीही दाब असो—बजावयाला कांहीं कमी केलें नाहीं. अगदीं लहानपणीं मी शेजारच्या मुलांना मारून आईकडे कागाळ्या आणीत असे हें मला अद्यापि आठवतें. आमचे

आजोबा असतांना आमच्या वाड्याच्या बाहेरच्या पटांगणांत कांहीं भाडोत्रीं कुळें राहात असत. त्यांत पाटोळे नांवाचें एक गरीब कूळ असे. त्यांचा रामू नांवाचा एक माझ्याच वयाचा लहान मुलगा असे. सहज खेळतां खेळतां मी त्याच्या डोक्यावर हात ठेवण्याचा हट्ट घेतला. पण हात ठेवूं न देण्याचा हट्ट त्यानेंही घेतला. कारण हट्ट करणें दोघांचाही सारखाच जन्मसिद्ध हक्क होता ना ? शेवटीं आम्हा लहानग्यांची मारामारी झाली. रामू आपल्या आईकडे रडत गेला. तरी मी त्याच्या मागें लागलोंच होतों. शेवटीं ह्या खटल्याचें अपील आमचे आईकडे आलें. कारण रामूची आई माझ्या आईची मोठी मैत्रीण होती. आईनें हा खटला साहजिकच आजोबांकडे वर्ग केला. आजोबांनीं आम्हां दोघा हेकेखोरांना आपल्या समोर घेतलें आणि दोघांला खाऊ देऊं केला. पण खाऊपेक्षां मला माझ्या दावेदाराचे डोक्यावर हात ठेवण्यांतच जास्ती ईर्षा वाटत होती. रामू खाऊला कबूल झाला, आणि मी त्याच्या डोक्यावर हात ठेविला. खटल्याचा निकाल लागला. बरा म्हणा वाईट म्हणा हा आग्रहीपणा माझ्यांत अद्यापि केव्हां केव्हां चमकतो !

**गांवढळ खोड**

म्हातारबा सुतार म्हणून माझ्या वडिलांचे एक मित्र असत. त्यांचीं दोन मुलें रामू आणि कृष्णा हीं अनुक्रमें माझ्या आणि माझ्या वडील भावाच्या वयाचीं असत. मी मराठी शाळेंत असतांना ह्या चौघांची फार गट्टी असे. एकदां आम्ही चौघे एकीकडे व दुसरीं आळींतील मुलें दुसरीकडे ह्यांची आमच्या घराच्या पश्चिमेस असलेल्या तळ्यांत एक मोठी मारामारी झालेली आठवते. तळ्यांत पाणी नसे. त्यांत खेळण्यास विस्तीर्ण जागा असे. पण एकदां रामू आणि माझीच मारामारी जुंपून आम्ही दोघेही आमच्या आळीं-तील मोठ्या रस्त्यांत भलीं मोठीं खोल गटारें होतीं त्यांत घाणींत पडलों होतों. रामूच्या आईनें आम्हांला दोघांला धुतलें, पुसलें, खडे कांटे

रुतले होते ते काढले. आणि माझ्यापेक्षां रामूला जरी मार जास्त लागला होता तरी त्याच्या आईनें माझेंच कौतुक करून मला माझ्या आईकडे पाठविलें.

विहिरीच्या जुन्या भिंतीवर एक प्रकारची बारीक लव्हाळ्याप्रमाणें वनस्पति चिकटून वाढत असे. ती वाळल्यावर आम्ही काढून आणीत असूं. ती प्रतिपक्षाच्या मानेला न कळत फासल्यावर तेथें आग सुटे. हा खरोखर आमचा दुष्टपणा आणि म्याडपणाही खरा. पण म्हणतात ना, प्रेमांत आणि युद्धांत सगळेंच कांहीं शोभतें. मग आम्हीच कसे अपवाद ? शिमगा आला म्हणजे ह्या बालयुद्धाला नवीन जोम येई. पण जसजसा मी वरच्या वर्गांत जाऊन ब्राह्मणांच्या मुलांना हाताशीं घेऊं लागलों तसा हा गांवढळपणा कमी झाला. तरी माझ्या कांहीं वैयक्तींत खोडया चालूच होत्या.

**रामतीर्थ**

दर श्रावणी सोमवारीं जमखंडीच्या पश्चिमेस रामतीर्थ म्हणून एक रम्य ठिकाण आहे, तेथें जत्रा भरत असे. इ. स. १८५७ सालच्या बंडानंतर जमखंडीचे यजमान श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन ह्यांनीं ह्या ठिकाणींच आपली वस्ती मांडली. पूर्वीं येथें रामेश्वराचें काय तें जुनें एक रम्य देऊळच होतें. पुढें २५।३० वर्षांत येथें विस्तीर्ण राजधानीचें स्थान झालें. पश्चिमेस डोंगराखालीं कडपट्टी म्हणून एक लहान खेडेगांव आहे. तेथें बसवण्णाचें लिंगायत पुरातन प्रसिद्ध देवालय आहे. येथें यात्रा मोठी भरत असे. ती मोडून आप्पासाहेबांनीं रामतीर्थ लोकप्रिय करण्यास ही यात्रा वर डोंगरांत आपण राहत, तेथें कांहीं वर्षे नेली. रामतीर्थास जाण्याला एक वरची डोंगराची व दुसरी खालची सपाट–गाड्या वगैरे जाण्याची–अशा दोन वाटा असत. ह्या दोन्ही वाटा सोडून अगदीं डोंगराच्या माथ्यावरून मेलगिरी लिंगाप्पाच्या देवळामागून रामेश्वराच्या देवळाला जाण्याची मीं नवीन टूम काढली. ह्याचें कारण पावसा-

ळ्यांत डोंगरावरचीच नव्हे तर भोंवतालच्या दूरवर मैदानी प्रदेशांतील शोभा फार सुंदर दिसे.

**विंचवाशीं खेळ**

शिवाय आणखी एक कारण वेगळेंच होतें. ह्या डोंगरावर विंचू फार असत. ते भले मोठे काळे तांबडे असत. काळ्या विंचवाला इंगळी म्हणत. ती चावली कीं प्राणांतच ! हे विंचू धरून त्यांची एक मोठी माळ करण्याची आम्हांला खोड लागली. दगड उचलला कीं खालीं विंचू आढळावयाचान. मी तर विंचू धरण्यांत मोठा धीट व पटाईत झालों. पुढें पुढें विंचवाच्या नांगीतलें विष काढून त्याला अगदीं तळहातांत घेऊन मी इतर मुलांना चकीत करीत असें. विंचू नजरेस पडला कीं तो आपली नांगी आधीं वर करितो. तो मी चिमटींत मोठ्या शिताफीनें घट्ट पकडीत असें. मग माझ्या नखावर त्याच्या नांगीचे टोंक घासलें म्हणजे त्यांतून विषाचा एक लहानसा बिंदू बाहेर निघे. तो पुसून टाकला कीं विंचवाचें सर्व तेजच नाहींसें होई. तो आपोआपच नांगी खालीं टाके. मग त्याला कोणीही खुशाल हातावर घ्यावें. पण निस्तेज विंचवालाही हातांत घेण्याचें धैर्य कोणास होत नसे. मग माझ्या फुशारकीला कोठली सीमा उरणार! घरांत किंबहुना आमच्या शाळेंतही एकादां मोठा विंचू निघाला कीं मुलें मजकडे येत. मी चटकन् तो धरून त्याचें विष काढून हातावर घेई. अशा गडबडींत एकादे वेळीं चुकून मला विंचू चावतही असे. पण अभिमानास पेटून त्या वेदना मी मुकाट्यानें सहन करीत असें. कोण हा अकटपणा !

**सहिष्णुता**

दुखणें आलें किंवा जबर इजा झाली तर इतरांप्रमाणें मी विव्हळत नसें. स्वस्थ घुम्मेपणानें पडे. " विठ्या, काय तूं बेरड आहेस रे " असें आई म्हणे तिकडे माझें लक्षच नसे. ही स्पार्टन सहिष्णुता माझ्यांत जन्मतः नसून ती माझ्या मानीपणानें मी आणली होती. शिक्षकांनीं छडी मारली कीं,

साधारण मुलें मोठ्यानें किंकाळी फोडीत. इंग्रजी शाळेंत गेल्यापासून मला तर शिक्षकाच्या हातून मार खाण्याची कधीं अपवादादाखलही पाळी आली नाहीं. सहनशीलपणा वाढवावा म्हणून मी शिक्षक नसतांना त्यांची छडी घेऊन एकाद्या मुलाच्या हातांत देई. आणि माझ्या तळहातावरच नव्हे तर मनगटावर जोरानें मारण्यास सांगे. किती मारलें तरी मी हात खालीं घेत नसें. हात हिरवा निळा झालेला लपवून ठेवण्याचा जो त्रास होई तेवढाच काय तो.

इंग्रजी सहाव्या किंवा सातव्या यत्तेंत असतांना घडलेली एक गोष्ट. आमचें नेहमींचें मित्रवलय बसलें होतें. मी दुःख किती सहन करतों, तें पाहाण्यासाठीं व्यंकू कुलकर्णी ह्यानें एकदां जळती उदकाडी माझ्या उजव्या हाताच्या पंजाच्या मागील भागावर ठेवली. ती एकदम न ठेवतां हळूच जवळ आणतां आणतां लावली. उद्देश हा कीं, पहिला चटका लावल्याबरोबर मी कचरतों कीं काय पाहण्याचा. इतकेंच नव्हे तर माझ्या तोंडांतून शब्द किंवा डोळ्यांवरून कसलेंही चिन्ह दिसलें कीं मी हरलों असें समजावयाचें ठरलें होतें. शेवटीं जळती उदकाडी बराच वेळ ठेवली तरी हूं का चूं नाहीं. उदकाडीच विझूं लागली. इतक्यांत माझ्या आईनें अकस्मात् येऊन तें पाहिलें. ती रागें भरली! माझ्या उजवा हाताचे मागें तो लहानसा व्रण अद्यापि स्पष्ट दिसत आहे. ह्या अर्वाच्यपणास काय म्हणावें ?

**विक्षिप्तपणा**

विक्षिप्तपणाचें धाडस माझ्या उपजत स्वभावांत पेरलेलेंच दिसतें. कारण मी कालेजांत गेल्यावरही बऱ्याच वेळां मी चमत्कारिक वागलों आहें. पन्हाळगड – विशाळगडची सफर मी फर्ग्युसन कॉलेजांत असतांना केली. तेव्हां किल्ल्याच्या अवघड जागीं चढून जाऊन बसणें मला आवडावयाचें. इंग्लंडांत असतांना, इंग्लिश लेक्स् मध्यें मी एकदां डॉ. कारपेंटर–आमच्या मँचेस्टर कॉलेजचे प्रिन्सिपाल–ह्यांचा पाहुणा होतों. बरोबर कॉलेजमधील

सहाध्यायी ७।८ होते. एके दिवशीं ठरलें कीं, सूर्योदय पाहण्याला रात्रीं उठून एका डोंगराच्या शिखरावर जावयाचें. सूर्योदयापूर्वीं तेथें पोंचण्यासाठीं भल्या पहाटे उठून निघालों. डोंगरांत कांहींशी वाट उंच गेल्यावर मोठा पाऊस आला. रात्र अंधारी होती. सगळी मंडळी परतली. पण मला परतावेसें वाटेना. मी एकटाच तसा पुढें चाललों. पाऊस थांबेना, वाट दिसेना. मुलूख अगदींच अपरिचित, बरोबर कोणीच नाहीं. शेवटीं जवळच एक लहानशी गुहा लागली. तींत शिरून पावसांतून आश्रय घेतला. सुदैवानें काड्याची पेटी होती. काडी ओढून पाहातां गुहा फार लहान होती हें दिसलें. उजाडेपर्यंत रात्र तेथेंच काढावी लागली. सकाळीं उठून एकटाच भुतासारखा घरीं आलों. मिसेस कारपेंटर चिंतेंत बसल्या होत्या. कारण हें माझे करणें त्यांना फार धाडसाचें वाटलें. पण मला त्यांत कांहीं विशेष वाटलें नाहीं.

ह्याच वेळीं डॉ. कारपेंटर आणि आम्ही सर्व मंडळी इंग्लिश लेक्स् डिस्ट्रिक्ट (सरोवर प्रांतीं) मध्यें वनभोजनास गेलों असतां आम्ही सर्वजण डोंगरांत एका रम्य जंगली ठिकाणीं फराळास उतरलों. जो तो स्वच्छंदानें हिंडूं फिरूं लागला. मला एक उंच झाड दिसलें. त्यावर चढण्याची मला हुक्की आली! लागलेंच चढलोंही. पण उतरतां येईना. कारण पायांत बूट घालून कसातरी चढलों तरी उतरतांना बुटासह पाय घसरूं लागले. बूट नसते तर उतरणें सोपें होतें. पण मंडळींत बूट काढणेंही बरें नव्हतें. लागलों घुटमळायला. अखेर एका फांदीच्या शेवटीं जाऊन ती वाकवून खालीं उडी घेतली. त्यावेळीं तर मिसेस कारपेंटरनीं किंकाळीच फोडली. आणि पुनः असल्या चेष्टा करूं नकोस म्हणून तिनें गंभीरपणानें बजावलें. स्कॉटलंडांतील सरोवर प्रांतांत तर मी एकटाच रोज २०।२५ मैल सरोवरावरून बोटींतून जाई. आणि उंच डोंगराच्या अगदीं शिखरावर एकटाच तास न् तास जाऊन बसे. भीति वाटत नसे. भिण्यासारखें कांहीं नव्हतेंही. हॉटेलांत श्रीमंती चोचले करणाऱ्या मंडळींत न मिसळतां कोठेंतरी अगदीं एकांतवासांतील गरिबांच्या

झोंपडींत उतरत असें. सॅवरडेनॉन नांवाच्या खेड्यांत एका गरीब कुटुंबांत मी उतरलों होतों. तेथील लहान मुलांना घेऊन मी लॉक् लोमंड सरोवरावर एकदां फिरत होतों. मनांत आलें कीं पोहावें. कपडे काढून घेतली उडी! जरी उन्हाळा होता तरी सरोवराचें पाणी इतके थंड होतें कीं मी पडल्या-बरोबर गारठलों. अंगाची मूठ वळावयाला लागली. पायाला गोळे येऊं लागले. मग पोहतों कसचा! मोठ्या प्रयासानें कांठाला लागलों. लहान मुलें घाबरून गेलीं. हा जीवावरचा प्रसंग गुदरला!

**शर्यत**

मी मराठी शाळेंत असतांना १०।१२ वर्षांचा होईपर्यंत तर फारच उतावळा, चळवळ्या व खोडकर होतों. पण माझा वडील भाऊ पाठीराखा नेहमीं असे, म्हणूनच बाहेर गेलेला मी सुरक्षित घरीं येत असे. एरवीं आईला मोठी काळजीच असे. चैत्र महिन्यांत रामतीर्थांत श्रीमंत अप्पासाहेब गुरांचें जंगी प्रदर्शन करीत. त्यावेळीं मोठमोठ्या शक्तिवान् बैलांची ओझ्यानें भरलेल्या गाड्या ओढण्याची शर्यत होत असे. ती पाहण्यास गांवोगांवच्या लोकांची मोठी गर्दी जमे. एकदां ही शर्यत पाहाण्यास मी आणि माझा भाऊ गेलों होतों. गर्दींत आम्हां मुलांस कसें दिसणार? म्हणून आम्ही एका मोठ्या झाडावर चढलों. पण त्या झाडावरही अगोदरच पुष्कळ माणसें चढून पाहात होती. त्या झाडाच्या एका मोठ्या उंच आणि लांब फांदीवर इतकीं माणसें गर्दी करून बसलीं कीं शेवटीं भार सहन न होऊन ती सबंध फांदी माणसांसह तुटून खालीं पडली. पण खालीं देखील माणसांची गर्दीच होती. त्यामुळें मोटा हाःहाःकार झाला. त्यांत मीही उंचीवरून खालीं पडलों. गर्दींत पडलों म्हणून हातपाय मोडले नाहींत. पण विलक्षण ओरखडलें होतें. इतक्यांत पोलीसची धरावरी चालली. तेव्हां जीव घेऊन पळत सुटलों. पण माझे लग्नांतलें मोठें लांब लाल पागोटें झाडाच्या फांदींत अडकलेलें, लग्नांतला लांब चिटाचा अंगरखा फाटलेला, शिवाय धोतर पायांत अडकत होतें. पोलीस तर धरावयास जवळ

आलेला. अहाहा! काय तो प्रसंग! पण सर्वांना चुकवून पागोटेंही झटकन ओढून घेऊन शेंडी सावरीत जी धूम ठोकली तों दीड मैल मागें न पाहातां घरापर्यंत मजल गाठली. पण मरण पुढेंच अद्यापि होतें. घरीं बाबांनीं फाटके कपडे पाहिल्यावर काय दशा होईल ती आठवून पोलीसपेक्षांही ह्या नवीन धास्तीनें काळीज धडधडूं लागलें. घरीं कांहीं प्रवेश करण्याची छाती होईना. वाकून पाहात बाबा आहेत काय, कोठें बसले आहेत ह्याचा कानोसा घेतल्यावर चोराप्रमाणें आंत शिरलों. बाबा घरीं नाहींत हें पाहून हायसें वाटलें व सर्व श्रमांचा परिहार झाला!

**विशेष करामत** शिमग्यांत एकदां अशीच खोड मोडली. शिमग्याचे दिवसांत चांदण्या-रात्रीं, बाबांच्या डोळा चुकवून उनाडक्या करीत फिरत असूं. विशेष करामत म्हणजे वेश्यांच्या आळींत बदफैली लोकांच्या नांवानें शिमग्यांतल्या अचकट विचकट म्हणी म्हणत अभद्र ध्वनि काढीत मध्यरात्र उलटून जाईपर्यंत हिंडावयाचें; आणि पुनः धुलवडीच्या सकाळीं भुताटकी करावयाची, ती निराळीच! एकदां काय झालें, मी कांहीं मुलांबरोबर एका वेश्येच्या घराजवळ वाईट गाणीं म्हणत बोंबलत गेलों. मुलांच्या नादीं लागून तिच्या दाराशीं दंगामस्ती करूं लागलों. आंतून बाळा काणे नांवाचा एक तरुण ब्राह्मण त्रासून आला व त्यानें मलाच पकडलें. त्याच शिक्षकानें मला शाळेंत घालण्याचा प्रथम मुहूर्त करण्याचा धडा घालून दिला असें मागें सांगितलेंच आहे. तो फार रागीट व दांडगा होता. उभ्या वर्गांत मुलांना मारूं लागला तर एकाच हातानें न मारतां दोन्ही हातांनीं गुराला मारल्याप्रमाणें झोडपीत सुटे. ही त्याची मारकट प्रसिद्धि मला माहीत होतीच. अशा यमाच्या हातीं सांपडल्यानें माझी गाळण उडाली. त्यानें संतापून माझें डोकें धरलें होतें. त्याच्या हातांत माझा रुमालच ठेवून मी खालीं झुकांडी देऊन निसटलों, तों सूं बाल्या केला. बाळा काण्यांच्या हातून सुटलों;

पण रुमालाशिवाय घरांत बाबांपुढें कसें चालणार ! शेवटीं माझा वडीलभाऊ ह्या काण्याकडे गेला आणि मी रामजीबोवांचा मुलगा असें कळल्यावर त्या यमाचीच उलट गाळण उडाली. रुमाल परत देऊन झालेली गोष्ट बाबांना कळवूं नको अशी उलट माझ्या भावाचीच तो गयावया करूं लागला. अशानें हा प्रसंग टळला ! मीं मोठा झाल्यावर शिमग्यांतले अनाचार व अत्याचार बंद करण्यासाठीं होलिका संमेलनाची महाराष्ट्रभर मोठी चळवळ केली, तींत बरेंच यशही आलें. मुंबईंत ह्या कार्याचा आद्य व मुख्य प्रवर्तक मीच हें सर्व खरें; पण बाळपणच्या माझ्या लीलांची वाट काय ? मोठेपणीं होलिका संमेलनांत साळसुदपणें लंबी व्याख्यानें देतांना मध्येंच एकादेवेळीं बाळा काणे आठवल्याबरोबर माझी बोबडीच वळे. एवढ्या प्रसिद्ध वक्त्याच्या तोंडाला मध्येंच कां खीळ पडली असें श्रोत्यांस वाटे. पण अंदरकी बात राम जाने !

---

# प्रकरण १५ वें

## कांहीं संवयी आणि वागणूक

हा काळ संपविण्यापूर्वी माझ्या कांहीं संवयी व कांहीं विशिष्ट वागणूक यांसंबंधी आठवणी देणें बरें. माझ्या वयाच्या ६ व्या वर्षी मी प्राथमिक शाळेंत गेलों आणि १२ व्या वर्षी हायस्कुलांत गेलों व १९ वे वर्ष संपण्यापूर्वीं माझें दुय्यम शिक्षण संपलें. ह्या तिन्ही टप्प्यांत माझ्या स्वभावांत निरनिराळे फरक पडून अधिकाधिक विकास पडत असलेला मला देखील कमी अधिक कळून येत होता.

## कांहीं संवयी आणि वागणूक

**पेहराव**

प्राथमिक शाळेंत असतांना माझ्या पोषाखाचे बाबतींत मी फार गबाळ्या होतों. कर्नाटकांत प्राथमिक शाळेंत जाण्याच्या वयांतही लहान मुलें रुमालच बांधीत असतात. अजूनही खेड्यांत तेथें हाच प्रकार दिसेल. पुणेरी टोपी मी सबंध हायस्कुलांत असतांना घातली नाहीं. पुण्यांत कॉलेजांत आल्यावर मोठमोठीं बी. ए. च्या वर्गांतलीं मुलें नेहमींच — आणि मोठे प्रोफेसरही केव्हां केव्हां टोपी घातलेले पाहून आम्हां कर्नाटकीयांना मोठेंच आश्चर्य वाटे. आमच्या हायस्कूलच्या काळांत पुणेरी टोप्या जमखंडी येथील दुकानांत विकत मिळणेंच संभवनीय नव्हतें. मग कोट आणि वास्कुटांचे नांवच घ्याव-याला नको. खादीच्या बंड्या आणि वरती केव्हांतरी घालावयाला लांब झग्याचे व अस्तन्याचे मांजरपाटी आंगरखे व नेसण्यास धोतरें असत. डोईला कर्नाटकी जाडा भरडा रुमाल. तो मला प्राथमिक शाळेंत असतांना तरी कधींच नीट बांधावयाला येत नसे! ब्राह्मणांचीं मुलें लंगोटी घालीत; पण घरंदाज मराठ्यांचीं मुलें धोतरें किंवा विजारी घालावयाचीं. धोतरें मळलेलीं, आंगरख्यावर शाई सांडलेली, आणि रुमालाच्या एकदोन फेरी गळ्यांत आलेल्या, कसें तरी अस्ताव्यस्त बांधलेलें खड्यांचें दप्तर आणि पाटी सांवरीत १०–१०॥ वाजतां आमची स्वारी दुडदुड धावत येई. भूक म्हणजे इतकी लागलेली असे कीं, आईला ओरबाडून खाण्याची तयारी! आमच्या सोप्यांत समोरच्या भिंतींत एकावर एक असे दोन मोठे कोनाडे असत. वरच्या कोनाड्यांत दप्तर, पुस्तकें वगैरे आणि खालच्यांत कपडे ठेवावयाचे असत. पण मी हें सर्व उभ्याउभ्याच फेकून देत असें. तें सर्व नीट ठेवण्याचें काम माझ्या मोठया भावाचें किंवा आईचें. बाबांच्या दाबा-मुळें आंघोळ केल्याशिवाय गत्यंतरच नसे. पण ती आंघोळ त्याच मासल्याची म्हणजे सगळें आंग कांहीं भिजावयाचें नाहीं. मात्र कपाळावर गंधाचा नाम-मात्र मोठा ओढलेला, त्यामुळें बाबांचें लक्ष आंघोळीच्या व्यंगाकडे जाऊच नये!

**साधी राहणी**

पोषाख भपकेदार करणें किंवा दागदागिने घालून नटणें ह्याची मला लहानपणापासून कधींच आवड नव्हती. हायस्कुलांत गेल्यावर पोषाखांतला हा गैदीपणा कमी झाला. तरी माझें लक्ष अशा गोष्टीकडें फारसें नसे. साधेपणा मला नेहमींच आवडे. बरेंच दिवस अंगांत बाराबंदी बंडीच असे. मला अलीकडचा ज्याला ( छातीवर गुंड्या लावलेला ) सदरा म्हणतात हा जेव्हां प्रथम मिळाला तेव्हां मोठा आनंद झाला. तो अर्थात् खादीचा होता. तो दिवस श्रावणी सोमवार होता. हा नवीन कपडा घालून मी रामतीर्थास रामेश्वरास जाऊन आलों. एकटाच होतों. वाटेंत किती वेळां तरी माझ्या ह्या नवीन संपत्तीकडे पाहून मी स्वतःचें अभिनंदन करून घेतलें म्हणून सांगूं ! ह्या वेळीं मी फार तर १२ वर्षांचा असेन.

प्राथमिक शाळेंत असतां मला एक चमत्कारिक खोड होती. सहज उभा असतां माझ्या दातांतून जीभ बाहेर आलेली दिसे. तें मला कळतच नसे. बाबांनीं मला नेहमीं टोकावें, तरी मी आपला बावळटासारखा दातांत जीभ काढून उभाच. मला माझीच शरम वाटे पण खोड कांहीं बराच काळ गेली नाहीं.

**स्नान**

हायस्कुलांत गेल्यावर माझ्यांत किंचित् व्यवस्थितपणा आला; पण त्याची केवळ लहर येऊन जाई. ती लहर आली कीं मग सर्व वस्तु व्यवस्थित ठेवण्याच्याच नादांत गुंगत असें. आणि ती ओसरून गेल्यावर पुनः येरे माझ्या मागल्या ! हायस्कुलांत गेल्यावर मी नेहमीं थंड पाण्यानें स्नान करावयाला विहिरीवर जात असें. आणि जातांना माझेच नव्हे तर बाबांचे व इतरांचेहीं पांढरे कपडे धुवावयास नेत असें. जमखंडीस बहुतेक पाण्याचा तुटवडा असे. चांगल्या स्वच्छ व मुबलक पाण्याच्या विहिरी १।–१॥ मैलावर असत. तितकें लांब जाऊन स्वच्छ स्नान करून, कपडे धुवून व्यवस्थित घड्या घालून येत असें.

मीं मागें सांगितलेंच आहे कीं, घरांतली माझी मैत्रीण म्हणजे माझी धाकटी बहीण जनाक्का ही आमची जोडी जन्मभर आहे.

**अखंड सहवास** अगदीं लहानपणीं आमची गट्टी जमणें आणि फूं होण्याचे हेलकावे घड्याळाच्या लंबकापेक्षांही वारंवार होत असत म्हटलें तरी शोभेल! दर सेकंडास भांडणारीं आम्ही भावंडें झोपेंतच काय ते अलग होत असूं. माझा वडील भाऊ आमचें भांडण मिटवीत असे. पण तो वारल्यावर जणूं मिटविणारा कोणी नाहीं म्हणून कीं काय आमचें भांडणच मिटलें! खरें पाहतां माझा स्वभावच बदलला. माझ्या बहिणीवरच्या सात्विक प्रेमाचा वाढता प्रवाह संथपणानें अखंड वाहूं लागला. माझा शाळेंतला अभ्यास, माझें खासगी वाचनाचें व्यसन, माझ्या भोंवतालचा सततचा सोब-त्यांचा गराडा ह्या सर्व विक्षेपाला न जुमानतां मी माझ्या बहिणीशीं खेळत असें. मी आणि ती वृद्ध झालों आहों तरी आमच्या सहवासांत खंड नाहीं.

नवरात्र आलें कीं जनाक्काचा चिमुकला घट निराळा बसविणें, गणेश-चतुर्थी आली कीं तिचा छोटा गणपती निराळा मांडणें,

**गुळव्वा** आषाढांतला मंगळवार आला कीं तिची गुळव्वा सज-विणें असे एक ना दोन; तिचे नानाप्रकारचे खेळांची सजावट ती सासरी जाईपर्यंत मी करण्यांत मोठा आनंद मानीत असें. आमच्या ह्या बालमैत्रीचें कौतुक करून आमची आई आम्हांला उत्तेजन देत असे. गुळव्वा ही एक कर्नाटकी ब्राह्मणेतर मुलींची मंगळागौरच म्हणावयाची. देवळाच्या शिखराप्रमाणें एक चिखलमातीचें लहानसें देऊळ कुंभाराकडून दाणे घालून विकत आणीत असूं. मग त्याला गुंजा, बटगुंजा व करडीचे पांढरे दाणे मी कलाकुसरीनें चिटकवीत असें. हिची पूजा मंगळ-वारीं रात्रीं होई. एका जेकावर (चिखलाचा ६ इंचांचा एक लहानसा खांब) त्यावर एक आडवी चोय ठेवून तिला दोन्ही टोकाला चिखलाच्या पणत्यांतून दिवे लावून ते गरगर फिरवून आम्ही गुळव्वापुढें खेळत असूं.

चिखलाचा एक रेडा करावयाचा त्याच्या पाठीला एक खळगा करून त्यांत कुंकवाचें पाणी भरावयाचें आणि चिखलाच्याच सुरीनें तो रेडा गुळ्ळवापुढें कांपावयाचा, ह्या सर्वांत माझा हातखंडा. दुसरे दिवशीं बुधवारीं गुळ्ळवाचे विसर्जन करावयाला आम्ही डोंगरांत जनाक्काच्या मैत्रिणी घेऊन सबंध दिवसभर खेळून येत असूं. तेव्हां शिदोऱ्या, लाह्या, खोबरें ह्यांची लयलूट! हे एक बाळ वनभोजनच. खरें पाहातां हा खेळ मुलींचाच. मी गेलों म्हणजे मुली "शेळ्यांत लांडगा आणि बायकांत हांडगा" असें म्हणून माझी टिंगल करीत, तरी पण जनाक्कासाठीं तें सर्व सोसून तिच्या खेळाचें सुख मी भोगी. खेळच नव्हे तर मी माझ्या वाचनांतल्या गोष्टी व सहलींतील अनुभवही जनाक्काला वेळोवेळीं सांगून तिला मी माझ्या ज्ञानाच्या व माहितीच्या पातळीवर (Level) ठेवण्याचा सतत प्रयत्न करी. जनाक्काचा प्रतियोगी सहकार असावयाचाच !

लहर आली म्हणजे मी आईच्या घरकामालाही हातभार लावीत असें.

घरकामाची लहर

विशेषतः सणावारीं स्वयंपाकघरांत कांहीं गोडधड होऊं लागलें कीं, मग माझ्या मातृभक्तीला पूरच यावयाचा ! नागपंचमीचे लाह्यापीठाचे लाडू, गणेशचतुर्थीचे मोदक, नवरात्रीच्या कडाकण्या; दिवाळीच्या करंज्या-कडबोळीं, मोहरमांतला मलीदा-चोंगे वगैरे खाण्याचे पदार्थ करण्याला माझीं पुस्तकें टाकून तिच्या पुढेंपुढें इतका सुळसुळत असें कीं, जणूं तिची मी एक सूनच! आईनें पुरण घातलें कीं कणीक मऊ करण्याला मी काच्या मारून दुःशासन वधासाठीं भीम जसा काय सज्ज होई ! अशा वेळीं रामायण-भारतांतल्या वामनाचे श्लोक, मोरोपंतांच्या आर्या आईपुढें म्हणून दाखविण्याचा तोंडाचा पट्टा एकदां कां सुरू झाला, कीं कणीक मऊ झाली तरी हें साग्रसंगीत दुःशासन वध चालूच राही. मग आई तिकडे न कां ऐकेना. " अरे विठ्या, लांकडांचें असतें तर तें तोंड केव्हांच झिजलें असतें की रे !" असें आई कानडींत म्हणे. जनाक्का मात्र मोठी कामचुकार असे. खायाला मी आणि कामाला माझा मोठा भाऊ, हा तिचा बाणा असे.

## कांहीं संवयी आणि वागणूक

डोंगरांतून जळाऊ लाकडांचा भारा आणून आईला मदत करण्याचें एकदां अस्मादिकांनीं मनांत आणिलें. लागलीच एक कुऱ्हाड

**अव्यवहारिपणा**

व एक मोठी दोरी घेऊन निघालों. पण शेवटीं "जेनु काम तेनो थाय, बिजा करेसो गोते खाय" असाच शेवटीं प्रकार घडला. जाळण्याला अगदीं निरुपयोगी अशा कांटेरी झुडुपांचा भारा तयार केला, पण तो कांहीं केल्या घरापर्यंत आणतां येईना. रात्र पडावयाला झाली तरी घरीं हा गडी येईना म्हणून आई अर्ध्या वाटेवर मला हुडकायला आलेली भेटली. भारा अर्ध्या वाटेवरच टाकून कसें यावें लागलें ही रडकथा आईस सांगण्याची पाळी आली. कसलीं लांकडें गोळा केलीं हें आईनें विचारतां त्या झुडुपाचा मासला दाखविला. तेव्हां तिनें कपाळाला हात मारून म्हटलें, " हायस्कुलांत पहिला नंबर मिळाला तरी जळाऊ लाकूड कोणतें व त्यांचा भारा घरापर्यंत कसा आणावा हें व्यवहारज्ञान तुला नाहींरे पोरा! लाकडे नाहींत तीं नाहींत पण दोरी मात्र डोंगरांत टाकून हात हालवीत आलास, काय तुझी तारीफ!" ही गोष्ट मी मोठा झाल्यावर आई मला सांगून कितीदां तरी हिणवीत असे. मी किती जरी पंडित झालों तरी प्रपंच चालविण्याचें शहाणपण माझ्यांत येईल कीं नाहीं ह्याविषयीं साशंकच असे. माझ्या भावी आयुष्यांत ही माझ्या आईची शंकाच खरी ठरली!

बाजारांत जाऊन एकादा जिन्नस खरेदी करून आणणें मला आवडत नसे. तें व्यवहारज्ञानच माझेमध्यें शेवटपर्यंत आलें नाहीं. ह्यासंबंधीं एक मजेची गोष्ट मला आठवते ती अशी.

शाळेंत माझा अभ्यास उत्तम असे. विशेषतः गणितांत मी हुषार होतों. रामजीबावांचा विठू म्हणजे इंग्रजी शाळेंतला एक

**बाजारांतील शोभा**

मोठा वाखाणण्यासारखा मुलगा अशी गांवांत प्रसिद्धि झालेली होती. पण माझें शिक्षण सर्व नव्या

तऱ्हेनें झालेलें असल्यानें जुन्या गांवठी शाळेंतल्याप्रमाणें मोडी अक्षर वळणदार काढणें, हस्तलिखित मोडी पत्रें वाचणें, तोंडचे हिशेब करणें हें उपयुक्त आणि व्यावहारिक शिक्षण मला मिळालेंच नव्हतें. त्यांत माझा लाजाळू स्वभाव! त्यामुळें मी बाजारांत जाणें नेहमीं टाळीत असें. मोहदीनसाहेब नांवाच्या वाण्याचे दुकानांत आमच्या घरचें उधारी खातें होतें. त्या दुकानांत जाऊनही जिन्नस आणावयाचे मी टाळीत असें. पण एकदां कांहीं सामान आणणें मला भागच पडलें, म्हणून मी गेलों. शाळेंतला मोठा नांवाजलेला मुलगा कधीं दुकानांत न येणारा आलेला पाहून, मोहदीन साहेबांनीं तोंडचे हिशेब मला कसें काय येतात तें पाहाण्याची कसोटी चालवली. मी जें चुकवीत होतों तेंच पुढें आलें. मला कांहीं त्यांच्या साध्या प्रश्नांस उत्तरें देतां येईनात. मग काय? त्यांना माझीच नव्हे तर नवीन इंग्रजी शिक्षणाचीही टर उडविण्याची अमोलिक संधि आयतीच मिळाली. त्याच्या दुकानांत नेहमीं बसणारा उठणारा त्यांचा एक उडाणटप्पू मित्रही जवळच बसला होता. मला कांहींच सांगतां येईना तेव्हां अंगाला दरदरून घाम आला! खालीं घातलेली मान वर करवेना कीं उठून जाववेनाही! जवळ बसलेल्या त्या टोळभैरवाचें नांव रामय्या असें होतें. माझी अशी भिरकंडी उडालेली पाहून रामय्यानें दांटगट कानडी भाषेंत म्हटलें, "वजन करणाऱ्या शेराचा दगड घाल त्याच्या कपाळांत; म्हणजे तरी कांहीं उत्तर सुचेल. काय म्हणे हा शाळेंत पहिला नंबर आहे! आणि येवढा साधा हिशेब विचारला तर बोबडी वळली, द्या ढकलून त्याला खालीं, बघतां काय!" मोहदीनचें दुकान म्हणजे आमच्या शाळेसमोरील मारुतीचे देवळाला लागून भर चौकांत असलेलें. ही शोभा झाल्यावर कित्येक महिने त्या दुकानासमोर फिरकण्याचें देखील मला धैर्य होईना!

---

# भाग चौथाः 'धर्म भावनेचा विकास'

## प्रकरण १६ वें

### माझ्या एकांत सहली

जमखंडी हा गांव तिन्ही बाजूंनीं वेष्टिलेल्या डोंगराच्या बगलेंत आहे. विशेषतः दक्षिणेस मुधोळ संस्थानच्या वाटेवर तर एक सुंदर लांब एकांतांतील सहली दरी आहे. तिच्यांत कट्टेगिरी नांवाचा दुसरा एक विस्तीर्ण तलाव आहे. पावसाळ्यांत हा भरून वाहूं लागला म्हणजे त्या सर्व प्रदेशास सुंदर वन्य शोभा येत असे. मी जरी नेहमीं माझ्या संवगड्यांच्या घेऱ्यांत अडकलेला दिसें तरी पुष्कळ वेळां त्यांना टाकून एकटाच एकाद्या दरींतून, डोंगराच्या माथ्यावरून, पूर्व व उत्तरेच्या बाजूनें पिकलेल्या शेतांतून किंवा जमखंडींतील मोतीबागेंतून हिंडणें मला फार आवडत असे. जमखंडीचे उत्तरेस ४–४॥ मैलांवर भव्य कृष्णेचें पात्र आहे. तें किंचित् माझ्या नित्याच्या आटोक्याच्या बाहेरचें असे. पण तेथेंही केव्हां केव्हां मी माझी गोपाळ मंडळी घेऊन जात असे. माझ्या हृदयाचा परिपोष माझ्या एकांतांतील सहलीमुळेंच विशेष झाला. निर्जन डोंगरांतून व दरींतून हिंडत असतां मी वाचलेल्या कादंबरींतला नायक मीच बनत असें. मात्र मला नायिका नसल्यामुळें माझा विप्रलंभ श्रृंगार लंगडालुळा पडत असे. जमखंडींत वसंतऋतूंत कांहीं आंब्रय़ांना अमोघ मोहोर येऊन झाडावरच्या कोकिळा मदोन्मत्त होत ! उन्हाळीं तेथें कडक भासे. सायंकाळच्या क्लांत समयीं मीं मोतीबागेंतल्या कारंज्याजवळच्या बकुलीच्या

झाडाखालीं बकुळीच्या मधुर सुगंधाच्या फुलांच्या माळा विणीत बसलों असतां,

" कारंजाचे तुषार वाटती अग्नी कणाचे परी,
पुष्पांचा तो सुगंध माझ्या शूळ निपजवी शिरीं,
कोकिळ कुंजित ऐकुनि वाटे वीज कडाडे वरी "

वगैरे संगीत सौभद्र नाटकांतून ऐकलेल्या पीडा मलाच होऊं लागत! पण सुभद्रेचा मागमूस कोठेंच नसे! सुभद्रा खोटी असली तरी

**पहिला ठसा**

सृष्टिदेवीचे हावभाव नजरेपुढें खरेच असत. मोठा झाल्यावर कालिदास, बाणभट्ट आणि त्याहीपुढें वर्डस्वर्थ आणि स्कॉटस् ह्या कवींनीं व कादंबरीकारांनीं जें दिव्यामृत पाजिलें, त्याचेंच बाळकडू मला ह्या ओबडधोबड कादंबऱ्यांनीं व नाटकांनीं पोरवयांतच पाजिलें होतें. मग त्यांचा मी आभारी कां असूं नये? पण सर्वांच्याही पूर्वीं मला हृदयदान दिलें तें माझ्या पवित्र आईनेंच! तिच्याच पुण्यप्रभावानें मला सर्व जडरसांतून तारण मिळून माझ्या हृदयाचा परिपाक प्रथम धर्माच्या भक्तिरसांत व नंतर तत्वज्ञानाच्या शांतरसांत झाला. माझ्या वेळेच्या मराठी पांचव्या क्रमिक पुस्तकांत 'सहल करून येणें' हा एक धडा होता. तो मला फार आवडत असे. त्या आवडीचा साक्षात्कार माझ्या स्वतःच्या सहलींत मला घडत. पण ह्या सर्वांची पूर्व तयारी माझ्या आईच्या रानावनाच्या गोड गोष्टींत आणि बाबांच्या प्रेमळ सहवासांतच झाली. पुढें कादंबऱ्यांनीं आणि पौराणिक पोथ्यांनीं जी काय भर टाकली असेल ती केवळ शब्दसंपत्तीची आणि जड रसांचीच होय. दैवी कोमल भावनांचा पहिला ठसा माझ्या आईचाच!

वर्षांतून निदान एकदां तरी — विशेषतः पावसाळ्याच्या अखेरीस बाबा आम्हां सर्वांना घेऊन कोठेंतरी वनभोजनाला जात असत.

**वनभोजन**

जमखंडी गांवाला ( आमचे वाड्याला ) लागून पश्चिमेला एक डोंगर आहे. हा जवळ जवळ ७००।८०० फूट

तरी उंच असावा. ह्याच्या अत्यंत उंच शिखरावर एक लहानसें शिवालय आहे. त्याचें कानडींत नांव मेलगिरी लिंगाप्पा ( उंच गिरीवरचा लिंग ) असे. येथून जमखंडी गांवचाच नव्हे तर आसमंतांतील निदान २०।२५ मैलांचा देखावा पावसाळ्यांत सुंदर दिसतो. देऊळ उंच चबुतऱ्यावर बांधलेलें आहे. त्याचे मागें एका खडकांतील गुहेंतून निर्मळ पाण्याचा झरा पावसाळ्यांत वाहतो. येरवीं रुक्ष असलेला हा उंच डोंगर पावसाळ्यांत हिरवागार दिसतो. हें उंच आणि एकांत ठिकाण बाबांना पसंत असे. आमच्या घरच्या सर्व मंडळींनाच नव्हे तर एका दोघा आपल्या जिवलग मित्रांनाही बरोबर घेतल्याशिवाय त्यांना वनभोजन यथासांग झालेसें वाटत नसे. अर्थात ह्या कल्पनेंत आईची त्यांना पूर्ण सहानुभूति व साह्य असे. बहुतेक सगळा दिवस आमचा मोठ्या आनंदाचा जाई. ही रसिकता बाबांमध्यें कोठून आली ह्याचें मला आतां आश्चर्य वाटतें. ह्यामुळें मजमध्यें सृष्टीशोभेची रुचि व अवलोकनशक्तीचीं बीजें रुतलीं. आणि माझ्या ग्रहणशील मनावर चांगला परिणाम झाला.

---

# प्रकरण १७ वें

## माझें वाचन

**खाजगी वाचन**

आधुनिक विद्यार्थ्यांच्या मनाची वाढ शाळेबाहेरच्या वाचनावर अवलंबून आहे. आधुनिक शिक्षणाला विद्यार्थ्यांच्या खासगी वाचनाची जोड मिळाल्याशिवाय तें सर्व निरुपयोगी किंबहुना त्याहून वाईट ठरतें, हें आतां सर्वमान्य तत्त्व झालें आहे. पण माझ्या हायस्कुलच्या काळांत हें तत्त्व आमच्या शिक्षकाला नुसतें

माहीतही नव्हतें, मग मान्यता बाजूसच राहिली. आमची शाळा बहुतेक खेडवळ मग तेथें पुस्तकालय कोठून असणार ? त्यावेळीं मराठींतील वाङ्मयच मुळीं ज़र संपुष्टात होतें तर माझ्या वाचनाचा मुद्दा कसा निवणार ? तरी मी इंग्रजी तिसऱ्या चौथ्या यत्तेंत जाईपर्यंत बऱ्याच मराठींतल्या त्यावेळच्या अद्‌भुत कथानकाच्या व उघड शृंगाराच्या कादंबऱ्या वाचल्या होत्या. माझ्याइतक्या कादंबऱ्या त्या वेळच्या माझ्या सोबत्यांपैकीं कोणींच वाचल्या नव्हत्या; ह्या गोष्टींचा मला तेव्हां मोठा क्षम्य अभिमान वाटत होता, हें मला आतां नीट आठवतें. ह्याचें एक कारण असें कीं मला अगदीं लहानपणीं तोंडी गोष्टी ऐकण्याचा फार नाद असे. हा नाद माझ्या आईनेंच मला अगदीं बाळपणीं अद्‌भुत व करुण रसाच्या गोड गोड गोष्टी सांगून लावून ठेविला होता. पुढें घरीं कोणी आल्या गेल्याजवळ गोष्टी सांगण्याचा मी तगादा लावीत असें. ह्या बाहेरच्या लोकांनीं मला ज्या गोष्टी सांगितल्या त्या मात्र सर्वच लहान मुलांनीं ऐकण्यासारख्या नव्हत्या. कांहींत बीभत्सपणा उघड असे. त्यावेळचें गांवढळ जगच तसें होतें.

**कादंबरी वाचन** पुढें मराठी ४।५ यत्तेंत असतांना गुलबकावली, वेताळ पंचविशी, बत्तीस पुतळी, शुक बहात्तरी वगैरे पुस्तकें माझ्या हातांत येऊं लागलीं. इंग्रजी शाळेंतील खालच्या वर्गांत असतांना, विचित्रपुरी, मंजुघोषा, मदनमंजरी, वसंतकोकिला, शृंगारसुंदरी, हीं आणि अशीं कित्येक पुस्तकें मी अधाशाप्रमाणें केव्हांच वाचून टाकीत असें. हीं पुस्तकें मला कोठून मिळत ह्याचेंच मला आतां आश्चर्य वाटतें. 'इच्छा तेथें वाट सांपडते' हीं इंग्रजी म्हण माझ्या अनुभवास, तेव्हां ह्या कादंबरी वाचनाच्या बाबतींत फार येत असे. पुढें पुढें ६।७ व्या यत्तेंत गेल्यावर अरेबियन नाइटस्‌चें भाषांतर, नारायणराव गोदावरी, वेषधारी पंजाबी अशा प्रकारचीं पुस्तकें मिळूं लागलीं. हरी नारायण आपटे ह्यांचीं पुस्तकें व 'करमणूक' हें पत्र मी पुण्यांत कॉलेजांत जाईपर्यंत मिळणें शक्यच

नव्हतें. किंबहुना तीं त्या वेळीं अस्तित्वांतच नव्हतीं. कॉलेजांत गेल्यावर मजमध्यें दुसरेंच युगांतर झालें. पण मराठी शाळेंतील बीभत्स गोष्टी आणि इंग्रजी शाळेंतल्या उघड शृंगाराच्या घवघवीत वर्णनाच्या कादंबऱ्यांमुळें माझ्या कोमल आणि जन्मतः भावनाशील मनावर कांहीं अंशीं अनिष्ट परिणाम झाला, हें मला पुढें कळून आलें. १४।१५ व्या वर्षांच्या आंतच माझ्यांत अकालीन शृंगाररसाचा प्रादुर्भाव झाला असावा, असें मला वाटतें.

**वाचनाचें वेड**

करुण, शृंगार, वीर, रौद्र इत्यादि रसही समजूं लागून माझ्या बुद्धीप्रमाणेंच हृदयाचाही परिपोष होऊं लागला ह्यांत कांहीं वावगें झालें नाहीं. तरी पण त्या काळच्या वाङ्मयांतील तुटपुंजेपणामुळें मी अकालीं शृंगारमय होणें साहजिक होतें तरी इष्ट नव्हतें. शिमग्यांतील हुल्ल्ट मुलांच्या नादीं लागून चांदण्या रात्रीं वेश्यांचीं दारें ठोठावून बीभत्स गाणीं म्हणण्यांत जरी मला तादृक अपाय झाला नसला; तरी पुढें प्रतिष्ठितपणें वसंत कोकिला आणि मदनमंजरी असल्या तीनतीनशें पानांच्या संस्कृत पूर्ण मराठी भाषेंतल्या एकरंगी कादंबऱ्या वाचून मला अपाय झाला. ह्याच सुमारास जमखंडीस नवीन अलल डुरर नाटकेंही येऊं लागलीं होतीं. पुढें वरच्या यत्तेंत गेल्यावर वाईकर संगीत मंडळीची रत्नावलि आणि अण्णा किर्लोस्कराचें शाकुंतल व सौभद्र हीं नाटकें पाहावयास मिळूं लागलीं. तरी माझ्या दारिद्र्यामुळें नाटकें पाहाण्यावर जो आळा बसला, तो कादंबऱ्या वाचण्यावर बसेना. कारण नाटकाला तिकीट काढावें लागे. पण कादंबऱ्या फाटक्या कां असेनात फुकट वाचावयास मिळत. गुळास मुंगी चिकटते त्याप्रमाणें कोठून तरी शोधून आणिलेल्या कादंबरीस मी चिकटलेला दिसे. तरी शाळेंत सगळ्या सातही यत्तेंतून माझा नंबर पहिल्याचा दुसरा कधीं झाला नाहीं. म्हणून माझें कादंबऱ्यांचें वेड तेव्हां कोणाच्या डोळ्यांवर आलें नाहीं. शिवाय हेंही लक्षांत घेतलें पाहिजे कीं माझें खाजगी वाचन केवळ फोलकट कादंबऱ्यांतच न संपतां श्रीधर, मुक्तेश्वर,

महिपती सारख्या मराठी कवींच्या पौराणिक पोथ्याही मी वाचीत असें.

**पोथीवाचन**

माझे बाबांनीं शाळेंतील अभ्यासाविषयीं जरी माझी म्हणण्याइतकी विचारपूस केली नाहीं, तरी त्यांच्या त्या वेळच्या मताप्रमाणें जे धार्मिक लहान मोठे ग्रंथ त्यांना आढळले त्याचे पाठांतर मजकडून बाबा लक्षपूर्वक करून घेत असत, हें मला आतां आठवून त्यांचे मला फार आभार वाटतात. त्यामुळें पुढें हायस्कुलांत गेल्यावर माझ्यामध्यें आपोआप एक भक्तीचा उद्रेक झाला. पण हायस्कुलांत जाण्यापूर्वी किंवा गेल्यावर आरंभींच्या वर्षी बाबा माझेकडून रोज आंघोळ केल्यावर जेवणापूर्वी देवीदास कवीकृत ‘ व्यंकटेश स्तोत्र ’ वाचवून घेत असत. हा लहानसा १०८ ओव्यांचा ग्रंथ अतिशय सुंदर आणि रसाळ आहे. मी नित्य तो आवडीनें वाचीत असें. त्यांतल्या कांहीं ओव्या माझ्या अगदीं मुखोद्गत झाल्या होत्या. दर शनिवारीं विशेषतः श्रावणमासीं संध्याकाळीं दिवा लावल्यावर बाबा स्वतः तुळशीकट्यावर बसत आणि माझेकडून शनिमाहात्म्य वाचून घेत. कदाचित् साडेसातीचा फेरा आला म्हणून शनिग्रहाच्या शांतीसाठीं त्यांनीं हें पठणश्रवण सुरू केलें असावें. बाबांना ज्योतिषाचा नाद होता आणि विश्वास होता. दर शुक्रवारीं कसली तरी पोथी वाचवून नंतर फुटाण्याचा प्रसाद वाटण्यांत येत असे. आपल्या वडिलांच्या श्राद्धाचे दिवशीं आणि विशेषतः अक्षततृतीयेच्या दिवशीं बाबा मजकडून गयासूर आख्यान नांवाची एक पोथी वाचवून घेत असत.

**धार्मिक ग्रंथ**

बाबांच्या संग्रहीं जसें शिळा प्रेसवर छापलेल्या हरीविजय, रामविजय, पांडवप्रताप, करवीर महात्म्य, गुरुचरित्र वगैरे पोथ्या असत; त्याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरीची एक हस्तलिखित मोठी पोथी आणि तुकारामाची रूपावलि, मनचर्येचे अभंग, गौळणी वगैरे हस्तलिखित गाथांचा पुष्कळ संग्रह असे. तसेंच दत्त

सांप्रदायाचीं अष्टकें, देवींच्या आरत्या, अनुभविक साधूंचीं पदें, भजनी भारुड वगैरे कानडी किंवा मराठी पदांचा त्यांना जसजसा शोध लागे तसा ते सर्व आमचेकडून लिहून ठेवीत असत. ह्यामुळें माझ्या धर्मबुद्धीच्या विकासालाच नव्हे तर मराठी व कानडी भाषेच्या अभ्यासाला मोठी मदत झाली !

---

## प्रकरण १८ वें

## पोरवयांतील माझी धर्मभावना

**प्रस्ताव**

हायस्कूलचा काळ इ. स. १८९१ अखेर माझ्या वयाचीं आठरा वर्षे म्हणजे माझें पोरवयच म्हणावयाला हरकत नाहीं. तेथपर्यंत माझा अभ्यास, खेळ, खोड्या, सोबत्यांचा सहवास व माझा एकांत वास वगैरे गोष्टी उघडपणें मीं सांगितल्या. आतां जी धर्मभावनांची आठवण सांगणार आहें तो विषय गंभीर आहे इतकेंच नव्हे तर तो माझ्या चरित्रांतला आत्मा आहे. धर्मानें माझ्या आयुष्याचा प्रवाह-निदान त्याची दिशा तरी-पुढें पार बदलली. अशा महत्वाच्या विषयासंबंधीं लिहिण्यापूर्वीं धर्माविषयीं माझी दृष्टि कशी आहे तें सांगणें जरूर आहे. मी केवळ आठवणी व मागील अनुभव लिहीत असतां मध्येंच माझी आतांची दृष्टि किंवा विचार देणें अगंतुक विषयांतर आहे, हें मला कबूल आहे. पण माझी दृष्टि समजल्याशिवाय मी धर्माविषयीं जें लिहीन तें वाचकांस न समजतां कदाचित् गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून हें किंचित् विषयांतर क्षम्य आहे असें मला वाटतें.

इतर गोष्टी वेगळ्या आणि धर्म ही बाब वेगळी अशी पुष्कळ सूज्ञांचीही समज असते. पण इतर गोष्टीप्रमाणेंच मनुष्यमात्रांत धर्माची जी उपजत

बुद्धि आढळते तीही परिणति व विकासाचाच विषय आहे असें मला वाटतें. म्हणजे तीही नैसर्गिक नियमांना अनुसरूनच उपजते, वाढते आणि कदाचित् लयही पावते. खाणें, पिणें, वाचन, अभ्यास, मैत्री, वैर, खेळ, खोड्या, संपत्ति, विपत्ति वगैरे गोष्टी केवळ निसर्गाच्या नियमांप्रमाणें घडतात. त्यांना कांहीं ईश्वरी प्रसादाची किंवा प्रेरणेची गरज नाहीं. मात्र धर्माच्या जागृतीला आणि वाढीलाच काय ती ईश्वरी कृत्याची जरूरी आहे, असें मला वाटत नाहीं. अशी जरूरी माझ्या धर्मबुद्धीला असेल तर ती माझ्या पाळण्यांतल्या खेळांला आणि पोरकट खोड्यांना कां नसावी ? मीं जें बरें केलें असेन, तेवढीच नेमकी ईश्वरी कृपा आणि वाईट किंबहुना बरेंही नव्हेत आणि वाईट नव्हेत अशा सर्व एरवी मामुली गोष्टींला मात्र मीच जबाबदार, असें माझें मत नाहीं. तर असें भोळसर मत सर्वज्ञ परमेश्वराचें कोठून असणार ?

आपल्या चारित्र्याबद्दल व्यक्तीच सर्वस्वी जबाबदार असेंही माझें म्हणणें नाहीं. जशी व्यक्ति जबाबदार आहे तसाच त्या व्यक्तीचा अनुवंश (पूर्वपरंपरा) आणि परिस्थिति (ह्यांतच त्या व्यक्तीचें शिक्षण, नातलग, स्नेही, वैरी वगैरे सर्वच नैसर्गिक बाबींचा समावेश होतो) ह्याही गोष्टी जबाबदार आहेत. एकूण मनुष्याच्या चारित्र्याबद्दल व्यक्ति आणि निसर्ग हीं दोनच कारणें पुरीं असून, ईश्वराला त्यामध्यें खेंचणें अनावश्यक दिसतें.

असो. ह्यापेक्षां जास्ती खोल विचारांत शिरण्याचें हें स्थळ नव्हे. दांडगाई, मारामारी आणि माझ्या दुष्ट खोड्यांच्या आठवणी ज्या लेखणीनें आणि ज्या ओघांत लिहिल्या त्याच लेखणीनें आणि ओघांत मी माझ्या धर्माचाही विषय लिहितों हें पाहून कोणा वाचकाचें कोंवळें मन प्रथमच बिचकूं नये; आणि पुढेंही ज्या सहज आणि मोकळ्या मनानें माझीं व्यंगें सांगितलीं तशाच मोकळेपणानें माझ्या धार्मिक भावनांचा अहवाल मी सांगत आहें हें वाचून कोणाच्या कोंवळ्या विचारांना धक्का लागूं नये म्हणून मध्येंच ही थोडी प्रस्तावना केली आहे.

# पोरवयांतील माझी धर्मभावना

शिमग्यांतल्या माझ्या ९।१० वर्षांच्या वयांतल्या अश्लील लीला वाचून

**स्पष्टोक्ति**

किंबहुना १४।१५ वर्षांच्या वयांत जुन्या शृंगारिक कादंबऱ्या वाचून हुरळलेल्या माझ्या मनाला, "कारंज्याचे तुषार वाटती अग्निकणाचे परी" हा भपकेदार अनुभव आला; अशी माझी स्वतःचीच जबानी वाचून कोणी सूज्ञ वाचक, मी त्यावेळीं मोठा बदफैली होतों असें अनुमान काढणार नाहीं. त्याचप्रमाणें पुढें ज्या मी माझ्या पोर धर्माच्या कहाण्या सांगणार आहें त्या वाचून मी जन्मसिद्ध संत–शिरोमणी होतों, असेंही कोणी अनुमान काढण्याचें कारण नाहीं हें उघडच आहे! कच्च्या दिलाच्या, अर्धवट विचाराच्या व पक्षपाति वाचकांसाठीं माझ्या आठवणी मुळींच नाहींत हें सर्वांनीं ध्यानांत ठेवावे.

धर्म हा विषय बुद्धीपेक्षां भावनेचा अधिक असल्यानें, आणि तो विकासशीलही असल्यानें मी ह्या बाबतींतील माझ्या आठ-

**बागुलबोवा**

वणींना अगदीं माझ्या पाळण्यापासून सुरवात करितों. मी—तान्हें बालक असतांना-ज्या पाळण्यांत उताणा निजत असें तो पाळणा आमच्या घरच्या सोप्यांत टांगलेला असे. साधारणपणें पाळण्यावर कांहीं खेळणीं अगर भपकेदार, रंगीबेरंगी, बेगडी झिळमिळ्या बांधण्याचा मातांना शोक असतो. माझ्या पाळण्यावर तसलें कांहीं बांधलेलें आठवत नाहीं. निदान आठवण राहील अशा वयांत तरी कांहीं नव्हतें. पण माझें लक्ष पडल्यापडल्या वरच्या छताकडे जाई. नेमकें पाळण्याच्या वरती असलेल्या एका वेळूला एक चमत्कारिक गांठ होती. तिच्याकडे मी नेहमी निरखून पाही. ती मला एका दाढीवाल्या बोवाच्या मुखवट्याप्रमाणें भासे. मी माझ्या आईचें अंगाईचें गाणें ऐकूनही लवकर निजलों नाहीं आणि कामाखालीं बेजार झालेल्या आईला तर मला निजवावयाची घाई झाली म्हणजे शेवटीं आईनें मला बागुलबोवाची भीति घालावी. इकडे आईनें केलेला बागुलबोवाचा उल्लेख आणि वरती ह्या वेळूच्या गाठींत दिसणाऱ्या बुवाची माझी

दृष्टादृष्ट एक झाली म्हणजे माझा लय त्याच्याकडे विशेषच लागे आणि माझें रडणें थांबे. कारण ही वेळूची गांठ म्हणजेच बागुलबोवा अशी भीति आणि आश्चर्य ह्या भावनांनीं मिसळलेली माझी कोंवळी समजूत होऊन माझा वर लय लागे ! मी निजलों असें समजून आई कामाला जाई. पण मी इकडे जागाच असें. ह्या वेळीं मी फार तर २।–२॥ वर्षांचा असेन. ही माझ्या आयुष्यांतील अगदींच पहिली आठवण !

**पहिली धर्मभावना**

पुढें वर्ष सहा महिन्यांनीं मी किंचित् बोबडें बोलूं लागल्यावर त्या वेळूच्या गाठीकडे बोट दाखवून तो पाहा बागूलबुवा तोच काय ? असे मीं आईला विचारीही व ती हासून होय म्हणे ! पण हें बागुलबोवाचेंच नव्हे तर माझ्या पहिल्या देवाचें दर्शन होय, हें मला आतां कळतें. तेव्हां मलाच माझें मन कळत नव्हतें तर तें माझ्या साध्या भोळ्या आईला कोठून कळणार? माझाच नव्हे तर अखिल मानव जातीचाही पहिला देव बागुलबुवाच असतो, हें मला पुढें ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांतील मँचेस्टर कॉलेजांत तुलनात्मक धर्माच्या अभ्यासानें कळलें. व्यक्तींत असो किंवा मानव जातींत असो धर्मविकासाच्या पायऱ्या जवळजवळ त्याच आहेत, ह्या सिद्धान्ताला माझी ही बाळआठवण किती पोषक आहे ! Fear of God is the beginning of all knowledge ह्या बायबलांतल्या जुन्या करारांतील म्हणीलाही माझी आठवणच जोराची साक्ष देते. मात्र ह्या नव्या बागुलबुवाचा प्रथम परिचय घडतांना मनामध्यें केवळ भीतिच वाटत नसून, भीति थोडी पण आश्चर्य जास्त अशी कांहींशीं मिश्र भावना नवीनच उत्पन्न होत होती. कांहीं असो तीच माझी पहिली धर्मभावना होय !

**धर्माची गोडी**

ह्या पुढील चार वर्षांत म्हणजे मी सात वर्षांचा होईपर्यंत आमचे घरांतल्या कुळाचारांत आणि विधि संस्कारांत देवापेक्षां देवी उपासनेचें प्राबल्य अधिक असे. माझे आजोबा बसवंतराव विशेष धार्मिक नव्हते. संताबाई ही माझी

आजीच धर्मकृत्यांत पुढाकार घेत असे. आमचे घरीं नवरात्राचा सण आणि सोहळा सर्वांत मोठा होत असे. नवरात्रांत माझी आजी नऊ दिवस उपास करीत असे. केवळ फळावर, तेही थोडीं केळीं खाऊन ती असे. तिचें मुख्य दैवत श्री यल्लामादेवी हिचें वर्णन मागें आलें आहेच. तुळजापूरची अंबाबाई माझ्या आजोबांची व यल्लामा ही माझ्या आजीची. वस्तुतः पाहिलीपेक्षां दुसरी मला अधिक पसंत असण्याचें कांहीं कारण नाहीं. असलेंच तर आजीचा पुढाकार येवढेंच. जितका गाजा-वाजा अधिक किंवा जितकें गोड खावयाला ज्याच्या पुजेंत अधिक मिळेल तितकें तें दैवत लहान मुलाला अधिक प्रिय हा नियम निसर्गसिद्धच आहे. वैदिक दैवतांत इंद्र अधिक प्रिय आणि प्रबल कां तर तो दारू अधिक पीत असे म्हणून. ती इंद्रालाही प्रिय अशी समजूत रूढ झाली असावी. ह्या न्यायानें मला ही यल्लाम्मा ५।६ वर्षांपासून प्रिय झाली. मनावरचा हा संस्कार मी पुढें इंग्रजी पांचव्या यत्तेंत असतांनाही कसा मला जाणवला हे मीं मागें सांगितलें आहे.

आमच्या देव्हाऱ्यावर आणि नवरात्राच्या पूजेंत तुळजापूरच्या अंबाबाइच चित्र आणि आरत्या अधिक येते. ताईबाईचें प्रस्थ ह्याचें कारण श्रीयल्लमा ही कानडी देवता आणि तिची उपासना अधिक ग्राम्यपणाची. आमचे घरचे पुरोहित तम्मण भटजी डेंगरे ह्यांना अंबाबाईच्याच मराठी व कानडी आरत्या येत असत. पण सौंदत्तीपेक्षां तुळजापूर अधिक लांब. आणि जमखंडीस अंबाबाईचे देवळापेक्षां श्रीयल्लामाचेंच देऊळ अधिक प्रसिद्ध शिवाय आणि माझ्या आजीचा करारीपणा जास्त. म्हणून ती जिवंत असे तोंपर्यंत माझ्या बाबांनीं पुढें सुरू केलेल्या ब्राह्मणी संस्कृतीला विशेष बळ आलें नाहीं. इतकेंच नव्हे तर देव्हाऱ्यावरच्या श्रीयल्लामापेक्षांही बाहेर गोठ्यांतील कोनाड्यांत बसलेली ताईबाई हिचें प्रस्थ वर्षांतून एक दिवस इतकें माजे कीं

आम्ही सर्वजण त्या दिवशीं अगदीं हैराण होऊन जात असूं. आम्ही सर्वजण शाकाहारी असूनही केवळ नवसासाठीं म्हणून ह्या ग्राम्य ताईबाईची, एक गाभण मेंढी कापून आजीला कंदुरी करावी लागत असे. आमचे आजोबा जरी मोठे भाविक नव्हते तरी तेच एकटा मांसाहारी असल्यामुळें ताईबाईची ही पूजा त्यांच्या पथ्यावर पडे. आजाआजींनें सर्व ठीक झालें, तरी मला हें काय गौडबंगाल चाले तें कळत नसे! तें कसेंहि असो, यल्लामामुळें माझ्या मनावर अनुकूल परिणाम होत तर ताईबाईकडे पाहून प्रतिकूल ठसे उमटत!

मी लहानपणीं इतका खोडकर होतों तरी फार कनवाळू होतों. ह्या ताईबाईला बळी देण्यास आणिलेल्या गाभण मेंढीची मला

**सूडाची कल्पना** मोठी कींव येत असे. पण माझा इलाज तो काय

चालणार? माझ्या देखत त्या बिचाऱ्या जिवाचा घात झालेला पाहून मला ह्या ताईबाईचा मोठा राग येत असे. तरी दुसरे दिवशीं इतर देवाबरोबर तिचीही पूजा मला मुकाट्यानें करावी लागत असे. ह्या ताईबाईचें उणें पुरें करण्याचा मार्ग जरी नव्हता तरी तिचा सूड उगविण्याची मला दुसरी एक चमत्कारिक संधि मिळत असे ती अशी. आमच्या वाड्याच्या महाद्वाराच्या बाहेर दाराशीं लागून दोन्ही बाजूंस दोन तिकोनी दगड ठेविले असत. त्यांना चुना लावलेला असे. प्रसंगविशेषीं त्यांना हळद, कुंकूंही लागत असे. ह्या दोन द्वारपालक देवताच असत म्हणावयाच्या. दिसण्यांत आकृतीनें हे दगड ताईबाईप्रमाणें आणि तेवढेच असत. मला वाटे हे ताईबाईचे कोणीतरी नातलग आहेत. त्या दुष्ट ताईबाईवरचा माझा राग मी केव्हां केव्हां त्या बिचाऱ्या बाहेर ठेवलेल्या दगडांवर मनमुराद काढून घेत असे. त्यांना एकमेकांवर चांगलें ठेचून काढीत असें. त्यांना उलटे ठेवी, पालथे पाडी; पण कांहीं केलें तरी मेलेली मेंढी पुनः थोडीच जिवंत होणार होती? मारमारून माझेच हात दुखरे झाले म्हणजे मला हा खुळा नाद सोडावा लागे.

**यथासांग पूजा** ह्या ताईबाईसारखीच आमच्या वाड्याच्या अगदीं बाहेरच्या अंगणांतील वायव्येकडील एका पडक्या खोलींतील खांबाचीही मला लहानपणीं पूजा करावी लागत असे. हें रमाबाई नांवाच्या एका मृत बाईचें भूत होतें. येणेंप्रमाणें आमचे घरीं माणसापेक्षां देव देवतांची गर्दी फार मोठी जमली होती. नवरात्रांत, गणेशचतुर्थींत वगैरे महापूजेचा प्रसंग आला म्हणजे देवघरांतील देव्हाऱ्यावरील खंडोगणती टाकांची व मूर्तींची पूजा झाल्यावर, मग उतरंडीच्या डेऱ्यांची (गाडग्यांची) नंतर देव्हाऱ्यासमोरच्या कोनाड्यांत ठेवलेल्या लाकडी पादुकांची, जवळच्या खिडकींत रचून ठेवलेल्या सर्व पोथ्यांची, स्वयपांकघरांत येऊन ताक करण्यासाठीं रोवलेल्या खांबाची, सोप्यांतील मुख्य कोनाड्यांत बसविलेल्या गणपतीची, गोठ्यांत बसलेल्या ताईबाईची आणि शेवटीं अगदीं बाहेर पायखान्याजवळील खोलींतील वर सांगितलेल्या खांबाची ऊर्फ भूताची अनुक्रमें पूजा करावी लागत असे. ही पूजा म्हणजे ताम्हणांतून नेलेल्या पाणी, गंध, अक्षता, फुलें वगैरेंनीं करावयाची असे. शिवाय हें झाल्यावर धुपारती, दीपारती आणि कापुरारती ओवाळायला पुनः ह्या इतक्या देवतांसमोर यावें लागे. ही आरती ओवाळतांना उजव्या हातानें आरती ओवळणें आणि डाव्या हातानें घंटा वाजविणें ही कसरत एकाच वेळीं करावी लागत असे. आणि पुष्कळवेळां — विशेषतः गोड नैवेद्यामुळें, अगर शाळेला सुटी असल्यामुळें मी खुषींत असलों तर — ही सर्व पूजा यथासांग करणें मला आवडतही असे.

**मारुतीची पूजा** मराठी चौथ्या पांचव्या यत्तेंत असतांना बाबांनीं घरचें पूजारीपण मजकडेच दिलें होतें. ह्या मूर्तीपूजेंत माझें मन जरी केव्हां केव्हां रमत असे तरी रोज रोज हें सर्व नियमानें करण्याचें लचांड मागें लागल्यामुळें मी बहुतेक फार कंटाळत असे. ह्याचें कारण असें कीं आमची मराठी शाळा सकाळीं ७ पासून १०



८

पर्यंत आणि पुनः दोन प्रहरीं २ पासून ५ पर्यंत असे. उन्हाळ्याचे दिवसांत सकाळीं शाळेंतून आल्यावर कडकडीत भूक लागलेली असायची. तरी पण मला आंघोळ करून सोंवळ्यानें ही सर्व पूजा करावी लागे. इतकेंच नव्हे तर घरांतील सर्व पूजा आटोपल्यावर मग गांवच्या मारुतीचे देवळांत जाऊन त्याची पूजा करून यावें लागे. मारुतीला जातांना सोंवळ्यानें जावें लागे. स्नान करून अंगाला व कपाळाला गंध लावून उजव्या हातांत पळी – पंचपाली त्यांत पाणी, फुलें, तिचें बाजूला गंधाचा मोठा गोळा लावलेला, डाव्या खाकेंत धुतलेल्या उपरण्याची घडी अशा थाटानें आमची वामनमूर्ति मारुतीला निघावयाची. सुमारें ११।१२ वाजतां उन्हाळ्यांतलें तें कर्नाटकी ऊन पडे, पण अनवाणींच जावें लागे. मारुतीचें देऊळ बरोबर बाजारांत आमच्या हायस्कुलासमोरच होतें. तेथून आल्यावर मारुतीचें तीर्थ घरीं सर्व मंडळींना पळी पळीभर द्यावें लागत असे. हें एक माझी पूजेची हजेरी लावण्याचें साधन बाबांनीं करून ठेविलें होतें! इतकें झाल्याशिवाय मला जेवायला मिळत नसे. पूजेला ब्राह्मण ठेवल्यास कोठल्याही देवस्थानांत त्याला चमचमीत नैवद्याचें खावयाला आणि वर भरपूर दक्षिणा असे. पण मला मात्र इतकें सारें करून जेवतांना नुसती कोरडी भाकर, तुरीची पातळ डाळ आणि तांबडी भगभगीत मिरच्यांची चटणी ह्याशिवाय कांहीं मिळत नसे. चटणीवर तेलही मिळावयाची मारामार! मग माझ्या कोवळ्या मनावर ह्या पूजेचा काय परिणाम होत असेल बरें?

अर्थात् मला ह्या सर्व पासरीभर देवांचा केव्हां केव्हां भारी राग येत असे.

पूजा करीत असतां सगळे देव माझ्या हातींच येत. जे

गाड्याची पूजा दगडाचे कठीण असत ते वाचत. पण जे सोन्यारुप्याचे

नाजूक टाक असत त्यांना मी धरधरून वाकवीत असें

आणि पुनः बाबांनीं पाहूं नये म्हणून सरळ करून ठेवी. घाई झाली म्हणजे दुरूनच त्यांच्यावर पाणी फेकून भिजवीत असें. घरांतल्या

देवाचा असा झटपट संक्षिप्त समाचार घेतल्यावर मारुतीचीही तशीच वाट लागावयाची. घरांतून निघतांना पंचपात्री, गंध, फुलें, अक्षता सर्व शृंगार थाटाचा असावयाचा, पण पोटांत कावळे चावूं लागल्यावर कोण मारुतीपर्यंत जातो ? आमचें मोठें आंगण ओलांडल्यावर बाहेर रस्त्यांत लगेच म्हातारबा नावांचे माझ्या बाबांचे एक सुतार मित्र होते; त्यांच्या मालकीचा सुतारी कारखाना लागत असे. त्यांच्याकडे दुरुस्तीला आलेल्या खटारगाडया रस्त्यांतच उभ्या असावयाच्या. त्यांपैकीं एकाद्या गाडीच्या चाकाच्या गड्डयाची पूजा करून मी घरीं तीर्थ द्यावयाला येत असें. पण माझी ही चोरी फार दिवस न लागतांच उघडकीला आली. म्हातारबा वरचेवर बाबांना भेटावयाला येत असत. ते म्हणत, " रामा ! ( माझ्या बाबांपेक्षां ते बरेच वयानें वडील असअसल्यानें ते अशी एकेरी हाक मारीत ) आमच्या रस्त्यांत उभ्या असलेल्या गाड्यांच्या चाकांवरून अलीकडे बरेच दिवस पांणी, गंध, फुलें, अक्षता आढळतात. हा काय चमत्कार ! " बाबांनाही हें काय गौडबंगाल आहे पाहावेसें वाटल्यावरून ते पाहवयास गेले. पाहतात तों आपल्या घरचा गंध व फुलें नित्याचीं त्यांच्या ओळखीचीं दिसलीं. घरीं येऊन त्यांनीं मला दरडावून विचारलें, " कायरे विठ्या, रस्त्यांतल्या गाडयांची पूजा करीत असतोस काय ? " कांहीं झालें तरी मी खरें बोलणारा मुलगा अशी बाबांची नेहमीं खात्री होती. म्हणूनच त्यांचा मी लाडका होतों. मी मोठा खजील झालों तरी पण चाललेला खरा प्रकार असेल तसा सांगितला. त्यामुळें त्यांच्या रागाला वावच न उरल्यामुळें त्यांना उलट माझी कींव आली आणि खरें बोलण्याबद्दल त्यांनीं माझें कौतुकच केलें. गोष्ट अशा थरावर आली म्हणजे माझे आईलाही मध्यस्थी करण्याचें धैर्य होई. शाळेंत जाणाऱ्या लहान मुलाला जेवणाला उशीर होतो म्हणून तिनेंही मला पाठवळ दिलें. शेवटीं मारुतीची ब्याद माझ्या मागची सुटली, मारुतीपेक्षां मला रस्त्यांतली गाडीच पावली म्हणून मीही आनंदलों. मग त्यापुढें देव्हारांतल्या सोन्यारुप्याच्या टाकांच्या कंवराही

मी फारशा वाकविल्या नाहींत. कारण केव्हांतरी बाबा पूजा करावयास आले म्हणजे सगळ्या देवांच्या कंबरा वांकलेल्या पाहून हा काय चमत्कार म्हणत. हे देव म्हणजे आमचे आजे, पणजे हे पूर्वजच असत. ते सर्व म्हातारे होऊन वारले होते म्हणून त्यांच्या कंबरा वांकणें साहजिकच होतें. असल्या पुजाऱ्यापासून आमचें रक्षण कर, अशी त्यांनीं ईश्वराजवळ प्रार्थना केली असावी. म्हणून त्यांची व माझी ह्या अवेळीं पुजेच्या चरकांतून सुटका झाली ! मूर्तिपूजा ही पहिली पायरी म्हणून तिचें मंडण करणाऱ्यांनीं हा एक धडा घेण्यासारखा आहे. कांहीं असो, बाबांनीं पूजा करणें अगर न करणें केवळ माझ्याच मर्जीवर सोंपवून आपला समंजसपणा प्रगट केला व त्याचा सुपरिणाम असा झाला कीं, माझ्या धर्मबुद्धीला कायमचा धक्का पोंचला नाहीं.

**भिंतीवरील थाप**

पुढें आई मला केव्हां केव्हां पूजा करावयाला सांगे. पण आईला झुकांड्या द्यावयाला मला कितीसा उशीर लागणार ? स्वयंपाक घरांतल्या भिंतीवर मी खडूनें एकदां मोठ्या अक्षरानें खालील वाक्य लिहून ठेविलें होतें. “ आई ! मी उद्यां पूजा करितों, बरें ! ” दुसरे दिवशीं आईनें मला टोंकलें, “ कारे विठू, आज पूजा करणार ना ? ” मी काय मुलखाचा चवचाल पोऱ्या ! तिला म्हणे, “ आई माझें वाक्य नीट वाच. मी आज पूजा करण्याचें कबूल केलें नसून उद्यां करण्याचें ठरविलें आहे ना ? ” तो उद्यां कधींच आज येणें शक्य नव्हतें. “ लिहिणें वाचणें शिकलीं म्हणजे मुलें कशीं चावट होतात बाई ! ” म्हणून आई बिचारी गप्प बसे. भिंतीवरील वाक्य माझ्या अवखळपणाचें स्मारक म्हणून कित्येक दिवस तसेंच राहून गेलें. प्रत्यक्ष बाबाही तें पाहून न पाहिल्यासारखें करीत. “ हें पोर पुढें कोणाचे हातीं सांपडणार नाहीं ” असें भाकीत आईपुढें करून दोघेही माझें मला नकळत कौतुक करीत व स्वस्थ बसत !

---

# प्रकरण १९ वें

## मूर्ति-पूजा

देव्हारा

येथपर्यंत मी जें लिहिलें त्या माझ्या बालवयांतल्या चेष्टा होत्या. हा माझ्या प्राथमिक शाळेंतला १२ वर्षांच्या वयांतला काळ होता. ह्या काळांतही मी घरीं देवपूजा केव्हां केव्हां फार मन लावून करीत असें. देव्हाऱ्यावर देव पुष्कळ असत. शिवाय इतर कोनाड्यांतूनही पूजनीय वस्तु पुष्कळ ठेविल्या असत. उदाहरणार्थ आमचा देव्हारा म्हणजे देवघरांतल्या भिंतीत माझ्या कंबरेइतक्या उंचीवर एक मोठा चार फूट रुंद व तितकाच उंच आणि ३।४ फूट खोल असा कोनाडा होता. त्यांत प्रथम देवांच्या मूर्ति आणि पितरांचे टांक नीट मांडावयाचे असत. त्यापुढें शाळिग्राम, निरनिराळ्या नद्यांतले गोटे; त्याचेहीपुढें घंटा, धूपार्ति, कापुरारती, निलांजनें, पळी, पंचपात्री आणि उजवीकडे एका अडणीवर मोठा शंख आणखी एक लहान शंख वगैरे ठेवले असत. उजवीकडे आंत पुनः एका खिडकींत श्री यल्लमाची चवरी आणि आमच्या आजीची ताळी वगैरे जवाहीर असें. डावीकडील एका लहानशा देवळींत एक समयी आणि जवळ एक काशीहून आणिलेला गंगोदक बंद करून ठेविलेला तांब्या अशा कितीतरी वस्तूंचा सुंदर संभार असे.

पूजेचा उत्साह

मनाला आलें कीं, ह्या सर्व देवदेवता आणि इतर वस्तु धुवून पुसून व्यवस्थेनें मांडून त्यांवर गंधाक्षता, कुंकू, हळद, फुलें यथासांग लावून पूजा करण्यांत त्या

बाळपणीं देखील मला मोठें सुख आणि ईर्षा वाटे. तीं माझ्या वडील भावाला वाटत नसावी आणि हा आम्हां दोघां भावांमधील भेद बहुतकरून माझ्या बाबांच्या लक्ष्यांत आला असावा म्हणून ते मलाच पूजा करावयास सांगत असावेत. ह्यावरून माझ्या स्वभावांतील उत्साह हा गुणही दिसून येतो. विशेष सणावारीं घरीं कांहीं गोडधड नैवेद्याचें झालें म्हणजे माझ्या बाळभक्तीला तर पूरच येत असे. मानवी जातीप्रमाणें व्यक्तींतही सकाम भक्ति अगोदर असणारच. मग मला ह्यांत लाज आणणारें कांहीं विशेष नाहीं.

**आध्यात्मिकता**

मूर्तिपूजा मुलांना आणि बायकांना देखील आवश्यक नाहीं असें माझें आतां धर्माचा इतिहास शास्त्रीयदृष्टीनें वाचून ठाम मत झालें आहे. तरी त्यावेळीं मूर्तिपूजेंत मला मोठी करमणूकच नव्हे तरी आपण कांहीं विशेष गोष्ट करीत आहों असें वाटे. ती गोष्ट आध्यात्मिक होती हें त्यावेळीं वाटणें शक्यच नव्हतें. तरी मला जो उत्साह आणि निरतिशय आनंद वाटत होता, तो केवळ नैवेद्याच्या लोभामुळेंच होता असेंही नव्हतें. माझ्या बाबांचा दरारा घरीं फार होता तरी माझ्या आईवर लहापणींही मी इतका दाब टाकीत असें कीं, हट्ट धरिला असतां तर देवांच्याही अगोदर मला केलेले गोड पदार्थ खावयाला मिळाले असते. आणि बाबांनींही ज्याअर्थी पूजेची मजवर सक्ति कधीं केली नाहीं त्याअर्थी पूजा करण्यांत मला तितक्या कोवळ्या वयांतही ९।१० वर्षांचा असतांना तेव्हां न सांगता येण्यासारखें कांहीं तरी आंतरिक सुख होत असावें. नाहींतर माझ्यासारख्या त्या वेळच्या काफिर आरवाला अगर तुफान पठाणाला ह्या हिंदु पूजेची दगदग सहनच झाली नसती! "व्यतिषजति पदार्थान् आंतरः कोऽपि हेतुः" ह्या पूजेंत माझी कोंवळी आध्यात्मिकताच असेल, नसेल कशावरून!

हा जो मी वरील तर्क रचला आहे त्याला कारण पुढें जें लिहीत आहें त्यांत दिसणार आहे. तो चुकीचा ठरला तर माझी चूक कबूल करावयाला मी केव्हांही तयार आहें. कारण हें जें सारें प्रकरण मी लिहीत आहें तें मी मोठा धार्मिक होतों असें भासविण्यासाठीं नसून, पुढें प्रौढपणीं माझ्यांत ज्या धार्मिक भावना स्पष्ट झाल्या त्याचेंच हें प्राथमिक अस्पष्ट रूप होतें किंवा असेल हें दाखविण्याचा माझ्या शास्त्रीय प्रयत्न आहे.

**शिवलिंग पूजा**

इंग्रजी तिसऱ्या चौथ्या वर्गांत असतांना मी १४।१५ वर्षांचा होतों. त्यावेळीं माझ्या भावनाशील अंतःकरणांत स्पष्ट रूपानें भक्तिभावनांचा उद्रेक मला दिसून आला. ह्यावेळीं माझी मराठी वाङ्मयांत चांगली प्रगति होत होती. मी पौराणिक पोथ्या वाचीत होतों. विशेषतः मी शिवलीलामृत ह्या लहानशा पोथीचें पारायण आवडीनें करीत असें. हें मी स्नान करून जेवणा-पूर्वी करीत असें. शिवाय श्रावणमासांत शिवलिंगाचें अर्चन मी मोठ्या भक्तिभावानें करूं लागलों. पाटावर शिवलिंग ठेवून मी त्यावर बेलपत्राची सहस्रदळें वाहात असें. म्हणजे बरोबर जरी हजार पानें नसलीं तरी पुष्कळशीं पत्रीं मी स्वहस्तें तोडून आणून माझ्या आवडत्या शिवलिंगावर अर्पीत असें. आणि विष्णु सहस्रनामाप्रमाणें शिवनामांचा जप करीत असें.

**शिव व विष्णु**

हिंदु धर्मांतील शिव आणि विष्णु ह्या मुख्य दैवतांपैकीं मला पहिलेंच विशेष आवडे. अजून झालें तरी मला एकाद्या विष्णु मंदिरापेक्षां एकाद्या शिवालयांत जाऊन बसणें अधिक पसंत आहे. ह्याचें कारण विष्णु मंदिरें सापेक्षतः अधिक अर्वाचीन आणि त्यांत शिवालयापेक्षां भजनपूजनांचा व स्त्रीपुरुषांचा अधिक गोंगाट असतो. शिवालयें प्राचीन आणि निवांत असतात. गाभाऱ्यांत मूर्तींचा सुळसुळाट आणि उपकरणांचा दणदणाट नसतो. पण हरीचिं-तनांत मी कृष्णाचे जे चाळे वाचीत असें त्यापेक्षां शंकर पार्वतीचे गोष्टींत

अधिक साधेपण आणि भोळेपण मला त्या लहान वयांतही दिसत असे. ह्यामुळें कृष्णापेक्षां भोळा सांब अधिक आवडे !

**पुराणिकाचा थाट**

ह्याच दोनचार वर्षांत मी शाळेंतील माझ्या सोबत्यांस जमवून सुट्टीचे दिवसांत हरिविजयांतील गोवर्धनाख्यान, रामविजयांतील कुंभकर्णवध किंवा पांडवप्रतापांतील हरिश्चंद्राख्यान असले भक्तिरसोत्पादक अध्याय वाचून पुराणिकाप्रमाणें अर्थ सांगत असें. विशेषतः शेवटच्या आख्यानाचे वेळीं श्रोते आणि वक्ता आम्हीं दोघेही करुणरसानें व्याकुळ होऊन रडत बसल्याचें मला आतां नीट आठवत आहे. तसेंच विठोबाच्या मठांत मागें वर्णन केलेल्या सप्ताहांत अगदीं लहानपणीं मी जो तमासगिराप्रमाणें जात होतों तो ह्यावेळीं प्रेमानें वश होऊन भाग घेऊं लागलों. पुढें बाबा गुरुचरित्र वाचून दत्तमंदिरांत जाऊं लागले तेव्हां त्या चरित्रांतील कथा मला रामरावणाच्या युद्धापेक्षां, किंबहुना कृष्णगोपींच्या लीलेपेक्षां अधिक मानवी तऱ्हेच्या व करुण भक्तीला पोषक असलेल्या अधिक आकळूं लागल्या. आणि दत्तमंदिरांतील करुणाष्टकें बाबांच्या तोंडून ऐकणें मला फार आवडत. ह्या माझ्या बुद्धिविकासाबरोबर जो धर्मभावनांचा विकास होऊं लागला त्यांतील शास्त्रीय संबंध जरी त्यावेळीं मला कळून येणें शक्य नव्हतें, तरी वस्तुस्थिति तशी होती खरी !

**गोड फरक**

पोथ्या वाचणें हा तिसऱ्या प्रहरचा आणि भजनास जाणें हा एक सायंकाळचा, कांहीं अंशीं फावल्या वेळेचा, प्रकार होता. तरी श्रावण महिन्यांत स्नान करून जेवणाचे पूर्वी मी श्रीशिवलीलामृताच्या पारायणाचा, नामजपाचा, लिंगार्चनाचा आणि उपवास करून रामतीर्थास ( १॥ मैल डोंगरांत ) जाऊन येण्याचा जो नाद घेतला त्यांत खरा भक्तिभाव होता. आणि हा माझा नवीन नाद पाहून आई-

बाबांना कौतुकच नव्हे तर आश्चर्य वाटे. श्रावणमासांत डोंगरांत आपल्या वानरसेनेला घेऊन जाऊन रामेश्वराहून परत येतांना जिवंत विंचवांची माळ घरीं आणून लहान बहिणींना भेडसावणारा पठाण पोऱ्या, आतां सरळ-मार्गानें उपवाशी एकाकी रामेश्वराला जाऊन त्याचा अंगारा आणून वडिलां-नाही लावतो हा कोण गोड फरक! हा फरक आपल्या मुलाच्या स्वभावांत पडत आहे हें पाहून कोणा प्रेमळ आईबापाला कौतुक वाटणार नाहीं!

हा जो परिपाक माझ्या स्वभावांत दिसूं लागला तो कांहीं तिसऱ्या चौथ्या यत्तेंत एकदम आला असें नव्हे. माझ्या भावाच्या मृत्युबद्दल शोक, घरांतील दारिद्र्य, आईबाबांचा उदासीनपणा वगैरे अनेक नैसर्गिक कारणें ह्या अंतर-पालटीचीं होतीं. इतकेंच नव्हे तर तिसऱ्या, चौथ्या यत्तेंत मला माझ्या वर्गांतील हुषारीमुळें सोबत्यांमध्यें आणि वर्गामध्यें जें जें यश आणि प्रभुत्व मिळालें त्याचाही हा सात्विक परिणाम होता. इतर मुलांप्रमाणें मी यशामुळें आढय, हेकेखोर व जुलमी न होतां माझ्या सोबत्यांना घेऊन जरी बराच वेळ धांगडधिंगा घालीत असें तरी पुनः कांहीं वेळ पोथ्या वाचण्यांतही घालीत असें, हीं विशेष ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट आहे, असें मला वाटत आहे. पण तेव्हां मात्र मी केवळ अनभिज्ञ आणि मुग्ध भावनाशील होतों!

**भक्ति व यश**

शाळेला मी नियमानें जात होतों. कारण नंबर पहिला असल्यानें वर्गाचा सेक्रेटरी मलाच व्हावें लागे. मार्कपत्रकें, हजरीपत्रकें नीट ठेवणें वगैरे शिक्षकांच्या हाताखालचीं सटर फटर कामें सेक्रेटरी नात्यानें मला करावीं लागत. म्हणून शाळेंत उशीर करून जाणें किंवा गैरहजर राहणे हें शक्यच नसे. तरी मी शाळेस जाण्यापूर्वी आईला किंवा बाबांला न सांगतां, अथवा जातां जातां शाळेपुढच्या मारुतीचें दर्शन न घेतां कधींच जात नसें! पुढें बबलादींचे सिद्ध पुरुष २।३ वर्षे घरीं येऊं लागले, त्यांचेवरही माझी श्रद्धा बसली. तसा त्यांच्यांत मजविषयीं प्रेमळपणा होता. त्यांचा प्रसाद

म्हणून बराच अंगारा मी एका पेटींत घालून ठेवीत असें. ह्यांतच रामेश्वराचा, मारुतीचा, दत्ताचा वगैरे अंगारा असे. शाळेंत जाण्यापूर्वी सर्व देवांचीच नव्हे तर बबलादीच्या सर्व सिद्ध पुरुषांचीं नांवें घेऊन आणि कपाळाला हा मिश्र अंगारा लावून मी शाळेंत जाई. आणि मला वाटे कीं, ह्या माझ्या भक्तीमुळें मला वर्गांत रोज मार्क इतरापेक्षां जास्त मिळून माझा नंबर नेहमीं पहिला राही. वस्तुतः हा माझा धर्मभोळेपणा होता. कारण खरा प्रकार असा कीं हा माझ्या भक्तीचा नवीन उद्रेक होण्यापूर्वीच १।२ वर्षें माझी हायस्कुलांत प्रगति होऊन माझी प्रसिद्धि झाली होती. भक्ति प्रथम असो किंवा यश प्रथम असो; ह्या दोन्हींचें कांहीं वर्षांनीं पुढें साहचर्य घडलें ही गोष्टही खोटी नाहीं.

पांचव्या यत्तेंत असतांना मला खरूज फार लागली व घरीं आम्ही सर्वच-जण बेजारलों. तेव्हां श्री यल्लमाचे यात्रेला जाण्याचा मींच घरीं आग्रह धरिला आणि तो बाबांनीं पारही पाडला असें मी वर सांगितलेंच आहे, वगैरे गोष्टींवरून जरी ह्या माझ्या धर्माच्या दुसऱ्या विकासांत कांहीं अंशीं सकाम-पणाची झांक मारते; तरी एकंदरींत त्यावेळच्या माझ्या भक्तिभावनांतून बऱ्याच अंशानें सहजमधुरता होती असें मला वाटतें. येरवीं, माझे सोबती जे अभ्या-सांत, खेळांत आणि इतर करमणुकींत माझ्या प्रभावळींत गुरफटले ते माझ्या धार्मिक छंदांतही तसेच गुरफटले नसते.

**अधिक स्फोट**

हा जो मजमध्यें भक्तीचा उद्रेक झाला म्हणून मीं वर म्हटलें तो जसा एकादा भूकप अकस्मात व्हावा तशा प्रकारें मी हाय-स्कूलमध्यें असतांना झाला असें मुळींच नव्हे. हायस्कूल-मध्यें गेल्यावर मी नव्या जगांत गेल्यासारखें मला कां वाटूं लागलें, घरची स्थिति बदलल्यामुळेंही माझ्या स्वभावांत फरक कसा झाला वगैरे वेळोवेळीं माझ्या स्वभावविकासाची मीमांसा शास्त्रीयदृष्ट्या वर केली आहे. धर्मभावनेविषयीं माझी स्वतःच्या शास्त्रीय दृष्टीचें थोडे दिग्द-र्शन मीं केलें आहे. त्यावरून धार्मिक भावना ह्या इतर भावनाहून अगदीं

तत्वतः भिन्न आहेत असें कित्येक विचारी माणसें समजत आहेत तसें मी समजत नाहीं. माझी पुढची कहाणी ऐकून वाचक गोंधळू नयेत म्हणून ह्याचा थोडासा जास्त स्फोट करणें मला येथें जरूर दिसतें.

बालस्तावत् क्रीडा सक्तस्तरुणस्तावत्
तरुणी--रक्तः
वृद्धस्तावत् चिंतामग्नः परेब्रह्मणि
कोपि न लग्नः

असें प्रत्यक्ष आद्य शंकराचार्य म्हणतात. पण मला तर वाटतें कीं, लहानपणीं मुलांची खेळाची आवड, तरुणपणीं तरुणीसंबंधीं उदात्त रस आणि म्हातारपणीं एकाद्या ऐहिक बाबतींतील सात्विक चिंतामग्नता; ह्या तिन्हीं भावनांहून भक्तीची भावना तत्वतः अगदीं भिन्नच आहे असें म्हणता येत नाहीं. ह्या भावनांत जी वयपरत्वें अंतःकरण्याची परिणति होत जाते तीच किंचित् आणखी थोडी जास्त शुद्ध, जास्त व्यापक आणि जास्त जोरदार झाली कीं तिला आम्ही भक्ति हें नांव देतों. ज्या सहज आनंदानें मूल खेळतें, तरुण रमतों, आणि वृद्ध सात्विक चिंतेनें व्याकुळ होतो; तोच आनंद ईश्वराच्या उत्तमोत्तम भक्तींत आहे, हें माझें मत कित्येकांना विपरीत वाटेल. ऐहिक रस आणि पारमार्थिक रस ह्या दोन्हींला एकाच माळेंत गोंवतों ही माझी अक्षम्य भूल वाटणें साहजिक आहे. परंतु ऐहिक काय कीं पारमार्थिक काय रस तो रसच; तो कांहीं अरस होणार नाहीं. ह्याच दृष्टीनें वेदान्तानेंही ईश्वराची 'रसोहि सः' अशी व्याख्या केली आहे. आणि सत्, चित् आणि शेवटचें आनंद हे त्याचें स्वरूप सांगितलें आहे. मग मी भक्तिभावनेची इतर स्वाभाविक भावनांमध्येंच गणना करितों ह्यांत काय पाप घडतें ? ह्या न्यायानें पाहतां बाळपणींचा मी खेळकर, पोरपणींचा मी खोडकर किंबहुना कादंबऱ्या वाचून अकालींच शृंगार रसाच्या वेदनांनीं विव्हळ होणारा, पुढें पोक्तपणीं अनेक राजसी भावनांचे हेलकावे खाऊन, शेवटीं वृद्धपणीं महारापोरांच्या घरच्या चिंतेंत असो किंवा स्वतः

माझ्या घरच्या मुलाबाळांच्या चिंतेंत असो, प्रसंगोपात्त मग्न झालों असलों तरी ह्या सर्व निरनिराळ्या भावनांत आणि माझ्या धार्मिक आयुष्यांतील उत्तमोत्तम भक्तिभावनेंत तत्वतः भिन्नता माझ्या तरी अनुभवास आली नाहीं. मी मोठा झाल्यावर प्रार्थना समाजांत असतांना आवड, प्रेम आणि भक्ति ह्या विषयावर एका कौटुंबिक उपासनेच्या प्रसंगीं प्रवचन करीत असतांना जे विचार प्रकट केले आहेत ते विचार आतां मी येथें भक्तिभावनेविषयीं जी मीमांसा करीत आहें तिच्या उलट आहेत हें खरें. पण हल्लींची माझी दृष्टि आधुनिक शास्त्रांतील विकास वादाला अधिक सुसंगत आहे असें वाटतें. ह्यामुळें हायस्कूलमधलाच काय पण पुढचाही माझ्या धर्मभावनांचा सर्व विकास माझ्या आयुष्यांतील इतर सर्व अनुभवांशीं आणि तदनुसार घडलेल्या वागणुकीशीं तत्वतः मुळींच विसंगत नाहीं असें माझें आतां मत झालें आहे. असो!

**साधुसमागम**

पोरवयांतल्या सहजभक्तीच्या आठवणी सांगतांना मी माझ्या पूजाअर्चांच्या, पोथीवाचनाच्या नामजपाच्या, भजनांच्या व यात्रादिकांच्या वगैरे आठवणी वर सांगितल्या. पण आणखी एक मुख्य विषयाच्या आठवणी सांगणें जरूर आहे. ती गोष्ट संतसमागम ही होय. आतां ह्या पोरवयांत मला खरे संत व खोटे संत ह्यांत फरक तो काय कळणार! मी करीत होतों त्या भक्तीचा विषय जरी मूर्तिच होत्या आणि ती भावना जरी पोरकट होती तरी त्या सर्व भावना त्यावेळच्या मानानें अगदीं शुद्ध, निष्कपट आणि जोरदार होत्या एवढीच गोष्ट मुद्याची आहे. त्याचप्रमाणें ज्या ज्या कांहीं पुरुषांच्या समागमामुळें मला ह्या वयांत धार्मिक आनंद होत असे, त्या त्या पुरुषांचा खरा साधुपणा किंवा विज्ञान कोणत्या दर्जाचा होता हा मुद्दा गौण आहे. माझी श्रद्धा व प्रेम त्या त्या माणसावर बसत असे हाच मुद्दा मुख्य आहे. ह्याच दृष्टीनें पुढच्या आठवणींचें महत्व आहे. एरवीं त्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं. बाबांना देवळांचा व भजनांचा जरूर नाद होता, तसाच भटकणाऱ्या साधु वैराग्यांचा

आणि सिद्ध महंताचाही नाद होता, असें मी मागें त्यांच्या आठवणी देतांना सांगितलें आहे. त्यांनीं नादावून घरीं आणिलेल्या असल्या माणसांवरच साधू समजून माझीही श्रद्धा बसत असे. एरवीं अशा वयांत माझा इतर कोठल्या साधूशीं परिचय घडणें शक्य असणार बरें ?

**जटाधारी गोसावी**

अघोरी पंथांतल्या एका जटाधारी गोसाव्याकडे बाबा एका काळीं फार जात येत असत. ह्यावेळीं मी हायस्कुलांत जात होतों कीं त्यापूर्वींचा हा काळ होता हें मला नीट स्मरत नाहीं. हा एका ठिकाणीं गुप्त होऊन दुसरीकडे प्रगट होतो, अशी कांहीं भाविक लोकांची समजूत झाली असावी. साधारणपणें हा बुवा गांवाबाहेर कोठल्यातरी झाडाखालीं धुणी पेटवून रात्रंदिवस अंगाला राख लावून बसलेला असे. तो बसल्या जागेचा कधीं उठतच नसे अशीही लोकांची समजूत असे. ह्याची मुद्रा प्रसन्न व बोलणें हेंगाडें मराठीच कां असे ना, पण प्रेमळ असे. हा एकाएकी एके दिवशीं दोन प्रहरीं आमच्या गोठ्यांतल्या एका अंधारी कोपऱ्यांत उभा असलेला आम्हांला दिसला. बाबा जरी विश्वासू आणि आदरशील होते, तरी भलत्या सलत्या चमत्कारावर भुलून जाण्याइतकी त्यांची श्रद्धा आंधळी नव्हती. म्हणून त्या बोवाचें हें चमत्कारिक येणें बाबांना आवडलें नाहीं. त्यांनीं त्याला आपल्या ठिकाणीं पोंचविलें. तरी पण विशेष न रागावतां त्या बुवाला रोज दोनप्रहरीं एक भाकरी व थोडी भाजी पाठविण्यास बाबांनीं आईस सांगितलें. हें अन्न रोज नेऊन पोंचविण्याचें काम मजकडे होतें आणि तें मी आनंदानें करीत असें. ह्यांत मला आनंद तो कां वाटावा बरें? लहान मुलाला असलीं कामें नियमानें करण्याची हौस असणें साहजिक मुळींच नाहीं. मला तर त्या साधुकडे जाऊन त्याचा समाचार घेणें, तो भुकेलेला गोसावी तें अन्न आतुरतेनें घेई म्हणून विशेषतः कळकळीनें तें पोंचविणें; अन्न ज्या तांटातून नेत असें त्यांत तो साधू चार डाळींबाचे दाणे, खोबऱ्याचा लहानसा तुकडा, किंवा थोडीशी

खडीसाखर प्रसाद म्हणून कांहीं तरी आपल्याजवळचें घालून ताट परत करीत असे—तो प्रसाद मी श्रद्धेनें घरीं भावंडांना आणून वाटणें वगैरे गोष्टी त्या लहान वयांत भक्तीच्याच द्योतक होत्या ! केवळ भुकेलेल्यास अन्न देण्याची परोपकारी भावना किंवा साधुसमागमाची जाणूनबूजून आवड राखण्याची आध्यात्मिक भावनेला माझें तें लहान वय पात्र नव्हतें. पण ह्या दोन्हींच्या मधली एक स्थिति मी तेव्हां अनुभवीत होतों हें खरें. तिला काय नांव द्यावें हें मला आतां देखील नीट समजत नाहीं !

**इतर बैरागी**

मराठा जातींत कोणी तरी गोसावी गुरु करून घेण्याची परंपरा चालत आली आहे. नाशिक जिल्ह्यांतील त्र्यंबकेश्वर येथील विठ्ठलपुरी नांवाचे गोसावी माझे वडिलांचे गुरु होते. ते वृद्ध होते. त्यांचे शिष्य गोसावी ह्यांचा उपदेश मला आणि माझ्या भावाला बाबांनीं कान फुंकण्याचा विधि करून देवविला होता. हे गोसावी एक दोन वर्षांनीं आमचे घरीं फिरतीवर येऊन संभावना घेऊन जात. त्यावेळीं त्यांच्याशीं माझा लळा विशेष असे. तुळजापुरचे भोपे भवानराव कदम आमचे घरीं कुळदेवतेचा नवस वगैरे काय असेल तें घेऊन जाण्यास मधून मधून येत. तेही मला फार आवडत. पुढें इंग्रजी शाळेंत असतांना नाशिकाकडचे भगवानदास आणि माधवदास नांवाचे दोन वैष्णव बैरागी आमचेकडे वरचेवर येत असत. हे नुसते पांथस्थ या नात्यानें जमखंडीच्या कोठल्यातरी देवळांत उतरून बाजारांत भिक्षा मागून एक वेळ जेवून राहात. आमच्याकडून त्यांना कसलीही आकांक्षा नसे. तरी त्यांचा व आमच्या घरचा फार लोभ जडला होता. त्याचें विशेष कारण मी इंग्रजी शाळेंत जाणारा, मोठा समजूतदार, प्रेमळ मुलगा हें ओळखून, बाबा असोत नसोत, माझ्या भेटीला घरीं येऊन माझ्याशीं त्यांनीं परिचय वाढविला होता. शेवटीं इंग्रजी ६ व्या ७ व्या इयत्तेंत असतांना बबलादीचे सिद्धांचें येणें जाणें फार झालें. त्याचा माझेवरच नव्हे तर अखेरीस माझाही

त्यांचेवर काय परस्पर परिणाम झाले हें मागें सांगितलेंच आहे.

देवपूजा, भजन, पोथीवाचन आणि साधूंची आवड वगैरे जे धार्मिक भावनांचे प्रकार आठवतील तसे जे मी वर सांगितले

**योग्य पारख**

त्यावरून व आमच्या घराण्यांतील आजी आणि आई ह्यांचीं व्रतें आणि उपास ह्याविषयीं जी मीं हकिकत दिली तिच्यावरून आमच्या घराण्यांत हिंदु धर्माची जुनी परंपरा, आचार-विचार आणि बाळबोधपणा कसा रुजला होता हें दिसून येतें. पण ह्यापेक्षां विशेष गोष्ट सांगावयाची ती ही कीं, जुन्या धर्मांचे इतके तप-शिलवार आचार आमचे घरीं चालत होते तरी केवळ कर्मठपणा, धर्म-भोळेपणा, दंभ आणि दुराग्रहाचा पगडा आमच्या घरीं आईबाबांच्या वर्तनांत मला केव्हांच दिसून आला नाहीं. एखाद्या ढोंगी साधूचें कपट दिसून आलें किंवा कोणाही सांप्रदायिक अतिथीचा स्वार्थी मतलब दिसून आला कीं बाबांचा निस्पृहपणा उग्रस्वरूप धारण करीत असे. आल्या अतिथीची आमचे घरीं जरी शक्तिनुसार संभावना होण्याला कधीं चुकत नसे, तरी त्यानें एकादें दुर्वर्तन केलें किंवा त्याचा लोभी आणि मतलबी डाव दिसला तर लागलीच त्याची उलट दिशेनें संभावना करावयाला बाबा कधीं मागें घेत नसत! ह्यामुळें भलत्यासलत्या सालोमालो भटक्याला आमचे दारांत पाय ठेवण्यापूर्वीं विचार करावा लागत असे. आईच्या भक्तींत कोणताही वरपंग नव्हता. ह्या माझ्या वडिलांच्या स्वभावांतच माझ्या भावी सामाजिक आणि धार्मिक सुधारणेचीं बीजें पूर्णपणें आढळत आहेत. आईनें व्रतें जरी बरीच केलीं तरी अमक्या वेळीं अमका नवस केलाच पाहिजे, अमक्याला अमके दान दिलेंच पाहिजे असा हट्ट कधींच केला नाहीं. दोघांच्याही धर्मभावना साध्या, सहज आणि निर्हेतुक होत्या. आणि त्यांतच माझ्या ‘ भावी ’ धर्माचाच नव्हे तर माझ्या सर्व सामाजिक सुधार-णांचाही उगम आहे.

---

# प्रकरण २० वें

## भावी सामाजिक सुधारणेची तयारी

हायस्कुलांत असतांना विशेषतः ४ थ्या ५ व्या यत्तेपासून पुढें माझ्यांमध्यें भावी सामाजिक सुधारणेचें बीजारोपण कसें होऊं लागलें ह्यासंबंधींच्या आठवणी देऊन मी हा हायस्कूलचा काळ पूर्ण करणार आहें. ह्यालाही माझ्या आईबापांचा धर्म आणि शील हींच केवळ कारणीभूत आहेत.

**भावंडांचीं नांवें**

माझ्या आजाआजीचा धर्म कसाही असो. ते जिवंत असे तोंपर्यंत जरी माझ्या आईबापांनीं त्यांच्या पुरातन देवदेवींच्या उपासनेची परंपरा विनतक्रार चालविली होती, तरी ती त्यांच्या पाठीमागें फार दिवस टिकली नाहीं. आजाआजी असतांनाच बापांचा पंढरपूरच्या वारकरी पंथांत नुसता प्रवेशच नव्हे तर पुढाकारही चालू होता. माझ्या वडील भावाचें लाडकें नांव जरी भाऊ असें होतें तरी त्याचें पाळण्यांत ठेविलेलें खरें नांव परशुराम हें होतें. श्रीयल्लम्मा हें रेणुकादेवी—जमदग्नी ऋषीची पत्नी—हिचें तेलगू अथवा कानडी नांव होय. तिचा मुलगा परशुराम. हें नांव माझ्या भावाला श्रीयल्लमाची भक्ति करणारी जी माझी आजी तिनें ठेविलें असावें. पण पुढील सर्व मुलांचीं नांवें माझ्या बापांनीं आपल्या पंढरपूरच्या भागवत संप्रदायाप्रमाणें ठेविलेलीं आहेत. तीं अशीं. परशुरामाच्या पाठीवरच्या आणि माझ्या आधींच्या मुलाचें नांव कृष्णा. हा लहान असतांनाच माझे आईचे अंगाखालीं झोपेंत चेंगरून मरण पावला हें मागें आलेंच आहे. ह्यानंतर माझें नांव विठू. जन्म पत्रिकेंत माझें पाळण्यांत ठेविलेलें नांव तुकाराम असें आढळतें. माझ्या जन्माचेवेळीं बाबा पंढरपूरच्या वारीला गेले होते. म्हणून

परत आल्यावर त्यांनीं माझें नांव विठ्ठल हें ठेविलें. मी पांचवा मुलगा. माझ्यानंतरचा मुलगा नांव ठेवण्यापूर्वी ६।७ वे दिवशींच वारला. नंतर मुलगी झाली. ती ७ वी जनाक्का. ही कार्तिक शुद्ध एकादशीस जन्मली. ह्यावेळींही बाबा पंढरपुरास जाऊन आले असावेत. आठवी मुलगी तान्याक्का हिचें पाळण्यांतलें नांव मुक्ताबाई असें आहे. पुढें जीं वरींच मुलें झालीं तीं लहानपणींच वारलीं. त्यांपैकीं एकाचें नांव दत्त होतें. शेवटचा मुलगा एकनाथ. अगदीं अखेरचें मूल चंद्राबाई. हें नांव मात्र बवलादी सिद्धांचे जे उपास्य दैवत चंद्रगिरीताई असें होतें तिचेवरून ठेविलें होतें. एकंदरींत वारकरी पंथाच्या साध्या, उदार, प्रागतिक, भागवत धर्माचा पगडा माझ्या वडिलांच्या मनावर आणि अकृत्रिम शीलावरही बसला होता ह्यात शंका नाहीं. त्याचींच हीं नांवें साक्ष देतात !

तुकाराम हें नांव मागें पडून विठू हें नांव माझें कसें पुढें रूढ झालें त्याचा जरी शोध आतां नीट लागण्याचा संभव नाहीं; तरी माझ्या

**मातापित्यांचें ऋण** बाबांच्या भागवत धर्मांतून स्वतः माझी भावी सामाजिक सुधारणा कशी उदय पावली हें शोधून काढणें तितकें कठीण नाहीं.

" विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥
कोणाहि जीवाचा न घडो मत्सर । वर्ण सर्वेश्वर पूजनाचें ॥ १ ॥

हा तुकारामाचा अभंग सर्वच वारकरी म्हणतात. पण त्याचा जोराचा ठसा बाबांनींच नव्हे तर माझ्या आईनेंही माझ्या ग्रहणशील हृदयावर आपल्या प्रत्यक्ष आणि पदोपदीच्या प्रेमळ आचरणानें जो उठविला आहे; त्यांत ज्या भावी साधारण ब्राह्मसमाजाचा मी प्रचारक झालों त्यानेंही विशेष भर टाकिली असें माझ्यानें म्हणवत नाहीं.

ज्ञानदेवें घातला पाया । तुका झाला कळस ॥

ह्या उक्तीप्रमाणें ज्या शुद्ध भागवत धर्माची प्राणप्रतिष्ठा महाराष्ट्रांत झाली त्यांतच उदार, सामाजिक प्रागतिकतेची व सहानुभूतिपूर्ण

सहिष्णुतेचीं भरपूर बीजें होतीं, तरी महाराष्ट्रांत १९ व्या शतकांत सामाजिक सुधारणेचा म्हणण्यासारखा कां प्रकर्ष झाला नाहीं हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे.

" निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम ।
आवडीनें नामें गाती, ते नर पावती मंगल धाम ॥ "

हें सुंदर भजन म्हणून नाचणाऱ्या पुष्कळ वारकऱ्यांच्या आचरणामध्यें वरील साधूंच्या शुद्ध शिकवणीचा मेळ दिसत नाहीं. पण माझ्या वडिलांच्या आचरणाविरुद्ध मला ही कुरकुर करावयाला मुळींच जागा नाहीं, ह्या गोष्टींचा मला मोठा अभिमान वाटतो. प्रार्थना अगर ब्राह्म समाजाचा परिणाम अद्यापि मराठ्यांवरच नव्हे, इतरही महाराष्ट्रियांवर झालेला नसून मी मात्र आज ह्या समाजाचा एक कां होईना पण अपात्र प्रचारक म्हणून वावरत आहें. ह्यांत कांहीं श्रेय असेल तर मोठा भाग ह्या समाजापेक्षां माझ्या वडिलांनीं घालून दिलेल्या जिवंत आचरणाच्या धड्यांकडेच जास्त जात आहे !

आमचें घराणें मूळचें दक्षिणेकडील अस्सल कर्नाटकांतलें. राजपुतांशीं संबंध लावणाऱ्या उत्तरेकडील मराठ्यांपेक्षां दक्षिणेकडील देशस्थ मराठे साध्या राहणीचे व बाळबोध वळणांतले. ह्यांचा मराठमोळा पडदानशीन् नखऱ्याचा नाहीं, किंवा ब्राह्मणी सोंवळेपणाच्या जातिभेदालाही फारसा जुमानणारा नाहीं. निदान माझ्या पाहाण्यांत माझ्या आजीपासून तरी ह्या दोन सामाजिक विषांची बाधा आमचे घरीं दिसून आली नाहीं. ह्यांत माझ्या बाबांनीं आपल्या सहजसुंदर भागवत धर्माची भर टाकिली. " कोणाही जीवाचा न घडो मत्सर " हें वर्म तर माझ्या आईच्या स्वभावांत अगदीं श्वासोच्छ्वासाप्रमाणें सहज भिनलें होतें. ह्यांत मी पामरानें कांहींच भर टाकणें शक्य नव्हतें.

**पवित्र वातावरण**

आमच्या घरीं पडदा नव्हता इतकेंच नव्हे तर बाहेरची कोणी सभ्य आणि विश्वासार्ह पाहुणे मंडळी अगर मित्र मंडळी आली, तर त्यांच्याशीं आमच्या घरचीं स्त्रीपुरुष आणि लहान थोर सर्व माणसें फार मोकळेपणानें व

आपलेपणानें वागत असत. ह्या स्वाभाविक बाळबोधपणामुळें आमच्या घरीं येणाऱ्यांना अगदीं पवित्र आणि भारलेल्या वातावरणांत उतरल्या-प्रमाणें अनुभव येई, असें कित्येकांनीं आमचेजवळ उघड उद्गार काढावे. माझ्या मित्रांना आमच्या घरच्या अकृत्रिम व निष्कपट चालीरीति, घरांतील लोकांचा एकमेकांशीं स्नेह व गोड वागणूक आणि दुसऱ्यांशीं तसेंच वर्तन अगदीं नमुनेदार वाटत. कांहीं तर नवीन आलेले स्नेही कांहीं गोष्टींकडे टक लावून पाहातच बसत! आमचे घरची शांति, तृप्ति, प्रीति ह्या कांहीं अवर्णनीय त्यांना वाटत. आमच्या घरीं आल्यावर एकाद्या पुरातन देवळांत गेल्याचा त्यांना भास होऊन, परत जावेंसें वाटत नसे! आमचे बाबा आपल्या मुलींना "आई" म्हणून हाक मारीत असत; ही लहानशीच गोष्ट पण परकीयांवर ह्या गोष्टींतील सहृदयतेचा परिणाम चटकन् होई. माझ्या दोन लहान बहिणी माझ्या लहानग्या मित्रा-बरोबर अगदीं भावांप्रमाणें लडिवाळपणानें व मोकळेपणानें वागत आणि आई तर माझ्या कोणाही मित्राला आपल्याच मुलाप्रमाणें वागवावयाला केव्हांही तयार असे. ह्यामुळें आमचे घरीं विश्वकुटुंबियतेचा जिवंत देखावा अथवा साक्षात्कार दिसे.

नुसता पडदा न घालणें ह्यांत कांहीं विशेष नाहीं. पण अंतः-करणांतच मुळीं पडद्याला थारा न देणें ही दैवी कृपा होय. आमचें घर म्हणजे ह्या कृपेचा एक देव्हारा होता! प्रापंचिक विपत्ति कितीही आल्या; दारिद्र्य, आजार, मरण, कर्जाचा बोजा असले इतर कितीही मनाची पारख करणारे प्रसंग आले तरी घरचे शांतीचें वातावरण कधीं क्षुब्ध होत नसे. येणें-प्रमाणें भौतिक दारिद्र्यांत आत्मिक श्रीमंतीचा भोग आमचे घरीं आणि घरां-तील लहानथोर व्यक्तींत दिसत असे. अशा घरीं मग जातिभेदाला कोठून वाव मिळणार! आधुनिक सुधारकांप्रमाणें जातिभेद मोडण्याची उठाठेव करण्याची आम्हांवर कधीं पाळीच येत नसे. कारण तो जातिभेदाचा

संस्कारच आम्हांवर घडला नव्हता. मग तो मोडण्याची वार्ता कोठून येणार? लहान मुलापुढें मद्यपान निषेधाच्या किंवा व्यभिचार निषेधाच्या व्याख्यानाची जरूरीच नसते. किंबहुना तीं हास्यास्पद ठरतात. त्याप्रमाणें जातिभेद मोडण्याचा कोणी आम्हांला उपदेश केला असता तर तो मुळी आम्हांला समजलाही नसता, इतके आम्ही ह्या भेदाच्या अमंगळ विषाचे अनभिज्ञ होतों!

**मुलींचें शिक्षण**

शिक्षणाचे बाबतींत आमच्या घराण्याचा त्या प्रांतांत मोठा विशेष होता. बाबांनीं जें पुस्तकी शिक्षण आणि जी बहुश्रुतता मिळविली ती त्या काळचे मानानें नावाजण्यासारखी होती. आणि मीही पुढें हायस्कुलांत जाऊन सतत नंबर पहिला ठेविला, इतकेंच नव्हे त्या काळच्या विद्यार्थी वर्गांत अग्रगण्य झालों; ह्याचें प्रत्यक्ष श्रेय जरी बाबांला नाहीं तरी अप्रत्यक्षपणें पूर्व भूमिका तयार केल्याचें श्रेय त्यांचेकडेच जातें. पण ह्यापेक्षांही त्यांच्या प्रागतिकपणाचें मोठें कौतुक करण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनीं आपल्या दोन्ही मुलींनाही शाळेंत घातलें ही होय. मी जसा माझ्या हायस्कुलांतला अगदीं पहिल्या अमदानींतला मुलगा तशा माझ्या बहिणी त्या वेळच्या मुलींच्या शाळेंतल्या जवळ जवळ पहिल्याच विद्यार्थिनी होत्या! जनाक्का आणि तान्याक्का ह्या दोघी माझेपेक्षां धाकट्या बहिणी. पहिली मोठी हुशार सतेज दिसे, दुसरी धाकटी मात्र अगदीं भोळी आणि बुद्धीनें मागासलेली असे. जनाक्का बाबांची विशेष लाडकी. क्षत्रिय घराण्यांत लहानपणीं मुलींना मुलांचाच पोषाख घालण्याची बऱ्याच ठिकाणीं चाल आहे. इतकेंच नव्हे तर अशा मुलींना वडील केव्हां केव्हां सभांतून व दरबारांतून अशाच पुरुषी पोषाखांत घेऊन जात असतात. जनाक्काचा हा पोषाख व त्या वेळचें तिचें बाळसें बाबांनाच नव्हे तर आमच्या घरच्या सर्व मंडळींना आवडत असे. स्वतः आम्हीं मुलांनीं कधीं विजार घातली नाहीं तरी पण जनाक्काला ऊर्फ आपल्या "आईला" बाबांनीं

कोल्हापुरी पद्धतीची तुमान करून आवडीनें घालावी! आणि तिनेंही ती घालून मोठ्या दिमाखानें आम्हांपुढें यावें!

**स्वभाव–लक्षणें**

वरील परिस्थितींत वाढल्यामुळें माझ्या भावी सुधारणेची तयारी कशी झाली हें निराळें फारसें सांगावयाला नको. स्वातंत्र्याची प्रीति, नित्य नव्या जीवनाचा शोक व सत्याचा छडा लावण्याची जन्मजात हौस हीं माझ्या स्वभावाचीं मुख्य लक्षणें होतीं. आणि ह्या लक्षणांना कोणत्याही तऱ्हेनें आळा घालण्याचा माझ्या आईबाबांनीं कधींही प्रयत्न केला नाहीं, हें केवढें माझें भाग्य! कुरणांत चरणाऱ्या आईबापांजवळ त्यांचें शिंगरूं ज्याप्रमाणें स्वच्छंदानें बागडत असतें; तद्वत् माझ्या आईबाबांचा मला आश्रय होता; पण दाब कसलाही नव्हता! फार तर काय मीं एखादी चांगली पण अगदीं नवी आणि रुढीविरुद्ध गोष्ट केली तर उलट तिचें तें कौतुकच करावयाला तयार असत! ही अपूर्व संधि माझ्या सुधारणेला मिळाली.

**अभेद भाव**

हायस्कुलांत गेल्यावर माझ्या अभ्यासांत जसे नवे नवे विषय येऊन त्यांत माझी अप्रतिहत गति होऊं लागून माझ्या चैतन्य-क्षितिजाचें वलय दिवसेंदिवस वाढूं लागलें; तसेंच मला निरनिराळ्या जातींचे व संस्कृतीचे मित्र आणि सोबती मिळत जाऊन, माझ्या विचाराला आचाराचें स्वरूप देण्याचे प्रयोग करण्यालाही वाव मला मिळूं लागला. ब्राह्मण, लिंगायतासारख्या ज्या जाति मराठ्यांकडे जेवत नाहींत त्या जातींचीं माणसें आमचे विश्वकुटुंबिय घरीं जेवत. इतकेंच नव्हे तर न्हावी, धोबी वगैरे ज्या इतर हिंदूंकडे किंवा मुसलमान वगैरे परधर्मीयांकडे मराठे जेवीत नाहींत; त्या जातींचे लोकांशींही पंक्तिभेद करण्याचें पाप आमचे घरीं कधीं घडत नसे. पण मी पुढें जेव्हां माझ्या मित्रांशीं मिळून मिसळून वागूं

लागलों तेव्हां ह्यापुढची पायरी मला चढावी लागली, ती अशी.

**मुसलमान स्नेही**

इंग्रजी चवथ्या किंवा पांचव्या यत्तेंत असतांना मूर्तुजा नांवाचा एक माझा मुसलमान स्नेही होता. तो माझ्या घरीं नेहमीं येत असे व जेवतही असे. त्यानें एके दिवशीं सहज मला आपल्या घरीं जेवावयास बोलावलें. परजातीच्या माणसाचे घरीं प्रत्यक्ष जाऊन जेवण्याचा माझ्या जन्मांतला तो अगदीं पहिला प्रसंग होता. मी लागलाच कबूल तर झालोंच; पण जेवणाला बसलों तेव्हां मी कांहीं तरी अपूर्व गोष्ट करितों असें मला वाटूं लागलेलें स्पष्ट आठवतें. त्यावेळीं माझें वय फार तर १४ । १५ वर्षांचें असावें. मूर्तुजाला व त्याच्या घरच्या माणसांला तर माझ्या ह्या मोकळेपणाचें जास्तच आश्चर्य वाटलें. ह्यानंतर मी सहाव्या आणि सातव्या इयत्तेंत गेल्यावर सय्यद मीरासाहेब हतरुट ह्या पोक्त मुसलमान गृहस्थाचा माझ्याशीं प्रथम परिचय व नंतर अगदीं जिवलग स्नेह जडला. मीरासाहेब आमच्या घरीं आणि मी त्यांचे घरीं अगदीं उघड जेवत असूं. इतकेंच नव्हे ह्या माझ्या सुधारकी वर्तनानेंच आमचा परस्परांचा लोभ जडला. तो इतका कीं पुढें कांहीं वर्षांनीं ते वारल्यावरही त्यांचे थोरले चिरंजीव सय्यद अब्दुल कादीर हे मला आपल्या मुलाप्रमाणें वाटूं लागलें. त्यांनीं शेवटीं ब्राह्मधर्माचा स्वीकार करून ते प्रार्थनासमाजाचे सभासद झाले. शिवाय मी स्थापन केलेल्या भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी (Depressed Classes Mission Society of India) चे ते एक आस्थेवाईक प्रचारकही झाले! माझ्या सुधारकी बाण्याचा प्रत्यक्ष मीरासाहेबावरही परिणाम असा झाला कीं ते एक मुसलमान गृहस्थ असल्यामुळें त्यांचे घरीं अर्थात् स्त्रियांचा पडदा होता. तरी मीरासाहेबांनीं माझी आपल्या पत्नीची ओळख करून दिली होती व मजपुढें त्या पडदा पाळीत नसत. ही मोठी विशेष गोष्ट होती!

शुद्ध तत्त्वें

वरील गोष्टीचा विशेष खालील कारणांत आहे. आमच्या घरीं जीं साहजिक सुधारणेचीं तत्त्वें पाळलीं जात तीं समता आणि स्वतंत्रता; उदारता आणि स्वाभिमान ह्यांच्या समतोलांत होतीं. आमचे घरीं जे वरिष्ठ म्हणविणाऱ्या ब्राह्मण, लिंगायत जातीचे सभ्य गृहस्थ येत असत; ते जर आपला पोकळ डौल सोडून आमच्याशीं समानतेनें व खऱ्या प्रेमानें वागत असले तरच आम्ही त्यांच्या घरीं जेवावयास जात असूं व त्यांच्याशीं घरोबा राखीत असूं. येरवीं ते कितीही श्रीमंत किंवा घरंदाज असले तरी आम्ही त्यांचेकडे ते ब्राह्मण आहेत अगर लिंगायत आहेत येवढ्याच कारणानें जेवावयास जात नसूं! त्याचप्रमाणें मराठ्यांपेक्षां खालच्या मानलेल्या किंवा मुसलमानांसारख्या परधर्माच्या मित्रांकडे जेवावयाला जावयाचें झाल्यास त्यांच्यांत समानतेचें, स्वतंत्रतेचें अंतःकरणापासून प्रेमाचें नातें असेल तरच जात असूं; येरवीं नाहीं. ह्या न्यायानें मीरासाहेबांना किंवा त्यांच्या पत्नींना आमच्या घराण्यापुरता तरी आपला पडदानशीनपणा सोडावा लागला, हें सहजच आहे. अशा गोष्टी केवळ देवाण घेवाण ह्या व्यापारी तत्त्वानें किंबहुना आधुनिक सुधारकांच्या शुद्ध बुद्धिवादानेंही घडून येण्यासारख्या नसतात. अंतःकरणाचा जिव्हाळा, हेतूचा शुद्धपणा आणि अकृत्रिम प्रेम हा सर्व सुधारणांचा अढळ पाया होय. ह्याच तत्त्वावर आमच्या घराण्याला त्या जुन्या काळीं व जमखंडीसारख्या मागासलेल्या अथवा कानाकोपऱ्यांतल्या प्रांतीं एवढी प्रागतिकता राखतां आली. आणि तींच शुद्ध स्नेहाचीं तत्त्वें माझ्या हायस्कूलच्या काळांत माझ्या स्नेह्यांशीं आमच्या परस्पर वर्तनांत होती.

पडदा, शिक्षण, जातिभेद वगैरेंचे बाबतींत इतकी प्रगति करून आमच्या विवाहाचे बाबतींत मात्र बाबांनीं असा अविचार कां केला ह्यांचा वरील कारणांवरून खुलासा होण्यासारखा आहे. तो असा कीं, त्यांची प्रागतिकता केवळ नवीन बुद्धिवादावर किंवा विचारावरून अवलंबून नव्हती. ती निर्मळ अंतः-

करणावर व दांभिकपणाच्या अभावावर अवलंबून होती आणि ह्याच वळणानुसार माझेंही वर्तन घडत होतें.

हायस्कूलमध्यें नवीन वाङ्मय, नवीन विषयांचें अध्ययन व नवीन संस्कृतीचा परिचय घडल्यामुळें माझ्या स्वतःमध्यें कांहीं अंशीं बुद्धिवादाचा अंकूर दिसूं लागला होता. तो हायस्कूलचा काळ संपल्यावर—म्हणजे मॅट्रिकची परीक्षा पास होऊन मी कॉलेजांत गेल्यावर अर्थात् जोरानें फोंफावूं लागला. पण सातव्या यत्तेंत असतांना त्या बुद्धिवादाची पूर्वचिन्हें थोडींशीं माझ्या वर्तनांत दिसूं लागलीं होतीं. घरीं माझें वजन घरगुती बाबतींत बाबांवरही पडूं लागलें. त्यामुळें त्यांनीं माझी धाकटी बहीण मुक्ताबाई हिच्या विवाहाची घाई केली नाहीं. एरवीं उपवर होण्यापूर्वी मुलींचें लग्न झालेंच पाहिजे, ह्या समजुतीला जर आईबाबा चिकटले असते तर मुक्ताबाईचें लग्न माझ्या आणि जनाक्काच्या प्रमाणें त्यांनीं लहानपणींच उरकून घेतलें असतें. मुक्ताबाईचें लग्न ती जवळ जवळ १४ वर्षांची झाल्यावर झालें. त्यावेळीं मी कॉलेजांत होतों. असो.

**सहृदयता**

मी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला पुणें सेंटरला बसून इ. स. १८९१ च्या नवंबर–डिसेंबर मध्यें पास झालों. त्या वेळीं माझें वय १८ वर्षांचें होतें. ह्या कोवळ्या वयांत आणि मागासलेल्या कर्नाटक प्रांतांतील जमखंडीसारख्या एका छोट्या ब्राह्मणी संस्कृतीच्या संस्थानांत त्या जुन्या काळांत माझ्या हातून सामाजिक सुधारणेचे जाणूनबुजून प्रयत्न होण्याचा प्रश्न नव्हता. वर ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या केवळ माझ्या भावी सुधारणेचीं पूर्व चिन्हें एवढ्याच अर्थानें सांगितल्या आहेत. पण ह्यांत एका महत्त्वाच्या तत्त्वाचा येथेंच निर्देश करणें बरें वाटतें. तें तत्त्व म्हणजे सामाजिक असो अगर धार्मिक असो कोणत्याही खऱ्या सुधारणेचें मूळ कारण शुद्ध बुद्धिवाद आहे किंवा सहृदयता आहे ह्याचा निर्णय हें होय. पण ह्या निर्ण-

याचे बाबतींत माझा कल दुसऱ्या कारणाकडे म्हणजे सहृदयतेकडे जास्त आहे. हीच गोष्ट मीं वर लिहिलेल्या आठवणींतून बऱ्याच अंशीं सिद्ध होऊं पाहते. निदान त्या वेळच्या माझ्या हायस्कूलच्या शिक्षणांत तरी शुद्ध बुद्धिवादाचा प्रादुर्भाव करून देणारे विषय म्हणजे रसायनशास्त्र आणि खगोलशास्त्र ह्यांच्या मूलतत्त्वांचीं लहान पुस्तकेंच होत. एका वर्षांत ह्यांची शिकवण ती काय आणि त्यामुळें माझ्या विचारसरणीस निराळें वळण लागणें फारसें संभवनीय नव्हतें. ह्यावरून असें दिसतें कीं, माझ्या आणि माझ्या आईबाबांच्या वर्तनांतील वर सांगितलेला उदारपणा व प्रागतिकपणा ह्याचें कारण माझी व त्यांची सहृदयता, न्यायाकडे प्रवृत्ति, आणि दांभिकपणाचा तिटकारा हेच गुण होते. मी पुढें कॉलेजांत गेल्यावर ह्या स्वाभाविक गुणांत बुद्धिवादाची भर पडली एवढेंच फार तर म्हणतां येईल.

**इतराजी**

मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यावर पुढील सबंध वर्ष पुढें काय करावें या विवंचनेंत गेलें. नौकरी पाहण्यासाठीं बेळगांवांस सुमारें सहा महिने काढले. तरी कोठें दाद लागेना. शेवटीं जमखंडी हायस्कुलांत शिक्षकाची जागा रिकामी झाली म्हणून हेडमास्तर श्री. त्रिंबकराव खांडेकर यांनीं मला जमखंडीस बोलावून घेतलें; आणि रिकामी जागा मला दिली. इंग्रजी २ ऱ्या यत्तेवर २।३ महिने काम केलें नाहीं तोंच श्रीमंत सरकारांनीं मला रामतीर्थास बोलावून नेलें व मुंबईस व्हेटरनरी कॉलेजमध्यें स्कॉलरशिप देऊन पाठवितो असें म्हणाले. पण मी त्यावेळीं उत्तर दिलें कीं, ‘ मला जनावराचा डॉक्टर व्हावयाचें नाहीं. आर्टस् कॉलेजमधील स्कॉलरशिप दिल्यास जावयास तयार आहे. ’ यावरून यजमानास राग येऊन त्यांनीं मला तावडतोब नोकरीवरून दूर केलें आणि दिपवाळीचा पगारही दिला नाहीं. कांहीं अपराध नसतां असें झाल्यामुळें मला फारच वाईट वाटलें.

# भाग पांचवा : 'कॉलेज शिक्षणाचा काल'

## प्रकरण २१ वें

### कॉलेज–प्रवेश

इ. स. १८९३ चे आरंभापासून तो इ. स. १८९८ अखेर सहा वर्षे मी पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजमध्यें होतों. ह्या काळाचे दोन भाग पडतात. प्रिव्हियस आणि इंटरमिजियट परीक्षांचा पहिला भाग; आणि बी. ए. आणि एल्. एल्. बी. च्या परीक्षेचा दुसरा भाग. ह्या दोन भागांत माझ्या घरची स्थिति, सांपत्तिक स्थिति, मनःस्थिति व देशस्थिति वगैरे अनेक कारणांमुळें बराच भेद पडला आहे.

घरची अत्यंत गरिबी, तशांत मागें सांगितल्याप्रमाणें जमखंडीच्या ब्राह्मण संस्थानिकांशीं वाद होऊन त्यांनीं आपल्या हायस्कुलांतून शिक्षकाचे नोकरीवरून एकदम कमी केल्यामुळें निराधार होऊन मी पुण्यासारख्या विस्तीर्ण शहरांत कोणाची ओळख ना पाळख असा आलेला. त्या माझा फर्ग्युसन कॉलेजमध्यें कसा प्रवेश मिळाला ह्याचें मला अद्यापि आश्चर्य वाटतें. हायस्कुलांतील सहाव्या यत्तेंतील माझे शिक्षक रा. वासुदेवराव चिरमुले बी. ए. ह्यांनीं, पुणें येथें गरीब मराठा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे बाबतींत मदत करणारी एक संस्था आहे, असें सांगितलें म्हणून केवळ माझे नशीबाची परीक्षा करण्याकरितां मी ह्या अफाट शहरांत कसा तरी येऊन पडलों.

त्यावेळीं माझ्या वयाचें विसावें वर्ष देखील अद्यापि पुरें झालें नव्हतें. मॅट्रिकच्या परीक्षेकरितां मी पुण्यास इ. स. १८९१ चे अखेरीस फार तर एक आठवडा राहिलों असेन. पण परीक्षेच्या घाईत

ह्या शहरांतील परीक्षेच्या मंडपापलीकडे अधिक माहिती होणें संभवनीय नव्हतें. आमचे हायस्कूलचे हेडमास्तर रा. त्रिंबकराव खांडेकर ह्यांना मी आवडत असें. माझी नोकरीवरून कांहीं अपराध नसतां श्रीमंत संस्थानिकांनीं एकदम हाकालपट्टी केली ह्याबद्दल त्यांना वाईट वाटलें; पण त्यांनाही मराठ्यांना कॉलेजांत स्कॉलरशिप देणाऱ्या पुणें येथील संस्थेची कांहींच माहिती नव्हती. रा. चिरमुले ह्यांनीं दिलेली अगदींच त्रोटक व अपुरी माहिती सांगितल्यावर त्रिंबकराव खांडेकरांचे एक बंधु पुण्यास वकील होते; त्यांना एकादें माझ्या ओळखीचें पत्र दिलें असेल कीं काय हेंही मला आतां आठवत नाहीं. ह्या वकिलाचा एक मुलगा जमखंडी हायस्कुलांत शिकण्यासाठीं कदाचित् आपल्या चुलत्यांकडे राहण्यासाठीं आला असावा; त्याचेशीं थोडी माझी ओळख होती. पण त्याची भेट होऊन त्याच्याकडून किंवा त्याच्या वडिलांकडून मला विशेष मदत झाली असेल असें कांहीं मला वाटत नाहीं. पुण्यास गरीब मराठ्यांना कॉलेजांत मदत करणारी डेक्कन मराठा असोशिएशन नांवाची संस्था आहे व तिचे संस्थापक व सेक्रेटरी रा. गंगाराम भाऊ म्हस्के ह्या नांवाचे एक मराठा जातीचे इंग्रजी शिकलेले पुढारी गृहस्थ प्रसिद्ध वकील आहेत वगैरे माहिती रा. खांडेकर वकिलांनीं मला दिली असावी. तरी पण पुण्यास आलेल्या माझी खेडवळाची कोणीं कशी राहण्याची तात्पुरती कां होईना सोय केली हें कांहींच मला आठवत नाहीं. ह्यावेळीं सदाशिव पेठेंतल्या हौदाच्या रस्त्यावरील फडतरेच्या वाड्यांत मी थोडे दिवस होतों. एवढींच अंधुक आठवण मला आतां येत आहे.

**गं. भा. म्हस्के**

गंगाराम भाऊ म्हस्के ह्या गृहस्थाचे मराठा जातीवर मोठे उपकार आहेत. त्या पूर्वकाळचे एक फरडे इंग्रजी शिकलेले, सुधारकी बाण्याचे हुषार वकील अशी ह्यांची प्रसिद्धि होती. ह्यांचे पुणें लष्करांत मेनस्ट्रीटवर मोठें चांगलें स्वतःचें घर आहे. रानडे,

भांडारकर, वगैरे त्या काळच्या सुधारक पक्षांत ह्यांची चांगली मान्यता होती. वकिलींत ह्यांनीं बरेच पैसे मिळविले होते. हिराबागेंत असलेल्या कॉस्मॉपॉलिटन क्लबच्या दिवाणखान्यांत पुण्याच्या तत्कालीन मोठमोठया माणसांच्या मोठमोठया तैल तसविरी टांगल्या आहेत. त्यांत ह्यांचीही एक तसबीर अद्याप लटकत आहे. ह्यांची मराठे संस्थानिक, राजे व इतर जातींचे प्रागतिक शिक्षणप्रेमी श्रीमंत गृहस्थांत त्या काळीं छाप होती. त्यांच्याकडून मदत घेऊन ह्यांनीं व ह्यांचे दुसरे एक लष्करांत राहणारे राजन्ना लिंगो नांवाच्या वकिलांनीं ही ' डेक्कन मराठा असोशिएशन ' संस्था काढली होती. पण ही सारी माहिती माझेसारख्या पुण्यांत नवीनच आलेल्या तरुणाला त्यावेळीं असणें शक्य नव्हतें.

एके दिवशीं रा. म्हस्केसाहेबांना भेटावयाला मी पुणें लष्करांत गेलों. त्यावेळीं पुण्याशिवाय त्या तोडीचें दुसरें शहर मीं पाहिलें नव्हतें. त्यामुळें मेनस्ट्रीटचा भव्य रस्ता त्यांतील दोन तीन मजली घरें, परदेशी मालांनीं भरलेलीं तेथील बोहऱ्यांचीं दुकानें आणि इतर लष्करांतील रस्ते व शोभा पाहूनच माझे डोळे दिपले होते! अशा स्थितींत मी रा. म्हस्के यांच्या दिवाणखान्यांत येऊन पोंचलों.

**स्कॉलरशिप**

म्हस्केसाहेब त्यावेळीं आपल्या नेहमींच्या आरामखुर्चीत पाय पसरून उताणे पडले होते. दिवाणखान्यांत अगदीं अलीकडच्या पद्धतीची पूर्ण सजावट केलेली होती. दिवाणखाना ऐसपैस लांबरुंद व हवाशीर असून चांगल्या सतरंजीची व वरती कांहीं गालीच्यांची बिछायत होती. मधोमध एक गोल टेबल आणि इकडे तिकडे बऱ्याच मऊ खुर्च्या तसेंच साध्या खुर्च्यांची चंगळ होती. ह्यावरून म्हस्केसाहेब हे एक पुण्यांतील सुशिक्षित संभावितांतले एक पुढारी होते, ह्याची खात्री झाली. हे घरच्या पोषाखांत म्हणजे धोतर आणि सदरा ह्यांत होते. पण तोंडांत एक मोठा अस्सल विदेशी चिरूट होता. त्याचा विपुल धूर सोडीत, खालीं पिकदाणींत थुंकत आणि चिरुटाची राख जवळच्या एका

लहानशा टेबलावरील रक्षापात्रांत टाकीत स्वारी अगदीं एकटी आराम करीत होती. चेहरा गंभीर, वागणूक खरोखर संभावीत होती. मला खुर्चीवर जवळच बसावयास सांगून भाषण सर्व आपण इंग्रजींत केलें. पण तें सर्व ओठांतून—निदान दातांतून चिरूट न सोडतांच केलें. साधी विडीही आमच्या जमखंडींत न पाहिलेला मी गांवढळ हा मोठा चिरुट तोंडांत खोवलेला व बोलतांना हेलकावे खाणारा पण खालीं न पडणारा पाहून, माझें लक्ष बोलण्यापेक्षां त्या चिरुटाकडेच किंचित जास्त लागलें! एकंदरींत म्हस्केसाहेबांनीं मला बरें वागविलें. स्कॉलरशिप मात्र दरमहा दहा रुपयांचीच देणें शक्य होतें असें सांगितलें. कांहीं असो, माझी कॉलेजांत जाण्याची कशीबशी सोय होईल अशी आशा उत्पन्न झाली. पण ह्यापलीकडे राहण्याची किंवा अभ्यासाची दुसरी कसलीही सोय म्हस्केसाहेबांनीं केली नाहीं किंवा विचारपूस किंवा कळकळ दाखविली नाहीं. एखाद्या युरोपियन सभ्य गृहस्थाचें वर्तन ज्याप्रमाणें एकाद्या नेटिव्ह माणसाशीं बेतानेंच असतें तशीच त्यांची ढब दिसली. रंगानें ते सावळे जवळजवळ काळेच होते. एरवीं सर्व थाट युरोपिअन वळणाचा दिसला.

त्या पूर्वकाळांत मराठ्यांत इतका इंग्रजी शिकलेला गृहस्थ हा एकटाच होता. इतकेंच नव्हे तर वकिलींतही बराच पुढारलेला आणि तत्कालीन नागरिकांत मान्यता पावलेला होता हें माझ्या तेव्हां लक्षांत आलें नाहीं. कारण ही तुलना करण्याइतकी मला पुण्याची माहिती नव्हती. ज्या म्हस्केसाहेबांच्या प्रयत्नानें आज शेंकडो मराठे पदवीधर झाले, त्यांपैकीं एकही आज पुण्यांतल्या समाजांत अशा मान्यतेनें राहत नाहीं. ते म्हस्केसाहेब त्यावेळीं कसे राहूं शकले ही एक मननीय गोष्ट आहे.

कॉलेजांत माझी हजेरी कशीतरी एकदां लागली. फर्ग्युसन कॉलेज त्यावेळीं पुणें शहरांत शनिवार पेठेंतील गद्रे ह्यांच्या विस्तीर्ण जुन्या वाड्यांत होतें. हें कॉलेज माझ्यासारख्या गरिबांकरितांच होतें. हें नसतें तर डेक्कन कॉलेजसारख्या

**फर्ग्युसन कॉलेज**

भारी खर्चाच्या संस्थेंत माझा प्रवेश अशा तुटपुंज्या स्कॉलरशिपनें झाला नसता फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल वामन शिवराम आपटे (संस्कृत कोशकार) हे मी जाण्यापूर्वींच वारले असल्यामुळें त्यांचे जागीं प्रसिद्ध सुधारक रा. गोपाळ कृष्ण आगरकर हे होते. हे गांवांत न राहतां गांवाच्या पश्चिम बाजूस ज्या विस्तीर्ण जागीं हल्लीं कॉलेजच्या स्वतःच्या इमारती आहेत त्या जागेवर एक झोपडें बांधून राहत असत. त्या झोपडीशिवाय आजूबाजूंस त्या काळीं एकही वसतीचें चिन्ह दिसत नव्हतें. दरमहा दहा रुपये स्कॉलरशिपमध्यें माझा त्या वेळींही कॉलेजचा खर्च भागण्याचें मुष्किल होतें. कारण कॉलेजची फी दरमहा ५ रु. वजा जातां माझ्या हातीं ५ रुपयेच उरत! म्हणून कॉलेजची फी माफ करण्याबद्दल मी एक अर्ज घेऊन प्रिन्सिपॉल आगरकर ह्यांना भेटावयाला गेलों.

आगरकर मोठे सुधारकाग्रणी ही कीर्ति माझ्या कानावर जमखंडीस असतांनाच आली होती. इतकेंच नव्हे तर इ. स. १८९२ सालींच मी जमखंडी शाळेंत शिक्षक असतांना त्यांचे सुधारकपत्रांतले सणसणीत लेख माझ्या वाचनांत येऊन माझीं मतें झपाट्यानें सुधारणेच्या बाजूचीं बनत चाललीं होतीं. रा. गंगाराम भाऊ म्हस्के हे सुधारक आणि वकीलही होते. त्यांना पाहून पुणेरी सुधारक म्हणजे कसे असतात ह्याविषयीं मला कांहींशी कल्पना आली होती. पण आगरकरांना प्रथम पाहिल्यावर त्या देखाव्याचा माझ्या ह्या कल्पनेशीं नीट मेळ बसेना.

**प्रिं. आगरकर**

माझ्या भेटीची वेळ सकाळीं नऊ वाजण्याच्या सुमाराची होती. दिवस अर्थात् हिवाळ्याचे होते. आगरकर दमेकरी कायमचेच होते. ते झोपडीचे बाहेर आंगणांत उन्हांत उभे होते. लोकरीचा जवळजवळ फाटलेला काळा मळकट कोट, चित्पावनी थाटाचें नेसलेलें धोतर, लहानशा शेंडीचे थोडेसे विखुरलेले केस, पायांत आगरकरी सुधारणेचा जोडा—म्हणजे ब्राह्मणी जोडाच-

पण त्याचें टाचेवरचें कातडें टाचेच्या मागें उभें वर आलेलें, मुद्रा बरीच त्रासलेली, भिवयाचे केस दाट किंचित् खोल व भेदक असें हें प्रथम दर्शन घडलें. माझा अर्ज पाहून, मला डेक्कन मराठा असोशिएशनची स्कॉलरशिप मिळत आहे हें ऐकल्याबरोबर स्वारीनें मला फी माफ व्हावयाची नाहीं हें निर्भीडपणें सांगितलें. उगाच नादाला लावण्यापेक्षां त्यांचें हें तडकाफडकी उत्तर एका रीतीनें योग्यच होतें. पण मजवर मात्र त्या उत्तराचा परिणाम बरा झाला नाहीं. आधींच त्यांचा एकंदर पोषाख व मुद्रा पाहून, त्यांच्या सुधारकी कीर्तीमुळें मी जी भलतीच कल्पना करून घेतली होती ती ढासळली होती. आणि त्यावर हा नकाराचा बॉंब मजवर आदळल्यामुळें आगरकरांविषयीं माझा ग्रह अनुकूल झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर हा ग्रह कॉलेजच्या इतर प्रोफेसरांशीं माझा पुढें जो अत्यल्प प्रत्यक्ष संबंध आला त्यामुळें कांहीं म्हणण्यासारखा दुरुस्त झाला नाहीं. खरोखर पाहतां ह्यांत आगरकरांचा, इतर प्रोफेसरांचा किंवा कॉलेजच्या इतर परिस्थितीचा कांहींच दोष नव्हता. केवळ ह्या निराशेला माझाच अजाणपणा व अननुभवीपणा हेंच कारण होय !

---

# प्रकरण २२ वें

## प्रिव्हीयसचें वर्ष

मी जमखंडी येथील हायस्कुलांत पहिल्या यत्तेंत इ. स. १८८५ सालीं गेलों त्यावेळीं तें हायस्कूल झालें नव्हतें. त्याचप्रमाणें **कॉलेजचा पसारा** मी फर्ग्युसन कॉलेजांतील पहिल्या म्हणजे प्रिव्हियसच्या वर्गांत इ. स. १८९३ सालाचे आरंभीं गेलों; तेव्हां

तें कॉलेज फुलग्रेड कॉलेज झालें होतें कीं नाहीं हें मला आठवत नाहीं. निदान बी. ए. चा वर्ग त्यावेळीं असला तरी तो सुरू होऊन फार वर्षें झालीं असतील असें मला वाटत नाहीं. कॉलेज पुणें गांवांत शनिवार पेठेंतील गद्रे ह्यांच्या वाड्यांत भरत होतें, त्यांतच न्यू इंग्लिश स्कूलही भरत होतें. त्याला लागूनच होळकरांचा मोठा वाडाही आहे. तो मी पुढें इंटरमिजिएट वर्गांत गेल्यावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे आला होता. त्यावेळीं शिक्षणासाठीं ह्या मंडळीच्या एवढ्याच इमारती होत्या. खेळण्यासाठीं पुढें लवकरच नारायण पेठेंतील नदीजवळचा कबूतरखानाही मिळाला असावा. कारण आम्ही इंटरमिजिएटमध्यें असतांना तेथें फुटबॉल खेळत होतों.

**व्याख्यान पद्धति**

प्रिव्हियसचा क्लास त्यावेळीं गद्रेवाड्याच्या समोरच्या मोठ्या दिवाणखान्यांत भरत असे. आमच्या वेळीं देखील हा भव्य दिवाणखाना भरेल इतके सुमारें ६०।७५ विद्यार्थी तरी असत. ह्या वर्गांत पोट तुकड्या नव्हत्या. त्यामुळें हा क्लास म्हणजे एक मेंढवाडाच दिसत असे. मराठी प्राथमिक शाळा सोडून जमखंडीस हायस्कुलांत गेल्यावर मला जसें नव्या जगांत व संस्कृतींत स्थित्यंतर झाल्याप्रमाणें वाटलें तसें येथें झालें. कॉलेजांतल्या शिक्षणाच्या फरकाचें मुख्य लक्षण म्हणजे व्याख्यानपद्धति ही होय. ही पद्धत बरी असो वाईट असो, शें–पन्नास मुलांनीं एका उंच पीठावर बसलेल्या अगर उभ्या असलेल्या शिक्षकाचें निरुपण अगर प्रवचन ऐकत बसणें म्हणजे हायस्कूल मधल्या वैयक्तिक पद्धतीला मुकणेंच होय. हायस्कुलांत तीस मुलांपेक्षां अधिक शिष्यसमुदाय असणें शक्य व इष्ट नाहीं. कॉलेजांत ह्या संख्येला आळाच नसतो. त्यामुळें शिक्षकाचा शिष्याशीं व्यक्तिगत संबंध तुटतो आणि विद्यार्थी धागा तुटलेल्या पतंगाप्रमाणें शिक्षकापासून किती लांब गेला असतो हें शिक्षकास कळणें जवळजवळ अशक्य होतें. तथापि आम्ही व्याख्यान ऐकणारे सभ्य गृहस्थ (Gentlemen) झालों ही भावना कॉलेजांत

गेल्याबरोबर प्रसवून एक प्रकारची आढ्यता येत असेल खरी. पण तिनें खरा आध्यात्मिक–किंबहुना नुसता बौद्धिक लाभ घडत नाहीं हें माझ्या अनुभवास लवकरच येऊं लागलें. तें कसेंही असलें तरी आमच्या ह्या नवीन आढ्यतेची एक मौजेची गोष्ट आठवते; ती अशी—

**मॅग्नाचार्टा**

शेपन्नास मुलांची हजेरी रोज घेणें आवश्य होतें. कारण विश्वविद्यालयाच्या परीक्षेला बसण्यापूर्वी अमूक दिवसांची हजेरी ( टर्म ) कॉलेजांत भरली आहे असा दाखला विद्यार्थ्याला विद्यालयास द्यावयाचा असतो. प्रोफेसराचा वेळ हजेरी घेण्यांत जाऊं नये म्हणून हें काम ह्या कॉलेजचे श्री. दीक्षित नांवाचे एक अनुभविक कारकून असत त्यांचेकडे असे. हे भले धिप्पाड गृहस्थ न्यू इंग्लिश स्कूलमध्यें ड्रिलही शिकवीत असत. त्यामुळें हें लष्करी कुऱ्यांत हजेरी घेत. ह्यांचा आवाज दणकट व एकंदरीत चर्या उग्रट होती; आणि ह्या गोष्टीची जाणीव दुर्दैवानें त्यांच्यांत किंचित वाजवीपेक्षां जास्त होती. म्हणून त्यांची वागणूक विद्यार्थ्यांशीं–विशेषतः बाहेरगांवच्या नवख्याशीं–थोडीशी चढेलपणाची व उर्मटपणाची होती. प्रत्येक विद्यार्थ्यांचें नांव पुकारल्यावर विद्यार्थ्यांनीं Present Sir असें सभ्यपणाचें उत्तर द्यावयाचें असते. ही स्वारी विद्यार्थ्यांचें नांव पुकारतांना त्यांच्या मागें मिस्टर हे सभ्यतादर्शक उपपद लावण्याचा कंटाळा दाखवूं लागली. पण विद्यार्थ्यांना आपण सभ्य गृहस्थ आहोंत ही जाणीव होती. " मिस्टर " नांवामागें न ऐकूं आल्यास Sir ( महाराज ) हे Present ( हजर ) ह्या उत्तरापुढें लावण्याची ही सभ्य मंडळीं अर्थातच टाळूं लागली. शेवटीं हें प्रकरण प्रिन्सिपॉलपर्यंत जाऊन ह्या ड्रिल ( कवाईत ) शिकविणाऱ्या कारकूनजीला विद्यार्थ्यांच्या नांवावागें मिस्टर हे पद जरूर लावण्याचा धडा शिकावा लागला! आणि अशा प्रकारें आम्हां विद्यार्थ्यांनाही आम्ही सभ्य गृहस्थ आहोंत ह्याबद्दलचा मॅग्नाचार्टा–पुराव्याचा पट्टा–मिळाला!

सभ्य गृहस्थपणाचें तिसरें लक्षण म्हणजे हायस्कूलप्रमाणें कॉलेजांत

**लाजाळूवृत्ति**

शिक्षकांपुढें ५।६ तास रोज डांबून बसण्याची आवश्यकता नव्हती. दोन तीन तास दोन तीन विषयांवर फार तर व्याख्यानें ऐकलीं कीं, आम्ही सभ्य गृहस्थ झालों मोकळें ! मग वाटल्यास पुस्तकांत डोकें खुपसून बसा, किंवा खेळाच्या मैदानांत बागडा किंवा गांवांतून उनाडक्या करा, कोणी कोणाला विचारणाराच नसें. सभ्यपणाच्या लक्षणांच्या एकाहून जास्त माळा इतराप्रमाणें माझ्याही गळ्यांत जरी पडल्या होत्या तरी मी कर्नाटकांतून नुकताच पुण्यासारख्या मिजासखोर शहरांत गेलेला गरीब खेडवळ विद्यार्थी, इतरासारखा व इतका एकदम कांहीं "सभ्य गृहस्थ" होण्याइतका धीट बनलों नाहीं. भेदरट, लाजाळू, अनोळखी असा मी सर्वांत मागच्या बाकांवर बसत असें. आणि ही संवय पुढें अनेक कारणांनीं शेवटपर्यंत कायम जडली.

आमच्या कॉलेजचें त्यावेळीं विद्यार्थि वसतिगृह नव्हतें. तें पुढें १८९५ सालीं कॉलेजची स्वतःची इमारत चतुःशिंगीच्या माळावर उभारल्यावर झालें. आणि तें झाल्यावरही माझ्यामध्यें निरंतर सुख मानून वास करणाऱ्या माझ्या दारिद्र्य मित्रानें तेथें राहाण्याची मला मनाई केली. अर्थात् मग मला शहरांत जेथें मिळेल तेथें माझ्या बिऱ्हाडाची सोय करावी लागली.

**पेंच–प्रसंग**

मला स्कॉलरशिप तर अवघी दरमहा १० रुपयांची! प्रिन्सिपालनें माझ्या फी माफीचा अर्ज तर देखत हुकूम धुडकावून लावला. दरमहा ५ रुपये कॉलेजची फी; तीही सगळ्या टर्मची अगाऊ ३० रुपये भरावयाची होती. शिवाय कॉलेजची पुस्तकें व इतर उपकरणें घ्यावयाची होतीच. मग खोली भाड्याला व खाणावळीला काय उरणार? मी ही सर्व आवश्यक सोय कशी लावली ह्याचा उलगडा मला आतां किती आठवण करून पाहिले तरी सुचत नाहीं. मी त्यावेळीं काय केलें ते एक हरीच जाणें! विशेष पेंच हा कीं, ज्या आगरकर महाशयांनीं मला नादारी दिली नाहीं; त्यांच्या सुधार-

कांतील लेख वाचून माझी अलीकडे कित्येक दिवसापूर्वीपासूनच त्या हरीवरील श्रद्धाही बरीच कमी कमी होत आली होती. पण ज्याअर्थी मी जगून वाचून राहिलों आणि बी. ए.; अर्धा एल. एल. बी. ही झालों त्या अर्थी ह्या सर्व सोयी झाल्या हें तर खासच. आणि ज्याअर्थीं तुरुंगांत कधीं गेलों नाहीं व आजारीही फारसा पडलों नाहीं त्याअर्थी मी कांहीं तरी उपाय केलें असावें. पण अशानें माझ्या वाचकांचें समाधान कसें होणार? ह्या प्रश्नामुळें आतां मी जो पेंचांत पडलों आहे तितका त्यावेळींही मी खास पडलों नाहीं. असो!

वरील प्रश्नास उत्तर म्हणजे त्यावेळची स्वस्ताई आणि त्यापेक्षांही निखालस उत्तर म्हणजे गरजा आणि उणीवा सहन करण्याची माझी अपार तयारी. माझ्या आईबाबांनीं विशेषतः ही माझी तयारी सगळ्या आयुष्यभर पुरून मागें मुलांबाळांस लागल्यास उरेल इतकी केली होती. मी पुण्यास आल्याबरोबर जरी कॉलेजांतला "सभ्य गृहस्थ" बनलों नाहीं तरी कशीही वेळ आल्यास वर्ष अखेर परीक्षा उतरण्याची तयारी ठेविली.

कोठून ओळख निघाली किंवा काढली तें कांहीं आतां आठवत नाहीं; पण लवकरच सदाशिव पेठेंतील ताडपत्रीकरांच्या वाड्यांतील ढेलजेंतील दोन खणांची एक खोली आम्हां तिघां जमखंडीच्या विद्यार्थ्यांना भाडें कांहीं न पडतां राहावयास फुकट मिळाली. आणि जरी भाडें पडलें असलें तरी ह्या दोन खणांस तिघांमिळून दरमहा आठ आण्यांपलीकडे जास्त पडणें शक्यच नव्हतें! हे तिघे विद्यार्थी म्हणजे जनुभाऊ करंदीकर ( रा. जनार्दन सखाराम करंदीकर ), काशिनाथ पोंक्षे आणि मी स्वतः! ह्याच खोलींत केव्हां केव्हां अभ्यास करावयाला विशेषतः आम्हां सर्वांच्या आवडीचें वर्गांत लावलेलें इंग्रजी पुस्तक जेन ऑस्टिनची कादंबरी 'प्राइड ॲन्ड प्रेज्युडीस' हें आमच्याबरोबर वाचावयाला वाईचे केशव रामचंद्र कानिटकर, 'फर्ग्युसन कॉलेज' चे भावी प्रसिद्ध प्रिन्सिपाल, हेही येत असत. बाहेरगांवचा ( पुण्याचा नव्हे हो ) हाच

तिघेजण

काय तो सोबती आणि मित्र आम्हां जमखंडीकरांना लाभला; आणि तो अद्यापि टिकला आहे. पण खुद्द पुण्याच्या एकाही विद्यार्थ्यानें अगर पुढें मोठा झाल्यावर गृहस्थानें आतांपर्यंत कोणीही आंगाशीं लावून घेतलें नाहीं. ह्याचें नांव पुणें!

**कॉलेजखर्च**

राहाण्याची सोय झाल्यावर अर्थात् खाणावळही पाहिलीच. दरमहा ५ रुपयांत, कदाचित् ४॥ ही असतील, खाणावळ भागे. भात, चपाती, वरण, भाजी, तूप, साखर सर्व कांहीं बेतानें पण असेच. दूध नाहीं तरी पुण्याचें नमुनेदार पारदर्शक ताक तरी असेच! आंघोळीला पाणी पुण्यांतील तेव्हांच्या हौदांत गल्लोगल्लीं थंडगार मुबलक मिळे. वाटेल तितक्या बादल्या टाळक्यावर ओतून घेतल्या तरी कोणी विचारीत नसत. पाण्याच्या बाबतींत पुण्याइतका सुखी गांव त्यावेळीं साऱ्या जगांत कोठें नसेल! बाकीचा चिल्लर खर्च आम्ही तिघांमध्यें अगदीं गोडी गुलाबीनें सहज वाटून घेत असूं. एकंदरींत त्यावेळचा माझा कॉलेजचा खर्च हल्लींच्या माझ्या मुलाच्या हायस्कूलच्यापेक्षां निम्याहूनही कमी येत असावा. एरवीं माझें शिक्षण झालेंच नसतें!

**काटकसर**

कॉलेजांत दरवर्षी दोन मोठ्या सुट्या होत्याच. त्यावेळीं घरीं येण्याजाण्याचा जो आगगाडीचा खर्च होई तो खाणावळीचा जो खर्च वाचे त्यांतून होई. कुडची स्टेशनावरून जमखंडीस जावयाला ३३ मैलांचा चांगला गाडीचा रस्ता आहे. कित्येक वेळां माझा सर्व बोजा घेऊन हा सर्व रस्ता मी पायींच केलेला मला नीट आठवत आहे. बैलगाडींत एका स्वारीला चार आण्यांपासून फार तर आठ आण्यांपर्यंत खर्च येई. तो वांचविण्यासाठीं मला हे ३३ मैल पायींच रखडावें लागे आजची तरुण मंडळी मुंबईत अर्धा मैल जावयाचें झाल्यास निदान एक आणा ट्रामला खर्चून वर दोन आण्यांचा

चहा पितात. एवढ्यांतच हात आटोपले तरी त्यांना काटकसरी म्हणण्यास मीही तयार आहे !

मला दरमहा दहा रुपयेप्रमाणें एक वर्षांत १२० रुपये स्कॉलरशिप मिळे. त्यांत साठ रुपये तर कॉलेजची फी झाली. बाकीच्या साठ रुपयांत जितके महिने पुण्यास राहत असें तितके ५ रु. तरी खाणावळीस द्यावे लागत. सुट्टींतले वाचलेले रुपये गांवीं जाण्यायेण्यास, खोलीभाड्यास आणि दिवाबत्ती, न्हावी, धोबी, वगैरे खर्चास आवश्यक असत. मग माझ्या कॉलेजच्या पुस्तकांला पैसे कोठून आणिले ह्याचा मला कांहींच थांग लागत नाहीं. जरूर तेवढींच पुस्तकें आमचीं स्वतःचीं निरनिराळीं असावींत; बाकीचीं कांहीं तिघांत मिळून होतीं. तरी एवढी जरूर तीं पुस्तकें मीं कशीं विकत घेतलीं असतील, मला आतां कांहींच आठवत नाहीं. मात्र मी तीं त्यांचीं किंमत कोणापासून चोरली नव्हती येवढेंच स्पष्ट आठवतें. अशा कठीण कात्रींत माझी कॉलेजची पहिलीं तीन वर्षें म्हणजे इंटरमिजिएटची दुसरी परीक्षा पास होईपर्यंत मीं दिवस काढले कसे तें ईश्वर जाणे !

**पैशांची टंचाई**

असें माझें हें गाडें वर्षभर कसें तरी रेटलें. माझी प्रिलिमिनरी म्हणजे कॉलेजांतील पूर्वीची चांचणी परीक्षा पास झाली. अर्थात् मला मुंबईच्या विश्वविद्यालयांतील पहिल्या प्रीव्हियस परीक्षेला बसावयाचें होतें. त्या परीक्षेची फी २० रुपये होती. ती कोठून आणावयाची हा मोठा तातडीचा प्रश्न पडला. परीक्षेचा फॉर्म ( अर्जाचा नमुना ) भरण्याचे दिवस आले. पण वीस रुपये कांहीं मजजवळ येईनात. मी गांगरलों ! वेळ कठीण आला. प्रीव्हियसच्याही पूर्वीची एक अधिकच परीक्षा मजपुढें आली म्हणावयाची ! शेवटीं हताश होऊन बसलों असतां एका गृहस्थानें एक विचार सुचविला. नरहरपंत नांवाचे एक गरीब ब्राह्मण गृहस्थ भटकीसाठीं ताडपत्रीकरांच्या वाड्यांत जात येत असत. त्यांचा व आम्हां विद्यार्थ्यांचा परिचय झाला होता. मी मराठा

असून इतका शिकलों ह्याचें त्यांना कदाचित् कौतुक वाटत असावें. मी ह्या पेचांत पडलों असें पाहून त्यांनीं मला आपल्या रावबहादूर नवलकर नांवाच्या एका परभू सुधारक गृहस्थाकडे नेलें. त्यांनीं मला परीक्षेच्या फीकरितां दोन रुपये दिले व माझी फार निकडीची गरज आहे म्हणून मला ताबडतोब मदत करावी अशा अर्थाची एक चिठ्ठी, आपल्या कांहीं मित्रांची नांवें मला कळवून, त्यांना दाखविण्यासाठीं दिली. परंतु ही चिठ्ठी घेऊन इतक्या जणांकडे जाणें मला फारच अवघड वाटूं लागलें. एकतर हीं माणसें फार मोठमोठीं होतीं. आणि त्यांचे बंगले शोधून काढून त्यांच्यापुढें जाऊन उभा राहिलों तरी ते मला कसें वागवितील ह्याची मला फारच भीति वाटूं लागली. कारण अशा प्रकारच्या याचनेचा माझ्या आयुष्यांतला हा अगदीं पहिलाच प्रसंग होता. रावबहादूर नवलकरांच्या घरीं देखील मला रा. नरहरपंतांनींच बळेंबळें नेलें होतें. त्यांनींच मला भरीस भरवून रावबहादूर महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, सरदार कुप्पुस्वामी मुदलियार, वकील राजन्ना लिंगो वगैरे मोठमोठ्या माणसांकडे पाठविलें. इतर कांहीं जणांकडे ही चिठ्ठी घेऊन उन्हातान्हांतून दीनवाणा होऊन फिरलों. पण त्या सर्वांचीं नांवें आतां आठवत नाहींत. रुपये सारे १४ च जमले. फी भरण्याची तर घाई अगदीं गळ्याला फांसासारखी लागली. अशा स्थितींत कधीं न विसरण्यासारखी गोष्ट घडली, ती अशी.

**डॉ. शेळके**

वरील चौदा रुपये जमविण्याकरितां मी ज्या गृहस्थांकडे गेलों त्यांत मराठा जातीचा कोणीच गृहस्थ नव्हता. प्रत्यक्ष म्हस्केसाहेबांकडे मी मुळींच गेलों नाहीं. कारण त्यांनीं आपल्या संस्थेंतून स्कॉलरशिप दिली, ह्याचेंच मला असह्य ओझें झालें होतें. फीला पुनः पैसे पाहिजेत हें दैन्य त्यांचेपुढें दाखविण्याचें धैर्य मला मुळींच होईना. सबंध वर्षभर मी जे काटकसरीचे हाल सोसले त्यापायीं मदत मागण्यास जर मी त्यांचेकडे कधींच गेलों नाहीं

तर मग आतां तरी कसें जावयाचें ! शेवटीं नरहरपंतांनीं डॉ. शेळके नांवाच्या एका मराठा जातीच्या गृहस्थाच्या घरीं जाण्याचा आग्रह केला. शुक्रवार पेठेंत बाळंत स्त्रियांसाठीं जो दवाखाना आतां आहे तेथें पूर्वीं म्युनिसिपालिटीचा एक दवाखाना होता. त्यांत शेळके हे डॉक्टर होते. हे मूळचे कोल्हापूरचे. तेथें त्यांचें एक घर आहे. ह्यांचेपुढें मी नवलकरांची चिठ्ठी ठेवल्याबरोबर त्यांनीं जें मला खरपूस तासडलें तें मला आमरण आठवील ! “ मराठ्यांच्या कुळांत जन्मून असं हें भिक्षापात्र फिरविण्याची तुला लाज वाटत नाहीं ? जवळ पैसे नसल्यास गुरें राखावींत. कशास शिकावें?...” वगैरे वगैरे. ती चिठ्ठीच नव्हे तर मजजवळचे १४ रुपयेही ह्या मराठा जमदग्नीपुढें ठेवून तेथून निसटावें असें मला झालें. अंगाला माझ्या घाम आला. असो.

**सौ. वहिणाबाई**

बाकीचे ६ रुपये आणि मुंबईला जाण्याचा खर्च ह्याबद्दल मला जी अनपेक्षित मदत झाली ती अशी— तेरदाळचे रा. विष्णुपंत देशपांडे हे माझे अत्यंत जिवलग बाळमित्र. माझ्यावर आलेली ही अडचण त्यांच्या लक्षांत आली. ते घरचे जरी श्रीमंत होते तरी ते स्वतः वयांत न आल्यानें त्यांचे हातीं पैसे खेळत नव्हते. त्यामुळें त्यांना तळमळ लागली. त्यांची प्रेमळ पत्नी सौ. वहिणाबाई यांना ही तळमळ पाहवेना. त्यांनीं आपल्या माहेरांकडून दिवाळींतील भाऊबीजेच्या ओवाळणींत मिळालेले २० रुपये रा. विष्णुपंतांमार्फत मला पोंचविले. जुन्या वळणांतील ही साध्वी बाई आपल्या नवऱ्याचा मी मोठा भाऊ असें समजून मजसमोर अद्यापि कधींही उभी राहिली नाहीं. असा हा खऱ्या कळकळीचा अपूर्व मासला होता. मात्र ह्यापुढें मीं स्वतःसाठीं कोणापुढें अशी भीक कधींच मागितली नाहीं. तरी आतांपर्यंत माझा व माझ्यावर अवलंबून असलेल्यांचा योगक्षेम चालला ह्याचें श्रेय डॉ. शेळके ह्यांनाच मला देणें बरें वाटतें ! परोपकारासाठीं पुढें लाखो रुपये जमविण्याची पात्रता व इच्छा

मला आली. ह्यांतही कदाचित् डॉ. शेळके ह्यांचाच हा विरोधी आशीर्वाद कारण झाला असेल, नसेल कशावरून ?

आमच्या वेळेला, आतांप्रमाणें, प्रिव्हीयसची परीक्षा कॉलेजांत घेत नसत. तिचेसाठीं आम्हांला मुंबईलाच जावें लागलें. त्या निमित्तानें मला ह्या मोहमई ऊर्फ मुंबईचें प्रथम दर्शन घडलें. ह्या प्रथम दर्शनाचा परिणाम मुळींच अनुकूल नव्हता. ह्याचें एक कारण आम्ही अगदीं ऐन परीक्षेच्या वेळींच मुंबईस आलों आणि जागेपणाचे बहुतेक तास अभ्यासांत किंवा परीक्षेचे पेपर्स लिहिण्यांतच जात. त्याशिवाय मुंबईची कोंडलेली गर्दीची वस्ती, समुद्र कांठची घामट हवा, मुंबईच्या लोकांचा आत्मशून्य वरपांगी स्वभाव इत्यादि अनेक कारणें होतीं. कांदेवाडींत खत्रे यांच्या चाळींत दोन खणाचे एका खोलींत आम्ही कांहींजणांनीं जागा घेतली. त्यावेळीं ह्या दोन खणांला चार रुपये भाडें पडलें. तें आम्हांला किती जास्त वाटलें ! पण आतां त्याच जागेला १२ रु. पेक्षां जास्त भाडें पडत असावें. रात्रंदिवस जागून कशीतरी परीक्षा देऊन मी फार वेळ न दवडितां सुट्टींत जमखंडीस गेलों. परीक्षेंत पास झाल्याचा निकाल जमखंडीस समजला. माझ्यापेक्षां माझ्या आईबाबांनाच फार आनंद झाला !

## प्रकरण २३ वें

## इंटरमिजिएटचें वर्ष

माझ्या हायस्कूलच्या काळापेक्षां कॉलेजचा काळ फार निराळा गेला. मराठी शाळेंतील प्राथमिक शिक्षण संपवून हायस्कूलमध्यें आल्यावर युगांतर

झाल्यासारखे वाटलें असें मागें लिहिलें आहे. कांहीं अंशीं तसाच अनुभव मी कॉलेजांत प्रवेश केल्यावर येथील शिक्षणाच्या नवेपणामुळें आला खरा; पण खरा निराळेपणा वेगळाच होता.

**उलटा प्रकार**

हायस्कुलांत गेल्यापासून आमच्या घरच्या सांपत्तिक परिस्थितीमुळें मला मोठी आपत्ति भोगावी लागली कशी ह्याचें वर्णन मीं केलेंच आहे. पण ही आपत्ति मी अजून लहान व मुग्ध असल्यामुळें मला तितकी जाणवली नाहीं. ती माझ्या आईबाबांस विशेषतः आईला जाणविली. मी त्यांच्या आश्रयाखालीं सुखांत (चैनींत) नाहीं तरी समाधानांत होतों. विशेषतः जमखंडीसारख्या मागासलेल्या ठिकाणच्या मानानें माझा अभ्यास व हुषारी फार चांगली असल्यामुळें व मला स्कॉलरशिप मिळत असल्यामुळें मी आनंदांत असें. आईबापांच्या सहवासाशिवाय माझ्या भोंवतालच्या मित्रमंडळीच्या सहवासामुळें माझा हायस्कुलचा सर्व काळ अगदीं मजेचा गेला. पण कॉलेजचा सर्व प्रकार ह्याच्या उलट घडला.

**गाढवी सवाष्णी**

प्रिव्हीयस परीक्षेंत मी पास झालों असें मला जमखंडीसच कळलें. कॉलेजची परीक्षा पास झालेला पहिलाच विद्यार्थी ह्या नात्यानें जमखंडी गांवांत माझी ख्याति अधिकच पसरली हें सर्व खरें. तरी मी जेव्हां पुण्यास परत येऊन मुंबई इलाख्यांतील प्रिव्हियसला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांमध्यें माझा नंबर कितवा आला आहे हें जेव्हां मला कळलें तेव्हां माझी मोठी निराशा झाली. माझा नंबर पहिल्या वर्गांत किंवा दुसऱ्या वर्गांत तर आलाच नव्हता पण तिसऱ्या वर्गांतही फारसा वर नव्हता; हें पाहून जमखंडीतील माझी हुषारी म्हणजे खेडेगांवांत गाढवी सवाष्णी ही म्हण प्रत्ययास आणून देणारीच एक चीज झाली. जमखंडी हायस्कूल म्हणजे एक क्षुद्र उंबराचें फळ. त्यांत भराऱ्या मारणारा मी एक किडा मुंबई विश्वविद्यालयाच्या विस्तीर्ण उघड्या आंगणांत आल्यावर माझें अल्पबळ मला कळून आलें! विश्वविद्यालयांत

चमकण्याची तयारी करून देण्याची पात्रता आमच्या त्या वेळच्या बिचाऱ्या जमखंडीच्या हायस्कुलांतच नव्हती, ती माझ्यामध्यें कोठून येणार ?

ह्याशिवाय कॉलेजशिक्षणांत मी निस्तेज होण्याची दुसरींही अनेक कारणें होती. माझ्या घरच्या गरिबीची जाणीव जी मला हायस्कुलांत घडली नाहीं ती पुण्यास मी एकटाच आईबापांपासून दूर राहूं लागल्यामुळें मोठ्या तीव्रपणानें भासूं लागली. शिवाय माझ्या लाजाळू स्वभावामुळें जमखंडींतलेच जे काय १।२ ओळखींचे सोबती होते, त्यांपलीकडे पुणेंकर विद्यार्थ्यांपैकीं कोणाशीं माझी मैत्री जमली नाहीं. जनार्दनपंत करंदीकर, विश्वनाथ पोंक्षे आणि मी ह्या तिघां जमखंडीच्या विद्यार्थ्यांपैकीं करंदीकर आणि मी दोघेच पास झालों. आणि पोंक्षे ह्यांना कॉलेजच्या शिक्षणाला मुकावें लागलें.

**कंगाल स्थिति**

हायस्कुलांत प्रत्येक वर्गांत थोड्या विद्यार्थ्यांशीं त्यांच्या वर्गांतील शिक्षकाचा प्रत्यक्ष संबंध घडतो. पण कॉलेजांत शेंकडो किंबहुना हजारो विद्यार्थी आणि हाताच्या बोटावर मोजण्याइतके व तेही दर विषयाला बदलणारे प्रोफेसर त्यामुळें त्यांच्याशीं विद्यार्थ्यांचा वैयक्तिक परिचय घडत नाहीं. आणि मी तर बाहेरगांवचा कानडी मुलखांतला लाजाळू व सामान्य विद्यार्थी ! फर्ग्युसन कॉलेजची त्या वेळची स्थितीही माझ्या स्वतःच्या स्थितीप्रमाणें कंगालच होती. वसतिगृह, क्रीडांगण वगैरे इतर उपकरणांचा व विद्यार्थ्यांनीं वरचेवर एकत्र जमण्याच्या प्रसंगाचा अभाव असल्यामुळें; त्यावेळची आमची—निदान माझी तरी—स्थिति जंगलांत चुकलेल्या कोंकराप्रमाणें असह्य भासत होती. इत्यादि अनेक कारणांमुळें कॉलेजच्या शिक्षणावर माझें प्रेम बसेना. हायस्कुलांतली मनाची तरतरी, गुप्त हौस हीं झपाट्यानें मावळूं लागलीं. अशांत घरगुती संकटांनीं एकदम उचल खाल्ली. आणि माझ्या सत्वाची चहूंकडून ह्या काळांत पारख चालली. त्यांतून मी कसा निभावलों ह्याचें मला अद्यापि नुसतें आश्चर्य मात्र वाटतें. पण नीट मीमांसा कांहीं होत नाहीं.

माझें कॉलेजांत येण्याचें कारण पर्यायानें जमखंडीच्या श्रीमंत संस्थानिकांची मजवर विनाकारण गैरमर्जी होऊन त्यांनीं मला हायस्कुलांतील शिक्षकाच्या नोकरीवरून दूर केलें हें मागें आलेंच आहे. जमखंडीचे यजमान श्री. आप्पासाहेब रामचंद्रराव येथेंच स्वस्थ न बसतां त्यांनीं माझ्या वडिलांनाही नोकरीवरून कमी केलें. त्यामुळें चहूंकडूनच आकाश फाटल्यासारखी स्थिति झाली. आणि पुण्यास माझा व जमखंडीस माझ्या घरचा योगक्षेम कसा चालला हें मला आतां कांहींच सांगता येत नाहीं !

अशा कठीण स्थितींत आणखी आकस्मिक संकट उद्भवलें. तें असें.

**जनाक्काचा छळ**

माझ्या दोन लहान बहिणींपैकीं मोठी बहिण जनाक्का हिचा सासरीं फार छळ होत होता. तिची सासू मोठी खाष्ट बाई होती आणि नवरा फार अविचारी व उर्मटपणानें वागत होता. ह्या सासूचा व नवऱ्याचा छळ जनाक्काच्या सासऱ्याला प्रत्यक्ष आवडत नव्हता, पण त्याचें कांहीं घरीं अशा बाबतींत चालत नसे. जनाक्का चार यत्तेपर्यंत लिहावयाला वाचावयाला शिकली होती आणि तिचा नवरा केवळ अक्षरशत्रु होता. येवढेंच ह्या छळाचें कारण होतें. घरीं पडेल तें सर्व काम उत्कृष्ट एकाद्या मोलकरणीप्रमाणें जरी जनाक्का आपल्या लहान वयांत बिनबोभाट करीत असे, तरी तिच्या सासूला तें खपत नसे. शेवटीं जनाक्काच्या नवऱ्याला बाहेरचा नाद लागून त्यानें घरीं एक द्वितीय संबंधाची बायकोही आणिली आणि जनाक्काच्या जिवाला अपाय घडण्याचेही वरचेवर प्रसंग येऊं लागले.

गोष्ट येथवर आल्यानें मला ह्या प्रकरणांत हात घालावा लागला. घरची गरिबी, माझ्या कॉलेजच्या खर्चाची ओढाताण अशा वेळीं मी जनाक्काची काय व्यवस्था करणार ? पण त्यावेळीं माझ्या सुधारणेच्या मताला आणि सामान्यतः स्त्रीजातीसंबंधीं कारुण्यालाही पूर येत चालला होता. अशा वेळीं माझ्या प्रत्यक्ष बहिणीवर तिची वागणूक इतकी

पवित्र व स्वभाव सहनशील असूनही असा प्रसंग आलेला पाहून मी बेफाम झालों. मी त्या वेळीं मे च्या सुटींत जमखंडीस आलों असेन. माझ्या कानावर जनाक्काच्या छळाची वार्ता विशेषतः तिच्या क्रूर नवऱ्यानें दुसरी बाई घरीं आणून ठेविली हे ऐकल्याबरोबर मी माझ्या आईबाबांनीं जनाक्काला एकदम आमचें घरीं आणावयाचा आग्रह केला. आमचे बाबाही मानीच होते. आम्हीं कोणींच ह्यापेक्षां मागचा पुढचा विचार जास्त न करितां, आमच्या आलगूरच्या मामांना माझ्या बहिणीला आसंगीहून आमचे घरीं आणण्याला पाठवून दिलें. त्यामुळें जनाक्काच्या सासूला व नवऱ्याला आयतेंच फावलें. त्यांनीं जनाक्काचे दागिने सर्व काढून घेऊन नेसलेल्या एका फाटक्या लुगड्यानिशीं मामांबरोबर तात्काळ पाठविली. त्यावर आम्ही जनाक्काला अखेरपर्यंत आसंगीला कधींच पाठविलें नाहीं. अगदीं लहानपणींच जनाक्का अशी आपल्या सासरला कायमचीच अंतरली. आणि ती केवळ अविवाहित जणूं आमचे घरीं राहिली.

ह्या पुढें कांहीं दिवसांनीं जनाक्काचा सासरा गोपाळराव हा तिला न्यावयाला आला, पण तिला सासरीं कोणत्याही प्रकारें सुख लागण्याची आशाच नव्हती. उलट तिच्या जिवालाच अपाय घडण्याची भीति होती म्हणून आम्ही तिला पाठविली नाहीं. गोपाळरावालाही विशेष आशा वाटत नव्हती म्हणून तो बिचाराही जास्त आग्रह न करितां निमूटपणानें आल्या पावलींच परत गेला. ह्या सर्व प्रकरणाला मीच कारण होतों म्हणून जनाक्काच्या पुढच्या सर्व आयुष्याची जबाबदारी माझ्या कोवळ्या शिरावर पडली. हें किती प्रचंड ओझें मी शिरावर घेतलें ह्याची मला त्या वेळीं कांहींच कल्पना नव्हती! ह्या वेळीं माझी इंटरमिजिएट क्लासांतली एक टर्म संपली असावी. पण मला हा काळ नक्की कोणता हें आतां आठवत नाहीं.

प्रीव्हियस परीक्षा पास होऊन मी पुण्यास आल्यावर प्रथम नारायण पेठेंत मुंजाबाचे बोळासमोरील केळकराचे वाड्यांत खोली घेतली होती. एक खोली मी आणि दुसरी कोल्हापूरचे रा. गोविंदराव शासने अशी जोड खोलींचे एक

दालन होतें. दुसरी विजापूरचे रा. गोविंदराव कलकेरी आणि कोल्हापूरचे रा. तळाशीकर ह्यांचें एक जोड खोलीचें दालन अशा चार खोल्या आम्हां चौघांमध्यें होत्या. अर्थात् मी ह्यावेळीं खोलीचें भाडें भरीत होतों; पण कसें तें मला सांगतां येत नाहीं. रा. शासने ह्यांची ओळख नक्की कोठें व कशी झाली हें मला आतां निश्चितपणें आठवत नाहीं. पण आरंभापासून अगदीं आतांपर्यंत टिकलेल्या अगदीं थोड्या मित्रांपैकीं ते एक म्हणजे चौघां मित्रांपैकीं ते एक आहेत. तेरदालचे विष्णुपंत देशपांडे हे इंग्रजी ५।६ व्या यत्तेपासून म्हणजे इ. स. १८९० पासून, प्रिन्सिपॉल केशव रामचंद्र कानिटकर हे प्रिव्हीयस वर्गापासून म्हणजे इ. स. १८९३ पासून आणि गोविंदराव शासने इंटरमिजिएट म्हणजे सन १८९४ पासूनच माझे मित्र आहेत. पहिले देशस्थ, दुसरे कोकणस्थ ब्राह्मण आणि तिसरे मराठा जातीचे आहेत. चौथे जनार्दनपंत करंदीकर हे तर माझ्या गांवचेच म्हणजे जमखंडीचे बाळमित्र आहेत. ह्यांपेक्षां जास्त कोणी लहानपणापासूनचे मित्र किंबहुना अलीकडचेही कोणी विशेष म्हणण्यासारखे समान वयाचे मित्र नाहींत.

**बाळमित्र**

शासने ह्यावेळीं पुणें नेटिव्ह इन्स्टिट्युशन नांवाच्या हायस्कुलांतील ७ व्या यत्तेंतील विद्यार्थी होते. वयानें माझेपेक्षां सुमारें वर्ष सहा महिन्यांनीं मोठे असावेत. हे दिलदार मनाचे मराठा मित्र लवकरच माझ्या घरांतल्या माणसांप्रमाणें मला जवळचे भासूं लागले. ‘समानशील व्यसनेषु सख्यम्’ ह्या न्यायानें सहज जो स्नेहसंबंध आम्हा दोघांचा जडला तो कायमचाच जडला. माझा स्वभाव तापट तर त्यांचा किरकिऱ्या! ह्या प्रकृतिदोषामुळें आमच्यांत नेहमीं कमीअधिक गोष्टीवरून वाद माजे व तो विकोपासही जाई. पण त्या मतभेदामुळें आमच्या स्नेहांत लवमात्रही बाधा येत नसे. गोविंदरावाची घरगुती स्थिति माझ्याप्रमाणें तंग नव्हती. त्यांचें

**रा. शासने**

वडील कोल्हापुरांतील एक घरंदाज फौजदार होते. खाऊन पिऊन सुखी घराणें होतें. माझीं उदार मतें व मोकळा स्वभाव यांवर लुब्ध होऊन गोविंदराव मजबरोबर राहूं लागले. ते आणि आम्ही जरी अभ्यासांत भिन्न वर्गांतले होतों, तरी परस्परांचा स्वाभाविक चांगुलपणा ओळखून होतों.

**स्वयंपाकव्रत**

ह्यावेळीं साहजिकपणें मला खर्चाचा फारच तुटवडा पडत असावा. कारण खाणावळींत न जातां मी घरींच माझा स्वयंपाक कांहीं दिवस करून जेवत होतों. आणि केवळ माझ्या-साठीं म्हणून गोविंदरावही कदाचित् माझेप्रमाणें स्वयंपाकी बनले असतील असे वाटतें. पण दुसऱ्या टर्ममध्यें परीक्षेचे दिवस जवळ येऊन अभ्यासाचा मारा जास्त पडल्यावर साहजिकच आम्हांला हें स्वयंपाकव्रत नाइलाजानें सोडावें लागलें. मी किंवा गोविंदराव कलेंत कधींच प्रवीण होण्यालायक नव्हतें. भात चांगला करीत असूं; पण गव्हाची पोळी मात्र खाण्यापेक्षां प्रदर्शनांत पाठविण्याच्या अधिक लायक होत असे. त्यामुळें प्रकृतीवरही परिणाम होऊन हा नाद आम्हीं सोडला.

**चैतन्य शून्यता**

माझ्या हायस्कूलच्या काळाच्या आठवणी लिहितांना माझे मित्र, खेळ, इतर छंद वगैरेसंबंधीं मला बरेच लिहितां आलें, तसें मला कॉलेजच्या काळासंबंधीं लिहितां येत नाहीं. ह्याचें कारण हेंच कीं दारिद्र्यामुळें व आईबापांच्या आश्रयापासून दूरच्या रहिवासामुळें माझ्या स्वभावांतला सहज आनंद बराच कमी झाला. किंबहुना मला अकालीं पोक्तपणा व विचारीपणाही आला. त्यामुळें माझा खेळकरपणा तर पार मावळलाच पण मला इतरांशीं मैत्री जोडण्याची हौस नाहींशी झाली! फार काय पण कॉलेजच्या वर्गांतील ठरीव अभ्यासावरील मनहीं उडूं लागलें. अभ्यास जुलमाच्या रामरामाप्रमाणें मला दुःसह झाला. त्यामुळें फर्ग्युसन कॉलेजबद्दलच नव्हे तर एकंदरींत तत्कालीन विश्वविद्यालयीन चैतन्यशून्य शिक्षणपद्धतीसंबंधीं विरक्ति आणि विमन-

स्कता माझ्यामध्यें वाढूं लागली. जमखंडी हायस्कुलांत पहिला नंबर म्हणून मिरवलेला मी फर्ग्युसन कॉलेजमध्यें कोठल्या कोनाकोपऱ्यांत बेपत्ता विद्यार्थी होऊन राहण्याची मला मनांत टोंचणी लागली. अभ्यासाची हयगय चाललेली माझ्या लक्षांतच येईना.

ठराविक अभ्यासाची वर सांगितल्याप्रमाणें अवस्था झाली तरी माझ्या मनाचा व बुद्धीचा विकास थांबला अशांतला

**बौद्धिक विकास** मुळींच प्रकार नव्हता. तें कधीं शक्यच नव्हतें. ह्याहीपेक्षां भयंकर आपत्ति मजवर पुढील आयुष्यांत कितीतरी कोसळल्या. तरी माझ्या मनाची अंतर्वाढ थांबणें शक्यच नव्हतें. सहज आनंद माझ्या मनोरचनेचा पायाच आहे असें आतां मला दिसूं लागलें आहे. माझ्या आनंदाला, शांतीला, समाधानाला—अतएव अंतर्विकासाला बाह्य उपाधींची मदत झाली नाहीं किंबहुना विरोधही झाला नाहीं, असो.

सोबती, खेळ, बाह्य सुखसोयी वगैरेची बाजू लंगडी पडली. तरी माझें खासगी वाचन त्या काळाच्या मानानें बरेंच चाललें होतें. जमखंडीसारख्या गांवढ्या गांवांतल्या हायस्कुलांत पुस्तकालयाची उणीव होती तितकी व तशी फर्ग्युसनसारख्या नवीन चालू झालेल्या कां होईना, पण कॉलेजांत असणें शक्य नव्हतें. प्रीव्हियस वर्गांत असतांनाच मला जॉन स्टुअर्ट मिल्लसारख्या तत्त्वज्ञानाचा आणि मेकॉलेसारख्या ऐतिहासिक निबंधकाराचा परिचय घडला. Liberty ( स्वातंत्र्य ); Utilitarianism ( उपयोगवाद, बहुजनहितवाद); Subjection of Women (स्त्रियांची गुलामगिरी ) वगैरे मिल्लचे प्रासादिक ग्रंथ मूळ इंग्रजींत वाचून कानांत वारें शिरलेल्या वासराप्रमाणें माझी स्थिति प्रीव्हियसमध्येंच झाली होती ! इंटरमिजियटमध्यें आल्यावर हर्बर्ट स्पेन्सरच्या Education (शिक्षण), Introduction of the Study of Sociology ( समाजशास्त्राच्या अध्ययनाचा परिचय) ह्या इंग्रजींतील मूळ ग्रंथांचें वाचन झालें. त्यावेळीं स्पेन्सरची चलती यूरोप–अमेरिकेंतच

नव्हे तर हिंदुस्थान व जपान ह्या पौरस्त्य देशांतही फार वैभवशाली आणि विजयी झाली होती. बहुतेक त्या काळचे कॉलेजांतले शिक्षक स्पेन्सरच्या अज्ञेयवादानें जवळ जवळ झपाटल्याप्रमाणेंच झालें होतें. दाभोळकर नांवाच्या एका गृहस्थांनीं तत्कालीन तरुण विद्वान् गृहस्थाकडून स्पेन्सरच्या बऱ्याच ग्रंथांची भाषांतरमाला प्रसिद्ध करण्याचें काम नेटानें चालविलें होतें. त्यांपैकीं बरींच पुस्तकें मी हावऱ्या हावऱ्यासारखें वाचीत असें.

**नास्तिकपणा**

जेथें आमचे गुरुच त्या नवीन विचारानें असें हैराण झालेलें, मग माझ्यासारख्या उतावळ्या विद्यार्थ्यांची अव्यवस्था झाली म्हणावयाला काय हरकत आहे. पुस्तकें जरी मी म्हणण्यासारखीं पुष्कळशीं वाचलीं नसलीं तरी जीं तात्विक महत्वाचीं वाचलीं त्यांचा माझ्यामध्यें अभिनिवेश फार जोराचा घडला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जमखंडींतल्या आमच्या वाड्यांतल्या अंधेरी देवघरांत बसून श्रीशिवलीलामृतांचें पारायण करीत शिवलिंगावर श्रावणी सोमवारीं सहस्रदळें वाहिल्याशिवाय तोंडांत पाणी न घेणारा पोऱ्या, मी पुण्यांत आल्यावर आगरकरांचे लेख आणि मिल्‌-स्पेन्सरचे प्रत्यक्ष ग्रंथ वाचून पुण्यांतल्या विद्यार्थ्यांत एक पट्टया नास्तिक बनलों !

**चर्चा मंडळ**

मी नुसतें वाचून स्वस्थ बसणारा युवक नव्हतों. जें आपल्या मनांत आलें तें दुसऱ्याजवळ बोलून त्यावर चर्चा करावयाची प्रवृत्ति किंबहुना खोड माझ्यामध्यें आनुवंशिकच होती. माझ्या वडिलांप्रमाणेंच मलाही बोलावयाला फार आवडतें. मात्र लाजाळूपणाचा दाब असल्यामुळें अपरिचिताजवळ किंवा अप्रासंगिकपणें वाक्तांडव करण्याचें मात्र मला कधीं धैर्य होत नसे. तथापि पोटांत घटकाभर विष आवरेल पण नवीन विचार अगर एकादा सुंदर अनुभव मनाला घडला, कीं कोणातरी सहानुभूतिच्या मित्राजवळ किंवा आताजवळ ओकून टाकल्याशिवाय मला चैनच पडत

नसे. ह्यामुळें केळकरांच्या वाड्यांत असतांना माझ्या नेतृत्वाखालीं आमच्या खोलींत एक छोटेखानी Debating Union [ चर्चा मंडळ ] स्थापन करण्यांत आलें होतें. त्यांत माझाच सुळसुळाट जास्त असावयाचा. ह्या लहानशा मंडळांत नवीन भेटलेल्या मिल्ल–स्पेन्सरच्या विचारांची पुनरावृत्ति करण्यांत मी मोठें वक्तृत्व पाघळीत असें. ह्या वक्तृत्वाची संवय आमच्या जमखंडींतील वसंत व्याख्यानमालेंतल्या माझ्या दुढ्ढाचार्यपणावरून मला लागत चालली होती. विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, विकासवाद, स्त्री-दाक्षिण्य, इ. इ. मोठमोठ्या अवजड विषयांवर लहान तोंडीं मोठा घास घेण्याचें मला जमखंडींतल्या वसंत व्याख्यानमालेंतच आंगवळणीं पडलें होतें. मग पुण्या-सारख्या वाचाळ आणि मुंबईसारख्या चवचाळ शहराचा संपर्क घडल्यावर आणि विशेषतः मिल्ल–स्पेन्सरच्या तत्कालीन वेदतुल्य नवीन विचारांच्या ज्ञानलतांनीं दुर्विदग्ध झाल्यावर माझें डोकें ताळ्यावर राहणें कठीण झालें. मंडळांतील सभांतूनच नव्हे तर विद्यार्थ्यांशीं खासगी संभाषणांत मी त्यांना माझा नवीन तुटपुंजा नास्तिकपणा शिकवूं लागलों. त्यावेळीं मी एक लहानसा इंग्रजींत निबंध लिहिला होता. त्यांत 'देवानें माणसाला निर्माण केलें नसून माणसानेंच उलट देवाला निर्माण केलें' हें अर्धवट सत्य मी मोठ्या उत्साहानें प्रतिपादिलें होतें हें पण आतां नीट आठवतें! तें कसेंही असो. कोणीं कोणाला निर्माण केलें हा वाद जगाच्या अंतापर्यंत चालणारा आहे. पण इतर अनेक कारणांत माझ्या विक्षिप्त खासगी वाचनाची आणि वादविवादाची भर पडून ठराविक अभ्या-साची आबाळ झाली. अर्थात् मला इंटरमिजियट परीक्षेंत अपयश आलें! जमखंडी हायस्कुलांतील पहिला नंबर विश्वविद्यालयांत बराच खालीं घसरतो; इतकेंच नव्हे तर उगीच घमेंड मारील तर चांगली आपटीही खातो कसा, हें मला प्रत्यक्ष अनुभवास आलें. विशेष हा कीं, ज्या ( Logic ) तर्कशास्त्र ह्या विषयांत माझा विशेष तोरा चालत असे त्यांतच मी नापास झालों असें वाचून तर "ज्वर इव मदो मे व्यपगतः" हा भर्तृहरीचा टोमणा मला

चांगलाच जाणवला !

**पशुपणा**

परीक्षेंत नापास होण्याचा अनुभव मला आतांपर्यंत मुळींच नव्हता. तो आला हें एका परीनें बरेंच झालें. वाईट वाटणें साहजिकच आहे; पण अगदीं धक्का असा बसला नाहीं. मात्र विश्वविद्यालयीन परीक्षांविषयीं आदर कमी कमी होऊं लागला. ह्या परीक्षेच्या चरकांत तरुण विद्यार्थ्यांचें रक्त कसें पिळून निघतें, आणि इतक्या रक्ताच्या आहुत्या ओतूनही शेवटीं अपयशाचा टिळा लागला म्हणजे विद्यार्थ्यांचें कंबरडेंच मोडतें हें कळलें ! कंबरडें मोडल्यावरही पुनः जो कॉलेजची वाट धरितो तो "स वै मुक्तोऽथवा पशुः" ह्या वचनाप्रमाणें मुक्त किंवा पशु असावा. मी मुक्त नसल्यामुळें पशुपणा पदरीं घेऊन इ. स. १८९५चे जानेवारींत हातांत नाक धरून जमखंडीहून पुनः कॉलेजच्या अभ्यासासाठीं पुण्याला निघालों !

**कडेवाला मित्र**

इ. स. १८९४ सालीं आम्हीं नारायण पेठेंत केळकरांच्या वाड्यांत असतांना सदाशिव पेठेंतील प्रसिद्ध हौदावर रोज सकाळीं स्नानास जात असूं. त्याच हौदाला लागून पूर्वेस करमरकरांचा (हें नांव पक्कें आठवत नाहीं) वाडा आहे. त्यांत एक ब्राह्मणाची खाणावळ होती. तेथें मी आणि गोविंदराव जेवावयास जात असूं. इ. स. १८९५ वर्षारंभीं मी पुनः पुण्यास आल्यावर पहिल्या टर्ममध्यें ह्याच वाड्यांतील दुसऱ्या मजल्यावर आम्हीं एक बिऱ्हाडासाठीं खोली भाड्यानें घेतली. तिच्यांत गोविंदराव, त्यांचे कोल्हापुराकडचे कुळकर्णी नांवांचे एक स्नेही, जनूभाऊ करंदीकर आणि मी इतकेजण मिळून राहात होतों. येथें देखील कांहीं दिवस आमच्या चर्चामंडळाच्या कांहीं सभा झाल्या. रा. कुळकर्णी आणि जनुभाऊ हे दोघे अगदीं जुन्या मताचे आणि गोविंदराव व मी तितकेंच नव्या मताचे असल्यामुळें ह्या पहिल्या टर्मभर अभ्यासापेक्षां आमचा वादविवादच फार झाला. आणि

तो अगदीं जोराजोरानें पुष्कळ वेळ चालत असे. कुलकर्णी हे घरचे श्रीमंत होते. नेसावयाला रेशीमकाठीं धोतरें आणि डाव्या हातांत एक भलें मोठें सोन्याचें कडें नेहमीं घालीत असत. त्यांच्या जुन्या राहटीचीं हीं झगझगीत चिन्हेंच होतीं. आम्ही त्यांना नेहमीं कडेवाला कुलकर्णी म्हणत असूं. ते बोलतांना किंचित् तोतरे बोलत असत. आणि वादांत चिडत असल्यामुळें त्यांच्या तोतरेपणाला मोठी बहारीची लज्जत येत असे ! स्नानसंध्या, सूर्याला नमस्कार, धोतरांच्या चापून निऱ्या, सुंदर चेहरा, पाणीदार डोळे, गोरा रंग आणि हातांतलें बावनकशी सोन्याचें भव्य कडें—एकंदरींत नमुना कांहीं औरच होता. अभ्यासाची प्रगति मात्र ह्या सर्वांच्या उलट दिशेनें धांव घेत होती ! ह्याच्या सहवासांत ही पहिली टर्म हासत खेळत मजेत गेली. अर्थात् डेक्कन मराठा असोशिएशनची माझी दरमहा १० रु. ची स्कॉलरशिप चालूच होती हें निराळें सांगणें नकोच.

**खाद्यक्रम**

गोविंदरावांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाली कीं नाहीं हें आठवत नाहीं. कुलकर्णी आणि ते पुनः नेटिव्ह इन्स्टिटयूटमध्यें गेले असावेत. असो. ह्या टर्ममध्यें माझी प्रकृति थोडी बिघडावयाचें एक चमत्कारिक कारण घडलें तें असें. दिवस उन्हाळ्याचे होते. चतुःशृंगीचे माळावर आणि आंबराईतून लांब फिरावयाला जात असूं. फर्ग्युसन कॉलेजची नवी इमारत बांधावयाचें काम त्या माळावर चाललेलें असे. जणूं काय आम्ही सुपरवायझरच, असे तें काम रोज कोठवर आलें तें पाहून येत असूं. आमचें कॉलेज म्हणून मोठा अभिमान वाटत असे ! परत येतांना कच्च्या कैऱ्या आणि लकडीपुलावरच्या पश्चिम टोकावर बसत असलेल्या एका भडभुंज्याच्या दुकानांतले डाळेकुरमुरे आणि गुडदाणी ही सपाटून खावयाची आणि वरती बेसुमार पाणी प्यावयाचें हा आमचा मेनू (खाद्यक्रम) असे.

अशा स्थितींत कडेवाल्या कुळकर्ण्यानें दुसरीच एक शक्कल काढली. ते नमस्कार बरेच घालीत. त्यांचें पाहून आम्हीही व्यायाम करीत असूं; पण व्यायामाप्रमाणें खाणें कांहींतरी पौष्टिक असलें पाहिजे म्हणून भिजलेली डाळ, वाळलेलें खोबरें आणि खारका ह्यांचा खुराक आम्ही सर्वांनीं चालू केला. मग काय विचारतां? झटपट पैलवान बनण्यास आतुर झालेले आम्ही जातां येतां डाळीचे फक्के मारणें, खोबऱ्याचे चावे घेणें आणि खारका कुरडतणें ह्यांत एकमेकांवर चढाओढ करूं लागलों. जो जास्त खाऊन पचवील तो शूर वीर, ही व्याख्या ठरली. अशांत पाडव्याचा कीं कसलासा सण आला. खानावळवाईनें केळाचें शिकरण केलें होतें. अर्थात् केळापेक्षां शिकरणांत पाण्याचेंच प्रमाण बेफाम जास्त झालें होतें. त्यांचाही मी मागें पुढें न पाहतां समाचार घेतला. आणि तिसरे प्रहरीं पुनः कच्ची डाळ, खोबरें, खारका आणि कैऱ्या ह्यांचा तोबरा चालू झाला. ह्याचा काय परिणाम झाला हें निराळें सांगण्याची आतां जरूरच उरली नाहीं.

**व्यायामाची ईर्षा**

त्या रात्रीं इतर मंडळी निजली. पण मला कांहीं झोंप येईना. पोटांत घडघडा करूं लागलें; कळा येऊं लागल्या. आणि वादळ झाल्यावर ज्याप्रमाणें वळवाच्या पावसाच्या सरीवर सरी याव्यात त्याप्रमाणें जोराजोराचे मला जुलाब होऊं लागले. चारपांच जुलाबांनंतर मला जिना उतरून खालीं पायखान्यापर्यंत जाण्याची शक्ति उरली नाहीं. खोलींतल्या न्हाणींतच विधि उरकावा लागला. १०।१५ असे जुलाब झाल्यावर नीट बसावयाचेंही त्राण उरलें नाहीं. पोटांतल्या तिडिकांना कसली उपमा द्यावी हें समजत नाहीं. कोणीतरी दोघांनीं मिळून एकादे धोतर जोरानें पिळून त्यांतले पाण्याचा थेंब न थेंब बाहेर काढावा तशी माझ्या आंतड्याची अवस्था झाली. ही उपमा तरी हल्लीं माझ्या आंतड्याला पीळ पडला नाहीं म्हणूनच सुचत आहे. त्या वेळेला ही सुंदर उपमा सुचणें

**आजार**

शक्य नव्हतें !

**दुःखानंद**

कादंबरीकार आपल्या स्वकपोलकल्पित कथानकांतील नायक-नायिकेच्या दुःखाच्या वेदनांचें रसभरीत वर्णन करीत असतो, ह्याचें कारण तो स्वतः त्या वेदनांच्या चटक्यापासून सुरक्षित असतो म्हणूनच. येरवीं हें काव्य शक्यच नाहीं. संगीत नाटकांतील पात्रें रंगभूमीवर उभी असतांना त्यांच्यावर घोर संकट ओढवलें असतां मोठमोठ्यानें आलाप काढून आपल्या दुःखाचें वर्णन प्रेक्षकापुढें करीत असतात. फासांवर जाणारा चारुदत्त इतका सुंदर गातो कीं गाऊन गाऊन मरावयाला पडद्याआड जाऊं लागला म्हणजे लोक त्याला "वन्स मोअर" करून पुन्हा फासावर आणितात आणि चारूदत्त लोकाग्रहास्तव पुनः त्याच वेदनांचा आनंदानें उपभोग घेतो. हा प्रकार पाहून मला तर माझें हासेंच आवरत नाहीं ! अरे पण मी हें काय कोणीकडे भरकटत चाललों, मीहि त्या नटाप्रमाणेंच माझ्या जुलाबाचें वर्णन चालू करतों; कारण पोटांत हल्लीं दुखत नसल्यानें वर्णन करण्यास कोणती हरकत आहे ?

**मुक्तता**

उजाडल्यावर उतार पडला. पण तेव्हां माझ्या तोंडावर निव्वळ प्रेताची कळा आली होती. आदले दिवशीं सायंकाळीं ज्यांनीं पाहिलें होतें त्यांनी दुसऱ्याच दिवशीं पहाटे माझी ओळख लागेना. अशी भयंकर पालट केवळ सहा तासांत घडली ! सकाळीं कोणत्याशा डाक्टराला बोलावून आणिलें.त्यानें तात्काळ थोडेसें हिंग आणि तूप खावयास दिलें. पण औषधापूर्वींच व्याधीचा अस्त झाला असल्याकारणानें हें नाटक शोकपर्यवसायी झालें नाहीं. मात्र डाळखोबरें आणि खारका ह्यांच्यावर अर्थात् हद्दपारीची शिक्षा तावडतोब समरीपावरनें बजावण्यांत आली. आणि झटपट पहिलवान होण्याची ईर्षा बाळगणाऱ्या मला घरीं नुसतें पत्र लिहिण्याचें सामर्थ्य यावयालाही बरेच दिवस वाट पाहावी लागली. बिचाऱ्या गोविंदरावांना तें पत्र लिहावें लागलें. आजार औट

घटकेचा असल्यामुळें, ज्यांना आजार झाल्याची बातमी नव्हती त्या माझ्या घरच्या मंडळींना मी आजारांतून बरा झालों हें पत्र वाचून दुःख झालें कीं सुख झालें हें ठरविणेचें मी वाचकांवरच सोपवितों!

**सुधारकी हेतू**

सन १८९५ च्या मे महिन्याच्या सुटींत मी जमखंडीला होतों. ह्यावेळीं गोविंदराव व मी दोघांनीं आपापल्या कुटुंबांतील कोणास तरी पुण्यास आणून कायमचें घर करून राहण्याचा विचार करीत होतों. इतका आम्हांला खाणावळीच्या जेवणाचा कंटाळा आला होता. त्यावेळीं दरमहा ५ पांच रुपये खाणावळीचा दर होता. केवळ काटकसरीनें व स्वतःचें घरचें जेवण हेंच एक साधें कारण नसून घरांतील स्त्रीनातलगांना स्त्रीशिक्षण व प्रवासाचा लाभ देण्याचा सुधारकी हेतूही आमच्या तरुण मनांत सळसळत होता. ह्याला कारण हरी नारायण आपटे ह्यांच्या कादंबऱ्या! अशा संधीस माझ्या बहिणीवर प्रसंग ओढवून ती कायमची माहेरीं आली. गोविंदराव आणि माझ्यामधील पत्रव्यवहाराचें पर्यवसान असें झालें कीं मी पुढील टर्ममध्यें पुण्यास गेलों; तों बरोबर माझ्या बहिणीस व मातोश्रीस घेऊनच गेलों. कोल्हापुराहून गोविंदरावही आपल्या पत्नीस व लहान मुलीस घेऊन आले. सदाशिव पेठेंत नागनाथाच्या पाराजवळ पालकरांचा एक मोडकळीला आलेला जुना वाडा होता. त्यांत बरीच स्वस्त जागा दुसऱ्या मजल्यावर मिळाली. तो वाडा माझे जमखंडीचे मित्र रा. श्रीनिवास नारायण करकंबकर देशपांडये ह्यांच्या मालकीचा होता. त्यांत माझें व गोविंदरावांचें कुटुंब, जनुभाऊ करंदीकर, माझे एक मित्र रामचंद्र नारायण सावंत असे राहूं लागलों. पण खर्चाचा बोजा गोविंदरावानेंच बऱ्याच अंशीं आपल्या अंगावर घेतला होता.

सन १८९५–९६ हीं वर्षें मुंबई पुण्यास हिंदु-मुसलमान दंग्याचीं गेलीं. तशांत पुण्यास प्लेग व जमखंडीस दुष्काळ आला. ह्याच वेळीं जमखंडीच्या यजमानांनीं आमच्या बाबांना नोकरीवरून कमी केलें. अशांत मी बहीण

व आई घेऊन पुण्यास शिकावयाला आलों. ह्याला म्हणावी सुधारणेची तळमळ ! मला शिकवण्या धरून प्रपंच व अभ्यास चालवावा लागत असे; पण चि. जनाक्काला कोणत्या शाळेंत घालावी हा विचार चालला. मला पुण्याची माहिती व तेथील शिक्षणाची व्यवस्था अद्यापि चांगली नव्हती. सदाशिव पेठेंत चिमण्या गणपतीजवळ खिस्ती मिशनची मुलींची प्राथमिक शाळा होती. तिची हेडमास्तरीण श्रीमति सांगले नांवाची बाई होती. त्या शाळेंत मी जनाक्काला घातलें, आनंद झाला. ही प्रत्यक्ष सुधारणेची पहिली पायरी ! आपट्यांच्या कादंबऱ्या आम्ही भावंडें अधिक आवडीनें वाचूं लागलों.

**पंडिता रमाबाई**

ह्या वेळीं पंडिता रमाबाई व तिचा खिस्ती धर्म बराच गाजत होता. तिची पुणें लष्करांत 'शारदा सदन' नांवाची एक मुलींच्या बोर्डिंग शाळेची संस्था होती. माझ्या बहिणीची कांहीं सोय लागते कीं काय हें पाहण्यासाठीं मी ह्या मोठ्या धेंडाला भेटावयाला गेलों. बाई शांत गंभीर दिसल्या पण तिचा खिस्ती कावा बरेंच बोलणें झाल्याशिवाय दिसण्यासारखा नव्हता. बाई माझ्या बहिणीस आपल्या पंखाखालीं घेण्यास तयार होत्या. पण त्यांनीं माझ्यासारख्या बाहेर गांवाहून नुकताच आलेल्या बावळटाळा पाहिलें व माझ्या बहिणीच्या निराधारपणाची कहाणी ऐकली, तेव्हां ती एकेक अटी घालून आपलें जाळें विणूं लागली. ती म्हणाली कीं, मुलगी तिचें स्वाधीन केल्यावर पांच वर्षें तिला सुट्टी वगैरे मिळणार नाहीं. तिला आमचे घरीं पाठवणार नाहीं. आम्ही मुलीच्या शिक्षणक्रमांत अडथळे आणूं. ह्याचा सरळ अर्थ मला तरुण हिंदूला कळेना. मुलीच्या हिताच्या दृष्टीनें ही अट अवश्य होती असें बाईचें मत पडलें. पण ज्या नवमताचें पाणी ही पंडिता प्याली होती त्याचे चार थेंब माझ्याही पोटांत गेलें होतें. मीं उत्तर दिलें, "बाई शिक्षणांत अडथळे आणण्यासाठीं मी बहिणीस तुमच्याकडे पाठवण्याचें कारणच नाहीं. तिनें खिस्ती

होण्यास अडथळे आणूं ही भीति तुम्हांस असणें साहजिक आहे. असें असलें तरी मुलीस नियमाप्रमाणें (विद्याखात्याच्या) सर्व सुट्या तुम्हांला देणें अवश्य आहे. मुलीच्या हिताची काळजी निदान तुमच्या इतकी तरी मला व मुलीच्या आईबापांला आहेच हा विश्वास तुम्हाला असावा. तुमच्या शिक्षणानें मुलगी आपखुशीनें व अक्कलहुशारीनें खिस्ती होऊं लागल्यास निदान मी तरी अडथळा आणणार नाहीं. तिच्यावर तिला न कळत,जबरी तर राहोच, पण भुलभुलावणी होऊं लागली तर तें मी सहन करणार नाहीं. बेहत्तर आहे तुमची अशी अटीतटीची मदत न मिळाली तरी."

पंडिता रमाबाईना मी तरुण असून दिसतों तसा बावळट नाहीं, हें कळून चुकलें. तिनें माझ्याविषयीं अधिक चौकशी केली. मी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी आहें असें ऐकल्यावर ह्या कॉलेजचे प्रोफेसर नास्तिक आहेत, असा शेरा तिनें मारला. जखडलेल्या धर्मापेक्षां मोकळा नास्तिकपणा बरा असें मी माझें मत सांगितलें.

प्रो. कर्वे

ह्या सुमारास प्रो. अण्णासाहेब कर्वे यांनीं हिंगणें येथें अनाथ बालिकाश्रमाची स्थापना नुकतीच केली होती. त्याच्यांकडे मी माझ्या बहिणीसाठीं भेटावयास गेलो होतो. शेणामातीनें सारवलेल्या कुडाच्या भिंतीच्या एका खोपटांत प्रो. अण्णासाहेब जमिनीवर बसले होते. त्यांचे आश्रमांत ब्राह्मण जातीच्याच १०।१५ विधवा मुली होत्या. माझ्या बहिणीला आपल्या आश्रमांत घेतां काय ह्या माझ्या प्रश्नाला, "ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाहीं" असें प्रोफेसर अण्णासाहेबांनीं सांगितलें व माझ्या बहिणीला आश्रमांत घेण्याचें साफ नाकारलें. ह्यामुळें माझी फार निराशा झाली. तत्कालीन महाराष्ट्रांत एक सुधारणा करतांना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येई ह्याचें हें उदाहरणच आहे.

**मिस् मेरी भोर**

पुढें माझ्या बहिणीच्या शिक्षणासाठीं पुष्कळ धडपड करावी लागली. तिला मीं शेवटीं पुणें येथील प्रसिद्ध ( हुजर पागेंतील ) मुलींच्या हायस्कुलांत घातलें. जमखंडीस तिच्या ३।४ यत्ता मराठी झाल्याच होत्या. इंग्रजी पहिल्या यत्तेंत तिचें नांव घालण्यास इतर कोणतीच हरकत नव्हती. पण हिंदु विवाहित स्त्री म्हणजे कोणत्या भयंकर तुरुंगांत असते, ह्याची कल्पना मला नव्हती. शाळेचे अधिकारी चि. जनाक्काच्या नवऱ्याची तिच्या शिकण्यास परवानगी मागूं लागले. तिचें येथवर शिक्षण झालें हेंच तर तिच्यावर नवरा जिवंत असून वैधव्याचा असला प्रसंग गुदरला वगैरे माहिती मला जिथें तिथें कष्टानें सांगावी लागली. नवऱ्याच्या हरकतीची जबाबदारी मीं घेतली. तिला शाळेंत प्रवेश मिळाला; पण मला तर तिला कोठून तरी स्कॉलरशिप मिळवावयाची होती. माझा वशिला तर कोठेंच नव्हता. त्या वेळीं हुजूर पागेंत मिस् मेरी भोर नांवाची हुशार खिस्ती बाई एक शिक्षकीण होती. आणि मिस् हरफर्ड नांवाची एक युरोपिअन बाई मुख्याध्यापिका होती. त्या दोघींना जनाक्काचा कळवळा आला. उच्च वर्णीय हिंदु लोकांत घटस्फोटाचा कायदा नाहीं. आणि कांहीं झालें तरी घटस्फोटाची नुसती कल्पनाही चि. जनाक्काजवळ काढण्याची माझी छाती नव्हती; इतकें तिचे तेज व पवित्रतेचा परिणाम घरांत आम्हां सर्वांवर पडत असे. ही सर्व परिस्थिति तिच्या शाळेंतील मुख्य अधिकाऱ्यांना कळली. मिस् भोरकडे माझें जाणें येणें होऊं लागलें. माझी सुधारणेचीं मतें व वागण्याचा बाणेदारपणा पाहून तिचा फार अनुकूल ग्रह आम्हां भावंडाविषयीं झाला. ह्यामुळें आमच्या सर्व अडचणींतून पुढें जनाक्काला संस्थान मुधोळच्या राजेसाहेबांची मराठा मुलीकरितां दहा रुपये दरमहाची एक स्कालरशिप होती ती मिळाली. ह्यामुळें माझी अंशतः तरी सोय झाली. येरवीं प्रसंग फारच कठीण आला होता.

**कावेबाजपणा**

सन १८९५ सालीं आमच्या फर्ग्युसन कॉलेजची नवीन इमारत चतुः-श्रृंगीचे माळ्यावर उघडण्यांत आली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कोल्हापुरचे महाराज श्रीछत्रपति शाहुमहाराज होते. त्यांच्या हातून हा उद्घाटन समारंभ उरकून घेण्यांत आला. माझें वय त्यावेळीं सुमारें २२ वर्षांचें होतें; पण ह्या छत्रपतींचें वय माझ्याहूनही ३।४ वर्षांचें लहान असावें. महाराष्ट्राचे छत्रपति ह्या नात्यानें महाराज अध्यक्षपदाला सर्वस्वी लायक होते, तरी वयोमानानें ते अद्याप अननुभवी होते. मी नेहमीं म्हणत आलों आहें कीं, महाराष्ट्रांतील चित्पावन जात युरोपांतील इंग्रजांप्रमाणें धोरणी व कावेबाज आहे. ही गोष्ट ह्या जातीला मोठी भूषणावह आहे. ह्या कावेबाजीचें उदाहरण म्हणजे छत्रपतींचा अध्यक्षपणा होय. कोवळ्या वयाचा हा क्षत्रिय छावा चित्पावनांचा हा सोहळा साजरा करावयाला आला होता. ह्याचें इंगित त्यावेळींही मला समजून आल्याशिवाय राहिलें नाहीं. पुढें हे शाहूमहाराज ब्राह्मणेतर पक्षाची मुहुर्तमेढ रोवणारे ह्या नात्यानें चित्पावन ब्राह्मणांच्या डोळ्यावर आले व दृष्टीसमोर नकोसे झाले. इतके कीं हे निधन पावल्यावर नागपुराकडे मवाळांची एक मजलस भरली असतां, उमरावती जिल्ह्याचे श्री. गणेश अक्काजी गवई नांवाचे एका महार जातीचे गृहस्थांनीं मृत महाराजांचे विषयीं दुखवट्याचा ठराव मांडला. पण तो श्रीनिवास शास्त्र्यांसारखा थोर पुरुष अध्यक्षपदावर झळकत होता तरी पास झाला नाहीं. तथापि त्या महाराजांचे औरस पुत्र छत्रपति राजाराम महाराजांना डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षपदाचा वारसा चित्पावनानें पुन्हां दिलाच व छत्रपतींनेंही तो वारसा मुकाट्यानें स्वीकारला, तें कसेंही असो. तरुण शाहूमहाराज सन १८९५ च्या ह्या समारंभांत फार शोभायमान दिसले !

ह्या १८९५ साल अखेरीस पुण्यास अखिल भारतीय राष्ट्रीय सभेचें अधि-

वेशन थाटानें भरलें. सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे बंगाली वाचस्पति अध्यक्ष होते. त्या वेळीं मी स्वयंसेवक होतों. तेव्हांपासून देशाभिमानाचें वारें समाजसुधारणेच्या वाऱ्याप्रमाणें माझे डोक्यांत शिरलें आणि मी राष्ट्रीय पक्षाचा झालों.

**रे. डॉ. संडरलंड**

ह्याच वर्षी आणखी एक महत्त्वाची गोष्ट विशेषतः माझ्या चरित्रावर परिणाम घडविणारी घडली. अमेरिकन युनिटेरियन असोसिएशननें आपला प्रतिनिधि म्हणून रेव्हरंड डॉ. जे. टी. संडरलंड ह्या नामांकित मिशनरी गृहस्थाला हिंदुस्थानांत पाठविलें. राष्ट्रीय सभेंत यांचें खणखणीत भाषण ऐकलें. हिंदुस्थानांतील ब्राह्मसमाज किंवा महाराष्ट्रांतील प्रार्थनासमाजापूर्वीं माझ्या ग्रहणशील मनावर ह्या परदेशीय उदार धर्मपंथाचा संसर्ग आधीं घडला ही गोष्ट पाश्चात्यांच्या व्यावहारिक प्रसरणशीलाची साक्ष आहे. डॉ. संडरलंड साहेबांची मीं समक्ष गांठ घेऊन विचारविनिमय केला. युनिटेरियन पंथाच्या लहान लहान चोपड्या बऱ्याच वाचल्या. Larger meaning of Uniterianism हें चोपडें मला फार बोधपर वाटलें. त्याच वर्षी पुणें येथील प्रार्थना समाजांत एक लहानशी एकेश्वरी पंथाची परिषद भरली होती असें मला पुढें किती तरी वर्षांनीं कळलें. आमच्या लोकांची काम करण्याची पद्धत किती टाळाटाळीची व पाश्चात्यांची विशेषतः अमेरिकनांची किती आकर्षक हें कळलें. डॉ. संडरलंड साहेबांनीं हिंदुस्थानांतील आपल्या कामाचा अहवाल आपल्या देशांतील युनिटेरिअन सभेपुढें मांडला व विशेष सूचना केली की, हिंदुस्थानांतील एकेश्वरी पंथाच्या ( ब्राह्म व प्रार्थना समाजाचा ) एक तरुण होतकरू विद्यार्थी अमेरिका, इंग्लंड येथील धर्माला वाहिलेल्या कॉलेजांत स्कॉलरशिप देऊन बोलावण्यांत यावा. ह्या सूचनेप्रमाणें १।२ वर्षांत कलकत्त्याहून ब्राह्मसमाजानें दर दोन वर्षांनीं एक असे तीन विद्यार्थी पाठविल्यानंतर इ. स. १९०१ सालीं पुढें स्वतः माझीच ह्या कामीं योजना झाली.

पण हा योग १८९५ सालीं मला कळण्यासारखा नव्हता. मला पुनः इंटरमिजियट मध्यें बसावें लागलें. पुण्यास मी व माझी प्रपंचाची काळजी बहीण. शिवाय १८९६ मध्यें माझ्या पत्नीलाही बहिणी-बरोबर शाळेंत घालून ह्या तिघांचा पुण्याचा खर्चच नव्हे तरी जमखंडीस माझे आईबाप व इतर ३ भावंडें ह्यांच्याही खर्चाचा भार माझेवरच्च पडला. मला १० रु. आणि जनाक्काहिला १०रु.अशी दरमहा वीस रुपयांचीच काय ती जमा असे. शिकवणीचे ५।७ रु. मिळालेच तर भर पडे. बाकीच्या खर्चाचें कर्जच होऊं लागलें! मोठी काळजी पडली. माझ्या तीन सख्या बहिणी; पण प्रपंचाची काळजी ही चौथी एक जन्माची सख्खी बहीण होती. तिनेंच मला शहाणें केलें. तितकें शहाणपण मला मुंबई विश्वविद्यालयानें किंबहुना ऑक्सफर्ड विद्यालयानेंही दिलें नाहीं.

पण नुसत्या काळजीनें कर्माचा लांडगा कांहीं दारांतून निघत नाहीं. शेवटीं मला बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव महाराजांची आठवण

जादा मदत झाली. डेक्कन मराठा असोशिएशन कडून मला दोन किंवा तीन वर्षें दरमहा १० रु. प्रमाणें फार तर ३६० रु. स्कॉलरशिप मिळाली व मी १८९६ सालीं इंटरमिजिएट मध्यें पास झालों. पण पुढें बी. ए. चीं दोन वर्षें कशीं जावीत ही विवंचना श्रीमंत गायकवाड महाराजांपुढें ठेवण्यास मी समक्ष बडोद्यास सुमारें १८९६ मध्यें गेलों. श्री. लक्ष्मणराव माने ह्या नावांचे एक थोर मनाचे मराठा गृहस्थ बडोदें येथें शहाबाग ह्या भागांत होते. त्यांची माझी कशी ओळख झाली व त्यांचेहून एक बडे गृहस्थ श्री. खासेराव जाधव ह्यांचा माझा कसा संबंध जडला हें मला कांहींच आठवत नाहीं. तरी ह्या सद्गृहस्थाच्या शिफारशीनें महाराजांनीं माझेसारख्या निराधार तरुण विद्यार्थ्यांची गांठ घेतली. त्यांनीं मला दरमहा २५ रु. स्कॉलर-शिप दिली. ही रक्कम मला डेक्कन मराठा असोशिएशनचे द्वारेंच मिळावयाची

होती. ही मदत मिळते म्हणून ह्या संस्थेनें आपली १० रु. मदत बंद केली. खरें पाहतां मला १५ रु. च अधिक मिळूं लागले. तेवढ्यालाच पाहून भुकेचा लांडगा आमचें दार सोडून दूर गेला. ही स्कॉलरशिप देतांना माझ्याकडून एक कायदेशीर स्टँपवर बाँड लिहून घेण्यांत आला. त्यांत माझें शिक्षण संपल्यावर मी बडोदा संस्थानांत नोकरीस रहावें, नाहींतर घेतलेल्या स्कॉलरशिपची रक्कम परत करावी असा स्पष्ट करार होता. पण ईश्वरी घटनेमुळें ह्यांतील एकही अट पुरी करणें झालें नाहीं. कसें तें पुढें ओघानें कळेल.

---

# प्रकरण २४ वें

## पदवीग्रहण

**सवलत**

बी. ए. मध्यें माझे ऐच्छिक विषय इतिहास आणि कायदा हे होते. माझा विशेष कल तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे असतांना लॉजिक आणि मॉरल फिलासफी, न्यायशास्त्र आणि नीतिशास्त्र हे विषय न घेतां, मी इतिहास आणि कायदा हे विषय घेतले ह्याचें कारण बी. ए. च्या कायद्याच्या पेपरमध्यें शेंकडा ६० वर मार्क मिळाल्यास फर्स्ट एल्. एल्. बी. ची परीक्षा पास झाली असें गणण्यांत येत होतें. म्हणून मीं या सवलतीचा फायदा घेण्यासाठीं ही निवड केली. दुसरें कारण असें कीं, माझें शिक्षण पुरें झाल्यावर कुठल्याही सरकारी नोकरींत अडकवून घेण्यापेक्षां सार्वजनिक कार्यांत पडण्याचा इरादा होता. त्यासाठीं स्वतंत्रपणें वकिली करणें भाग होतें. त्याशिवाय भावी आयुष्यांत माझा इतिहासाकडेच कल असल्याचें पुढें आढळून आलें. विचारांच्या दोन पद्धति आहेत. एक तत्त्वज्ञानाची मोघम

पद्धत; तींत ज्ञात कारणावरून अज्ञात कार्यांकडे जाणें आणि दुसरी ऐतिहासिक पद्धत; त्यांत ज्ञात कार्यांवरून अज्ञात कारणांचा शोध करीत जाणें. दुसरी पद्धत नवी असून अधिक परिणामकारी म्हणून मला तीच जास्त पसंत पडली. पण ही पसंती पुढील शिक्षणाचे काळांत झाली.

**डेक्कन कॉलेज**

कायदा ह्या विषयावरील व्याख्यानें त्यावेळीं डेक्कन कॉलेजांत होत होतीं. त्यासाठीं आम्हांला फर्ग्युसन कॉलेजांतून डेक्कन कॉलेजांत जावें लागे. त्यावेळीं जनुभाऊ करंदीकर, माधव नारायण हुल्याळ इतकी मंडळी जमखंडीकरांचे शनवारांतल्या वाड्यांत राहात होती. तेथून फर्ग्युसन कॉलेजांत जाऊन तेथून डेक्कन कॉलेजांत आठवड्यांतून दोनदां पायीं चालत जावें लागे. टांग्याचें भाडें जबर पडत असल्यानें आणि त्यावेळीं पुण्यांत सायकलचा सुळसुळाट झाला नसल्यानें मला पावसांत भिजत, उन्हाळ्यांत शिजत एवढा मोठा पल्ला गांठावा लागे. पण त्याचें मला कांहीं वाटत नसे. संगमावरून होडी चालू असे. तींत बसून शेतावरून डेक्कन कॉलेजला जाण्यास एक जवळची वाट होती. एकदां असें झालें कीं कॉलेजवरून परत येण्यास रात्र पडली आणि होडी बंद झाली होती. मी एकटाच होतों. अंगावरचे सारे कपडे डोक्याला गुंडाळून मी पोहत संगमावर आलों. याचें माझे मित्रांना फार आश्चर्य वाटलें. पावसाळ्यांत नदीला पूर आल्यावर फर्ग्युसन कॉलेजपासून होळकर ब्रिजवरून डेक्कन कॉलेजांत जाऊन, परत येते वेळीं बंडगार्डनवरून यावें लागे.

**निकाल**

१८९७ सालीं पुण्यास प्रथम प्लेगचा कहर सुरू झाला त्यावेळीं शाळा कॉलेजें बंद झाल्यानें, माझ्या घरच्या मंडळींना घेऊन जमखंडीस जावें लागलें. या सुमारास मुंबईस हिंदुमुसलमानांचा दंगा सुरू झाल्यानें पुण्यास सार्वजनिक गणपतीचा उत्सव लो. टिळकांनीं राष्ट्रीय पायावर सुरू केला.

पहिल्या उत्सवाचे वेळीं पुण्यालाही हिंदुमुसलमानांचा दंगा झाला. दंगे, उत्सव प्लेग आणि प्लेगमधील अधिकाऱ्यांचे खून अशा अनेक धामधुमींत आमच्या अभ्यासाची फार आबाळ झाली. मी व माझे बरेच मित्र १८९७ सालीं बी. ए. परीक्षेंत नापास झालों. पुन्हा १८९८ सालीं माझी बी. ए. ची परीक्षा एकदाची पास झाली आणि कायद्याच्या पेपर्समध्यें फर्स्ट क्लासचे मार्क पडून फर्स्ट एल्. एल्. बी. ही परीक्षाही पास झाली.

**पिळवणूक**

अलिकडच्या युनिव्हर्सिटींतील परीक्षेच्या चढाओढीच्या पद्धतीचा मला पूर्ण तिटकारा आला होता. अशा पद्धतीनें जे स्कॉलर ठरतात ते पुढील आयुष्यक्रमांत मोठ्या विद्वत्तेचीं कामें कां करीत नाहींत ? याचें कारण ऐन तारुण्यांत त्यांची अनैसर्गिक पिळवणूक व खच्ची होते. नुसत्या शर्यतीनें कोण विद्वान् होईल ! विद्वत्ता हा नैसर्गिक विकास आहे. शर्यतीचे घोडे आणि औताचे घोडे यांची तुलना केली तर अश्वशक्ति (Horse Power) कोणाची व कां जास्त असतें हें कळून येईल. युरोपांतल्या नाणावलेल्या ऑक्सफर्ड व केंब्रिज सारख्या जुन्या विश्वविद्यालयांतून या चढाओढीची पद्धत हिंदुस्थानइतकी हानिकारक दिसून येत नाहीं. हें जरी विलायतेंत गेल्यावर मला दिसून आलें, तरी ही पद्धत अनिष्ट आहे हें कळून येण्यासाठीं मला विलायतेला जाण्याची जरूर नव्हती. तिचे अनिष्ट परिणाम मी स्वदेशींच भोगले होते. माझा बी. ए. परीक्षेंतील शेवटचा पेपर संपल्यावर मी युनिव्हर्सिटीसमोरील पटांगणाचे भिंतीवर बसून राजाबाई टॉवरकडे तोंड करून मनापासून शिव्यांची लाखोली वाहिली. हा टॉवर म्हणजे मला प्राचीन बाबीलोनीया शहरांतील बॉल मरडॉक नांवाच्या उग्र देवतेचा पुतळाच भासला. त्या पुतळ्याच्या हातांत एक तापलेला लाल तवा असून गांवांतील मातांनीं आपल्या प्रथम जन्मलेल्या मुलांस त्यांत टाकून आहूती देण्याची चाल होती. तशीच चाल ह्या युनिव्हर्सिटीच्या परीक्षेच्या खाईत आपल्या पोटच्या पोरांस होरपळून

काढण्याची आहे.

यापुढें दोन वर्षे मी सेकंड एल्.एल्.बी. चा अभ्यास केला. श्रीमंत सयाजीराव महाराजांनी दयाळूपणें आपली स्कॉलरशिप सुरू केली होती. पण खरे पाहतां माझें लक्ष अभ्यासाकडे मुळींच नव्हतें. ह्याला घरगुती कारणें आणि बाहेर प्लेगसारखी व्याधि तर होतीच; पण खरीं कारणें काय होतीं तें पुढें पाहूं, आणि त्यामुळें माझ्या शिक्षणांतच नव्हे तर भावी आयुःक्रमांत मोठी क्रांति घडून आली.

**प्रो. मॅक्समुल्लर**

ठराविक अभ्यासक्रमाची मला जरी शिसारी आली होती तरी मनांतील विचारविकासाच्या चक्रांची गति मुळींच मंदावली नाहीं. मिल्ल, स्पेन्सरच्या विचारानुळें जो बंडखोरपणा माझ्या मनांत व भोंवताली माजला होता त्यांत माझ्या आत्म्याची भूक शमवण्याची शक्ति नव्हती. नास्तिकपणाच्या वाळवंटांत मनाची तहान भागणें शक्य नव्हतें. अशा क्रांतीच्या वेळीं ज्या एका नवीन तत्वज्ञान पद्धतीची व तत्ववेत्त्याची गांठ पडली तो प्रो. मॅक्समुल्लर होय. धर्मावरील त्याची विस्तृत व्याख्यानें, भाषाशास्त्राचें अलोट ज्ञान, पौरस्त्य विचाराबद्दल त्याची समतोल वृत्ति आणि संस्कृत भाषेबद्दलची गाढ सहानुभूति इत्यादि गुणांनीं तो मला एक नवीनच आप्तपुरुष भासूं लागला.

**रा. कळसकर**

ता. १२ मे १८९८ रोजीं आमच्या बिऱ्हाडीं बारामतीचे रा. रा. कळसकर बारामतीच्या महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक आले होते. त्यांचे साहस, उद्योग व स्वार्थत्याग हे मी ऐकूनच होतों. त्यांचें स्वतः भाषण ऐकून तर ह्यांनीं महार-मांग या खालावलेल्या जातींविषयीं किती कळकळ दाखविली, त्यांनीं काय काय केलें व आणखी किती करण्यासारखें आहे; हें सर्व मनांत येऊन मला स्वतःची मनःपूर्वक लाज वाटून तिटकारा आला.

ता. २९ मे. १८९८ रविवारीं सकाळीं आठ वाजतां रा. कळसकर

हुल्याळ व मी पुण्याच्या प्रार्थना समाजांतील उपासना पाहण्यास गेलों होतों. पुण्यांतल्या मंदिरांतली उपासना आजच प्रथम पाहिली, गेल्या डिसेंबरांत मुंबईच्या प्रार्थना समाजांतील उपासना पाहून मला तितकेसें बरें वाटलें नाहीं. उलट किंचित् दुराग्रह झाला होता.

**प्रार्थना समाज**

मंदिरांतील उपासना पाहून माझ्या मनांत मोठा पूज्यभाव उत्पन्न झाला. ह्याचें एक कारण हें कीं मुंबईच्यापेक्षां हें मंदीर फारच साधें आहे. दुसरें कारण असें कीं माझें मुंबईला प्रथमच जाणें असल्यानें तेथल्या उपासनेंत ख्रिश्चन चर्चमधल्या Prayer चा भास दिसला. माझ्यासारख्या गांवढळास नव्यानें दीक्षा घ्यावयाची असल्यास माझी खात्री आहे कीं तो मुंबईच्या भपकेदार देवळांत कधींच ती घेणार नाहीं. पुणें येथील उपासनेचे चालक साताराचे सबजज्ज रा. ब. काशीनाथ बळवंत मराठे हे होते. त्यांची प्रार्थना व व्याख्यान ह्यांनीं माझें मन फार वेधलें. ह्यावेळीं माझें मन श्रद्धेनें फार पवित्र झालें होतें. मीही सर्वांबरोबर प्रार्थनेचीं पदें अनन्यभावानें गायिलीं. येथेंही हिंदुधर्माचें निर्मळ स्वरुप दिसलें. प्रपंच साधून परमार्थ कसा करावा ह्याची रा. ब. मराठे यांनीं चित्तवेधक रितीनें फोड केली. माझी बहीण चि. जनाक्का आपल्या मैत्रिणीं-बरोबर प्रार्थनेसाठीं हुजुरपागेंतून आली होती. तिलाही ही उपासना फार आवडली. तिला दर रविवारीं उपासनेस जावेसें वाटलें. मलाही तसेंच वाटलें. दोन्ही भावंडांचा हा स्वतंत्र झालेला निश्चय पाहून तो अधिकच दुणावला. येणेंप्रमाणें ज्या प्रार्थना समाजाला अजाणपणें प्रथम हेटाळलें त्याकडेच लक्ष वेधलें गेलें.

याप्रमाणें माझ्या अभ्यासांत बरेवाईट व्यत्यय येऊन माझी अभ्यासू-वृत्ति सुटत चालली. रा. कळसकर यांचे खेड्यांतील समाजाच्या शिक्षणाचे प्रयत्न पाहून तसेंच आपण कांहींतरी करावें याविषयीं आमच्या मंडळांत चर्चा सुरू झाली. मी, रा. हुल्याळ, शासने, कानिटकर वगैरे तासचे तास बसून

वाटाघाट करूं लागलों. याबरोबरच प्रार्थना समाजाशीं माझा निकटचा संबंध येऊं लागला. समाजाच्या एका उत्सवास मी रोज जाऊं लागलों. रा. रा. गणपत भास्कर कोटकर नांवाचे एक वृद्ध पेन्शनर गृहस्थ यांचा माझा दाट परिचय घडूं लागला. त्यांच्या उपासना फार प्रेमळ असून गहिंवर आणणाऱ्या असत. मधून मधून समाजाचे प्रचारक रा. शिवरामपंत गोखले हेही मला आपले अनुभव सांगत. त्यांच्या साधेपणाची छाप चांगली बसे. समाजाचे सेक्रेटरी रा. केशवराव गोडबोले यांचा नियमितपणा व निष्ठावंत कार्यतत्परता यांचा फार परिणाम होई. न्या० मू० रानडे आणि सर्वांत अधिक उठावदार म्हणजे परमपूज्य गुरुवर्य डॉ. भांडारकर यांचाही थोडाफार समागम घडूं लागला. समाजांत गाण्याचा पुढाकार घेणारे वृद्ध पेन्शनर गणपतराव आंजर्लेकर यांची संगत घडूं लागली. या सर्व वृद्ध मंडळीनें मला भारून टाकून माझ्या तारुण्याचा आडमूठपणा, विचारांचा उच्छृंखलपणा व अनुभवांचा हिरवटपणा या भोवऱ्यांतून माझी सुटका करून शुद्ध उदार धर्माच्या शांत प्रवाहांत मला आणून सोडलें.

उत्सवांत शेवटीं प्रीतिभोजन होत असते. ते एका वर्षीं गणपतराव कोटकरांच्या राहत्या घरांत झालें. गव्हर्नरच्या बंगल्याच्या उत्तरेकडील बोटॅनिकल गार्डनजवळ शांतीकुटीर नांवाची रा. कोटकरांची साधी झोपडी आहे, तींत हें प्रीतिभोजन घडलें. मी अद्याप सभासद झालों नसतांही मला बोलावणें आलें. ह्या भोजनांत पुणें समाजांतील सर्व वृद्ध मंडळी व मुंबई समाजांतील तरुण मंडळी एकत्र जमली होती. फराळ, भजन, प्रार्थना, उपदेश, भोजन, संभाषण आणि सहल वगैरे प्रकार दिवसभर झाले. हें प्रत्यक्ष दृष्य अनुभवून समाज म्हणजे नुसती एक रविवारची सभा नसून देवाच्या कन्या-पुत्रांचें एक शुद्ध कुटुंब आहे हें माझ्या प्रचीतीस आलें. समाजाविषयीं सर्व संशय व तेढ दूर झाली, विशेषतः गणपतराव कोटकर आणि साताऱ्या

**परिचय**

समाजाचे श्री. सितारामपंत जव्हेरे यांच्या समागमांत समाजाचा इतिहास व तत्त्वांचा परिचय घडला.

**सभासद दीक्षा**

समाजाच्या पुस्तकालयांतून ब्राह्मसमाजांतील कांहीं ग्रंथ वाचावयाला मिळाले. त्यांत विशेषतः प्रतापचंद्र मुझुमदार यांनीं सुंदर इंग्रजींत लिहिलेलें केशव चंद्रसेन यांचे चरित्र वाचून माझी चित्तवृत्ति भडकून गेली. त्यांतलें विशेष प्रकरण Baptism of Fire ( अग्नि स्नान ) हें वाचून तर प्रार्थना समाजाचा नुसता सभासद न होतां, आजन्म वाहून घेतलेला प्रचारक कसा होईन याची दुर्दम्य तृष्णा लागून राहिली. रात्रंदिवस तेच तेच विचार, त्याच त्याच तरुण आणि वृद्ध मंडळींच्या गांठीभेटी घडल्यानें समाजाशिवाय कांहीं दिसेनासें झालें. डेक्कन कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत असलेले श्री. नानालाल दलपतराम कवि [ हल्लींचे गुजराथचे कविवर्य ], न्यू इंग्लिश स्कूलचे मारवाडी जातीचे एक पदवीधर तरुण शिक्षक श्री. मोतीबुलासा, डॉ० भांडारकरांचे कनिष्ठ चिरंजीव देवदत्त रामकृष्ण भांडारकर, डॉ० वासुदेव अनंत सुकथनकर, श्रीयुत लक्ष्मणराव ठोसर वगैरे तरुण मंडळी समाजांत आडवारीं वरचेवर जमूं लागली. त्यांतच कोटकरासारखी वृद्ध मंडळी मिळून मिसळून वागूं लागली. परिणाम हा घडला कीं ही सर्व मंडळी समाजाची रीतसर दीक्षा घेऊन सभासद झाली. मीही यांपैकींच होतों.

**पहिली उपासना**

१८९८ सालीं बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १८९९ व १९०० हीं दोन वर्षें मला सेकंड एल्‌एल्. बी. च्या टर्म्स भरण्यासाठीं मुंबईस रहावें लागलें. त्यावेळीं मी मुंबई समाजांत दर रविवारीं जाऊं लागलों. तेथें रा. द्वारकानाथ गोविंद वैद्य, रा. वामन सदाशिव सोहोनी, रा. बा. बा. कोरगांवकर ह्यांचा परिचय झाला. त्यांपैकीं कोरगांवकर हे पोक्त असून वैद्य व सोहोनी हे तरुण होते. कोरगांवकरांचे घरीं माझे विशेष जाणेंयेणें होतें. प्रथम

प्रथम पुणें समाजाच्या व्यासपीठावरून आणि नंतर मुंबईच्या व्यासपीठावरून उपासना व उपदेश करण्याची मला पाळी येई. पुण्याच्या व्यासपीठावरून मीं प्रथम उपासना चालवली त्यावेळीं उपदेशाकरितां "धाई अंतरिच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें" हा तुकारामाचा अभंग घेतला होता. डॉ. भांडारकर, रा. ब. का. ब. मराठे, केशवराव गोडबोले, शिवरामपंत गोखले इत्यादि वडील मंडळी उपासनेस हजर होती. माझा पहिलाच प्रसंग असून उपदेश फार चांगला वठला म्हणून डॉ० भांडारकरांनीं जवळ येऊन माझी पाठ थोपटली व सहृदय अभिनंदन केलें. हें वर्तमान मुंबईस कळल्या-वर तेथूनही मला उपासनेच्या पाळ्या येऊं लागल्या.

सुटींमध्यें जमखंडीस आल्यावर मी आमच्या घरीं दर रविवारीं सकाळीं मोठ्या थाटानें उपासना करूं लागलों. त्यावेळीं घरचीच मंडळीं नव्हे तर बाहे-रील मंडळीसुद्धां जमूं लागली. मी प्रार्थना समाजाचा सभासद झालों हें माझ्या आईबाबांना फार आवडलें. हें पाहून मलाही बरें वाटलें. प्रार्थना समाज म्हणजे बाबांच्या भागवतधर्माचीच एक सुधारून वाढवलेली आवृत्ति असें त्यांना वाटूं लागलें. कारण तुकाराम, एकनाथ, रामदास ह्यांच्या अभंगाची निरूपणें उप-देशाचे वेळीं होत असल्यानें वरील गोष्टींची साक्ष पटत होती. त्यामुळें बाहेरून येणाऱ्या मंडळींनाही हा प्रकार विशेष असा वाटला नाहीं. माझे मित्र मीरा-साहेब हथरुट या मुसलमान गृहस्थास व लिंगायत, ब्राह्मण इत्यादि जुन्या मित्रांस ह्या प्रकाराचें कौतुकच वाटलें.

**रा. सुकथनकर**

मी इंटरच्या वर्गांत असतांना कोल्हापूरचे वासुदेव अनंत सुखथनकर नांवाच्या एका गरीब सालस विद्यार्थ्याची गांठ पडली. सदाशिव पेठेंत आम्ही पालकर यांचे वाड्यांत असतांना ते आमच्याच जागीं राहूं लागले. ह्यांच्याशीं फारच मैत्री जमल्यावर पुढें हेही माझ्याबरोबर प्रार्थना समाजांत जाऊं येऊं लागून शेवटीं सभासदही झाले. सन १८९५ सालीं पुण्यांस कॉंग्रेस

भरली त्यावेळीं अमेरिकेंतील डॉ. जे. टी. संडरलंड ह्यांची पुण्यास व्याख्यानें झालीं असा वर उल्लेख आहे. अमेरिकेंतील युनिटेरियन समाजाकडून प्रतिनिधि म्हणून युरोप—अमेरिका येथील उदारधर्मांच्या समाजांचे हिंदुस्थानांतील प्रार्थना व ब्राह्म इत्यादि उदारधर्मांच्या समाजांशीं अधिक दळणवळण व सहकार्य करण्यासाठीं काय उपाय करावा यास्तव सूचनावजा रिपोर्ट करण्यासाठीं हे हिंदुस्थानांत आले होते. त्यांना भेटण्यासाठीं माझेबरोबर सुखथनकर हेही असत.

**रा. मोतीबुलासा**

सन १८९९ च्या सुमारास न्यू इंग्लिश स्कूलचे पदवीधर तरुण शिक्षक रा. मोतीबुलासा ' बी. ए. ह्यांस मॅन्चेस्टर येथें हिंदी विद्यार्थी म्हणून तौलनिक धर्मांच्या अध्ययनासाठीं पाठवण्याची नेमणूक झाली. विलायतेस रवाना झाल्यानंतर वाटेंत पोर्टसय्यद येथें वातज्वराचा विकार होऊन त्यांचे आकस्मिक निधन झालें. ही बातमी ऐकून पुणें व मुंबई येथील प्रार्थना समाजिस्टांना फार वाईट वाटलें. विशेषतः समाजाचे गुरुवर्य डॉ. भांडारकर यांच्या मनाला ती गोष्ट फारच लागून राहिली. मोतीबुलासाच्या दुखवट्यानिमित्त पुणें प्रार्थना समाजांत डॉ. भांडारकरांनीं एक विशेष उपासना चालविली, त्यावेळीं त्यांनीं मोठे कळकळीचे दुःखोद्गार काढले. त्यांच्या डोळ्यांतून सतत अश्रुधार चालली होती. ह्या प्रकाराचा माझ्या हृदयावर जोराचा परिणाम झाला. गुरुवर्य व्यासपीठावरून उतरतांच मी त्यांचेजवळ जाऊन, ' मोतीबुलासाच्या निधनानें रिकाम्या पडलेल्या जागेसाठीं मला जर गुरुवर्यांनीं पात्र ठरवलें तर मी विलायतेस जाण्यास तयार आहें ' असें सांगितलें. हें ऐकून गुरुवर्यांस आनंदाचें भरतें आलें व त्यांनीं मला मोठ्या प्रेमानें कुरवाळलें.

मँचेस्टर कॉलेजांत हिंदी विद्यार्थ्याला पाठवावयाचे झाल्यास त्याला बऱ्याच अटी असतात. अशा विद्यार्थ्यांची वरिष्ठ विद्यालयीन शिक्षणांत बरीच प्रगति व्हावयाला पाहिजे असते. इतकेंच नव्हे तर ब्राह्म व प्रार्थना समा-

जाच्या कार्याविषयीं त्याच्यामध्यें पात्रता दिसून कांहीं थोडे बहुत कार्यही व्हावयाला पाहिजे असतें. या सर्व गोष्टीं ध्यानांत घेऊन

अटींचा खुलासा तो विद्यार्थी ज्या भागांतला असेल त्या भागांतील सभासदांनीं आणि कार्यवाहकांनीं त्यांची एकमतानें शिफारस करायला पाहिजे. डॉ. संडरलंडच्या सूचनेनुसार अशा विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठीं आदि ब्राह्मसमाज, साधारण ब्राह्मसमाज आणि नवविधान ब्राह्मसमाज या कलकत्त्यांतील तिन्ही शाखांच्या प्रतिनिधींची ब्राह्मसमाज कमिटी या नांवानें नेमलेली एक एक समिति आहे. वरील प्रांतिक सभासदांची शिफारस या समितीकडे जाऊन तिनें ती पसंत करावयास पाहिजे असते. विलायतेंतील ब्रिटिश अँड फॉरेन असोसिएशन ही संस्था अशा पसंत झालेल्या विद्यार्थ्यांस वर्षाला १०० पौंडांची स्कॉलरशिप दोन वर्षें देत असते. पण विलायतेला जाण्याचा प्रवासखर्च या विद्यार्थ्यानें आपला आपणच पहावयाचा असतो. इतकेंच नव्हे, कॉलेजांतील शिक्षणांतून परत स्वदेशीं आल्यावर सदर विद्यार्थ्यानें ब्राह्मसमाजाच्या प्रचाराचें कार्य आजन्म करावयाचें असतें. निदान ह्या उद्देशाला विसंगत असें उदर भरण्याचें दुसरें कार्य करावयाचें नसतें. उलट अशा विद्यार्थ्यांच्या योगक्षेमाबद्दल ब्रिटिश कमिटी, कलकत्त्यांतील कमिटी किंवा दुसऱ्या कोणींही कायदेशीर हमी घेतली नसते. अशा प्रकारच्या मजकुराचा स्पष्ट छापील खुलासा विद्यार्थ्यांचे हातीं देण्यांत येतो. अशा बंदोबस्तानें विद्यार्थ्यांची जबाबदारी तावून सुलाखून निघते. ह्या सर्व बारीक सारीक अटींचा, माझ्या घरगुती परिस्थितीचा व होऊं घातलेल्या दुसऱ्या एलएल्. बी. च्या परीक्षेचा कोणताही अडथळा मनांत येऊं न देतां, किंबहुना त्याचा विचारही न करतां केवळ परमेश्वरी आदेश समजून मी गुरुवर्य भांडारकरांकडे माझा निश्चय गंभीरपणें प्रकट केला. गुरुवर्यांनींही तो तितक्याच झटक्या पटकीनें स्वीकारला.

डॉ. भांडारकरांनीं मनांत आणल्यावर प्रांतिक सभासदांची, कलकत्त्याच्या समितीची, नंतर ब्रिटिश कमिटीची व अखेरीस मँचेस्टर कॉलेज कमिटीची पसंती ह्या ओघाओघानेंच मिळाल्या. मध्यें एकच व्यत्यय घडला तो हा कीं, न्या. मू॰ रानडे यांनीं रा. परांजपे नांवाच्या दुसऱ्या एका ब्राह्मण तरुणाची पसंती करून शिफारस केली पण त्याची निवड झाली नाहीं. कारण आतांपर्यंत समाजांशीं त्याचा संबंध जडलेला नव्हता. ह्याच परांजप्यानें पुढें वर्धा येथें हनुमानगडावर एक नवीन धर्मप्रथा काढली.

व्यत्यय

येथवर झालें ते ठीक झालें. पण " सर्वारंभास्तंडुलाःप्रस्थमूलाः " ! प्रवासखर्चाची सोय काय हा मुख्य प्रश्न येऊन पडला. निदान दीड दोन हजार रुपये तरी पाहिजे होते. याशिवाय माझा पोषाखखर्च, मी परत येईतों माझ्या परिवाराचा योगक्षेम याचीही सोय व्हायला पाहिजे होती. सर्वांत मोठी अडचण प्रवासखर्चाची होती. पण त्याहून दुसरी अडचण अशी होती कीं, माझ्या बी. ए. च्या व एल्‌एल्. बी. च्या परीक्षेसाठीं ५ वर्षें मला श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं सुमारें दीड हजार रुपये दिले होते. आणि मँचेस्टरची स्कॉलरशिप घेतल्यानें गायकवाडींतच काय पण कुठेंही नौकरी करणें अशक्य होतें. आणि ती न केल्यास घेतलेली स्कॉलरशिपची रकम परत करण्याचा कायदेशीर करार होता. अशा प्रचंड फिकिरींत मी पडलों. पण ईश्वरीकृपेनें मला यांतूनही एक वाट दिसली ती ही कीं श्रीमंतांकडे समक्ष जाऊन झालेला प्रकार सरळपणें निवेदन करून त्यांची मदत मागावी. त्याप्रमाणें वेळ न दवडतां महाराजांकडे बडोद्यास गेलों. भेट झाली. महाराज खरे दिलदार. ते हंसून म्हणाले, " काय शिंदे, आमच्या पैशांची काय वाट ? " मी अत्यंत नम्रपणानें उत्तर केलें, "महाराज पत्करलेलें कार्य ईश्वराचें आहे आणि तें आपल्यास पसंत पडण्यासारखेंच आहे. धर्मसुधारणा, समाजसुधारणा इत्यादि प्रागतिक गोष्टींचें बाळकडू आपण

दयाळू महाराज



श्री. विठ्ठलराव सौ. रुक्मिणीबाई कुमार प्रताप शिंदे.

सन १९०१ सप्टेंबरमध्यें विलायतेला जाण्यापूर्वी घेतलेला फोटो.

आजपर्यंत पुष्कळच पाजीत आलेले आहांत. आतां तर विलायतेंतील युनिटेरियन समाजानें माझा अर्ज पसंत केल्यावर ही चालून आलेली संधि आपण दवडणार नाहीं अशा भरंवशावरच आपणाकडे आलों. मला प्रवासास लागणारे सुमारे दीड हजार रुपये जर आपण कृपाळूपणें द्याल तर अर्थातच माझे मागचे दीड हजार रुपयांचें ऋण फिटलें असेंच मी समजेन." ऋण फेडण्याचा हा अजब प्रकार पाहून दयाळू महाराज हंसले आणि म्हणाले, "बरें आहे. शिंदे तुम्ही यशस्वी होऊन या." सेकंडक्लास डेकचें जाण्यायेण्याचें भाडें देण्याची हुजुराज्ञा झाली.

हें कळल्यावर समाजाचे मित्रमंडळीस फार आनंद झाला. बाकीची लहानमोठी तयारी होण्याला फारशी अडचण पडली नाहीं. ही इतर तयारी करण्यास माझे मुंबई समाजांतील मित्र रा. कोरगांवकर यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. इतरांनीं त्यांना सढळ हस्तें मदत केली. हा बनाव सुमारें १९०० सालच्या नवंबर, डिसेंबर महिन्यांत झाला असावा. सेकंड एल्एल्. बी. च्या माझ्या चारही टर्मस भरल्या होत्या. कायदा बहुतेक वाचला होता तरी वरील दगदगीमुळें माझी खात्रीनें पास होण्याची तयारी नव्हती. परीक्षेचा फार्म भरून मुंबई युनिव्हर्सिटीकडे मीं फी देखील पाठविली होती. पण ज्या गोष्टीकडे मनापासून कल नव्हता तिची दगदग मी कसचा वाहतों. कायदा मागें पडला तो कायमचाच. त्याचें स्थान दैवी कायद्यानें पटकावलें.

**आश्वासन**

हा सर्व घडत असलेला महत्त्वाचा प्रकार मी माझ्या वृद्ध वडिलांस अद्याप कळविला नव्हता. याचें मुख्य कारण हा योग जमून येईल अशी मला खात्री वाटत नव्हती. शिवाय त्यावेळीं विलायतेला जाणें आणि त्यांतलेंत्यांत मागासलेल्या देशांतील माझ्यासारख्या गरीब खेडवळानें जाणें हें फारसे संभवनीय नसल्यानें आईबापांची सहजासहजीं अनुकूलता मिळेल असें मला वाटेना. ज्या आईबापांनी व इतर बहिणभाऊ, आश्रितांनीं इतके दिवस हालकष्टांत घालवले

होते व उच्चशिक्षण दुर्मिळ असलेल्या त्यावेळीं बी. ए.; एल्‌एल्‌. बी. वगैरे परीक्षा होऊन बडोद्यासारख्या संस्थानांत माझी चांगली वर्णी लागण्याचा काळ इतका जवळ आला असतांना त्या सर्वांवर निःशंक पाणी सोडून मुलानें विलायतेसारख्या दूर देशांत जाण्याचा मार्ग पत्करला आणि तोही ऐहिक स्वार्थासाठीं नसून परत आल्यावर फकिरी पतकरण्यासाठीं ! हे जेव्हां आई-बाबांना कळेल तेव्हां त्यांना काय वाटेल याचें दारुण चित्र मला दिसूं लागलें. शेवटीं मला जेव्हां त्यांना सर्व प्रकार कळविणें भाग पडलें तेव्हां वडिलांना धक्का बसून ते कित्येक आठवडे आजारी पडले. पण आश्चर्य हें कीं माझ्या आईनें धीर सोडला नाहीं; ती त्यांची वरचेवर समजूत घालूं लागली. आपल्या निराशेचें दुःख आवरून धरून दोघेही मी स्वीकारलेल्या मार्गांत मला यश मिळावें अशी प्रार्थना करूं लागले. इतकेंच नव्हे तर परत आल्यावर मी जें व्रत पतकरलें होतें त्यांत आपणही भाग घेऊं असे आश्वासूं लागलें. मला धन्यता वाटूं लागली.

प्रत्यक्ष मँचेस्टर कॉलेजची टर्म १९०१ च्या आक्टोबर महिन्यांत सुरू होणार होती. तोंपर्यंत ५।७ महिन्यांचा अवधि होता. या अवधींत मी पुण्याच्या किबेवाड्यांतील नूतन मराठी विद्यालयाच्या हायस्कुलांत इंग्रजी ६ व्या व ७ व्या इयत्तेंत इतिहास व इंग्रजी काव्य या विषयांचा शिक्षक म्हणून काम पत्करलें. त्यावेळीं ह्या शाळेजवळच असणाऱ्या जमखंडीकरांच्या वाड्यांत मी राहात असें.

शेवटीं सप्टेंबर महिना आला. आईबाप, बहिण भाऊ, पत्नी व मुलगा ही सर्व मंडळी जमखंडीकरांच्या वाड्यांत मजबरोबर राहात होती. आम्ही सगळे मिळून मुंबईस गेलों. "पर्शिया" नांवाच्या आगबोटीनें माझा प्रवास व्हावयाचा होता.

शनिवार ता. २१ सप्टेंबर १९०१ रोजीं सकाळचे १०॥ वाजतां रा. कोरेगांवकराचे घरांतून निघालों; तेव्हांपासून वियोगाच्या तीव्र वेदना सुरू

झाल्या. बॅलार्ड पिअरवर माझ्या आधीं बरीच मित्रमंडळी जमली होती. गुरु-जन आशीर्वाद देऊं लागले. मित्रमंडळ अभिष्टचिंतन करूं लागलें. कांहींजण प्रवासांत उपयोगी अशा महत्त्वाच्या सूचना करूं लागले. अशी एकच गर्दी उडाल्यामुळें मी भांबावल्याप्रमाणें झालों होतों. १२ वाजतां प्लेग डॉक्टरची तपासणी सुरूं झाली. १२॥ वाजतां मी सर्वांचा शेवटचा निरोप घेऊन निघालों. दारावर आंत सोडतांना रखवालदारानें थोडासा दांडगाईचा प्रसंग आणिला. पण हिंदुस्थानांतील निदान दोन वर्षेपर्यंत तरी ही दांडगाई अखेरची असल्यानें मीं ती कौतुकानें सहन केली. तपासणी एका मिनिटांतच आटोपली. एकदां आंत गेल्यावर जाणारांची आणि पोचविण्यास आलेल्यांची नुसती नजरानजरही होत नाहीं म्हणून दोघांसही फार वाईट वाटतें. मी मचव्यांत बसल्यावर मला न भेटलेल्या बाहेरच्या तिघां मित्रांकडून पुन्हा भेटून जाण्याबद्दल तीन चिठ्या आल्या. पण इतक्यांत मचवा निघाल्यानें माझा नाइलाज झाला. हळू हळू माझा मायदेश डोळ्यांदेखत अंतरूं लागला. वियोग मूर्तिमंत पुढें उभा राहून माझ्या जिवलग माण-सांची उदास व खेदमय दिसणारीं चित्रें मला एकामागून एक दाखवूं लागला. आणि अशाच कष्टमय स्थितींत मला दोन वर्षें काढावीं लागतील कीं काय अशी धास्ती पडली.

---

# भाग सहावा : 'परदेशगमन व धर्मशिक्षण'

## प्रकरण २५ वें

### विहंगावलोकन

परदेशांत १९०१ ते १९०३ या दोन वर्षांत माझें जे निरीक्षण व शिक्षण झाले त्याचा आराखडा विहंगमदृष्ट्या प्रथम घेणें बरें. मी इंग्लंडांत केवळ ऑक्स्‌फर्ड येथें मँचेस्टर कॉलेजांत धर्माचे पुस्तकी शिक्षण घेण्याकरतां गेलो नव्हतो.

**हेतू**

मुख्यतः तुलनात्मक पद्धतीनें जगांतील सर्व धर्मांच्या इतिहासाचे ऊर्फ विकासाचे अवलोकन करून स्वतःची धर्मबुद्धी विशद करून धर्मप्रचाराची तयारी करणे हा तर मुख्य हेतू होताच. पण तो एक हेतूं होता. शिवाय युरोपांतील प्रमुख चालीरिती पाहाव्या, वाङ्मय वाचावे, पंडित आणि सज्जनांच्या भेटी घ्याव्या, नव्या–जुन्याची वाढ निरखावी, निरनिराळ्या वर्गांची–विशेषतः खालच्या व चिरडलेल्या वर्गांची–अंतःस्थिति ओळखावी व त्यांच्यात राहावें, सुंदर आणि प्रेक्षणीय स्थळें पाहावीत आणि तेथें एकांतवास करावा व आत्मशोध करावा इ० अनेक हेतू होते.

मँचेस्टर कॉलेज हे सुधारकी कॉलेज होतें. ऑक्स्‌फर्ड युनिव्हर्सिटींत जुन्या खिस्तीमताचा दाब दृढ असल्यानें ह्या कॉलेजचा त्या युनिव्हर्सिटींत प्रवेश होणें शक्य नव्हते. तथापि त्या विश्वविद्यालयाचा बरा वाईट

**कॉलेजांतील सुट्ट्या**

परिणाम व संसर्ग ह्या कॉलेजवर न घडणें अशक्य होते. ह्या कॉलेजचा अध्ययनाचा व अनध्ययनाचा उर्फ सुटीचा काळ इतर कॉलेजांप्रमाणेंच नियमीत केला होता. पहिली टर्म ऑक्टोबर मध्यापासून तों डिसेंबर मध्यापर्यंत ८।९ आठवड्यांची व नंतर नाताळची सुटी ४ आठवडे. दुसरी टर्म जानेवारी मध्यापासून तों मार्च मध्यापर्यंत ८ आठवडे; व नंतर ईस्टरची सुटी ६ आठवडे. तिसरी टर्म मेच्या सुरवातीपासून जवळ जवळ जून अखेर; नंतर उन्हाळ्याची दीर्घ सुटी सप्टेंबर अखेर १२ आठवड्यांची. म्हणजे जवळ जवळ सहा महिने सुटी व सहा महिने अभ्यास असा प्रकार आहे. मी ऑक्स्फर्ड मध्यें दोन वर्षे होतो, त्याकाळीं सहा टर्म्स व सहा सुट्या पडल्या. पहिली नाताळची सुटी मी लंडनमध्यें घालविली. दुसरी सुटी पॅरिसमध्यें घालविली. तिसरी उन्हाळ्याची दीर्घ सुटी इंग्लिश व स्कॉच Lake Districts मध्यें, म्हणजे पर्वतशिखरें व सरोवरें चांदण्यांत हिंडून घालविली. पैकीं पहिले पंधरा दिवस बॉरोडेल नांवाच्या सुंदर दरींत डरवेंट वॉटर नांवाच्या सुंदर सरोवराच्या किनाऱ्यावर माझे परमपूज्य प्रो० जे० एस्लीन कार्पेंटर यांच्या लीथ नांवाच्या कुटीरांत पाहुणा म्हणून होतो. माझ्याबरोबर ७।८ विद्यार्थी होते. चौथी दुसऱ्या नाताळची सुटी मी मुद्दाम ऑक्सफर्डमध्येंच राहून घालविली. पांचवी मी कॉर्नवॉलमध्यें नैऋत्य किनाऱ्याकडील प्रदेशांतील वस्टनहॅम वगैरे शहरें व खेडीं पाहण्यांत घालविली. पैकीं १३ दिवस माझे मित्र मिस्टर आणि मिस् जे० वॉल्टरकॉककडे त्यांच्या पोल्ट्रनी नामक पाहुणचार घेतला.

शेवटची दीर्घ सुटी मी कांहीं दिवस चेल्टनहॅम येथील मध्यदेशांत घालवून पुढें हॉलंडची राजधानी ॲम्स्टरडॅम येथें अनेक सुधारलेल्या देशांतील उदार धर्मीयांची परिषद भरली होती, तींत हिंदुस्थानच्या ब्राह्मसमाजाचा प्रतिनिधी म्हणून गेलो. नंतर जर्मनी, स्वित्झरलंड व इटली हे देश पाहिले. जर्मनी येथील कलोन गांवचे प्रसिद्ध कॅथेड्रल ( उपासना मंदीर ), जे जगांतील सात

आश्चर्यांपैकीं एक असें मानलें जातें, हें विशेष रीतीनें पाहण्यासाठीं दोन दिवस घालविलें. स्वित्झरलंड येथील आल्प्स पर्वतांतील अत्यंत सुंदर असा लुसन प्रदेशांत अवलोकनासाठीं मुद्दाम चार दिवस घालविले. मुंबई युनिव्हर्सिटींत माझा ऐच्छिक विषय रोमचा इतिहास होता. त्या इतिहासांतील प्राचीन स्थळें, इमारती, अलिकडची लोकस्थिति व लोकसंख्या पाहण्यासाठीं जिनोआ व रोम येथे एक आठवडाभर राहिलों. शेवटीं नेपल्सजवळ जुने पाँपे शहर, भूकंपाखालीं दडपून गेलेलें पण नुकतेच उत्खनन केलेले, त्यांतील देखावे व वस्तू पाहण्यासाठीं; आणि जवळचा ज्वालाग्रहि व्हेसुवियस पर्वत नुकताच आ पसरून आपल्या पोटांतील ज्वलत्प्रवाह ओकत होता, हे पाहण्यासाठीं नेपल्सला ४ दिवस राहिलो. शेवटीं तेथील बंदरांतून इटॅलियन बोटीनें ता. ६ आक्टोबर १९०३ रोजीं मुंबईस येऊन पोहोंचलो.

माझ्या दोन वर्षांच्या प्रवासांत मी इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, हॉलंड, जर्मनी, स्वित्झरलंड व इटली हे देश थोडेबहूत पाहिलें. एकंदरींत इंग्लिश लोक बरे दिसले. फ्रेंच अधिक उल्हासी व किंचित उथळ भासले. इटॅलियन मात्र मेकॉलेनें म्हटल्याप्रमाणें हिंदू लोकांसारखे मनांतून बरेच उतरतात. हा कॅथालिक पंथाचा प्रभाव. आल्प्स पर्वत व ऱ्हाईन नदी प्रशस्त व रमणीय दिसली. पॅरिस शहर ख्यातीप्रमाणें सुंदर व नटवे दिसलें लंडन बोजड व बेंगरूळ दिसलें. त्यांत बराच फापट पसारा आढळून आला. इंग्लंडमध्यें विशाल असा देखावाच नाहीं. सर्व लहान प्रमाणावर साधेंच पण नयनमनोहर असायचे. लोक घुम्मे पण पक्के व्यावहारिक व शहाणे दिसले. श्रीमंत व दरिद्री हे भिन्न दर्जे एकमेकांत शेजारीं गुण्या गोविंदानें वागतात. संतोष व शांति ह्या चिमुकल्या बेटांत मूर्तिमंत दिसल्या. अर्थात् गर्वाची बाधा दोघांनाही आंतून झालेलीच. हे खोल नजरेंत आल्याशिवाय राहात नाहींच. दारूव्यसन व लैंग्य व्यभिचार मोठमोठ्या शहरांतून चोहोंकडेच

बोकाळला आहे व वाढत आहे. पण खेडीं व रानें शुद्ध आहेत. शेती खालावत आहे. बेकारी माजत आहेत.

ख्रिस्तीधर्माचा पगडा इतर मोठ्या देशांपेक्षां इंग्लिश बेटांत अधिक सुरक्षित दिसतो. मात्र तो संभावित स्वरूपांतच विशेष आहे. म्हणजे अध्यात्मापेक्षां सामाजिक जीवनच सांभाळून आहे. खऱ्या परोपकाराचीं कामे मागें पडून धर्मांची संभावित रहाटीच अधिक चालविली जात आहे. ह्या म्हणण्याला मुक्तिफौजही ( Salvation Army ) अपवाद नाहीं.

लैंगिक नीतीचा बोभाटा पॅरीस व फ्रेंच हद्दीवरील शहरांतून बराच आहे. तरी पण इतर देशांतील – विशेषतः अमेरिकन खुशालचेंडूच – या बोभाट्याला अधिक कारण आहेत. खुद्द फ्रेंच राष्ट्र कॅथालिक पेंचांतून सुटलें नाहीं तरी, वरपांगी स्वातंत्र्याच्या शाब्दिक गलबल्याला अधिक हातभार लावीत आहे. मला आयर्लंड, रशिया व ग्रीस हे देश पहावयास मिळाले असते तर बरें झालें असतें. रशियांतील कौंट टॉलस्टॉयचे पट्ट शिष्य क्रांतिकारक चेट्कॉव्ह हे एकदां मँचेस्टर कॉलेजच्या मार्टिनो क्लबमध्यें व्याख्यान देण्याला आले होतेच. त्यांची मी खाजगी भेट घेतली तेव्हां भावी महायुद्धाचें व रशियन क्रांतीचें स्वप्नही मला पडलें नव्हतें. तरी पण युरोपियन किनारा सोडण्यापूर्वी पाश्चात्य संस्कृतीच्या घमेंडखोर पोकळपणाचा मला जवळ जवळ वीट आला होता.

---

# प्रकरण २६ वें

## माझें विऱ्हाड

इंग्लंडांत परक्यांना राहण्यासाठीं उत्तम व्यवस्था असते. श्रीमंतासाठीं व

सामान्यासाठीं निरनिराळ्या दर्जोंचीं हॉटेलें शहरांत, गांवांत आणि प्रेक्षणीय स्थळें रानांवनांतून सुद्धां मुबलक आहेत.

**डॉ. ग्रेडन** शिवाय खासगी रीतीनें राहण्यासाठीं मध्यमप्रतीचे लोक पाहुण्यांकडून पैसे घेऊन ( Paying Guest ) आपल्या घरीं वाटेल तितके दिवस सोय करतात. डॉ० आणि मिसेस ग्रेडन या दंपतीकडे मीं बहुतेक पहिली टर्म घालवली. कॉलेज वसतिगृहांत, मी उशिरां गेल्यानें जागा मिळाली नाहीं. पण पुढील अनुभवावरून, स्वातंत्र्य आणि काटकसर या दृष्टीनें बाहेर राहणेंच बरें वाटूं लागलें. ग्रेडनसारख्या संभावित कुटुंबामध्यें मला इंग्रजी चालीरीति आणि सभ्यता यांची बरीच माहिती मिळून फार लाभ झाला. सामान्य हिंदु विद्यार्थ्याला टेबलावर बसून कांटे–चमचे वापरणें, टॉय कॉलर नीट बांधणें वगैरे क्षुल्लक गोष्टीपासून तों संभावित मंडळीमध्यें बोलण्या चालण्याची ढब राखणें व दुसऱ्याचा पाहुणचार करणें, वगैरेपर्यंतची फार खबरदारी घ्यावी लागते. शिकल्याशिवाय ही खबरदारी शक्य नाहीं. काटकसरीसाठी मला हें घर सोडून स्वतंत्र रीतीनें भाड्याची जागा घेणें पुढें काटकसरीच्या दृष्टीनें बरें वाटलें. गरीब स्थितीचें कुटुंब एक सबंध घर घेऊन आपण तळघरांत राहून इतर मजले सभ्य गृहस्थांस भाड्यानें देऊन आपली गुजराण करतात. कुटुंबांतील मालकीण ( हिला Land Lady असें म्हणतात ) बहुतेक अशा प्रकारचा धंदा करते. पाहुण्याचें जेवणखाण, स्नानाची, कपडे धुण्याची व कांहीं घरगुती व्यवस्थेची जबाबदारी या बाईकडे असते.

**भाड्याची जागा** ऑक्सफर्ड वूस्टर प्लेस नांवाच्या मध्यम वस्तीच्या भागांत नं. २३ च्या घरांतील पहिल्या मजल्यांतील दोन खोल्या मीं घेतल्या होत्या. ऑक्सफर्डचा विद्यार्थी, विशेषतः ब्राह्मसमाजाचा प्रतिनिधि म्हणून काटकसर संभाळून व्यवस्थेनें व सभ्यतेनें वागणें मला जरुर होतें. निजावयाची खोली व उठण्याबस-

ण्याची खोली निराळी ठेवावी लागते. युनिव्हर्सिटींतील बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यां-वर युनिव्हर्सिटीच्या शिस्तीचा डोळा असतो. म्हणून अशा घरांना युनिव्हर्सिटी-कडून परवाना घ्यावा लागतो. माझ्या लँड लेडीचें नांव मिस पिअर्सन होतें. मिस्टर पिअर्सन ऑक्सफर्डच्या एका मोठ्या हॉटेलांत वाढप्याचें काम करीत होते. ह्यांना दोन मुलें व चार मुली होत्या. माझ्या वरच्या मजल्यांत दुसरा एक पाहुणा होता. आम्ही दोघे ६ महिन्यांचे वर तेथें राहिलों तरी एकमेकांशीं कधींच बोललों नाहीं. कारणाशिवाय एकमेकांशीं सलगी लावणें हें असभ्य समजलें जातें.

**पिअर्सन**

पिअर्सन हें कुटुंब अत्यंत साधें, गरीब व फार प्रामाणिक होतें. जातिभेद नाहीं तरी इंग्लंडांत वर्गभेदाचें प्रस्थ फार आहे. ऑक्सफर्डचा विद्यार्थी आणि त्यांतल्यात्यांत धर्म-शिक्षणाचा विद्यार्थी, याचा दर्जा इंग्लंडांत फार मोठा समजला जातो. अमीर उमरावांच्या खालोखाल धर्माधिकाऱ्यांचा दर्जा फार मोठा मानला जातो. प्रसंगविशेषीं मोठमोठ्या लॉर्ड लोकांवरही अशा लोकांचें दडपण पडतें. ह्या कुटुंबांतील सर्व लहानथोर माणसांनीं मला नेहमीं फारच आदबीनें वागवलें. म्हणून मला शेवटपर्यंत बिऱ्हाड बदलण्याचें कारण उरलें नाहीं. सर्वांत वडील मुलगी ॲलिस हिच्याकडे पाहुण्यांची सर्व व्यवस्था पाहण्याचें काम होतें. बोलावल्याशिवाय कोणीही खोलीच्या आंत पाय टाकत नसत. इंग्लंडांत खोल्यांचीं सर्व दारें, उन्हाळ्यांतही नेहमींच लावलेलीं असतात. कोणी कोणाकडे परवानगीशिवाय आंत येत नाहीं. पुढें दाट परि-चय झाल्यावर मी होऊनच तळघरांतील स्वयंपाकघरांत मिसेस पिअर्सनकडे खेळीमेळीनें जाई. तेव्हां सर्व कुटुंबाला आपला मोठा सन्मान झाल्यासारखें वाटे. ॲलिसचें वय सुमारें बावीस वर्षांचें होतें. तिच्या पाठीवर विली व फ्रँक असे भाऊ होते. त्यांच्या पाठीवर नेली, मे आणि मॅगी अशा तीन मुली होत्या. मॅगी तीन वर्षांची होती.

मी या सर्व मुलांना घेऊन आदितवारीं फिरण्यास जात असें. ॲलिसचा एक मोठा भाऊ वारला होता. त्याचें थडगें मा

व्यक्तित्व

पाहण्यास जावें अशी ॲलीसनें एकदां मला सूचना केली होती. ख्रिस्ती समाजाची स्मशानभूमि देखील फार सुंदर व रमणीय असते. नाहींतर आमच्या पुण्याचें ओंकारेश्वर! एके रविवारीं मी तें थडगें सर्व लहानग्यांसह पाहण्यास गेलों. थडग्यावरील गुलाबाच्या झाडाला सुंदर फूल आलें होतें. तें पाहून मी लहानग्या मॅगीला म्हटलें, 'बाळ, तें फूल घे बघूं!' ती म्हणाली, " No Sir, तें झाड माझ्या आईचें आहे. तिच्या परवानगीशिवाय मला हात लावतां येत नाहीं. " हें ऐकून मी मनांत चरकलों. मॅगी केव्हां केव्हां बोलावल्यावर माझ्या खोलींत येई. तिला, 'हें टेबल कुणाचें, ही खुर्ची कुणाची' असे प्रश्न विचारल्यास "माझ्या आईची" असें गंभीर उत्तर येई. 'आमची' असे उद्गार तिचे तोंडून कधींच येत नसत. गरीब स्थितींतील लहानग्या मुलीचे व्यक्तीत्वाचे हे उद्गार ऐकून इंग्रजांविषयीं मला धन्यता वाटली.

---

## प्रकरण २७ वें

### मँचेस्टर कॉलेज

इंग्लंडांतील प्रचारक पद्धतशीरपणें तयार करण्यासाठीं मँचेस्टर कॉलेज या नांवाची केवळ उदार धर्मशिक्षणासाठीं वाहिलेली संस्था ऑक्सफर्ड येथें आहे. मँचेस्टर कॉलेज हें मँचेस्टर येथें प्रथम निघून लंडन वगैरे ठिकाणीं

स्थलांतर पावून आतां ऑक्सफर्ड शहरांत स्वतःच्या कायमच्या इमारतींत चालू आहे.

वास्तविक पहातां ही संस्था इ. स. १७५७ मध्यें वॉरिंग्टन ॲकेडमी, या नांवानें वॉरिंग्टन येथें स्थापन झाली. तिचें पुढें १७८६ सालीं मँचेस्टर कॉलेज असें रूपांतर झालें. या क्रांतीचे काळीं संस्थापकांचा धर्म व शास्त्र या दोहोंवरही सारखाच विश्वास होता. म्हणजे यांचा धर्म शास्त्रीय व शास्त्र धार्मिक होतें.

अध्यापक वर्ग

पहिले प्राध्यापक जॉन टेलर हे ( १७५७–६१ सालीं ) होते. इ. स. १८९७ सालापर्यंत प्रसिद्ध डॉ. मार्टिनो हे प्राध्यापक होते. त्यानंतर माझ्या वेळीं व नंतरही डॉ. ड्रमंड हे प्रिन्सिपाल होते. हे विद्येनें तसेंच श्रद्धेनें आणि शीलानें फार मोटे गृहस्थ होते. ह्यांच्याशिवाय प्रो० अप्टन ( तत्त्वज्ञान ), प्रो० कार्पेन्टर ( तुलनात्मक धर्म व पालीभाषा ) प्रो० रॉजर्स ( Church history ख्रिस्तीसंघाचा इतिहास ), प्रो० जॅक्स ( समाजशास्त्र आणि Hibburt Journal चे संस्थापक व संचालक ) वगैरे जाडे पंडित त्या विषयाचे अध्यापक होते. प्रिन्सिपाल ड्रमंड हे बायबल आणि धर्मशास्त्र शिकवीत. ह्यांपैकीं प्रो. कारपेन्टर हे तुलनात्मक धर्म ह्या माझ्या ऐच्छिक विषयाचे विशिष्ट Tutor म्हणजे माझ्या अभ्यासावर देखरेख ठेवणारे, नेमून दिलेले गुरु असत. यांच्याजवळ मीं पाली भाषा आणि बुद्धधर्माचा विशेष अभ्यास केला. दोन वर्षांचा अभ्यास आटोपून ह्या कॉलेजचा डिप्लोमा मला देतेवेळीं कॉलेज-कमिटीकडे प्रो० कार्पेंटरनें मजबद्दलचें जें प्रशस्तिपत्र पाठविलें त्यांत माझ्या खास गुरूनें ( डॉ. कार्पेंटरनें ) चांगले गौरवपर आणि प्रेमळ उद्गार काढले होते.

हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांप्रमाणें ह्या कॉलेजांत विद्यार्थ्यांची परीक्षारूपी शर्यत लावून त्यांच्या शहाणपणाचा दर्जा ठरवीत नाहींत. नेमून दिलेले खास

गुरु आपापल्या शिष्यांना निरनिराळ्या विषयांत त्यांना निबंध लिहिण्यास सांगून त्यांच्या अभ्यासाची आणि विचारविकासाची पारख करतात. वर्षअखेर खास निबंध लिहावयाला देऊन त्यांत दाखवलेल्या हुशारीप्रमाणें प्रशस्तिपत्र लिहून देतात.

**पूर्व व पश्चिम**

कॉलेजांत विद्यार्थीही इकडच्याप्रमाणें शेंकडयांनीं किंवा हजारांनीं मोजतां येण्यासारखा प्रकार मँचेस्टर कॉलेजांत नाहीं. एका वेळीं फार तर १५।२० विद्यार्थ्यांहून जास्त नसतात. तेही दोन वर्षांतून विभागलेले असतात. ते दुसरीकडे बी. ए. अगर एम्. ए. होऊन आलेले असतात. अगोदरच कोणत्या तरी गीर्वाण प्राचीन भाषेंत त्यांना पदवी मिळालेली नसेल तर अशा कोणत्या तरी दोन प्राचीन भाषांचा अभ्यास करण्याची ह्या कॉलेजांत व्यवस्था असते. मुंबई विश्वविद्यालयाचा संस्कृतचा बी. ए. असल्यानें मीं येथें पालीचा अभ्यास जास्ती केला.

मँचेस्टर कॉलेजचें महत्त्व त्यांतील केवळ ठराविक अभ्यासक्रमावर मुळींच अवलंबून नाहीं. ते एक उदार धर्मशिक्षणाचें कुटुंबच होतें. १५।२० विद्यार्थी, पांच सात प्रोफेसर, त्यांच्या मुली, नाती व इतर कुटुंबीय ह्या सर्वांचा धर्मपरिवार म्हणजेच कॉलेज. कॉलेजची इमारत प्रशस्त, नवी आणि सुंदर. अवाढव्य पुस्तकालय, गंभीर व स्वतंत्र उपासनालय आणि त्यांत दर आठवडयाला प्रार्थनेसाठीं जमणारा ऑक्सफर्ड शहरांतील युनिटेरियन समाज असें एक कॉलेजहूनही मोठें कुटुंब होतें. कॉलेजच्या उपासनालयांत प्रोफेसर मंडळी रविवारची साप्ताहिक उपासना चालवीत. त्याशिवाय दर बुधवारीं सायंकाळीं, कॉलेजच्या प्रत्येक विद्यार्थ्यानें उपासना चालवण्यास शिकावें म्हणून एक साप्ताहिक उपासना व उपदेश तयार करावयाचा असे. तो ऐकून सूचना देण्यासाठीं एका खास प्रोफेसराची नेमणूक आहे.

**धर्मपरिवार**

ह्याशिवाय विद्यार्थ्यांना वक्तृत्वाचे प्रसंग यावेत, मोठमोठ्या विषयावर विचारविनिमय करण्याला अवसर मिळावा म्हणून

**निबंध व प्रयोग** मार्टिनो क्लब या नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली होती. प्रत्येक टर्ममध्यें हा क्लब दोनदां भरत असे. त्यांतच वर सांगितल्याप्रमाणें चेट्कॉव्ह ह्या रशियनानें रशियांतील धर्मशिक्षण ह्यावर निबंध वाचला. हे मोठे ग्रंथकार असून प्रसिद्ध Socialist व Anarchist होते. ऑक्सफर्डमधील सर्व युनिटेरीयन समाजांतील स्त्रीपुरुषांचा परिचय व्हावा, विचारविनिमय वाढावा, म्हणून वर्षांतून निदान एक तरी, मोठें स्नेहसंमेलन घडविण्यांत येत असे. अशा एका स्नेहसंमेलनांत The Romance of Social Reform in India ह्या विषयावर मी एक निबंध वाचला. नुसता निबंधच न वाचतां, " हिंदु-गृहपद्धति व सामाजिक स्थिति " कशी असते हें प्रत्यक्ष दाखविण्याकरितां मध्यम स्थितींतील कुटुंबाच्या देखाव्याची सजावट करून दाखविली. कांहीं तरुणांना व तरुणींना हिंदी पोषाख देवून हिंदुपद्धतीनें बसविण्यांत आलें होतें. पोषाक, सामान, नकली दागदागिने वगैरे एका दुकानांतून तात्पुरते आणले होते. नवीन लग्न झालेली सूनबाई कोपऱ्यांत भिंतीकडे तोंड करून कशी बसते, जवळ आलेल्या परीक्षेसाठीं तिचा नवरा मोठमोठ्यानें घोकंपट्टी करीत दुसऱ्या कोपऱ्यांत कसा बसतो, कोणी वडीलधारें माणूस अवचित आल्यावर दोघे उठून कसे नमस्कार करतात वगैरे दृश्यें हावभावासकट दाखविण्यांत आलीं. एकंदर प्रयोग लोकांना इतका आवडला कीं ' Inquirer ' नांवाच्या युनिटेरियन समाजाच्या मुखपत्रांत निबंध आणि हा सर्व प्रकार प्रकाशित झाला. इतकेंच नव्हे तर त्या सर्व लेखांचें भाषांतर एका फ्रेंच वर्तमानपत्रानें प्रसिद्ध करून त्याची एक प्रत मजकडे आभारपूर्वक पाठविली.

नवीन टर्म सुरू झाल्यावर कॉलेजांतील वृद्ध प्रोफेसर प्रत्येक विद्यार्थ्याला समक्ष भेटून, आपल्या घरीं चहा घेण्याला दर आठवड्यांतून कोणचा

दिवस मुक्रर केला आहे तो कळवीत असत. सर्व विद्यार्थ्यांना कॉलेजच्या वसतिगृहांत जागा मिळत नसे. असे विद्यार्थी गांवांत

**चहापान**

भाड्यानें जागा घेऊन राहात असत. अशा विद्यार्थ्यांच्या घरीं जाण्यासही प्रोफेसर्स कमीपणा मानीत नसत. त्यांच्या घरीं चहाची परतभेट देण्यासही आनंदानें जात. मग अशा कॉलेजाला कुटुंब म्हणूं नये तर काय म्हणावें ?

सकाळीं १० पासून दोन प्रहरीं १ पर्यंत तीनच तास कॉलेजचीं व्याख्यानें असत, झालींच तर संध्याकाळीं जाहीर व्याख्यानें असत.

**उपासक**

रात्रींच्यावेळीं क्लबच्या सभा, संमेलनें चालत. वर्षांतून सहा महिने अभ्यास आणि सहा महिने सुट्टी, असें वर सांगितलेंच आहे. पण आठवड्यांतून चार दिवस कॉलेज व तीन दिवस सुट्ट्या असत. शनिवार, आदितवार, सोमवार हे सुटीचे दिवस ठेवण्याचें कारण हें कीं, इतर गांवांतील कुठल्याही एका युनिटेरियन समाजामध्यें जर एकादे वेळीं उपासक आचार्य नसले तर मँचेस्टर कॉलेजांतील विद्यार्थ्याला तें काम करण्याला पाठविण्यांत येत असे. आणि सांजसकाळच्या दोन उपासनेसाठीं जाण्यायेण्याचें भाडें, पाहुणचारासह दोन पौंड वेतन त्यांना मिळत असे. ही वर्णी मलाही लागत असे. ब्राह्मसमाजाचा प्रतिनिधि म्हणून मला विशेष आवडीनें निवडण्यांत येत असे. ह्या व इतर अनेक प्रकारानें हें कॉलेज म्हणजे सर्व देशांतील सर्व युनिटेरियन समाजाचें एक कॉलेजच होऊन राहिलें होतें. याशिवाय मुलांना गरीब लोकांच्या वस्तींत जाऊन तेथें दयेचीं व परोपकाराचीं कामें करण्याची संवय लागावी म्हणून एका स्वतंत्र लहानशा मिशनची स्थापना झाली होती. ह्याचा कॉलेजाशीं प्रत्यक्ष संबंध नव्हता. तरी डॉ. ड्रूमंड यांची कन्या मिस् नेली हिनें पुढाकार घेऊन हें चालविलें होतें आणि कॉलेजचे विद्यार्थी ह्यांत भाग घेत होते.

# प्रकरण २८ वें

## खेळकर वृत्ति

मँचेस्टर कॉलेजांतील विद्यार्थी पोक्त वयाचे पदवीधर व पुढे धर्मोपदेशकाचें गंभीर काम करणारे होते. म्हणून हे नेहमींच गंभीरपणानें वागत असत असें मुळींच नाहीं. ते बहुतेक खेळकर वृत्तीनें वागत. केव्हां केव्हां तर लहान मुलांप्रमाणें दंगा माजवून सोडीत.

**टॉयोसाकी**

जपानचे एक टॉयोसाकी नांवाचे आमचे वर्गबंधु असत. ते ठेंगू असून मोठे गमती होते. त्यांच्याशीं इतर विद्यार्थ्यांच्या नेहमीं चेष्टा चालत. ते कॉलेजच्या वसतिगृहांतच राहात. एकादे दिवशीं रात्रीं नाटकाला जाऊन उशिरां परत आले आणि दार ठोठावूं लागले म्हणजे दारावरील खिडकीवरून त्यांच्यावर पाणी ओतावें; तें असें कीं ते फार भिजूं नये अशाच बेतानें, असे चाळे चालत. एकदां एक अशी टूम निघाली कीं सर्वांची उंची मोजावी. टॉयोसाकीला एका भिंतीजवळ उभें केलें. त्याच्या उंचीची रेघ मारण्याच्या मिषानें हात वर करून वर असलेली पाण्याची तोटी खुली केली. टायो दचकून निसटला व सर्वत्र हंशा पिकला. दर रविवारीं टोयो फार सभ्यतेचा पोशाक करी. लाँग कोट, टॉप हॅट घालून स्वारी सडकून सभ्य गृहस्थ बने. आणि शहरांतल्या मुख्य मुख्य रस्त्यावरून हिंडून येई. एकदां एका चावट मित्रानें त्याच्या पाठीवर कोटाला एक कागदाची चिठी लावली व त्यावर Chase Me Girls असें जाड अक्षरांत लिहिलें होतें. टोयो घरीं परत येईपर्यंत त्याला हें कळलेंच नव्हतें. हें पाहून मोठा हंशा पिकला.

**मलूल हिंदी**

कॉलेजच्या इमारतींत विद्यार्थ्यांसाठीं Common Room म्हणून एक मोठें दालन होतें. त्यांत विद्यार्थ्यांनीं मोकळेपणानें वागावें, सिगारेट्स फुंकाव्यात, खेळावें, खिदळावें असा प्रकार चाले. केव्हां केव्हां प्रोफेसरही या खोलींत येत. त्यांच्यासमोर सिगारेट्स फुंकणें, एकादी त्यांना देणें असेंही चाले. या दालनांत मध्यभागीं एक मोठें गोल मेज होतें. मी इतरांइतका खिदळत नसे म्हणून मला Meek Indian म्हणजे "मलूल हिंदी" असें नांव पडलें होतें. माझा निरुपद्रवीपणा त्यांना जणूं उपद्रवच देत होता. म्हणून सूड उगवण्यासाठींच कीं काय दोघां धटिंगणांनीं मला सपशेल उचललें, गोल मेजावर आडवें ठेवलें आणि गाणें गात, मला घाण्यासारखें फिरवूं लागले. असा वात्रटपणा केलेल्या धटिंगणाला पुन्हा पुढच्या बुधवारीं उपासनालयांत गंभीरपणें उपासना चालवतांना पाहून मला हंसें आवरत नसे. अशा चाळ्यांपासून खुद्द प्रि० ड्रमंड हे सुरक्षित नव्हते. तशांत त्यांचीं व्याख्यानें असल्यानें या चेष्टांना साहजिकच उत्तेजन मिळे.

**इव्हर्ट**

कॉलेजांत मी केव्हां केव्हां माझा आवडता पिवळा फेटा बांधून शमला सोडीत असे. इव्हर्ट नांवाचा एक स्कॉच विद्यार्थी नेहमींच माकडचेष्टेंत गुंतलेला असे. त्यानें हळू हळू माझा शमला ओढण्यास सुरुवात केली. फेटयाचा खालचा एक विळखा सुटला, दुसरा सुटला तरी इव्हर्टची खोडी थांबेना. सुटलेला भाग आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं खालीं बाकाच्या पायाला तो गुंडाळूं लागलों. असे होतां होतां माझ्या डोक्यावर एकच विळखा राहिला. सगळ्या वर्गाला हंसें आंवरेना. स्वतः प्रि० ड्रमंड यांना तिकडे न पाहिलेसें करून व्याख्यान चालवणें कठीण जाऊं लागलें. ते फार गंभीर आणि शांत गृहस्थ असूनही त्यांच्यावरचा हा हल्ला अवर्णनीय होता. माझ्या तारांबळीला उपमाच नव्हती. स्कॉच लोकांस विनोद समजत नाहीं असा समज आहे, पण हें बाळ ह्या समजाला 'भयंकर'

अपवाद होतें. प्रोफेसर्स व्याख्यान देत असतांना देखील ह्या चावटपणाला आळा पडत नसे. प्रो० अप्टन हे कानानें बहिरे व वृद्ध होते. म्हणून ते खालीं मेजावर बसून, मुलांना नातवंडाप्रमाणें भोंवतालीं घेऊन व्याख्यानें देत असत. अप्टनचें व्याख्यान चाललें असतां तें एकाग्रतेनें ऐकत असलेल्यांच्या कानांत इव्हर्टची पेन्सिल शिरून तो दचकला नाहीं असा एकही विद्यार्थी नव्हता. अर्थात् व्याख्यानापेक्षां ह्या पेन्सिलीकडेच आम्हाला अधिक लक्ष पुरवावें लागे.

लॉकेट नांवाचा एक वेल्स विद्यार्थी कुलंगी कुत्र्याप्रमाणें ओरडण्यांत प्रवीण होता. नुसतें भुंकूनच आपली तृप्ति करून न राहतां तो केव्हां केव्हां पायाच्या पिंडरीला चावूनही आपली कुशलता प्रगट करी.

**मर्कट लिला**

सिगारेट न ओढणारा विद्यार्थी काय तो मीच एकटा होतों. त्यामुळें मी सर्वांच्या डोळ्यांत सलत असें. माझी बसावयाची खोली स्वच्छ, हवाशीर व टापटिपीची असे. अर्थात् हा अपराध कॉलेजबंधूंच्या दृष्टीनें असह्य होता. चिरुटाचा धूर, सिगारेटचीं थोटकें, कागदाच्या गोळ्या वगैरेची खोलींतल्या सामानांत गणना झाली नाहीं तर ती विद्यार्थ्यांची खोली कसली! एकदां चार पांच विद्यार्थी चहासाठीं न बोलावतां आले. प्रत्येकानें सिगारेटचे डबे बरोबर आणले होते. माझ्या खोलींत येऊन प्रत्येकजण धुराचे लोळच्या लोळ सोडूं लागला. खोली धुरानें इतकी गच्च भरली कीं जणूं काय ती बलून-प्रमाणें उडून जाते कीं काय असें वाटलें. चहा देण्यासाठीं लँड लेडी जेव्हां आंत आली तेव्हां झालेला हा संपूर्ण प्रकार पाहून खोलीला आग लागली आहे कीं काय असें वाटून भीतीने तिनें किंकाळीच फोडली. तेव्हां कुठें या मर्कटांचा नवस फिटला.

उन्हाळ्याच्या सुटींत डॉ. कार्पेन्टर लेक डिस्ट्रिक्टमध्यें राहण्यास गेले. तेव्हां आम्हां सर्व विद्यार्थ्यांना १५ दिवस आपला पाहुणचार व सरोवरप्रांताची

शोभा दाखवण्यासाठीं बोलावून नेलें. त्या सुट्टीच्या अनेक करमणुकींत ‘ पॉझ मॅगेझिन ’ नांवाचे एक तात्पुरतें हस्तलिखित पत्र विद्यार्थ्यांनीं काढलें. त्यांत कार्पेन्टर साहेबांना, “ चिप, ” अप्टन साहेबांना “ अपी ” आणि ड्रमंड साहेबांना “ डमी ” अशीं व्यंग नांवें देऊन त्यापुढें त्यांच्या लक्षणांचें एकएक वाक्य लिहिलें होतें.

पॉझ मॅगेझिन

प्रो. कार्पेन्टरच्या नांवापुढें खालील कविता होती—

Each day he does a mountain climb
A ten mile row, three meals, a witicism.
And fills the inteveniug time with Pali
Texts and Hebrew Criticism.

प्रिन्सिपाल ड्रमंड यांना पांच सुंदर तरुण मुली होत्या. त्यांच्या नांवांपुढें खालील वाक्य होतें—

Happy is the man whose quiver is full

टोयोसाकी—

There came from far Japan
To cheer this gloomy place
A merry little man
with mischief in his face.

He flirts like any boy
Although a married man
So we must send our Toy
Once more to far Japan.

शिंदे—

A meek and modest Indian
Who will, unless he faints,
Some day duly be worshipped
Among his country saints

He is no vulgur fraction
As single student be
But he and Mrs. Shinde
Form one integrity.

---

## प्रकरण २९ वें

### कांहीं टिपणें

**युनिटेरियन समाज**

ज्या युनिटेरियन लोकांकडून हिंदुस्थानांतील ब्राह्मसमाजाच्या प्रतिनिधि-विद्यार्थ्याला मँचेस्टर कॉलेजांतून धर्मप्रचारासाठीं तयार करण्याप्रीत्यर्थ स्कॉलरशिप मिळते तो इंग्लण्डांतील युनिटेरियन समाज आणि हिंदु-स्थानांतील ब्राह्मसमाज या दोहोंचीं धर्मतत्त्वें, आचाराचे आणि कार्यांचे धोरण स्थूलमानानें पाहतां जवळजवळ सारखेंच उदारपणाचें आहे. हिंदु-स्थानांतील निरनिराळ्या ब्राह्मसमाजांची व प्रार्थनासमाजांची संख्या, मीं १९१२ सालीं प्रसिद्ध केलेल्या Theistic Directoryमध्यें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील मिळून एकंदर संख्या १६७ आहे. इंग्लंड, आयर्लंड व वेल्स मिळून

एकंदर युनिटेरियन समाजांची संख्या १९०३ सालच्या Unitarian Pocket Book मध्यें दिल्याप्रमाणें ४५६ आहे. पण ब्राह्मसमाजापेक्षां युनिटेरियन समाजाची घटना किती तरी पटींनीं अधिक कार्यक्षम व सांपत्तिक स्थिति अधिक अनुकूल असल्यामुळें हिंदुस्थानांत आजन्म वाहून घेतलेले ब्राह्मधर्म प्रचारक आणि आचार्य फार थोडे म्हणजे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. आणि त्यांत पद्धतशीर रीतीनें तयार करून घेतलेले २।४ असतील किंवा नसतील. इंग्लंडांत अशा प्रचारकांची संख्या १९०३ मध्यें ३७४ होती. सर्व युनिटेरियन कामकाज आवरण्यासाठीं लंडनमध्यें British and Foreign Unitarian Association नांवाची एक संस्था आहे, तशी हिंदुस्थानांत नाहीं. साधारण ब्राह्मसमाज नांवाची कलकत्त्यांत एक मध्यवर्ति संस्था आहे. पण तिचा ताबा सगळ्यांवर सारखा चालत नाहीं. न्यूयॉर्कमध्यें American Unitarian Association नांवाची एक मध्यवर्ति संस्था आहे. कलकत्ता, लंडन आणि न्यूयॉर्क या तिन्ही मध्यवर्ति संस्थांकडून परस्पर सलोख्याचें सहकार्य घडतें. हें कार्य आजपर्यंत जवळ जवळ शंसव्वाशें वर्षांपासून चालत आलें आहे.

**साधन सभा**

ता. १० नवंबर १९०१ च्या आदितवारीं संध्याकाळीं ६ वाजतां आमचे कॉलेजबंधु मि. कॉक यांचे घरीं साधनसभा होती. जेवण तेथेंच झालें. परस्परांची हकिकत सांगितली. त्यांच्या घरीं मि. कॉक व त्यांची बहीण दोघेच आहेत. मोठ्या आनंदानें दिवस घालवत आहेत. दोघे अत्यंत ममताळू व सात्त्विक आणि हिंदुधर्माचे व तत्त्वज्ञानाचे चाहते आहेत. दोघे Theosophist आहेत. मि. कॉक हा स्वतः खाटकाचा मुलगा असून पूर्वाश्रमीं बरेच दिवस खाटकाचा धंदा करूनही, हा आणि ह्याची बहीण आतां पूर्णतः शाकाहारी बनली आहेत. आध्यात्मिक-भाव व भक्ति वाढवण्याकरतां नियमित वेळीं आम्ही एकत्र जमून कांहीं साधन करण्याचें त्यांनीं सुचवलें. माझे मनांत हें होतेंच. त्यांस मीं चांगलेंच प्रोत्साहन

दिलें. घरीं परत आल्यावर जेवतांना मिस्टर व मिसेस ग्रेडन (ज्यांचेकडे मी भाड्यानें राहात होतों) यांच्याशीं मांसाहाराबद्दल कडाक्याचा वाद झाला. मी हिंदुस्थानांत असतां कधीं कधीं मांस खात असें. पण तें अजिबात सोडावें असें मला वाटत नव्हतें.

येथें आल्यावर केवळ सात्त्विक अन्न घेत असें. दोघां ग्रेडननीं मला मांस घेण्याविषयीं फार आग्रह केला. सुमारें तीन महिने आमचा शाकाहार चालू होता. पण पुढें शाकाहार चांगलासा न मिळाल्यानें मला त्याची शिसारी आली. अंगांत फार अशक्तता आल्यानें मला शेवटीं तो सोडावा लागला.

**नाताळची पहिली सुटी**

ता. ८ डिसेंबर १९०१ रोजीं दोन प्रहरीं १ वाजतां ऑक्सफर्ड येथून निघून लंडनला ३ वाजतां पोंचलों. ग्रेजइन रोड, कॅल्थोर्प स्ट्रीट नं. ७ येथें खोली घेतली. स्वामी निर्विकल्प यांचे शिष्य रा. राजाराम पानवलकर आणि नाशिकचे व्यापार-शिक्षणासाठीं आलेले रा. पंगे हे दोघे लगतच्या खोलींत असत. पानवलकर हातानें स्वयंपाक आम्हां तिघांसाठीं करीत तो आम्हांस फार गोड लागे. तो सात्विक व शुद्ध वनस्पतीचाच असे. यांचे सोबतींत लंडन चांगलेंच पहावयास मिळालें.

**मिस् मॅनिंग**

दोनप्रहरीं ३ वाजतां मिस् मॅनिंगचे घरीं गेलों. तिला किती आनंद झाला! इकडचें तिकडचें बोलणें झाल्यावर तिनें आपली लायब्ररी दाखवली. नंतर हिंदुस्थानचीं चित्रें, मौजेच्या वस्तू, रुप्याचीं भांडीं वगैरे मोठ्या अभिमानानें दाखविलीं. प्रत्येक हिंदी मनुष्याबद्दल आणि वस्तूंबद्दल हिचें किती निष्काम प्रेम दिसलें! हिनें हिंदुस्थानांत प्रवास केला होता. आणि मिस् मेरी कार्पेंटर बाईप्रमाणें हिंदुस्थानच्या सामाजिक सुधारणा व शिक्षण यांबद्दल ती झटत असे. मिस् मॅनिंगला, "द्रौपदी व सुदेष्णा," हें रविवर्म्याचें चित्र मी भेटीदाखल दिलें. तें तिला फार आवडलें.

**दादाभाई नौरोजी**

लंडन इंडियन सोसायटी नांवाची लंडनमधील सर्व हिंदुस्थानवासियांची व मित्रांची सभा पार्लमेंटच्या इमारतीजवळ पॅलेस चेंबर-मध्यें दर पंधरवडयास शनिवारीं भरे. दर बैठकींत सोसायटीचे अध्यक्ष परमपूज्य दादाभाई नौरोजी हेच चेअरमन असत. एकदां आमचे मित्र रा. राजाराम पानवलकर यांचें ‘ इंग्रजी साम्राज्याखालील स्वराज्याची आवश्यकता’ ह्या विषयावर एक तासभर इंग्रजींत भाषण झालें. त्यानंतर चौघांचीं भाषणें झालीं. मीही बोललों. बोलणारे सर्वच तरुण अजाण व अननुभवी होते. तरी दादाभाई सर्वांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेत होते व त्यांचें आपल्या नातवाप्रमाणें कौतुक करीत होते. व्याख्यान आटोपतांच ह्या मुलांनीं त्यांस अनेक प्रश्न सवलतीनें विचारले. त्यांची फोड त्यांनीं मोठ्या आवेशानें केली. म्हातारा देहानें वृद्ध असे खरा पण त्याचा उत्साह तरण्यापेक्षां तरुण असे. सभेचे सेक्रेटरी वागळे यांस बोलतां बोलतां सत्तेनें म्हणाले “अरे तूं मूर्ख आहेस रे, आतां मी तुला शिव्या हांसडीन पहा.”

**एक जागृतीतले स्वप्न**

एकदां पॅस्मोर इन्स्टिटयूटमध्यें इटालियन चित्रकार ह्या विषयावर मॅजिकलँटर्न लेक्चर झालें. तें ऐकावयास गेलों असतां मनांत एक प्रेरणा झाली. माझे मित्र राजाराम पानवलकर यांस केव्हां सांगेन असें झालें. घरीं आल्या-वर आम्ही रात्री १ वाजेपर्यंत ह्या प्रेरणसंबंधीं बोलत बसलों. राजारामास ती फार रुचली. ती अशी :— राजारामानें मजबरोबर ऑक्सफर्ड येथें राहावें. परवानगी घेऊन कांहीं व्याख्यानें, मँचेस्टर कॉलेजांतील ऐकावीं. राजाराम हे विशेषतः उद्धारक मताचे तर मी सुधारक मताचा. असे जरी आम्ही आहों तरी दोघांचीं अंतःकरणें शुद्ध हेतूनें भरलेलीं असल्यानें आम्हीं एकमेकांस लवकर जाणलें व मैत्री जमली. तो हिंदुस्थानांतील “ आर्य संघाचा ” एक कट्टा सभासद आहे व मी प्रार्थना समाजाचा आहें. पण आतां भेद उरला नाहीं. इतकेंच नव्हे तर आम्ही

एकमेकांच्या संस्थेचे सभासद झालों. आमच्या भावी आयुष्याचा मार्ग रेखूं लागलों. Theosophy, मांसाहारनिषेध, योगसाधन, ज्या पौरस्त्य चळवळी येथें चालू आहेत त्यांचें राजारामानें रहस्य जाणून घ्यावें, पुस्तकसंग्रह करावा; माणसें जोडावींत, युनिटेरियानिझम, युनिव्हरसॅलिझम ( Universalism ) सारख्या ज्या पाश्चात्य चळवळी आहेत त्यांचा ठाव मीं घ्यावा असें ठरलें. आम्ही दोघांनीं मिळून येथें दीडवर्ष राहिल्यावर प्रथम दोघांनीं मिळूनच युरोपखंडांतून प्रवास करावा. रोम, अथेन्स, पॅलेस्टाईन, मक्का, कैरो इत्यादि पुरातन व पवित्र स्थळीं यात्रा कराव्यात. तेथील देखाव्यांचे फोटो घ्यावेत. त्यासाठीं राजारामानें ऑक्सफर्ड येथें फोटोग्राफी शिकावी. उदार धर्मावर आम्हीं जागोजाग व्याख्यानें देऊन आपला निर्वाह करावा. युरोपांत प्रवास झाल्यावर नंतर जपान व चीन देशांतून परत कलकत्ता, मद्रास शहरांवरून स्वदेशीं जावें. वाटेंत व्याख्यान देणें, स्नेह संपादणें, बंधुता वाढवणें हाच धंदा ठेवणें इ. इत्यादि. गुरुवारचा दिवस पवित्र समजून त्या दिवशीं कोठें तरी बाहेर जाऊन यासंबंधानें व्रतग्रहण करण्याचें ठरवून आम्ही निजलों. पण झोंप लागली नाहीं. तथापि पुढें याप्रमाणें कांहींही झालें नाहीं, हें सांगावयास नकोच.

दुपारीं ११ वाजतां रे० चार्लस व्हायसेच्या चर्चमध्यें उपासनेस गेलों.

**रे० चार्लस व्हायसे**

हें एका बोळांत आहे. एक तास गीतें गाणें, उतारे वाचणें, प्रार्थना करणें इत्यादि झाल्यावर १२ पासून १२॥ पर्यंत रे० व्हायसे यांनीं उपदेश केला. हे अगदीं कडक सुधारक असून एकेश्वरी पंथाचे आहेत. यांना युनिटेरियानिझमहि पसंत नाहीं. कारण त्यांत ख्रिस्ताचेंच पुढारीपण आहे. युनिटेरीयन लोकांत शुष्कवाद न करतां, मिळून काम करण्याचा मोठा गुण दिसून येतो. तो व्हायसे यांनीं घेतल्यास दोघांसही जास्त बळ येईल. पण या गोष्टीस व्हायसेचीच नाखुशी दिसते. चर्चमधील व्यवस्था फार चांगली आहे.

उपासक सुमारें १०० हजर होते. दारांत व्हायसेची पुष्कळ पुस्तकें विकण्यास ठेविलीं होतीं. बोळांत शिरतांच एक छापील व्याख्यान फुकट मिळतें. संध्याकाळीं पुन्हा उपासना होते. दोन्ही वेळां धर्मार्थ पैसे गोळा होतात. सर्व इंग्लंडांत इतक्या उदार मताचें हें एकच Theistic चर्च आहे. हें आमच्या ब्राह्म समाजाप्रमाणेंच निव्वळ एकेश्वरवादी आहे. हें आठवून व्हायसेची धन्यता वाटते.

**शेरलॉक होम्स**

रात्रीं ८ वाजतां नाटकास गेलो. 'शेर्लाक होम्स'चा प्रयोग झाला. तिकिटाची किंमत २॥ शिलिंग पडली. नाटकांत संगीत अगर कसलाही रस नव्हता. गुप्त पोलिस Sherlock Holmes चे काम छान वटले. ह्या लोकांचे लक्ष्य अभिनयाकडे जास्त आहे. तें त्यांना चांगलें साधलें आहे. रंगभूमि व नेहमींची रहाटी यांत मुळींच फरक दिसला नाहीं. हीच खुबी आहे. हें नाटक उत्तम गणलें गेलें आहे. पण मला कांहीं तें पाहून आनंद झाला नाहीं. नाटकगृहांत स्त्रियांची छानछोकी मात्र दिसली. Box चे तिकीटाला ४ गिनी म्हणजे ८४ रु. पडते.

**Domestic Mission**

रे० समर यांचे जॉर्जेस रो मधील मिशन पाहिले. ह्या भागांतील अत्यंत कंगाल लोकांची स्थिती चारपांच ठिकाणी त्यांचे घरीं नेऊन आम्हांस रे०समर यांनी दाखवली. पैकीं तीन ठिकाणीं म्हाताऱ्या स्त्रिया आजारी होत्या. दोघां आजारी स्त्रियांजवळ मी प्रार्थना केली. एक अगदीं बहिरी असल्यामुळें मला तिच्या कानाजवळ ओरडून प्रार्थना करावी लागली. या बाईनें राजा राममोहन रॉयबद्दल मोठ्या आस्थेनें व आदरानें उल्लेख केला. रस्त्यांत हिंडत असतां आमच्या मागें २००।२५० मुलांचा घोळका जमला होता. कारण त्या वेळीं माझे डोक्यावर हिंदी साफा बांधला होता. कांहींनीं आम्हांस थोडा त्रास दिला. एकाशीं हस्तांदोलन करून समजूत घातल्यावर सर्वांनींच तसें करण्याचा आग्रह धरला. त्रासाचे नुसते रूपांतर झाले. आम्ही घरांत शिरलों कीं ही गर्दी आम्ही बाहेर येईपर्यंत वाट पहात उभी असे. हा त्रास चुकवण्या-

साठीं समरसाहेबांनी एक अशी युक्ती काढली कीं एका घरांत गेल्यावर मागील दारानें आम्ही दुसऱ्या रस्त्यांवर गेलों. कामकरी बाया कामावर गेल्या असता त्यांचीं मुलें संभाळण्याची व्यवस्था एका घरांत केली होती. एकंदर लहानमोठी २३ मुलें होतीं. प्रत्येक मुलांस दोन पेन्स (२ आणे) प्रमाणें दर असे. गरिबांची घरें कितीही कंगाल असलीं तरी त्यांत निदान १०।२० चित्रें, कांहीं मूर्ति, कांहीं दिखाऊ सटरफटर सामान होतेंच. मिशनचे प्रार्थना-मंदिर साधेंच पण पुरेसें होतें. मिशनचा बहुतेक सर्व खर्च युनिटेरियन असोसिएशन मार्फत आहे. अशीं तीन मिशनें लंडनच्या निरनिराळ्या भागांत आहेत. अशीच मँचेस्टरसारख्या मोठमोठ्या शहरीं निरनिराळीं मिशनें आहेत. अशी मिशनें पाहून हिंदुस्थानांत परत गेल्यावर तेथील अस्पृश्य मानलेल्या लोकांसाठीं असेच प्रयत्न करावेत हा विचार मनांत आला.

**Postal Mission (पोस्टल मिशन)**

मिस् फ्लॉरेन्स हिल्च्या आमंत्रणावरून युनिटेरियन पोस्टल मिशनचा कौन्सिलमध्यें मुंबईच्या बाजूला ब्राह्मो पोस्टल मिशनची एक शाखा काढण्याचा माझा विचार मी कौन्सीलपुढें ठेवला. कमिटीला तो पसंत पडून त्यांनीं मला लागेल तशीं पुस्तकें पुरवण्याचें आश्वासन दिलें. कमिटींत १०।१२ स्त्रिया होत्या. युनिटेरियन वाङ्मय पोस्टामार्फत वाटून व पत्रव्यवहार करून प्रसार करण्याचें काम सर्व देशभर केवळ स्त्रियाच करतात. पुढें माझे मित्र रा. वासुदेवराव सुकथनकर यांचेकडून मी मुंबईस अशा एका ब्राह्मो पोस्टल मिशनची स्थापना करविली.

**संडेस्कुल असोसिएशन**

चेअरमन मि० प्रिचर्ड यांचे घरीं जेवणांस गेलों होतों. जेवणानंतर मुलांसाठीं एक उपासना एका मंदिरांत झाली. ती मिस् प्रिचर्ड इनें चालविली. मला दोन शब्द बोलावे लागले. मुलांची वर्तणूक फार व्यवस्थेशीर होती. सुमारे २०० मुलें होती. २० वर्षांवरील सुमारें ७ तरुण मुलांचा एक वर्ग रविवारीं

मिस्टर प्रिचर्ड स्वतः आपल्या घरीं घेत. या गृहस्थांचा स्नेह पुढें त्यांचा अंत होईतों टिकला.

इंग्लण्डच्या साऊथप्लेस नांवाच्या भागांत ह्या समाजाचें उपासना मंदीर आहे. फ्रान्सच्या ऑगस्टकॉम यानें Positivism (निश्चितवाद) नांवाचा संप्रदाय काढला. या संप्रदायांत, ईश्वर, आत्मा वगैरे, अज्ञेय गोष्टीला फाटा दिला आहे. याला Humanism ( मानव्यधर्म ) असेंही नांव देतां येईल. मोठमोठ्या थोर पुरुषांचे स्मृतिदिन पाळण्यांत येतात. केवळ नीतीपलीकडे धर्म म्हणून कांहीं बंधनें नाहींत. उपासना मंदीर व पद्धति इतर ख्रिस्ती देवळांतल्या प्रमाणें आहेत. पण परमेश्वर वगैरेंचा इथें उल्लेख देखील होत नाहीं. लोकांस जबरीनें लढाईवर पाठवणें हें निंद्य आहे असें उपासकांनीं प्रतिपादलें. ॲडमस्मिथ (अर्थशास्त्रज्ञ), सेज्वीक ( नीतिशास्त्रज्ञ ) वगैरेंचे उतारे वाचले. टेनिसनचीं कांहीं पदें गायिलीं. सुमारें २०० श्रोते हजर होते. हे बहुतेक अत्यंत उदार मताचे होते. फ्रेडरिक हॅरिसन या नांवाचे गृहस्थ ह्या संप्रदायाचे पुरस्कर्ते होते. ही संस्था पाहून मोठा विस्मय वाटला.

**साऊथ प्लेस नैतिक समाज**

ता. २९ डिसेंबर १९०२ रोजीं संध्याकाळीं ७ च्या गाडीनें, ऑक्सफर्डला निघालों. ९॥ वाजतां माझ्या बिन्हाडीं पोचलों. मला फारा दिवसांनीं घरीं आल्याप्रमाणें झालें.

सुमारें १ वर्षभर मीं इंग्लंडांत घालवून इंग्रजी राहटीची मला बरीच कल्पना आली होती. इंग्लंड हा प्रॉटेस्टंट पंथाचा ऊर्फ सुधारलेल्या ख्रिस्तीधर्माचा देश. फ्रान्स हा रोमन कॅथोलिक पंथाचा, पोपच्या पंजाखालचा, जुन्या वळणाचा देश. युरोपच्या दक्षिण भागांत तो असल्यानें आणि फ्रेंच लोक निराळ्या वंशाचे असल्यानें तेथील राहटींत साहजिकच बराच फरक असणार. तो पाहाण्यासाठीं मी १९०३ सालच्या ईस्टरचे सुटींत १ महिना फ्रान्समध्यें

**पॅरिस**

घालविण्याचा विचार केला. हिंदुस्थानाहून इंग्लंडला येतांना वाटेंत फ्रान्समधून खुष्कीच्या मार्गें मी आलों होतों. पण त्या वेळीं घाईच्या प्रवासांत मार्सेल्स, पॅरिस व कॅले यांची घाईत फार अंधुक कल्पना आली होती. ता. १४ मार्च १९०३ रोजीं सकाळीं ऑक्सफर्डहून पॅरिसला निघालों. रात्रीं १०॥ वाजतां इंग्लंडच्या न्यू हेवन बंदरांत आलों. समुद्र शांत व चांदणें असल्यानें प्रवास सुखाचा झाला. इंग्लंडला येतांना हाच प्रवास वादळी हवेमुळें फार त्रासाचा झाला होता. पॅरिसला सकाळीं ७ वाजतां पोंचलों.

**बॉने मोरी**

पॅरिस युनिव्हर्सिटीच्या कांहीं विद्वान पुढाऱ्यांना व इतर उदार धर्मानुयायांना माझे गुरु डॉ. कार्पेंटर यांचेकडून ओळखीचीं शिफारसपत्रें घेतलीं होतीं. प्रथम बॉने मोरी या वृद्ध प्रोफेसरांस भेटलों. हे डॉ. भांडारकरांसारखे किंचित् कडक व उग्र दिसले. पॅरिसचे वरवरचे सौंदर्य पाहण्यासाठीं हुरळून आलेला मी एक तरुण असावा असें वाटून त्यांनीं प्रथम माझी थोडी हजेरी घेतली. पण ऑक्सफर्ड कॉलेजांतील ब्राह्मसमाजाचा एक प्रतिनिधि म्हणून कार्पेंटरसाहेबांच्या शिफारसीचें एक पत्र पाहून स्वारीनें आपला शांत सल्ला दिला. तुम्हांला पॅरिस खरें पाहायचें असल्यास येथील नटव्या इमारती पाहून न भुलतां त्यांच्या माळ्यावरील गाळ्यांत शिरून डोकावून पाहा. तेथें कंगाल, चोरटे व गुंड लोक बिळांतल्या उंदराप्रमाणें चोरून रात्रीं आश्रयास राहतात, त्याचीं कारणें शोधा, असें बजावलें.

**प्रो. रेव्हील**

प्रो. जॉ. रेव्हील यांचे संभाषणांतून अशी माहिती मिळाली कीं, प्रॉटेस्टंट लोकसंख्या फ्रान्सांत ६–७ लाख आहे. प्रॉटेस्टंट समाजाच्या एका स्थानिक मंडळीस कन्सिस्टार्स असें म्हणतात. १०६ कन्सिस्टार्सपैकीं ३३ सुधारक मताचे (युनिटेरियन) आहेत. १७८९ पर्यंत प्रॉटेस्टंटास धर्मस्वातंत्र्य मुळींच नव्हतें. आतां कॅथालिक, प्रॉटेस्टंट व यहुदी अशा तिन्ही

संघांस सरकारांतून सारखाच आश्रय मिळतो. मदत देतांना सरकार मताची अट मुळींच घालीत नाहीं. सुधारक संघाची एक त्रैवार्षिक सभा भरते. तिचें नांव 'अॅसेम्ब्ली डी प्रॉतेस्तांत लिबाल' असें आहे. ह्या सभेनें कमिटी निवडल्यावर तिच्या मार्फत सरकारांतून खर्च मिळतो. पॅरिसचा समाज फार जुन्या मताचा आहे. सोशॅलिस्टांची सामाजिक चळवळ फार जोरानें चालू आहे. पण ह्या चळवळींतले सर्व सुधारक जरी हुशार आणि स्वार्थत्यागी आहेत तरी धर्मबाबतींत हे अत्यंत नास्तिक आहेत. कारण कॅथालिक मताच्या जुलुमास कंटाळून सर्व धर्मविरुध्दच ते लोक बंडावले आहेत. त्याप्रमाणें एकीकडे कॅथालिक धर्माचा अडाणीपणा व जुलूम; दुसरीकडे सुधारकांचा बुद्धीचा अंधपणा आणि औदासिन्य यांमध्यें उदार धर्माचें काम मोठें कठीण झालें आहे. सोशॅलिस्ट लोकांचा कटाक्ष धर्म आणि भांडवल यांच्याविरुद्ध सारखाच आहे.

मोस्यू वेग्नेअर आणि रॉबर्ती ऑ. फॉतेनी हे उदार धर्माचे मोठे वजनदार वक्ते आहेत 'ला प्रोतेस्तंत' हें साप्ताहिक व 'लिबरल एव्हॅन्जलीक' हें मासिक हीं उदार मताचीं आहेत. उदार धर्माच्या प्रसाराचें काम व्हावें तसें जोरानें चालू नाहीं. धर्म बाबतींत आतां बहुतेक पूर्ण स्वातंत्र्य आहे. व्यक्तीच्याच स्वभावाची वाढ झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं. जाँ रेव्हील हे आधुनिक धर्माच्या इतिहासाचे पॅरिस युनिव्हर्सिटींत व्याख्याते आहेत. व्याख्यानास सर्वांस मोकळीक आहे तरी थोडाच श्रोतृवर्ग हजर असतो. पॅरिस येथें धर्माचें नांव काढल्यास कित्येकांस हंसें येतें. वरपांगी जुन्या धर्माचें ढोंग माजवण्याचा हा परिणाम !

**मोस्यु रोज**

ता. २५ मार्च १९०३ रोजीं ७ वाजतां रात्रीं मोस्यु रोज यांचे घरीं जेवणास गेलों. मादाम रोज ही फार गोड व कुशल बाई आहे. ती इंग्रजी शिकत होती. निदान तशी मोस्यु रोजची समजूत होती. मीं कांहीं इंग्रजींत विचारलें कीं मादामची कासावीस होई. मग ती अति नजरेनें नवऱ्याकडे पाही. त्याचें मला मोठें कौतुक

वाटलें. ३।४ वर्षांची मार्सेला मुलगी फार गोड होती. आदामनें काढलेलीं कांहीं चित्रें पाहून समाधान वाटलें. मला पाहाण्यासाठीं मादामचे आईबाप व बहीण ही मंडळी जेवणास आली होती. फ्रेंच तरुणीस इंग्रज तरुणीइतकी स्वतंत्रता मुलीच्या संमतीनें आईबापच लावतात. मुलींची विवाहमर्यादा कमींतकमी १६ वर्षांची असते. अलीकडे १० वर्षांत स्त्रीशिक्षणाची अधिक सोय व प्रवृत्ति होत आहे. स्त्रियांच्या प्रगतीबाबतींत इंग्रजांचेंच येथें अनुकरण होत आहे. इंग्रजांचा संसारी शहाणपणा फ्रेंच शिकतात व आपली छानी म्हणजे फॅशन त्यांना शिकवतात. इंग्रजांपेक्षां फ्रेंच अधिक मोकळ्या मनाचे. पॅरिसमध्यें गुलहौसी लोक घरीं न जेवतां रेस्तोरॉंतमध्येंच जातात.

**बॉई बॉला**

ता. २८ शनिवार मार्च १९०३ रोजीं रात्रीं ८ वाजल्यावर माझ्या मित्रानें बॉई बॉला नांवाचे सार्वजनिक नाचाचें ठिकाण दाखविण्यास नेलें. हें ठिकाण लॅटिन क्वार्टर्स नांवाचे युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी राहातात त्या भागीं आहे, हें ऐकून ऑक्सफर्डहून गेलेल्या मला फार आश्चर्य वाटलें. एक फ्रँक देऊन वाटेल त्यानें आंत करमणुकीसाठीं जावें. व्हायोलिनवाल्यांचा मनोहर बँड येथें वेळोवेळीं सुरू होतो, तेव्हां वाटेल त्यानें वाटेल तिच्याशीं नाचूं लागावें, क्रीडावें, हिंडावें, बोलावें, उपहार घ्यावा किंवा संकेत करावा. येथें येणाऱ्या बहुतेकांबद्दल शंका येते. किंबहुना अशा ठिकाणीं शंका घेणें म्हणजेच रिकामटेकडेपणा आहे. पॅरिसच्या करमणुकी अशाच आहेत कीं, त्या परक्यांना सहसा सहन होत नाहींत. निदान त्या कळत तरी नाहींत. रंगेल स्त्रिया अगदीं उघड उघड येऊन विचारतात. सुमारें १००० तरुण माणसें येथें उल्हास करीत बसलीं होतीं. माझें मन विचारशील झालें. हल्लींच्या उद्योगाच्या झटपटींत मनुष्याला कसल्यातरी करमणुकीची आवश्यकता आहेच. धर्माधिकाऱ्यांनीं जर शुद्ध करमणुकी पुरवल्या नाहींत तर इथल्याप्रमाणें केव्हां केव्हां अशुद्ध व घातकी करमणुकी समाजांत शिरतात. इंग्लंडांत हल्लीं धर्माचे बाबतींत तरुणांचें लक्ष वेधण्याची

खटपट करणारे मिशनरी, लोकांना शुद्ध करमणुकी पुरवीत आहेत; त्याचप्रमाणें तरुण कामकरी वर्गाचें मन धर्माकडे वळवण्याचाही प्रयत्न करीत आहेत. याबाबत माझें मत पूर्वी फारसें अनुकूल नव्हतें. ही सोकावलेली तरुण मंडळी करमणुकीला पुढें व धर्माला मागें होतात असें माझें म्हणणें होतें, पण अशा शुद्ध करमणुकी पुरवल्या नाहींत आणि कॅथॉलिक धर्माप्रमाणें फाजील सोवळे-पणाचा दंभ माजवला तर मग पॅरिसांतल्यासारखे मासले दिसणारच असें वाटूं लागलें.

**परेला शाज**

दुसरे दिवशीं परेला शाज नांवाची स्मशानभूमि पाहावयास गेलों. ही सर्व स्मशानांत मोठी आहे. हिच्यांत सुमारें ३० लक्ष प्रेतें पुरलीं आहेत. प्रथम गेल्याबरोबरच समोरल्या एका उतरणीवरच्या भिंतींत ज्यांच्यासाठीं कबरस्थान नाहीं अशासाठीं एक मोठें स्मारक भिंतींत कोरलें आहे. तें पाहाण्यासारखें आहे. मृत नवराबायको भिंतींतल्या दाराशीं अज्ञेय प्रदेशांकडे जात आहेत. दोहोंकडे कित्येक मृत विन्मुखपणें त्यांच्या मागून चालले आहेत, खालीं तेंच जोडपें अखेरच्या निद्रेंत उघडें पडलें आहे. आशादेवीनें ( Hope ) थडग्यावरील शिळा उचलून धरली आहे, त्यावर त्यांचें अर्भक पालथें पडलें आहे. हें चित्र फार परिणामकारक असून त्यांत करुणरस परमावधीला पोंचला आहे. पुष्कळ थडगीं म्हणजे लहान लहान देवळेंच आहेत. आंत वेदीवर येशूचा पुतळा, मेरीचा पुतळा, मृताचा पुतळा—निदान फोटो इ० ठेवले होते. त्याव-रून फुलें, माळा घातल्या होत्या. मोठ्या मेणबत्त्या तेवत होत्या. त्यापुढें बसून प्रार्थना करण्याकरतां खुर्च्या ठेवल्या होत्या. अशा देवळांतून सर्व कुटुंबाचीं माणसें पुरलेलीं असत. स्मशानांत स्वच्छ व सुंदर सडका, दोहों बाजूंनीं उंच झाडें त्यांच्या खालीं एकाला एक चिकटून असलेलीं हीं देवळें असा एकंदर देखावा पाहून आपण पाताळ लोकांत मृतांच्या स्तब्ध शहरांतच आलों असें वाटतें. येथें प्रेतें जाळण्याचीही टोलेजंग व्यवस्था केलेली होती. एकंदरींत

तत्त्वज्ञान, नीतिकाव्य व धर्म इत्यादि अनेक गहन विषयांवर गंभीर चिंतन करण्यास पॅरिसची हीं कॅथालिक स्मशानस्थळें अत्यंत अनुकूल आहेत.

**रॉबिन्सन**

७ मंगळवार एप्रिल १९०३ रोजीं मोस्यू रोज यांचेबरोबर पॅरिसपासून ८ मैलांवर एक खेडें पाहाण्यास गेलों. बरोबर मादाम व मार्सेला होती. ह्या खेड्यांत रॉबिन्सन नांवाचें एक वनभोजनाचें मोठें स्थळ होतें. त्यांत सुमारें ३०।३५ रेस्तोरॉंत्स् होतीं. येथें करमणुकीकरतां पॅरिसचे उद्योगधंद्यांतले लोक दोन आदितवारीं सुमारें ४।५ हजार जमतात. दोन ठिकाणीं जुन्या झाडांच्या फांद्यांवरून तीन चार मजली घरें केलीं आहेत आणि खाण्यापिण्याचे पदार्थ खालून वर चाकावरून ओढून घेण्यांत येतात. भोंवतालीं डोंगरी देखावा आहे. चहूंकडे सहल करण्यासाठीं एथें पुष्कळ गाढवें भाड्यानें ठेवलीं आहेत. सुमारें ६० वर्षांपूर्वीं येथें शुकशुकाट होता. एका धोरणी पुरुषानें प्रथम एक विश्रांतिगृह उघडलें. तेव्हां तो रॉबिन्सन क्रूसोप्रमाणें जंगलांत एकटाच येऊन राहिला म्हणून ह्या ठिकाणास आतां रॉबिन्सन हेंच नांव पडलें आहे. त्याला इतकी किफायत झाली कीं, त्याचें अनुकरण होऊन आतां हें मोठें करमणुकीचें स्थान बनलें आहे. मोठमोठ्या जत्रा व क्षेत्रें कशीं बनतात यांचे हें एक चांगलें उदाहरण आहे. एकोणिसाव्या शतकांतलें हें एक पॅरिशियन क्षेत्रच होय.

**गुड फ्रायडे**

ता. १० एप्रिल १९०३ या दिवशीं भाविक लोक उपवास करतात. मासे, अंडीं हें फराळाचें सामान समजलें जातें. खाटकांचीं सर्व दुकानें बंद असतात. धार्मिक लोक मुख्य मुख्य देवळांत दर्शनास जातात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत देवळांतून रीघ लागते. मी आज सां व्हेन सां दि पाल, सां रोक्, मा दि लेन या तीन मोठ्या देवळांत गेलों. गायन, वादन, मंत्रघोष, उपदेश वगैरे चालू होते. फुलें, वेली, पानें यांनीं देव्हारे भरगच्च सजवले होते. एका टेबलावर मखमलीच्या गादीवर सुळावर चढलेल्या येशूची लहान मूर्ति ठेवलेली असे.

जवळ एक लहान मुलगा बसला होता. स्त्रीपुरुष एकामागून एक येत व मोठ्या भक्तीनें येशूचे दोन्ही बाहू, गुढघे, पावलें चाटून जात. वृद्ध स्त्रिया फारच प्रेमानें चाटीत आणि जवळ ठेवलेल्या एका ताटांत पैसा टाकून पुढें जात. जवळ बसलेला मुलगा रुमालानें मूर्ति पुशीत असे. हा प्रकार सर्वत्र एकसारखा चालला होता. सां रोक् येथे येशूला सुळावर चढवण्याचा व थडग्यांत नेण्याचा हुबेहूब देखावा दाखवण्यांत आला होता. तो पाहून कॅथॉलिक मूर्ति-पूजेचा माझ्या मनावर फार परिणाम झाला.

**मॅडोमासील डयुगा**

मॅडामोसील डयुगा ही बाई कुमारी मोछरी नांवाच्या स्त्रियांच्या कॉलेजांत वाङ्मय व तत्त्वज्ञान विषयांची अध्यापिका आहे. पॅरिस येथील स्त्री शिक्षणाबद्दल माहिती मिळविण्याकरितां ह्या बाईची मीं भेट घेतली. बाई अत्यंत गरीब, सभ्य व साधी होती. हिचा पोषाख व वागणूक इतकी साधी दिसली कीं, पॅरिस नगरांत राहण्यास जवळजवळ अयोग्य वाटली. दर एक माहिती पुरवण्याची हिची अत्यंत उत्कंठा दिसली. मीं अनेक प्रश्न विचारले, त्यांचीं तिनें समर्पक साधार उत्तरें दिलीं. सुमारें दोन तास बोललों तरी तिनें कंटाळा दाखविला नाहीं. उलट माझीं उदार मतें व बारीक चौकसपणा पाहून तिला सानंद आश्चर्य वाटलें व तें तिनें बोलूनही दाखवलें. हिंदुस्थानचे लोक म्हणजे गहन विचारांत गुंतलेले वैराग्यवृत्तीचेच असावयाचे असा तिचा समज होता. माझी हीं प्रगमनशील, बुद्धिवादी मतें पाहून आपणांस आश्चर्य वाटतें असें बोलून दाखविल्याबद्दल तिनें माफी मागितली. दुसरे दिवशीं तिनें मला जेवणास बोलावलें. आदले दिवशीं स्त्रीशिक्षणासंबंधीं भाषण झालेंच होतें. पुढें उच्च शिक्षणाविषयीं बोललों. भाषणांत व्यत्यय होऊं नये म्हणून तिनें दुसऱ्या कोणासही बोलावलें नव्हतें. फ्रेंच विवाहपद्धतीवर मोठें मजेचें बोलणें झालें.

फ्रान्समध्यें मुलांमुलींचीं लग्नें त्यांचे आईबाप त्यांच्या संमतीनें मोठेपणीं लावतात. इंग्रजाप्रमाणें हळू हळू येथेंही स्वयंवराची चाल पडत

चालली आहे. मात्र तरुण मुलीस तेथल्याप्रमाणें स्वातंत्र्य नाहीं. एका मुलीचें उदाहरण सांगितलें कीं, आईला सोडून ती एकटीच अशी केवळ स्नान-गृहांतच जात असे. नंतर पॅरिस शहरच्या नीतीसंबंधीं बाईनें मोकळेपणानें आपलें विचार कळविले. ब्रिटिशांपेक्षां फ्रेंच लोकांत वैवाहिक नीति कमी आहे. जसजसें दक्षिण युरोपांत जावें तसतसें नीतीचें मान कमी कमी होत जातें असें ती म्हणाली. गरीब व कामकरी स्त्रीपुरुष लग्न न लावतां नवराबायको-प्रमाणेंच राहतात. तें केवळ अनीतीचेंच असतें असें नाहीं, ह्याचें एक कारण लग्नाच्या विधीचें धर्मदृष्टीनें व कायद्यानें फाजील अवडंबर माजवलें जातें. गरिबांना तें झेंपत नाहीं. नीति बिघडण्याचें दुसरें कारण तरुण मुलांनीं २१ वर्षांनंतर २ वर्षें लष्करांत नोकरी केलीच पाहिजे असा कायदा आहे. अशा तारुण्याच्या वेळीं या पेशांत स्वैरवृत्ति साहजिकच वाढते. शिवाय पॅरिस जगांतील करमणुकीचें स्थान असल्यानें परकीय चैनी लोकांचे चाळे येथें फार चालतात. उच्च शिक्षणांत स्त्रियांचा कसा थोडा थोडा शिरकाव होत आहे व चळवळीचें काम स्त्रियाच कसें अंगावर घेत आहेत याविषयीं बोलणें झालें. एकंदरींत या बाबतींत फ्रान्स देश अमेरिकेच्या व इंग्लंडच्या मागें असल्याचें बाईनें कबूल केलें. स्त्री–शिक्षणाच्या कामीं कॅथॉलिक धर्माकडून कसा अडसर येतो तें तिनें स्वतःच्या अनुभवावरून सांगितलें.

ह्या प्रमाणें ह्या दोन दिवसांच्या संभाषणानंतर या विद्वान व आपल्या जातीबाबत झटून यत्न करणाऱ्या बाईविषयीं मला फार आदर वाटूं लागला. तसेंच तिलाही मजबद्दल व माझ्या ब्राह्मसमाजाबद्दल आस्था उत्पन्न झाली. आपल्या भेटीची आठवण म्हणून तिनें इमर्सनचें एक पुस्तक बक्षीस दिलें.

**व्हर्सायचा राजवाडा**

पॅरिसच्या नैर्ऋत्येस १५ मैलांवर इतिहासप्रसिद्ध व वैभवशाली व्हर्साय शहर आहे. मी १२ एप्रिल आदितवारीं दोनप्रहरीं तीन वाजतां तेथें पोचलों. येथें १५ व्या लुईचा प्रचंड आणि वैभवसंपन्न राजवाडा आहे. मध्यें चौकांत ह्या लुईचा

अश्वारूढ भव्य पुतळा आहे. या ठिकाणीं ऐतिहासिक चित्रांचा व पुतळ्यांचा जसा संग्रह आहे तसा जगांत कोठेंही नाहीं. कांहीं चित्रांनीं माझें मन वेधलें. शार्लेमेन, सां लुई यांचीं चित्रें पहातच रहावेसें वाटलें. क्रुसेड्स हॉलमध्यें क्रुसेड्ससंबंधीं चित्रें आहेत. दुसऱ्या मजल्यावरील गॅलरींत १७९७ ते १८३५ पर्यंतचीं भव्य चित्रें आहेत. त्यांत नेपोलियनचा पराक्रम वर्णिला आहे. त्याचें सेंट हेलीना येथील थडगें, राटीसबन येथें त्याच्या पायाला झालेली जखम सर्जन बांधीत असतां तो आपल्या पांढऱ्या घोड्यावर चढत आहे, अलेक-झांड्रिया शहरांत त्याचा प्रवेश, तेथील राजाचें शरण येणें, ऑस्टरलिस लढाईची आदली रात्र वगैरे चित्रें पाहून वीर व करुणरसाची माहिती कळली.

लुईची निजावयाची खोली, अंथरूण व चादर हीं राखून ठेवलीं आहेत. वाड्याचे खिडक्यांतून सुंदर बागेची व उपवनाची अनुपम शोभा दिसत होती. उंच झाडें, वीथिका, पुष्पवाटिका, गुंफा, तडाग लहानमोठीं हजारें कारंजीं, वाड्यापासून उतरत जाणारी सपाटी, पुढें दूरवर जाणारा रुंद व प्रशस्त कालवा, त्यावरील क्रीडानौका, एक ना दोन, नानाविध देखावे पाहून मन समाधान पावलें. मानवी ऐश्वर्य, सौंदर्य, स्वातंत्र्याच्या व सुधारणेच्या वातावरणांत इतके एकवटलेले माझ्या पाहाण्यांत तरी अद्याप कोठें आलें नाहीं व पुढें येईलसें दिसत नाहीं. म्हणून ८ चे सुमारास बाहेर पडतांना थोडेंसें अवघड वाटलें.

**ऑगस्ट डि कॉम**

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता ऑगस्ट डि कॉम राहात असलेलें घर नं. १० रू मॉसियॉर ल प्रिन्स ह्या रस्त्यांत आहे तें पाहिलें. त्यांनीं काढलेल्या positivist ऊर्फ निश्चितवादी समाज या घरांत भरत असतो. तिथें त्याच्या कांहीं तसबिरी व पुतळे होते. त्याची दत्तक मुलगी मादाम द व्हान्सा आणि त्याचा शिष्य लाफाट हे राहात होते. सर्व कांहीं सामान व्यवस्थित होतें. तो ज्या अंथरूणावर मेला तें अंथरूणही चांगल्या रीतीनें ठेवण्यांत आलें होतें.

**राममोहन रॉय**

राजा राममोहन रॉय यांची समाधि ब्रिस्टल शहरांतील एका स्मशानभूमींत सुंदर हिंदी पद्धतीनें बांधली आहे. हिच्याजवळ मी बसून थोडीशी प्रार्थना केली. प्रेक्षकांसाठीं एक मोठें पुस्तक ठेवलेलें असतें. त्यांत समाधि पाहिल्याचा उल्लेख करून मीं आपली सही केली. राममोहन रॉयला लहानपणीं जिनें स्वतः पाहिलें होतें अशी एक वृद्ध बाई या शहरांत रहात होती तिला मुद्दाम जाऊन भेटलो. ही सात वर्षांची असतांना तिची शाळा पाहाण्यास राममोहन गेले होते. त्यांची भव्य मूर्ति पाहून तिच्या लहानग्या मनावर फार चांगला परिणाम झाला होता असें तिनें सांगितलें. "He was every inch a Raja." असे तिनें मजपाशीं उद्गार काढले. या बाईचें नांव मिस् कॅसल असावें असें वाटतें. राममोहन रॉयचा अनुयायी आपणांस येऊन भेटतो याबद्दल तिला फार आनंद झाला. तिनें स्टॅफर्टन ग्रोव्ह, १८ ऑक्टोबर १८३३ च्या दिवशीं राजा राममोहन रॉयच्या अंत्यविधीचें वर्णन असलेल्या डायरींतलें जुनें पान मला आठवण म्हणून दिलें. याशिवाय राममोहन रॉयच्या डोक्याचे केंस व त्यांच्या नांवाचें एक सुंदर व्हिजीटिंग कार्ड तिनें मला दिलें. हीं सर्व योग्य ठिकाणीं सांभाळून ठेवण्यासाठीं कलकत्त्याला ब्राह्मसमाजाच्या सेक्रेटरीकडे मीं पाठवून दिलीं.

**१९०२ ची ईस्टर सुट्टी**

ही सुटी मीं इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावरीक प्रांतांत घालविली. या भागांत थंडी कमी असते. सकाळीं ९ वाजतां डेव्हनशायरमधील ब्रेडपोर्ट या गांवीं निघालों. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींतील चौघांजणांनीं दक्षिण आफ्रिकेंतील लढाईत स्वेच्छेनें कामगिरी पत्करली होती. त्यांपैकीं दोन विद्यार्थी माझ्याच गाडीनें निघाले होते. त्यांस निरोप देण्याकरितां स्टेशनवर विद्यार्थ्यांची गर्दी जमली होती. लष्करी बॅन्ड सुरू होता. हें पाहून माझें मन विचारांनीं व विकारांनीं भारून गेलें. दोन प्रहरीं दीड वाजतां ब्रेडपोर्टला पोंचलों. माझे

मित्र जे वाल्टर कॉक यांच्या परिचयाचे मि० कार्निक मला नेण्यास स्टेशनवर आले होते. हे जुन्या वळणाचे मेथॉडिस्ट पंथाचे. तरी माझ्याशीं त्यांनीं धार्मिक बाबतींत फार सहानुभूति दाखवली. चार दिवस मी त्यांच्याचकडे होतों. दुसरे दिवशीं रविवारीं संध्याकाळीं ब्रेडपोर्टच्या युनिटेरीयन चर्चमध्यें माझी उपासना ठरली होती. मँचेस्टर कॉलेज कमेटीचे प्रेसिडेंट श्रीमंत युनिटेरियन मि० कॉल्पॉक्स याच गांवांत राहात होते. त्यांची मुलाखत दोन प्रहरीं झाली.

रविवारीं संध्याकाळीं युनिटेरियन मंदीरांत उपासना चालविली. एकदोन आठवडे आधींच मजबद्दलच्या जाहिराती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. मीं लिटनीच्या पद्धतीनें उपासना चालविली. या पद्धतींत आचार्य व उपासक या पद्धतीच्या ठराविक छापील पुस्तकांतून कांहीं वाक्यें आळीपाळीनें म्हणतात. तेणेंकरून दोघांचेंही लक्ष उपासनेंत चांगलें लागतें. ही पद्धत मला आवडली. श्रोतृसमाज ३००।३५० जमला होता. मी परका म्हणूनच इतकेजण जमले असावेत. युनिटेरीयन पंथाशिवाय इतर पंथाचाही भरणा होता. एक तास उपासना झाल्यावर सुमारें २० मिनिटें माझें प्रवचन झालें. विषय ब्राह्मसमाज होता. बहुतेक सर्वांस प्रवचन कळलें. १०।१२ लहान थोरांनीं तसें येऊन सांगितलें.

रविवारच्या नेहमींच्या पोशाखाप्रमाणें माझ्या डोक्यावर गुलाबी फेटा होता. निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून उपासनेचा जो रिपोर्ट आला त्यांत ब्राह्मसमाजापेक्षां माझ्या फेट्याचें आणि विशेषतः शेमल्याचेंच अधिक वर्णन होतें.

**'ए' गार्डन**

ता. १८ मंगळवार मार्च १९०२ रोजीं सकाळीं ९ वाजतां मी, मि० कॉर्निक व रेव्हरंड विंटर असे तिघे ब्रेडपोर्टपासून ६।७ मैलांवर "ए" गार्डन टेकडीवरचे प्राचीन रोमन अवशेष पाहाण्यास गेलों. अगदीं डोंगराळ प्रदेशांत टेकडीच्या माथ्यावरून घोड्याच्या गाडीला आणि बायसिकलला जाण्यास

सुंदर सडका आहेत. ही रस्त्याची सुधारणा बायसिकल सुरू झाल्यापासून झाली आहे. (मोटारींचा प्रघात अजून झाला नव्हता. त्याचप्रमाणें विजेचे दिव्यांचा प्रघातही लंडनसारख्या मोठ्या शहरांतही झाला नव्हता.) ए गार्डन टेकडी समुद्रसपाटीपासून ८१२ फूट उंच आहे. जमीन मऊ, चिकणाईत चुनखडीची व गवतानें आच्छादित अशी आहे. टेकडीच्या माथ्यावरून जुन्या रोमन काळाची एक सडक सरळ बाणासारखी खालीं जाते. सडका अगदीं सरळ करण्याची चाल रोमन आहे. टेकडीच्या माथ्यावर जुनी रोमन छावणी होती. तिचे अवशेष अद्याप दिसतात. मध्यें दोन पुरुष खोल खंदक व दोन्हीकडे समांतर बांध असें एक मोठें वर्तुळ टेकडीच्या माथ्यावर आहे. येथून सुमारें १।२ मैलांवर समुद्र दिसतो. ही चांगली माऱ्याची जागा आहे. टेकडीवर अद्यापि केव्हां केव्हां रोमन लोकांचीं हत्यारें व हाडांचे सांगाडे सांपडतात.

त्यानंतर कॉर्निकसाहेबानें खालीं खेड्यांतून मेथॉडिस्ट समाजाचें काम पद्धतशीर कसें चालतें हें दाखविलें. दोन गरिब लोकांच्या घरांत जाऊन त्यांची स्थिति पाहिली. पैकीं एक बाई १० वर्षे अंथरुणाला आजारानें खिळलेली होती. तिचेजवळ जाऊन मीं प्रार्थना केली. मेथॉडिस्ट लोकांची गरिबांत धर्मप्रचार करण्याची हातोटी पाहाण्यासारखी आहे. आठवडाभर कामधंदा करणाऱ्या तरुणांस हुरूप येऊन रविवारीं खेडोपाडीं उपासना करण्यास पाठविण्यांत येतें. कॉर्निक हे अशापैकीं होते. दर रविवारीं दोन तीन खेड्यांत फेरी मारून ते येत.

डेव्हॉनपोर्ट येथील युनिटेरियन मंदीरांत सकाळीं ११ वाजतां व संध्याकाळीं ५ वाजतां मीं दोनदां उपासना चालवली. देऊळ भव्य होते पण युनिटेरियन चळवळ फार मंदावलेली दिसली. उपासकांची संख्या सकाळीं सुमारें ३० व संध्याकाळीं ५० अशी होती. विशेष अगत्य दिसलें नाहीं. सुधारक चळवळीस औदासिन्याप्रमाणें दुसरें कांहींच घातक नाहीं. हें येथें व दुसऱ्या

कांहीं ठिकाणीं दिसलें. याशिवाय ब्रूकर्न, टन्‌बिजवेल्स, वेल्सची राजधानी कार्डिफ, चेल्टनहॅम वगैरे ठिकाणीं माझ्या उपासना व प्रवचनें झालीं.

डेव्हनपोर्ट, प्लीमौथ आणि स्टोन हाऊस हीं तिन्ही शहरें एकमेकांस भिडून आतां त्यांचें एक गाव बनलें आहे. पूर्वीं धार्मिक जुलमाला कंटाळून अमेरिकेला ज्या वसाहती गेल्या त्यांपैकीं प्लीमथ ब्रदरेन ही याच गांवांहून गेली होती. हल्लीं लोकसंख्या दोन लाख आहे हीं गांवें टेकड्यांवर वसलीं असल्यानें एकही रस्ता सपाट नाहीं. बऱ्याच ठिकाणीं इतके भयंकर चढउतार आहेत कीं गाडी हाकलणें धोक्याचें होतें. तशांत इंग्लंडचे रस्ते बर्फ पडून निसरट होतात. सपाट रस्त्यांतही केव्हां केव्हां माणसें पडतात. पण अशा चढउतारावरूनही विजेच्या ट्रामगाड्या इतक्या शिताफीनें धांवतात, उतारावर मध्येंच थांबतात कीं पाहात राहावें. हें शहर आरमारी सैन्याचें मोठें स्थान असल्यानें येथें लष्करी देखावे पुष्कळ दिसतात. आदितवारीं लष्करी लोक उपासनेला जातांना कौतुक कां वाटूं नये ?

**नाताळची सुट्टी**

१९०२ ची नाताळची सुट्टी मीं ऑक्सफर्डमध्येंच घालविली. ऑक्सफर्ड येथें एक नॅचरल हिस्ट्री म्युझिअम म्हणून भव्य संग्रहालय आहे. त्याच्या मागच्या बाजूस प्रोफेसर टायलर नांवाचे वृद्ध आणि विद्वान् संशोधक राहातात. प्रिमिटीव्ह कल्चर नांवाचा त्यांचा ग्रंथ प्रख्यात आहे. मानव समाजाची आद्यस्थिति कशी होती ह्याविषयीं शोध करणें हा त्यांच्या आयुष्यांतील मुख्य विषय आहे. त्यांना मी भेटलों. मी हिंदुस्थानचा विद्यार्थी म्हणून त्यांना मोठा आनंद झाला. संभाषणाचेवेळीं दिव्याची आणि कंदिलाची प्रगति कशी झाली हा विषय निघाला. तेव्हां मी माझ्या जन्मभूमी—जमखंडीमध्यें बाजारांत माळणी कोणत्या प्रकारचे दिवे वापरतात तें सांगितलें. वेळवाच्या चार पायांवर तट्ट्याचा एक लहानसा मनोरा असतो. एका बाजूला हा वेळवाचा कंदील मोकळा असतो. बाकीच्या तिन्ही बाजू मेणानें मेणवल्या असतात. त्यांत करडईच्या

तेलाची पणती जळत असते. ज्या दिशेनें वारा वहात नाहीं त्या दिशेकडे या कंदिलाचें तोंड वळवून माळणी आपला रात्रीचा व्यापार करतात. हें ऐकून प्रिमिटिव्ह कल्चरचीं उदाहरणें हिंदुस्थानांत अद्यापि कशीं आढळतात, हें मीं प्रोफेसरांना सांगितल्यावर त्यांनीं माझे फार आभार मानले व स्वदेशीं परत गेल्यावर माळणीच्या दिव्याचे २।४ नमुने अवश्य पाठविण्याविषयीं विनंती केली. या विषयाची माझी ग्राहकता पाहून त्यांनीं दुसरे दिवशीं मला चहाला बोलावलें. त्यांची व्याख्यानें सर्वांस मुक्त असत. तरी तिघां चौघां-खेरीज कोणी येत नसे. मीं तीन चारदां व्याख्यानें ऐकलीं. व्याख्यानापेक्षां संभाषणच मला बरें वाटलें. युनिव्हर्सिटीचे हे मोठे जाडे प्रोफेसर आहेत. त्यांना वाटेल तेव्हां अशीं २।४ व्याख्यानें देण्यापलीकडे कांहीं काम नाहीं. ह्यांचें घर म्हणजे एक मोठी म्युझिअमच असे. मी भेटावयास जाई तेव्हां प्रोफेसर टायलर म्हणत, “Come in Mr. Shinde. This is my den.” आणि विचित्र वस्तूंनीं भरलेली आपली भव्य खोली दाखवित.

**मिसेस मॅक्समुल्लर**

मि० हर्बर्ट स्पेन्सर, डॉ. मार्टीनो, मॅक्समुल्लर वगैरे अत्यंत नामांकित मंडळींचे ग्रंथ वाचून माझी त्यांच्यावर श्रद्धा बसली होती. त्यांपैकीं मी इंग्लंडांत गेलों तेव्हां कोणी हयात नव्हतें. कांहीं तर नुकतेच वारले होते. प्रो. मॅक्समुल्लर यांचें घर युनिव्हर्सिटी पार्क जवळ चांगलें थाटाचें होतें. तेथें मी मिसेस मॅक्स-मुल्लरना भेटण्यास गेलों. आपल्या नवऱ्याचा एक होतकरू हिंदी चाहता आणि अनुयायी आपल्यास भेटावयास आलेला पाहून तिला फार संतोष वाटला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर तिनें माझा पत्ता विचारून मी लवकरच इंग्लंड सोडणार होतों म्हणून स्वदेशचा पत्ताही विचारून घेतला. मी स्वदेशीं आल्यावर तिनें प्रो० मॅक्समुल्लरची सर्व प्रसिद्ध लेक्चर्स, तुलनात्मक धर्मावरची आणि हिंदु षड्दर्शनें हीं पुस्तकें मला बक्षीस पाठविलीं. मि. हर्बर्ट स्पेन्सर यांच्या आत्मवृत्ताच्या दोन मोठ्या प्रतीं मला

ब्रिटिश आणि युनिटेरीयन असोसिएशन मार्फत हिंदुस्थानांत मिळाल्या; तेंही या बाईकडून कीं काय तें आठवत नाहीं.

१९०३ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीपूर्वीची ऑक्सफर्ड येथील शेवटची टर्म भरत आली. माझ्या कॉलेजच्या प्रोफेसरांचा व मित्रांचा तसेंच सर्व विश्वविद्यालयाचा निरोप घेण्याचे दिवस जसजसे जवळ येत चालले तसतशी मला फार हुरहुर वाटूं लागली. विलायतेंतील हीं दोन वर्षे म्हणजे माझ्या आयुष्यांतील एक मोठें सुखस्वप्नच होय.

ऑक्सफर्डपासून दीड दोन मैलांवर बेंझी नांवाचें क्षुद्र खेडें होतें. तेथें एक ओसाड जुनें उपाहारालय होतें. त्यांत मी केव्हां केव्हां विश्रांतीसाठीं जाई. शेवटचा एकांतवास करण्यासाठीं मी तेथें जाऊन या दोन वर्षांचें सिंहावलोकन केलें. आंतून मला असें उदासीन वाटत असतां ऑक्सफर्ड शहरांत मात्र आनंदाचा मोठा गलबला माजला होता.

**बोटींच्या शर्यती**

वर्षअखेरीस ऑक्सफर्डच्या विद्यालयांत Eighth week नांवाचा एक अत्यंत गर्दीचा आठवडा घालविण्यांत येतो. निरनिराळ्या कॉलेजच्या आठ बोटींची ही चुरशीची टेम्स नदीवरील शर्यत (Regatta) असते. ऑक्सफर्डजवळील टेम्स नदीच्या भागाला आयशिस हें नांव आहे. मॉडेलिन कॉलेजापासून जवळ जवळ मैल दीड मैल नदीचा प्रशस्त भाग बोटीच्या शर्यतीला फार योग्य आहे. ज्या ज्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मागें यश आलें असतें, त्यांच्यापैकीं आठ आठ विद्यार्थी एकेका बोटींत बसलेले असतात. यशांतील नंबराप्रमाणें बोटीचा अनुक्रम ठरलेला असतो. कॉलेजांतील बहुतेक सर्व विद्यार्थी आपापल्या बोटींच्या बाजूनें किनाऱ्यावर उभे असतात. बोटी वेगानें धावूं लागल्या म्हणजे किनाऱ्यावरील मंडळी बेहोष होऊन ओरडत, कर्णे फुंकीत, हातवारे करीत, धांवत असतात. ह्यांत केव्हां केव्हां कॉलेजांतील शिक्षकही भाग घेतात. हा रमणा आठवडाभर चालतो.

**ऑक्सफर्ड**

ऑक्सफर्ड हे अति प्राचीन विद्यालय असून इंग्लंडच्या इतिहासांतच नव्हे तर चालू वरिष्ठ प्रतीच्या समाज रहाटींतही या विद्यालयाचा अनेक प्रकारें परिणाम घडलेला दिसून येतो. इंग्लिश राष्ट्ररूपी पुरुषाच्या पाठीचा मणकाच हें विद्यालय म्हटलें तरी चालेल. श्रीमंत समाजांतील विशेषतः अमीरउमरावांचीं मुलेंही या विद्यालयांत सामाजिक व संभावीत वळण लावून घेण्यासाठीं येतात. प्रत्यक्ष राजघराण्यांतील तरुणही राजपुत्रासह युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या कॉलेजांत असतात. सुमारें १७।१८ कॉलेजांतून ४।५ हजार विद्यार्थी शिकत असतात. ह्या आठवड्यांत इतक्या कॉलेजांतील विद्यार्थी येथील संमेलनांत भाग घेण्यासाठीं आपल्या आयात्बहिणींना बोलावणें करतात. सभा, संमेलनें, पार्ट्या, भोजनें इत्यादि प्रसंगांची गर्दी उडते. इंग्रजी विवाह, स्वयंवर पद्धतीचा असल्यानें परस्पर परिचयाला हा काल फार अनुकूल असतो. इंग्रजी समाजाचा ध्येयवाद व्यवहाराला नेहमीं समांतर असतो. एकंदरींत राष्ट्रीय जीवनांत ही बुद्धी युनिव्हर्सिटी बारीकसारीक गोष्टींतही कसें मन घालते आणि बिनबोभाट काम साधून घेते हा एक निरीक्षणाचा मोठा विषय आहे.

**पदवीदान समारंभ**

ता. २४ जून १९०३ रोजीं ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचा मोठा वार्षिक पदवीदान समारंभ झाला. १० वाजल्यापासून शेल्डोनियन थिएटरांत स्त्रीपुरुषांची गर्दी जमूं लागली. १२ वाजतां थिएटर खालवर गच्च भरलें. सुमारें दोन हजार लोकसमुदाय हजर होता. तीन चतुर्थांशावर स्त्रियाच होत्या; यावरून जमावाचें सामाजिक स्वरूप स्पष्ट दिसलें. मागील Eighthweek च्या ( बोटींच्या शर्यतीच्या ) खालोखाल हा आठवडा मोठा चैनीचा होता. चोहोंकडे नाच, मेजवान्या व खेळ चालतात. परीक्षा आटोपल्यामुळें विद्यार्थी मोकळे



सन १९०३ मध्यें इंग्लंडमधील चेल्टनहॅम येथें श्री. अण्णासाहेब
धर्मोपदेशासाठीं गेले असतांना घेतलेला फोटो.

असतात. त्यामुळें मुद्दाम बोलावून आणलेल्या बहिणी व मेहुण्या यांचा आदर-सत्कार करण्यास ते उत्सुक असतात.

बारा वाजतां सेनेटचा छबिना आंत आला. नंतर ज्या बड्या लोकांना सन्मानाच्या पदव्या घ्यावयाच्या होत्या ते आले. त्यांत आफ्रिकेंतील बोअर युद्धांतील यशस्वी वीर सर जॉर्ज व्हाईट हे होते. त्यांस D. C. L. ची पदवी देण्यांत आली. बादशहा एडवर्डचे बंधु ड्यूक ऑफ आल्बनी यांची पत्नी व कन्या हजर होत्या. समारंभांतील सर्व भाषणें लॅटिनमध्यें झालीं. ( ही पुराण-प्रियता किंचित् हास्यास्पदच होती. ) अशा गंभीर प्रसंगीं विद्यार्थ्यांनीं गोंगाट व वात्रटपणा केला यांत काय नवल ! एका विद्यार्थ्यानें बायकासारखा आवाज काढला. दुसऱ्यानें मांजराच्या आवाजाची नक्कल केली. ही सर्व मंडळी अंडर ग्रॅज्युएट्स होती. व्हाईटसाहेबांनीं कांहींतरी बोलावें म्हणून ३।४ मिनिटें टाळ्यांनीं ठिकाण दणाणलें; तर त्यांचें भाषण सुरू असतांना तें लवकर संपेना म्हणून कांहींनीं गोंगाट व आरडाओरडा सुरू केला. अंडर ग्रॅज्युएट्स असा दंगा करतात म्हणून त्यांना तिकिटें देण्यांत येत नाहींत. तरी येनकेन प्रकारेण जी कांहीं मंडळी आंत येतात ती आपला प्रताप अशा रीतीनें गाजवतातच. हा नेहमीचाच प्रकार असल्यानें सर्वांस कौतुकच वाटलें.

---

## प्रकरण ३० वें

### परत प्रवास

**शेवटचा निरोप**

३१ ऑगस्ट १९०३ रोजीं सकाळीं मी होवर्न येथून निघालों. लंडनला आणि इंग्लंडलाही शेवटचा रामराम केला. जर्मन समुद्रांतून हॉलंडची राजधानी ॲम्स्टरडॅम येथें इंटरनॅशनल लिबरल रिलीजस कॉन्फरन्स करतां गेलों. तेथें मी ता. ४ सप्टेंबरपर्यंत होतों.

विलायतेला येतांना मला बोटीच्या प्रवासाबद्दलचा खर्च श्रीमंत सरकार सर सयाजीराव महाराजांनीं दिला होता. स्वदेशीं परत जाण्याचा

**एक अडचण**

खर्च मिळण्यापूर्वी माझ्या कॉलेजांतील अभ्यासाबद्दल कॉलेज अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविण्याबद्दल हुकूम महाराजांकडून झाला होता. त्या प्रमाणें हा इंग्रजींत रिपोर्ट अध्यापकांकडून महाराजाकडे गेला. तो पुरवणी नं. २ मध्यें पुढें दिला आहे. त्याअन्वयें मीं महाराजांकडे अर्ज केला असतां त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडून पत्र आलें कीं, मी स्वदेशीं परत गेल्यावर बडोदें संस्थानांत नोकरी करण्याबद्दलचा करार लिहून देईन तर हा खर्च मिळेल. मी ता. १ मे १९०३ रोजीं महाराजांना खुलाशाचें सविस्तर पत्र लिहिलें कीं, "मला जी युनिटेरीयन स्कॉलरशीप मिळाली होती तिची एक शर्त अशी होती कीं, मी आजन्म स्वतःला धर्मप्रचारासाठींच वाहून घेईन. यदाकदाचित् माझ्या योगक्षेमाची कोणीं जबाबदारी घेतली नाहीं, तर या प्रचाराला प्रतिकूल होणार नाहीं असेंच एकादें काम करून उदरनिर्वाह करीन; पण प्रचार सोडणार नाहीं. महाराजांनीं हें सर्व पसंत केलें होतें. म्हणून आतां कोणती हरकत न घेतां स्वदेशीं परत जाण्याला मला ते मदतच करतील." हें पत्र पावतांच महाराजांनीं, टॉमसकुक कंपनीकडे तारेनें तिकीट देण्याबद्दल हुकूम केला असल्याचें त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरींनीं मला कळविलें.

कॉलेजला उन्हाळ्याची सुटी झाल्याबरोबर माझें इंग्लंडांतील काम संपलें म्हणून स्वदेशीं निघतां आलें असतें. पण ॲम्सटरडॅम

**ॲम्सटरडॅमचा खर्च**

येथील आंतरराष्ट्रीय उदार धर्मपरिषदेला मला ब्राह्म-समाजानें हिंदुस्थानचा प्रतिनिधि निवडल्यामुळें आणि ती परिषद सप्टेंबरमध्यें भरणार असल्यानें दरम्यानचा तीन महिन्यांचा खर्च आणि जादा प्रवासखर्च यांची पंचायत पडली. युनिटेरीयन स्कॉलरशिप मला दरसाल १०० पौंडांची होती. तीच अपुरी होती. मी फार काटकसरीनें राहून माझ्या खर्चाची कशीबशी तोंडमिळवणी केली. ॲम्सटरडॅमच्या जादा खर्चाविषयीं माझे मित्र श्रीयुत बा. बा. कोरगांवकर

यांनीं वर्गणीचे परिश्रम करून ता. २५ जुलै १९०३ रोजीं पत्रानें १३ पौंड ६ शिलिंग ८ पेन्सचा ( म्हणजे २०० रुपयांचा ) चेक पाठविला. कलकत्त्याहून हेमचंद्रसरकारकडूनही निदान तितकीच रक्कम मिळेल असें कळविलें. अशा रीतीनें माझी अडचण भागली.

**ॲम्सटरडॅमची परिषद**

ता० १ सप्टेंबर रोजीं इंग्लंडहून निघालेल्या पाहुण्यांची बोट ॲम्सटर-डॅमला पोहोंचली. तींतच मी होतों. नदीच्या कांठावरच्या सुंदर अम्सटील हॉटेलांत आमची व्यवस्था झाली होती. व्याख्यानें, उपासना, मेजवान्या, यांची एकच गर्दी उसळली होती. डच लोकांनीं फारच संस्मरणीय स्वागत केलें. मीं वाचलेला, हिंदुस्थानांतील उदारधर्म हा निबंध, ह्या परिषदेचें ‘ लिबर्टी ’ नांवाचें जें पुस्तक प्रसिद्ध झालें त्यांत प्रसिद्ध झाला आहे.

**व्होलंदाम**

ता. ४ सप्टेंबर रोजीं ॲम्सटरडॅमहून व्होलंदाम नांवाचें एक जुनें खेडें पाहाण्यास निघालों. बरोबर सुमारें निरनिराळया राष्ट्रांची २०० पाहुणे मंडळी होती. आम्हां पाहुण्यांची व्यवस्था ठेवण्यास डच मंडळी आली होती. सुमारें दोन वाजतां व्होलंदाम येथें पोहोंचलों. हें खेडें समुद्रकिनारीं एका धक्क्याच्या आश्रयाखालीं आहे. समुद्रसपाटीपेक्षां या खेडयाची सपाटी ४।५ फूट तरी खालीं असावी. आमची इतकी गर्दी पाहाण्यासाठीं खेडयांतील सर्व माणसें, मुलालेकरांना घेऊन दाराबाहेर उभी होती. डच लोकांची स्वच्छतेसंबंधीं मोठी ख्याति आहे. त्याप्रमाणें दोन प्रहरीं घरें धुण्याचें काम चाललें होतें. आम्हीं कित्येक घरांत शिरून त्यांच्या चुली आणि निजावयाच्या जागा पाहिल्या. साधेपणा, स्वच्छपणा व टापटीप पाहून आनंद झाला. ह्या लोकांच्या पायांत ओबडधोबड लांकडी जोडे होते. घरांत शिरतांना ते आपले जोडे बाहेर ठेवीत. आम्हांला बुटांसह आंत जाण्याला लाज वाटू लागली. तरी आम्हांस हे लोक आंत जाण्यास खुशीनें परवानगी देत. धक्क्यावर

टेकून माझा पाळणा हालवीत बसत. त्यांना मुळींच दिसत नसे. मला थोडें थोडें समजत असे. मी त्यांचा लाडका होतों. मला साखरफुटाणे व साखरेंतलें काजू आजोबा खावयास देत, म्हणून मी नेहमीं त्यांच्या आजूबाजूला लाडीगोडी करीत असें. त्यावेळीं आजोबा मला कांहींतरी मजेदार गोष्टी व बालीगतें शिकवीत.

**माझा जन्म**

आजोबा सुमारें १८७८–७९ इसवींत वारले असावे असा माझा तर्क आहे. त्यावेळीं माझ्या बाबांनीं संस्थानाची नोकरी सोडली असें आई म्हणत होती. मी इ. स. १८७३ एप्रिल महिन्याचे २३ तारखेस जन्मलों असा माझ्या जन्मपत्रिकेंत उल्लेख आहे.

**एक स्वप्न**

ह्यावेळची एक गोष्ट आठवते, तिजवरून आजोबांचा मी किती लाडका होतों हें दिसतें. आजोबा वारण्याचे सुमारास मला देवी काढल्या होत्या. त्यावेळीं मी ५ किंवा ६ वर्षांचा होतों. अद्यापि शाळेंत जात नव्हतों. देवी टोंचल्यानें माझे दंड सुजले होते. आजोबांच्या मृत्युमुळें घराणें शोकांत होतें. माझ्या दंडावरील जखमांची हयगय होऊन ते सुजून त्यांत किडे पडलेले कोणीं पाहिलेंच नव्हतें. दहावे दिवशीं दसपिंडीच्या विधीकरितां आम्हीं घरांतील सर्व मंडळी कृष्णा-नदीवर जाणार होतों. आदले दिवशीं रात्रभर माझा हात दुखून मला झोप कशी ती आली नाहीं. माझी आई दिवसां नेहमीं कामांत असे. तिला गाढ झोप लागली होती. तिला स्वप्न पडलें. त्यांत आजोबा माझ्या पाळण्याजवळ मला कुरवाळीत म्हणाले, "पकुल्या, तुझ्या दंडांत किडे पडले. अजून तुझेकडे लेकाचे कुणीच पाहात नाहीं कीं रे !" हें वाक्य ऐकून आई जागी होऊन पाळण्यांत मला पाहूं लागली, तों माझे दंडांत खरेंच किडे बुजबुजत असलेले दिसले. तिनें लगेच बाबांना जागें केलें. नंतर उन्ह पाण्यानें माझे दंड धुवून त्यांत टरपेंटाईन घातल्यावर सर्व किडे बाहेर येऊन माझे हात हलके झाले.

एक दोन मैलांवर आम्ही हिंडलों. एदाम या खेडयांत आम्ही आगगाडींतून उतरल्यावर व्होलंदामपर्यंत सुमारें दोन मैल एका कालव्यांतून जुन्या चालीच्या बोटींतून आम्ही कांहींजण निघालों. या बोटींना एक लांब लांकडी दांडा लावला असून त्यांस खांदा देऊन माणसें बोट पुढें ढकलीत असत. संध्याकाळीं ५ पर्यंत इकडे तिकडे हिंडल्यावर आगबोटींतून आम्ही परत ॲम्सटरडॅमला परत आलों. अशा रीतीनें अगदीं आनंदानें ॲम्सटरडॅम येथील परिषदेचा शेवट झाला.

**कलोन कॅथीड्रल**

ता० ५ सप्टेंबर रोजीं सकाळीं कलोन येथें पोहोंचलों, हॉटेल एविग् लँप-मध्यें उतरलों. लगेच न्याहारी करून येथील प्रसिद्ध कॅथीड्रल पाहाण्यास गेलों. एवढी सुंदर इतिहासप्रसिद्ध इमारत असूनही, बाजारांतील गर्दीच्या भागांत ती कोंडल्यासारखी झाली आहे. मी चौकांतून तिच्याकडे पाहात राहिलों. हातांत कॅमेरा होता. पण चित्रासारखा कितीतरी वेळ आ वासून पहात राहिलो असतां, मलाच कितीतरी लोक पाहून गेले असावेत. आश्चर्याचा आवेग उतरल्यावर मी इमारतींत हळूंहळूं शिरलों. बांधकाम गॉथिक थाटाचें आहे. काळ्या कुरुंदाचा दगड वापरला आहे. उंच निमुळत्या कमानी एकावर एक लागलेल्या असून गॉथिक शोभेची एथें परमावधि झाली आहे.

ता० ७ सोमवारीं १९०३ रोजीं स्वित्झरलंड आणि जर्मनीच्या हद्दीवरील बाझल शहरांत थोडा वेळ राहून त्याच रात्रीं ११ वाजतां, आल्प्स पर्वतांतील ल्यूसर्न या नांवाच्या अत्यंत रमणीय गांवीं पोहोंचलों. हा गांव ह्याच नांवाचे सरोवराचे कांठीं आहे. चार दिवस विश्रांति आणि एकांतवासांत घालविले. मौंट पिलाटुस नांवाच्या आल्प्स् पर्वताच्या शिखरावर मी एकटाच सफर करून आलों. समुद्रसपाटीपासून हें ठिकाण ७००० फूट उंच आहे. जर्मनी सोडून स्वित्झर्लंडकडे जातांना आल्प्स पर्वतांतून सेंट गॉथर्ड नांवाचा १० मैल लांबीचा एक बोगदा आहे. त्यांतून आमची गाडी गेली.

ता० ११ सप्टेंबर रोजीं मी कोलंबसाच्या जिनोवा या गांवीं गेलों. ता० १२ रोजीं कॅम्पो सँटो नांवाची अत्यंत सुंदर स्मशानभूमि पाहिली. इटालियन शिल्पकलेची येथें लयलूट झालेली दिसली. नंतर पांच दिवस रोम शहरीं घालविले. मुंबई विद्यालयांत माझा आवडीचा विषय रोमचा प्राचीन इतिहास असल्यानें हें पांच दिवस माझें मोठ्या बोधाचे गेले. ता० १५ रोजीं रविवारीं व्हॅटिकन् नांवाचा, पोपचा राजवाडा पाहिला. तिसरे दिवशीं पोप पायसचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें. शेकडों भक्तमंडळी दूर अंतरावरून आलेली, यांच्या दर्शनासाठीं रांगेनें बसलेली होती. पोपची स्वारी जवळ येतांच ही मंडळी त्याच्या चरणाचें चुंबन घेत. माझ्यापुढें आल्यावर मी हिंदुस्थानचा रहिवासी म्हणून माझ्यापुढें आपल्या हातांतील आंगठी चुंबनासाठीं पुढें केली. मी चुंबन घेतलें.

सिस्टाईन चॅपेल नांवाच्या एका दालनांत हा प्रसिद्ध भव्य पुतळा एका उंच कट्टयावर ठेवला होता. मायकेल् अँजेलो नांवाच्या प्रसिद्ध

**मोझेसचा पुतळा**

शिल्पकाराला हा महत्त्वाचा पुतळा कोरण्याला ४० वर्षें लागलीं असें सांगतात. दुसरीकडे सेंट पॉलचा लाईफ साईझ पुतळा, हातांत नंगी तलवार घेऊन उभा आहे. चित्रकलेंतील इटालियन लोकांच्या वैभवाला ह्या शहरीं नुसता पूर आला आहे. २००० वर्षांपूर्वींच्या प्राचीन इमारतींचें अवशेष मोठ्या आतुरतेनें पाहिलें; फॅबियन ॲफिथिएटर नांवाची एक अर्धवर्तुळाकार प्रचंड इमारत पाहून गतवैभवाची कल्पना आली. ह्यांत ग्लॅडिएटर नांवाच्या मल्लांचें प्राणांतिक मल्लयुद्ध होत असे. पादाक्रांत परकीय कैद्यांना ( ह्यांत राजेही असत ) ह्या इमारतींचें भुयारांत आणून ठेवीत असत. प्रसंगविशेषीं जनतेची करमणूक व्हावी म्हणून ह्या कैद्यांना बाहेर काढून आपसांत लढवीत असत. तो भयंकर रक्तपात पाहून प्रेक्षकजन आनंद मानीत व मल्लयुद्ध जिंकणाऱ्यावर खुष होत. हे रोमन-स्वराज्याचें लक्षण !

ता. १८ रोजीं मी नेपल्सला गेलों. ह्या बंदराचा देखावा फारच सुंदर

आहे. मुंबईच्या मलबारहिलप्रमाणें, समुद्रकांठावरील एका टेकडीवरून उंच उंच एक रस्ता जातो. आपोलो बंदराप्रमाणें येथें धक्कादी फार सुंदर आहे. मात्र लोकांचा विशेषतः व्हिक्टोरिया-वाल्यांचा अप्रामाणिकपणा वेळोवेळीं नजरेस आला. एक दोनदां तर माझ्या प्राणावरच बेतली होती. माझ्या हॉटेलांतील खिडकींतून घुमसत असलेल्या व्हेसुवियस ज्वालामुखीचा देखावा फार भीषण दिसत होता.

नेपल्स

दोन हजार वर्षांपूर्वी भूकंपामुळें व ज्वालामुखी पर्वताच्या तप्तरसामुळें हें शहर दडपून गेलें होतें. त्याचें आतां उत्खनन होऊन त्याला आतां प्रेक्षणीय स्वरूप आलें आहे. हें नेपल्सपासून सुमारें ४१५ मैल अंतरावर आहे. हें पाहाण्यासाठीं मी ता. १९ शनिवारीं गेलों. गरम राखेचा ढीग वर पडल्यानें त्याच्या खालीं जीं माणसें, जनावरें व इतर वस्तु सांपडल्या त्यांचे हुबेहूब सांगाडे तेथील म्युझिअममध्यें दाखविण्यांत येतात. हे खरे सांगाडे नसून राखेखालीं ह्यांचे जे सांचे बनले होते त्यांत प्लॅस्टर ऑफ पॅरीस ओतून उत्खननकारांनीं हे कौशल्यानें सांगाडे बनविले आहेत. कित्येक इमारतींतील भिंतीवरचे रंग व चित्रें अगदीं ताजी दिसलीं. रस्ते व दुतर्फा ओटे फरसबंदी होते. यावरून जड चाकांच्या चाकोऱ्यांच्या खोल खुणा दिसल्या. एका दिवाणखान्याच्या भिंतीवर कांहीं बीभत्स चित्रें दिसलीं त्यावरून त्या ऐश्वर्याच्या काळांत रोमन लोकाची नीति कशी खालावली होती हें कळलें.

पॉंपी

ता. २१ सप्टेंबर १९०३ रोजीं सोमवारीं नेपल्सहून स्वॉं–टीनो नांवाचे आगबोटीनें मी हिंदुस्थानांत येण्यास निघालों; व ता० ६ ऑक्टोबर रोजीं ४ वाजतां तिसरे प्रहरीं मुंबईला परत स्वदेशीं आलों.

मुंबई बंदरावर कित्येक मंडळी माझ्या स्वागतार्थ जमली होती. मी विलायतेला निघाल्यावर मुंबई प्रार्थना समाजाचे उपाध्यक्ष शेट दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला ह्यांनी परत आल्यावर मिशनरी म्हणून माझ्या राहण्याची स्वतंत्र सोय

स्वागत



**श्री. रामजीबाबा सौ. यमुनाबाई कुमार प्रताप शिंदे.**

( विठ्ठलरावांचे वडील, मातोश्री आणि त्यांचा दुसरा मुलगा )


सन १९०६ सालीं पनवेल येथें असतांना घेतलेला फोटो

व्हावी व इतरही कामांची तजवीज व्हावी म्हणून प्रार्थनामंदिराचे आवारांत एक राममोहन रॉय आश्रम म्हणून तीन मजली इमारत मी येण्यापूर्वीच बांधून ठेवली होती. इमारतीच्या लगतच भगवानदास माधवदास नांवाचे गुजराथी समाजबंधु रहात होते. त्यांच्या बंगल्यांत माझ्या स्वागतासाठीं समाजबंधूंचें संमेलन झालें. डॉ. भांडारकर, चंदावरकर, माडगांवकर वगैरे मंडळी व सर्व वडील थोर माणसें हजर राहून त्यांनीं आनंदानें स्वागतपर भाषणें केलीं. माझे वृद्ध मित्र रा. दिनानाथराव माडगांवकर यांनीं माझ्या स्वागतासाठीं एक पद मुद्दाम रचलें होतें. त्यांत खालील चरण होतें—

तरुण असतां स्वार्थत्यागी तुम्ही दिसतां भले ।
प्रभुवर कृपें धर्माभ्यासीं तुम्हां यश लाभलें ॥
तरि तुमचिया हस्तें धर्मप्रचार बरा घडो ।
तनु मन तसें देवापायीं सदा तुमचें जडो ॥ १ ॥

* * *

येथें माझ्या आयुष्यांतील आठवणींचा पूर्वार्ध संपला. ईश्वरकृपेनें उत्तरार्ध निघाल्यास गुरुजनांचा वरील प्रेमळ आशीर्वाद कितपत सफल झाला हें कळेल.



# पुरवणी

## पुरवणी नं. १— रोजनिशींतील वेंचे

सन १८९८ च्या आरंभापासून मी डायरींत बराच मजकूर लिहून ठेवला आहे. त्यांतील कांहीं वेंचे येथें देणें बरें वाटतें. बी. ए. मध्यें इतिहास हा विषय ऐच्छिक घेतला होता. त्याचें कारण मला हा विषय खरोखर आवडत होता. त्या वयांत मला स्वतंत्र विचार आणि टीका करण्याची संवय कशी लागत चालली हें खालील उताऱ्यावरून दिसतें.

### ( १ ) थोरले शाहूमहाराज

ता. ३१ मार्च १८९८

**थोरल्या शाहूचे चरित्रावरील विचार**

मल्हार रामराव चिटणीसकृत थोरले शाहुमहाराजांचें चरित्र आतां नुकतेच वाचून संपलें. या बखरींतील कांहीं कांहीं मुख्य गोष्टींचे शक चुकले आहेत. पुष्कळ गोष्टी मागेपुढें लिहिलेल्या आहेत. दाभाडयांच्या घराण्याची व पेशव्यांची चुरस, पेशव्यांचा व भोसल्यांचा तंटा (नानासाहेब व रघुजी भोसले यांचा), पेशव्यांचा व प्रतिनिधी यांचें वैमनस्य इत्यादि ऐतिहासिक महत्त्वाच्या वादग्रस्त बाबींचा विचार करावा तितका बखरकारांनीं केलेला नाहीं. यावरून चिटणीसाजवळ बरेच कागदपत्र असूनही त्यांचा उपयोग त्यांनीं किती केला असेल याची शंका वाटते. सर्व प्रसंगीं पेशव्यांची तरफदारी केलेली आढळते. ज्या बाळाजीवर ग्रांटडफ आपमतलबीपणाचा व अराजनिष्ठतेचा आक्षेप करतो व ज्यानें सकवारबाईस जुलमानें सती जाण्यास भाग पाडलें असे डफ म्हणतो, ज्या बाळाजीनें शाहूचे मरणानंतर सातारा हा राजकीय तुरुंग व पुणें हीच मराठ्यांची राजधानी केली, हे तर इतिहासप्रसिद्धच आहे, त्याच बाळाजीची एकाद्या कृतयोगांतल्या सेवकांस शोभतील अशी, बावनकशी राजनिष्ठेचीं उदाहरणें बखरींत सांगितलीं आहेत व त्याच

उदाहरणांवरून शाहुची हुकुमत किती होती हें दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. पण ज्याचे विलासी कारकीर्दीत बहुतेक प्रधान व सरदार शिरजोर होत चालले होते त्याचेच आज्ञेवरून सर्व गोष्टी होत होत्या असें म्हणण्यास याहून फारच निराळा पुरावा पाहिजे.

शाहूची कारकीर्द म्हणजे मराठेशाहीची ( पेशवाईची नव्हे ) भरभराट होय. शिवाजी महाराजांनीं कमावले, संभाजी महाराजांनीं गमावलें, राजाराम महाराजांनीं सावरलें, शाहूनें " शहाण्या " प्रधानाच्या मदतीनें वाढवलें व उपभोगिलें. शककर्त्या महात्म्याचा कडवेपणा संभाजी महाराजांत उतरला, राजकीय धोरण व हिंमत राजारामांत उतरली व अवशेष राहिलेला व्यक्ति विषयक चांगुलपणा तेवढाच शाहूमहाराजांचे वांट्यास आला. ह्या राजश्रींनीं मराठ्यास न शोभणारे गुण, विलास, नेभळेपणा व परावलंबिता इत्यादि, मोंगली झनानखान्यांतून आणले होते. त्या योगानें मोठमोठ्या व्यक्तींनीं त्यांचेभोवतीं जमून त्यांचे नांवाचे आश्रयाखालीं राज्याची मर्यादा जरी दूरवर वाढवली तरी सर्वाकर्षक मध्यशक्तीचा कमजोरपणा त्यांना दिसून चुकल्यामुळें ते डोईजड होऊन परस्पराशीं विरोध करूं लागले. व शाहुचे मरणानंतर मध्यशक्तीचा पूर्ण ऱ्हास होऊन अगर तिचें रुपांतर होऊन ते स्वतंत्रपणे वागूं लागले. येथेंच मराठेशाही संपली ! नारायणरावाचे खुनानंतर पेशवाईचीहि अगदीं अशीच स्थिति होऊन साताऱ्याप्रमाणें पुण्यासहि एक राजकीय तुरुंग झाला. शिंदे व फडणीस यांचे मध्ये दंडेली चालली. पुढें महादजीच्या व सवाई माधवरावांच्या मरणानंतर सर्व जगाच्या इतिहासास काळीमा लावणारी म्हारकी सुरूं झाली. तिचा लय १८१८ त झाला. कुठें शिवाजीमहाराजांनीं केलेला मराठेशाहीचा उदय आणि कुठें रावबाजीनें चालवलेल्या म्हारकीचा अंत ! पण या राक्षसी भेदाची जबाबदारी एकट्या शिवाजीमहाराजांवर किंवा रावबाजीवर नाहीं; तर ती सर्व मराठ्यांवर आहे; एवढें तरी समजल्यास पुष्कळ झालें. नाहींतर रावबाजीस शिव्यांची लाखोली व शिवजयंत्युत्सव यांतच आम्ही दमून जाणार. "

* * *

गतेतिहासाप्रमाणें चालू गोष्टीकडेहि माझी विवेचक नजर होती. हें खालील उताऱ्यावरून कळेल—

## ( २ ) वसंत व्याख्यानमाला

ता. ३० सोमवार, मे १८९८

" यंदा मालेची फार दैना दिसत आहे. दुष्काळ व प्लेग यामुळें फुलें ( मालेची ) कां महाग व्हावी हें कळत नाहीं. पण 'वर जातीची' फुलें मिळाली नाहींत म्हणून कोरांटीची व बाभळीचीं फुलेंच मालाकारांनीं जमवण्याचा सपाटा चालवला आहे. यावरून एक नुसती लांबलचक माळ कशीबशी तयार केली कीं काम आटोपलें असें यांना वाटतें.

पुण्यास, जर आपण विद्वत्तेचे आगर आहों, अशी खरीच प्रौढी मिरवायची झाल्यास त्यानें आपली जबाबदारी यापेक्षां चांगल्या रीतीनें जाणली पाहिजे. उठल्यासुटल्यानें भाषणें दिल्यानें महाराष्ट्राची किंबहुना हिंदुस्थानची अब्रू जाणार आहे. माझ्या मतें असल्या मालेच्या द्वारें कांहीं खऱ्या विद्येचे विलास लोकापुढें आले पाहिजेत. नुसतें वक्तृत्व पाजळणें, शाळेच्या चार शेंबड्या पोरांकडून टाळ्या घेणें किंवा सर्वांस माहीत होऊन शिळ्या होत आलेल्या चालू चळवळींचें चर्वीतचर्वण करणें, वगैरेकरतां ही माला नव्हे. महाराष्ट्रांतल्या चार विद्वान् डोक्यांत विचारांच्या ज्या कांहीं घालमेली होत असतील त्या सर्व या मालेच्या रूपानें लोकांपुढें आल्या पाहिजेत. म्हणजे माला ही ह्या अंतस्थ उलाढालींचे कार्य झालें पाहिजे. असे न होतां ह्या मालेची संस्थाच माला सुरूं होण्यापूर्वीं फार झालें तर महिनाभर कांहीं महत्वाकांक्षी व अधिक प्रसंगीं तरुणांच्या डोक्यांत आपण काय बोलावें व कसें बोलावें इत्यादीविषयींच्या विचारांचे काहूर उठवण्यास, कारण होते. लोकांपुढें कांहीं महत्त्वाच्या गोष्टी यावयाच्या असतात म्हणून

माला होते असे नसून मालेचा संप्रदाय आहे म्हणूनच कांहीतरी शिळोप्याच्या गप्पा होतात. आमच्या व्याख्यानमाला व आमचे विवाह यांच्यात बरेच साम्य आहे. विवाह झाला म्हणून जोडप्यांस एकमेकांवर प्रीति करणें भाग आहे. प्रीति असते म्हणून विवाह होत नसतो. ''

*　　　*　　　*

## ( ३ ) प्रो. गोखले यांचें व्याख्यान

**प्रो. गोपाल कृष्ण गोखले यांचें भाषण**

आज सायंकाळीं ( शनिवार ता. १६ एप्रील १८९८ रोजीं मद्रास टाईम ४ वाजतां ) आमच्या कॉलेजांतील हॉलमध्यें "इंग्लंडांतील व हिंदुस्तानांतील शिक्षण " या विषयावर इंग्रजींत सुमारें दीड तास, प्रो. गोखले यांचें उत्कृष्ट भाषण झालें. एकाग्रतेनें भाषण ऐकण्याची उत्कंठा दाबवेल तितकी दाबून मला जी कांहीं थोडीबहुत टिपणें घेतां आलीं त्यावरून खालील सारांश देत आहे. प्रो. गोखले म्हणाले,

" इंग्लंडला जाऊन आल्यापासून माझ्या आयुष्यांत पालट झाला आहे. विचार, मत व कल्पना यांस निराळेंच वळण लागलें आहे. इंग्लंडांतील उत्तम व विविध प्रकार व त्याचा अवाढव्य प्रसार पाहून मी थक्क झालो. मुलें ७ वर्षांचीं झालीं कीं प्रत्येकास शाळेंत घातलेंच पाहिजे असा सक्तीचा सरकारी कायदाच आहे. हें सक्तीचें शिक्षण प्राथमिक असून Board Schools मध्यें गरिबांस मोफत शिक्षण मिळतें. त्यांत धार्मिक शिक्षणाची भेसळ होत नाहीं. शिक्षणपद्धति मुलांस होतां होईल तों मनोवेधक होईल अशी आहे व मुलांच्या स्वाभाविक शक्तींचा विकास होईल अशीच असते. शिक्षक नेमावयाचे ते हुशार व अनुभविक नेमतात. शिक्षकांनीं तेवढ्याच धंद्याकडे आपलें आयुष्य वाहिलें असतें. मुलांस मानसिक व नैतिक शिक्षणहि दिलें जातें. सभ्य गृहस्थ व सभ्यपणा हे इंग्रजी भाषेंत विशिष्ट गुण होऊन बसले आहेत. दुसऱ्यानें नांवें ठेवण्यासारखें एकहि कृत्य त्यांचे नजरेस आलें तरी ते त्याचा बभ्रा

किंवा उहापोह करणार नाहींत. प्रसंगाशिवाय दुसऱ्याच्या वाटेस जाणार नाहींत, अपमान करणार नाहींत किंवा नेभळेपणानें सहनहि करणार नाहींत. असल्या सभ्यपणाचे परिणाम शाळांतून घडतात. तरी ते विशेषकरून गृहशिक्षणापासूनहि होतात. त्याचप्रमाणें कॉलेजचें शिक्षण, तेथील प्रोफेसरांची विद्वत्ता व योग्यता पाहून येथील इंडियन प्रोफेसरशिपची मला फारच लाज वाटली. स्वतःचे बरेच मूळग्रंथ लिहून विषयांच्या ज्ञानांत जास्त भर घातल्याविना प्रोफेसराचें पद मिळत नाहीं. टॉड हंटरनें इतकीं पुस्तकें लिहिलीं तरी तो नुसता फेलोच आहे. क्लासांत रोज लेक्चर देणाऱ्यांचा ट्यूटर्स नांवाचा निराळाच वर्ग असतो. ट्यूटर्सहि फार जाडे विद्वान असतात. प्रोफेसरांचीं व्याख्यानें वर्षांतून फार तर ३।४ होतात आणि तीं वर्षभर केलेल्या अध्ययनांचे दिग्दर्शनेंच असतात. प्रोफेसरांनीं अमुक एक केलें पाहिजे असें कांहीं नियम नसतात. त्यांच्या आवडत्या व्यासंगाला योग्य तो वाव दिला जाण्याची विद्याधिकारी खबरदारी घेतात. आपण शिकत असलेल्या शाळेंतच आपल्या मुलांनीं जावें अशी तेथील आईबापांची इच्छा असते आणि एकदां तो शाळेंत गेला कीं अखेरपर्यंत ( सिव्हिल सर्व्हिसपर्यंतहि ) तेथेंच त्याचा अभ्यास व्हावा अशी व्यवस्था असते. वरील प्रकारचें शिक्षण शिकण्यांत आपला पुढें चरितार्थ चालावा असा उद्देश तेथें कोणाचा नसतो. त्यामुळें सर्व लक्ष नुसते परीक्षा पास होण्याकडेच नसते. कांहीं दिवस कॉलेजच्या उच्च वातावरणांतच त्यांस अधिक महत्त्व वाटत असते. युनिव्हर्सिटींत असतांना परीक्षेच्या शिक्षणाच्या परिणामापेक्षां मुलांच्या मनावर सहशिक्षणाचा परिणाम होऊन त्यांच्या स्वभावाचा विकास फारच समाधानकारक होतो. क्लब्ज Clubs, Reading Rooms, Play grounds यांतून खेळण्याकडेच अध्यापेक्षां अधिक वेळ जातो. लाखों पुस्तकांच्या जंगी लायब्ऱ्या असतात. हें सर्व पाहून मी इतका स्तिमित झालों कीं आपण दहा वर्षांचा होऊन येथें शिकावयाला राहिलों तर फार बरें होईल असें वाटलें.

आमच्याकडे पहावे तर शिक्षणाचा बाजारच भरत आहे. मुलांच्या आवडीकडे दुर्लक्ष्य करून शिक्षण त्यांचे डोक्यांत एकसारखे कोंबले जात आहे. येथील प्रोफेसर्स तेथल्या टयूटर्सची देखील बरोबरी करूं शकत नाहीं. येथील कॉलेजांचा उद्देश हलका, पद्धत दूषित, शिक्षण अपुरे, एककल्ली व नकली ! " इत्यादि इत्यादि.

भाषण झाल्यानंतर सभेचे अध्यक्ष प्रिन्सिपॉल राजवाडे हे आपल्या अध्यक्षीय भाषणांत घोकंपट्टी व पोकळ ज्ञान याविषयीं म्हणाले कीं, "ज्या अर्थी आम्ही शिकतो हें ज्ञान अगदी नवीन व उसने मागून आणलेलें आहे त्याअर्थी तें आपल्या पदरीं पडलें असें नुसतें वाटायला निदान घोकंपट्टीच पाहिजे. परक्या देशांतील ह्या झाडाची लागवड तूर्त कांहीं दिवस तरी अशा जबरीच्या उपायानेंच एथें करावी लागत आहे हें खरें. पण त्याला उपाय नाहीं. तसेंच तिकडचे प्रोफेसर्स व इकडचे प्रोफेसर्स यांमधील लज्जास्पद अंतर पाहून तर मी खचूनच गेलों. असें वाटते कीं जागेचा ( प्रिन्सिपॉलशिपचा ) राजीनामा देऊन स्वस्थ बसावे !" तेव्हां गोखले, "छे छे," असे उद्गारले. त्यावेळीं श्रोतृसमाज मोठ्यानें हसला. स्वतः राजवाडेहि हसू लागले. शेवटीं समारोपाचे भाषणांनंतर सभा विसर्जन पावली.

गोखल्यांच्या भाषणावर मी पुष्कळ विचार केला. त्यांनीं केलेल्या इंग्लंडांतील शिक्षण पद्धतीचें वर्णन पुष्कळच एकतर्फी आहे. खुद्द इंग्लंडांतहि तेथील शिक्षण पद्धतीबद्दल सारखी ओरड आहे. यासाठीं त्यांनीं तिचे कांहीं दोषहि दाखवावयास हवे होते. ती संपूर्णतः निर्दोषी असेल असें मुळींच वाटत नाहीं.

हिंदुस्तानाला युरोपांत शिकण्यासारखे अद्यापि पुष्कळच आहे व ते हिंदुस्थान शिकत आहेच. पण स्वतः युरोपलाहि हिंदुस्तानांत शिकण्यासारखे अजूनहि बरेच आहे. तें मात्र स्वतः हिंदुस्तानच पाश्चात्य सुधारणेच्या दडपणाखालीं विसरत चाललेला आहे; मग युरोप कोठून शिकणार ?

* * *

## ( ४ ) विशाळगडची सफर

**सफरीचा बेत**

सन १८९९ च्या उन्हाळ्यांत प्लेगचा कहर पुण्यांत सुरू झाला. सुटीमुळें मी जमखंडीस आलों होतों. चि० जनाक्का हुजुरपागेच्या शाळेंतून येणार होत्या. अनेक खाजगी गोष्टीनें मन फार उद्विग्न झालें होतें. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध डोंगरी किल्ले पाहण्याची फार हौस होती. सृष्टीची शोभा पाहणें व ऐतिहासिक दृष्टि हे दोन हेतू होते. मी बरेच किल्ले पाहिले होते. तरी त्यांतल्यात्यांत विशाळगड हा अगदीं एकीकडचा प्रचंड मनोहर किल्ला पाहावयाचे मनांत आलें. बरोबर जनाक्काला घेऊन जावयाचा बेत करूं लागलों. कोल्हापूरचे गोविंदराव शासने यांना घेऊन ता. २१ एप्रील १८९९ रोजीं पन्हाळगडाला पोंचलों. चार दिवस पन्हाळा आणि पावनगड पाहिला. वासुदेवराव सुकठनकरांची आईबाप, बहिणभाऊ वगैरे मंडळी पन्हाळ्यास राहात होती. आमचे मित्र चिंतामणराव कुलकर्णी, हर्डीकर, गोविंदरावचे मित्र भाऊसाहेब माने वगैरे मंडळी पन्हाळयास आली. सगळे एकत्रच राहात होतो व मजेत हिंडत होतों.

**वाडी रत्नागिरी**

ता. २५ एप्रील रोजीं मंगळवारीं चैत्री पौर्णिमेच्या दिवशीं जवळच्या ज्योतिबाचे डोंगरावर वाडी रत्नागिरीची मोठी यात्रा भरत असे. प्लेगमुळें मोठी यात्रा भरली नव्हती. १२ जोतिर्लिंगापैकीं हें एक ठिकाण आहे. आसपासच्या खेड्यांतून ज्योतिबाच्या उंच काठ्या ( सासणी ) सुमारें २० आल्या होत्या. ह्या काठ्या म्हणजे बांबूचे उंच सोट, कापड अगर चीट गुंडाळलेले व मधोमध तोल राखण्यास दोर लावलेले असा असतात. खालून ५।६ फूट अंतरावर लाकडी जाड फळी बसवलेली असते. ह्या फळीवर देवाची लहान उत्सवमूर्ती ठेवलेली असते. तरुण उमेदीचे लोक ही फळी काठीसह डोक्यावर घेऊन देवळांस

तीन प्रदक्षिणा घालीत असतात. भोंवतीं ७।८ जण दोन्यांनीं तोल संभाळतात. वाद्यांच्या गजरांत सर्व बेहोष नाचतात. कितीही तोल संभाळला तरी केव्हां केव्हां काठी माणसावर पडते. देवाला मांसाचा नैवेद्य चालतो. देवाला गुलाल, खारका, खोबरें, यांची मोठी आवड दिसते. मुख्य दैवत ज्योतिबा त्याचे तोंड दक्षिणेस कोल्हापूराकडे आहे. आवारांत तीन उंच शिखरें आहेत. यावरून तीन मुख्य दैवतें येथें दिसतात. एका भागांत महादेवाचें लिंग असून तें स्वयंभू आहे असें म्हणतात. हें ज्योतिबाचे उजवे बाजूस उत्तराभिमुखी आहे. ह्या लिंगाचे उजवे बाजूस पश्चिमामुखी एक देवी उभी आहे. हिचें नांव चोपडाई असून ती ज्योतिबाची आई असें सांगतात. तिसरें दैवत ज्योतिबा अथवा केदारलिंग होय. देऊळ सुंदर, मोठे व मजबूत असून त्यावरील काम सुंदर कोपरेदार आहे. दक्षिणेंतील सौंदत्तीचे यल्लम्माचें देऊळ असेंच आहे. मंडपाचे डावे बाजूस तुकाईची मूर्ति आहे. उत्तरेकडे लांब खालच्या बाजूस यमाईची मूर्ति आहे. यमाई ज्योतिबाची बहिण म्हणतात. ती त्यास नवरी पहाण्यास गेली होती. नवरी सांपडली नाहीं म्हणून यमाई बाहेरच राहिली. केदारविजय म्हणून एक पोथी आहे तींत येथील सर्व महात्म्य आहे.

**पांडवदरी**

ता. २६ सकाळीं ९ वाजतां दशम्या वगैरे करून घेऊन जनाक्कासह आम्ही सर्व मित्रमंडळी पायीं चालत पांडवदरीस निघालो. ही दरी पन्हाळ्याचे पश्चिमेस पांच मैलांवर आहे. दरम्यान म्हसाईचें मोठें पठार ओलांडावें लागतें. हें पठार बहुतेक पन्हाळ्याइतकेंच उंच असून वर अफाट व सपाट मैदान आहे. पन्हाळ्याचा हुंडाबुरुज व हें पठार यांस मध्यें एका उंच पातळ सुळकेदार नैसर्गिक भिंतीनें जोडलें आहे. ही भिंत सुमारें अर्धा मैल लांब असून हिच्या शिरोभागीं दहावीस फूट उंच अणकुचीदार दगड उभे आहेत. ते पांढरे असल्याकारणानें ही भिंत नुकतीच घासलेल्या करवतीप्रमाणें तीक्ष्ण व

चमकदार दिसते. या दगडांतून वाघाला राहण्याची चांगली सोय आहे. शिवाय ह्या उंच भिंतीमुळें पन्हाळयाच्या दक्षिणेस रांगण्यास जावें लागलें तर पावनखिंडींतून वाट आहे. नाहींतर पावनगडास किंवा म्हसाईच्या अवाढव्य पठारांस वळसा घालावा लागतो. म्हणूनच नरवीर बाजी देशपांड्यानें पावनखिंड अडविली होती. अशा मनोहर कड्यास घाटशीळ म्हणतात. पन्हाळा उतरून म्हसाईचे पठारावर चढतांना खंडाळयांतील Tiger leap नांवाच्या अति-खोल दरीची आठवण होते. या बाजूवर दाट उंच झाडी आहे. वाटेंत झऱ्या-वर जागजागीं रेड्याची लहान मोठीं पावलें खडकांत खोल रुतलेलीं दिसलीं. महिषासूरमर्दिनीनें महिशासुरांशीं तुळजापुरापासून लढत येऊन येथें त्याचा वध केला असल्याचें सांगतात. चार मैल चालून गेल्यावर पांडवदरीजवळ म्हसाईचें लहानसें देऊळ लागते. येथें तुंबळ युद्ध झाल्याचे सांगतात. रेड्याची व माणसाची पुष्कळ पावलें वीत वीतभर खोल उमटलीं आहेत. ही देवी नवसास फार पावते. हे नवस म्हणजे "अमक्याने आमचे असे वाईट केले म्हणून म्हसाई तूं त्याचे वाईट कर" असें असतात. येथें नेहमीं पशूंचें रक्त सांडलेलें असतें. बारा वाजतां पांडवदरींत उतरलों. तोंच उदास वाटूं लागलें म्हणून जना-क्कानें कांहीं भक्तीपर पदें गायिलीं. पांचाचे सुमारास पन्हाळयास परत आलो. या पांचसहा दिवसांचे प्रवासांत आम्हांला रोज निदान १०।१५ मैलांची तरी चाल पडत असे. पन्हाळा व पावनगड हे टुमदार व सुंदर किल्ले असून भोंवतालीं सुंदर वनश्री आहे.

**मलकापूर**

ता. २७ एप्रील १८९९ रोजीं संध्याकाळीं बरोबर ७ वाजतां बैलगाडीं-तून विशाळगडास निघालों. बरोबर जनाक्का, गोविंदराव शासने, भाऊसाहेब माने, चिंतामणराव कुलकर्णी आणि हर्डीकर इतकी मंडळी होती. रात्रीची वेळ, वाटेंत चोर-ट्यांची भीति होती म्हणून आम्हीं बराच वेळ गाडीमागून चालत होतों. बांबोड्याचे धर्मशाळेंत दोन तास निजून सकाळीं मलकापुरास ८ वाजतां

पोहोंचलों. हा गांव सुमारें तीन चार हजार वस्तीचा असून येथें कोल्हापूरचे पंत प्रतिनिधी श्रीमंत विशाळगडकर यांची राजधानी आहे. हा भाग पन्हाळ्याचे दक्षिणेस २१ मैलांवर आहे.

दुसरे दिवशीं मलकापुराहून तिसरे प्रहरीं निघालों. तेथून सारखी चढण लागते. मांजरे गांवाला येईपर्यंत रात्रीचें ११ वाजलें.

**गजापूरचें रान**

तेथें जंगलांतच निजून पहाटे तीन वाजतां निघालों. चांदणें पडलें होतें. वाटेनें दाट जंगल लागलें. येथून मात्र पहाटेपर्यंत पारधीचें किर्र जंगल लागलें. दुतर्फा एकमेकांशीं लागलेले गगनचुंबी वृक्ष स्तब्ध तपस्याप्रमाणें उभे होते. त्यावरून दाट रानवेली शेंडयापासून बुडख्यापर्यंत लोंबत होत्या. वाट चढणीची म्हणून बैल हळू चालले होते. मधून मधून पालवींतून चांदण्याचे ठिपके पडले होते. चहूंकडे इतकी सामसूम होती कीं गाडीच्या चाकाचा आवाज व बैलांच्या गळ्यांतील जंगांचा नाद अरण्यभर गुंगत होता. आमचा गाडीवानही रंगेल गडी होता. "माझ्या चतुरा बैला चल. माझ्या पट्टाण्या बैला वड" इत्यादि लकेऱ्या मुक्तकंठानें मारूं लागला. त्याचे गंभीर प्रतिध्वनी उमटूं लागले. एकही घातूक जनावर भेटलें नाहीं. आम्हांला वाटलें कीं गाडीवानाच्या ताना ऐकून हिंस्र पशुंनाही झोंप लागली असावी. कैद्याप्रमाणें गाडींत बसवेना म्हणून मी खालीं उडी टाकली. कुलकर्णी व हर्डीकरही उतरले. आम्ही उतरूं नये म्हणून जनाक्कानें पुष्कळ आग्रह केला. याच रानांत कोल्हापूरकर व इचलकरंजीकर वाघाची शिकार करतात. इकडून अस्वल येईल काय, तिकडून वाघ येईल काय अशा धास्तींत वाट चालत होतों. पण एका कपिवर्गाशिवाय आमचे कोणीच स्वागत केलें नाहीं. कारण असले अश्रुतपूर्व गाणें-बजावणें ऐकून तटस्थ न होणारा एका चावट माकडाशिवाय दुसरा कोण अरसिक प्राणी आहे! पहाट झाली, आम्हाला अत्यानंद झाला. जंगल संपून उघडयावर आलों तोंच एक सुंदर स्वच्छ

नदी सामोरी आली. ही पहाट मी कधीं विसरणार नाहीं.

**विशाळगड**

ता. २९ एप्रील रोजीं सकाळीं गजापुरास पोहोचलों. पुढें गाडीची वाट नाहीं म्हणून ह्या उमद्या गाडीवानाला परत लावले. पेठेपासून पांच पैसे देऊन आमचा बोजा उचलण्यास एक हमाल केला. पेठ नांवाचीच होती. नारळाशिवाय कांहीं सामान मिळालें नाहीं. डोंगर चढलों तरी गड कांहीं दिसेना. शेवटीं अगदीं शिखरावर पोंचलों तों एकदम भयंकर खोल खंदक आणि त्यांत वर्षीत कप ठेवावा असा किल्ला व त्याचे सरळ तुटलेले काळे कडे पाहून आश्चर्याचा धक्का बसला. बराच वेळ पहात उभे राहून मग खंदक उतरूं लागलों. आठ वाजतां गडावर पोहोंचलो. हा गड पन्हाळ्याहून सुमारें ४० मैलांवर नैऋत्येस आहे. नांवाप्रमाणें खरोखरीच विशाल आहे. इतर गडाप्रमाणें आसमंतांतील टेकड्यांवरील चौथ्यऱ्यावर हा आरूढ झाला नसल्यामुळें अगदीं जवळ गेल्याशिवाय गड असा ओळखतच नाहीं. किल्ला पाहण्याचा जर कोणाचा पहिलाच प्रसंग असेल तर त्यांनीं हा किल्ला अवश्य पहावा. मुद्दाम खणून तयार केल्याप्रमाणें दिसणारा अति गंभीर खंदक, त्याचप्रमाणें सरळ उभे असलेले गडाचे कडपे, त्यांना बुरुजाप्रमाणें आधारभूत झालेल्या व टोंकांपासून खंदकांत दूरवर उतरत येणाऱ्या डोंगराच्या तीक्ष्ण धारा, जागजागीं ह्या धारा तुटल्यामुळें कित्येक वर्षें तसेंच खडे राहिलेले, शूर व धिप्पाड गडकऱ्याप्रमाणें भासणारे, काळे उंच फत्तर हें सर्व निसर्गाचें विराटस्वरूप पाहून प्रेक्षकांस एकामागून एक आश्चर्याचे जबर धक्के बसल्यावांचून राहात नाहीं. गडावर श्रीमंत मलकापूरकरांचा वाडा आहे; त्यांत आम्ही दोन दिवस आनंदांत काढले. भूक इतकी तीव्र लागे कीं एकमेकांस फाडून खाण्याची इच्छा होई.

गेलेल्या वाटेनें परत न येतां पश्चिमेकडे खालीं कोंकणांत उतरलो. कोणी हमाल न मिळाल्यानें सर्व बोजा आम्हीच वाहून घेतला.

**अंबाघाट** एकांतांतील कोंकणवस्ति रमणीय दिसली, पण ती पहाण्यास वेळ नव्हता. पुन्हां वर चढून शेवटीं ता. २ मेच्या सुमारास दोनप्रहरीं अंबाघाटावरील आंबेगावांतील धर्मशाळेंत एक दिवस काढला. कच्च्या फणसाची भाजी अतिशय गोड लागली. भाड्याची दुसरी गाडी करून पन्हाळ्यास परत आलो. हा प्रवास फारच सुखाचा आणि धाडसाचाही झाला.

---

## पुरवणी नं. २

### मॅन्चेस्टर कॉलेजचे दाखले

मी ऑक्स्फोर्ड एथील मॅन्चेस्टर कॉलेजमध्यें दोन वर्षें राहून कॉलेजच्या परीक्षेंत चांगला पास झालो होतो तरी मला कोणतीही पदवी मिळाली नाहीं. याचें कारण हें कॉलेज अगदीं नव्या विचाराचें आणि सुधारलेल्या वळणाचें आणि ऑक्स्फोर्ड कॉलेज हें अगदीं जुन्या खिस्ती धर्माला चिकटून असलेले होते म्हणून या कॉलेजला ऑक्सफर्ड विश्वविद्यालयानें मान्यता देणें शक्य नव्हतें म्हणून मॅन्चेस्टर कॉलेजने आपल्या स्वतःचा डिप्लोमा ( Diploma ) दिला. बडोद्याचे महाराज सर सयाजीराव गायकवाड यांनीं मला ऑक्स्फोर्डला जाण्यासाठीं प्रवासखर्च दिला होता व येण्यापूर्वी अभ्यासाचा दाखला कॉलेजच्या अधिकाऱ्याकडून योग्य रीतीनें आल्यास परत प्रवासखर्च मिळेल अशी अट घालण्यांत आली होती. त्या अटीप्रमाणें मॅन्चेस्टर कॉलेजचे प्रिन्सिपॉल व माझे खास ट्यूटर ( Tutor ) या दोघांचे दाखले खालीं दिले आहेतः—

( 1 )

Manchester College.

Oxford, March 4, 1903.

The following is the report of Mr. V. R. Shinde presented to the Committee in June 1902:—

Mr. V. R. Shinde, from want of previous preparation has had considerable difficulty in following the lectures on the New Testament. He has not attended the classes in the Old Testament. He has written two philosophical essays, showing original thought, one on Self-realization and the other on the Genesis of Free-will. He wrote excellent fortnightly papers during the Lent term on subjects connect with the History of Religion in India. During the Summar term he read Pali, weekly with Mr. Carpenter, and made excellent progress through his knowledge of Sanskrit. He has sent in a very thoughtful essay on Theories of Incarnation in "Vishnavism and Budhism".

In the present session he has attended classes in philosophy with Mr. Upton, in Old Testament with Mr. Addis; and in Doctrinal Theology with me. With his general conduct in the College we are more than satisfied.

( Sd/ **Dr.** ) **JAMES DRUMMOND,**
**Principal.**

( 2 )

Manchester College

Oxford, March 1st, 1903.

Mr. V. R. Shinde, B. A., has attended my lectures on the History of Religion, during two acadamical years with great diligence and faithfulness. He has prepared a series of papers on subjects prescribed for his study with industry, care and insight; and has shown much ability in his power to condence into short compass the results of considerable reading. The work of the second year which I have had from him, has been naturally in advance of that of the first, and has been in every way satisfactory to me. The subjects have included, Hinduism, Mohammedanism, Zardustrianism and the Religions of China. I may add that during one term, Mr. Shinde read with me every week, in the early Pali Texts of Budhism and showed that his Sanskrit knowledge would enable him to make rapid advance in this branch of study.

( Sd/ **Dr.** ) **J. ESTLIN CARPENTER,**
**Case Lecturer in**
**Comparative Religion.**

समाप्त.



# वत्सला साहित्य प्रकाशन

(स्थापना : जानेवारी १९३९)

## मालेचें ध्येयः—

- बहुजनसमाजास वाङ्मय वाचनाची गोडी लावणें.
- अप्रसिद्ध लेखकांचें मोलाचें लिखाण प्रकाशित करून त्यांस वाव व उत्तेजन देणें.
- ललितवाङ्मयाबरोबर भारदस्त वाङ्मय प्रकाशित करणें. किंबहुना भारदस्त व तात्त्विक वाङ्मयाचीच अधिक निर्मिति करणें.
- पुस्तक विकत घेण्याची आवड प्रत्येकांत उत्पन्न करण्याकरितां, पुस्तकाची किंमत शक्य तितकी अल्प ठेवणें.

## आणि वैशिष्ट्यः—

- मौलिक लिखाण, माफक किंमत व मोहक छपाई.

## वर्गणीदारासाठीं—

[ १ ] **आश्रयदाते**—एकदम अथवा दोन हप्त्यांनीं १०० रुपये एक वर्षांत देणारे.

[ २ ] **तहाहयात सभासद**— एकदम अथवा दोन हप्त्यानें ५० रुपये एक वर्षांत देणारे.

[ ३ ] **ग्राहक**— वार्षिक दोन रुपये देणारे.

टपाल खर्चासह चार रुपये किंमतीची जास्तीत जास्त चार व कमींत कमी दोन पुस्तकें दरवर्षी मालेतर्फे बाहेर पडतील. वर्ष जानेवारीपासून धरलें जाईल.

आश्रयदाते व तहाहयात सभासद यांना मालेचीं सर्व पुस्तकें मोफत पाठविलीं जातील.

ग्राहकास त्या त्या वर्षांतील पुस्तकें प्रकाशित होतांच मोफत मिळतील.

नम्र विनंति— मालेचा पवित्र उद्देश लक्षांत घेऊन सर्व बंधू-भगिनींनीं तिला उदार आश्रय द्यावा.

मालेसंबंधीं सर्व प्रकारचा पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावा—

**जयवन्त बाबुराव जगताप**, बी. ए. ( ऑनर्स )
संपादक : वत्सला साहित्य प्रकाशन
१२४८ शुक्रवार पेठ, पुणें शहर.

# माझ्या आठवणी व अनुभव

कर्मवीर विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिन्दे
यांच्या आत्मचरित्राचा उत्तरार्ध

( १९०३ पासून १९४० पर्यन्तचा वृत्तांत )

पृष्ठें ३०० : किंमत २॥ रुपये

जून १९४१ मध्यें मालेमार्फत प्रसिद्ध केलें जाईल.

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १२ | जन्मानंतर | जन्मापूर्वीं |
| २ | १६ | हे मारले | हे लढाईंत मारले |
| ५ | २ | सुवत्ततेंत | सुव्रत्तेंत |
| १० | २ | आवडत | आठवत |
| ११ | १७ | खार्ली | खालीं |
| १५ | १९ | अंत:कालचें | अंत काळचें |
| १८ | २० | त्याचें | त्यांचें |
| २० | ७ | साण | साणें |
| २६ | २१ | कर्तृत्व | वक्तृत्व |
| ५० | १६ | बालूबाई | वालूबाई |
| ५१ | १४ | क्षुब्द | क्षुद्र |
| ५३ | २३ | १८८३ | १८७३ |
| ५४ | ४ | करावयावी | करावयाचीं |
| ६२ | ९ | लाकडी सुमारें | लाकडी फळी सुमारें |
| ६३ | ११ | येण्याचा | घेण्याचा |
| ६३ | १५ | जाणवें | जानवें |
| ६४ | १० | चांगला | चांगलें |
| ६५ | १६ | मार्गे | मार्गें |
| ६९ | १५ | परिषोष | परिपोष |
| ७० | ११ | देशांत कोठे | देशांत आतां कोठें |
| ७२ | ८ | रॉजर्ले | रॉजर् |
| ७५ | १५ | बाह्य | ब्राह्म |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७७ | १२ | गुळगुळीत | गुटगुटीत |
| ७८ | ४ | मियासो | मियासाहेब |
| ७८ | २२ | तुंगल | तुंगळ |
| ७९ | ११ | कुंदगोलहून | कुंदगोळाहून |
| ८१ | १४ | ममलीचें | मळलीचें |
| ८२ | १७ | दांडक | दांडकें |
| ८७ | ९ | वर्ज | वर्ग |
| ९३ | १० | बावांच्या | बावांचा |
| ९४ | खालून २ | पडत | घडत |
| ९७ | १५ | गुळव्वा | गुळ्ळव्वा |
| १११ | १६ | अंबाबाइच | अंबाबाईचें |
| १११ | १६ | येते. | येतात. |
| १११ | २२ | शिवाय आणि माझ्या | शिवाय माझ्या |
| ११९ | ६ | माझ्या | माझा |
| ११९ | २४ | हरींचिंतनांत | हरि चरीत्रांत |
| १२९ | १७ | वर्ण | वर्म |
| १३६ | खालून १ | पण ह्या | ह्या |
| १३९ | १० | असावा | होता. |
| १५४ | २२ | गुत | गुल |
| १५६ | १७ | पावलींच | पावलीच |
| १६१ | ५ | पाघळीत | पाजळीत |
| १६१ | ११ | ज्ञानलतांनीं | ज्ञानलवांनीं |
| १६४ | ७ | कुरडतणें | कुरतडणें |
| १६४ | १६ | घडघडा | घडघड |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६६ | १९ | ह्यांच्या मालकीचा | ह्यांच्या मामांच्या मालकीचा |
| १६७ | १६ | बावळटाळा | बावळटाला |
| १६९ | १८ | पडत | घडत |
| १६९ | २२ | अडचणींतून पुढें | अडचणींतून सुटका होवून पुढें |
| १७२ | १२ | काळजीनें कर्मांचा | काळजीनें उपास-मारीचा |
| १८५ | खालून १ | कोरेगांवकराचें | कोरगांवकरांचें |
| १८७ | ९ | नव्या–जुन्याची वाढ | नव्या जुन्या संस्थांची वाढ |
| १८८ | १२ | चांदण्यांत | पाहण्यांत |
| १८८ | २० | त्यांच्या पोल्ट्रनी नामक पाहुणचार | त्यांच्या बॉस् कॅसल् या भागांतील पोल्ट्रनी नामक झोपडींत पाहु-णचार |
| १८९ | ५ | लोकसंख्या | लोक संस्था |
| १९४ | ३ | वॉशिंग्टन ॲकेडमी | वॉरिंग्टन अकॅडमी |
| १९४ | ४ | वॉशिंग्टन | वॉरिंग्टन |
| १९४ | ९ | डॉ. माटिनो | डॉ. मार्टिनो |
| १९४ | १३ | प्रो॰ रॉजर्स | प्रो॰ ऑजर्स |
| १९६ | खालून १ | कोणचा | कोणता |
| १९७ | १९ | कॉलेजच | काळीजच ( Heart ) |
| २०१ | १० | अशुद्ध And fills the intevening time with Pali Texts and Hebrew Criticism | |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | शुद्ध | And fills the intervening time<br>With Pali Texts and Hebrew Criticism. |
| २०४ | ७ | शिसारा | शिसारी |
| २०५ | १० | सवलतीनें | सलगीनें |
| २०५ | १८ | प्रेरणसंबधीं | प्रेरणेसंबंधीं |
| २०७ | १४ | रे० समर | रे० समर्स |
| २११ | ३ | लिब्राल | लिब्रॉल |
| २११ | खालून १ | अति | आतूर |
| २१२ | १ | आदामनें | मादामनें |
| २१२ | ४ | स्वतंत्रता मुलीच्या | स्वतंत्रता नाहीं.<br>विवाह मुलीच्या |
| २१२ | ९ | रेस्तोरांत मध्येच | रेस्तोराँ—मध्येंच<br>( Restaurant ) |
| २१२ | २१ | उल्हास | विलास |
| २१३ | १० | परेला शाज | पेर ला शाज |
| २१४ | १ | नीतिकाव्य | नीति, काव्य |
| २१४ | ७ | लोक दोन आदितवारी | लोक दर आदितवारीं |
| २१५ | ६ | आला होता. | आला. |
| २१५ | ८ | मोछरी | मोलरी |
| २१६ | १९ | वाईविषयीं | बाईविषयीं |
| २१७ | ८ | ऑस्टलिस | ऑस्टर्लिटझ् |
| २१८ | २० | ब्रेडपोर्ट | ब्रीडपोर्ट |
| २२३ | ९ | उपाहारालय | उपासनालय ( मंदीर) |

REFBK-0021686